# “मलकापूर नगरपालिकेचा इतिहास (इ.स.१८८४ ते इ.स.२०१०)”

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे
इतिहास विभाग

तात्विक व सामाजिकशास्त्रे विद्याशाखांतर्गत इतिहास विषयातील विद्यावाचस्पती(पीएच.डी.) पदवीसाठी सादर केलेला

शोधप्रबंध

संशोधक
श्री.राजेंद्र रघुनाथ सोनावले

मार्गदर्शक
प्राचार्य डॉ. अमर पांडे

डिसेंबर, २०१७

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या तात्विक व सामाजिकशास्त्रे विद्याशाखांतर्गत इतिहास विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी.) या पदवीसाठी श्री. राजेंद्र रघुनाथ सोनावले यांनी **“मलकापूर नगरपालिकेचा इतिहास (इ.स.१८८४ ते इ.स. २०१०)”** या विषयावरील शोधप्रबंधाचे काम माझ्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केलेले आहे.

सदर शोध प्रबंधामध्ये त्यांनी नमूद केलेली माहिती व संशोधनात्मक विधाने ही माझ्या माहितीप्रमाणे बरोबर आहेत. सदर माहिती त्यांनी इतरत्र कोठेही वापरलेली नाही. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (यु.जी.सी.) २००९ च्या नवीन नियमाला अनुसरून सदर शोधप्रबंधाचे काम केलेले आहे.

स्थळ : मलकापूर
दिनांक : / /

मार्गदर्शक
प्राचार्य डॉ.अमर पांडे
एम.ए.,एम.फिल.,पीएच.डी.
एन. डी. पाटील नाईट कॉलेज,
सांगली.

# प्रतिज्ञापत्र

मी प्रतिज्ञापूर्वक नमूद करतो की, **"मलकापूर नगरपालिकेचा इतिहास (इ.स.१८८४ ते इ.स. २०१०)"** हा शोधप्रबंध मी प्राचार्य डॉ.अमर पांडे यांच्या मार्गदर्शनाखाली टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या पीएच.डी. पदवीसाठी सादर केला आहे. हा शोधप्रबंध इतर कोणत्याही विद्यापीठात कोणत्याही पदवीसाठी सादर केलेला नाही.

स्थळ : मलकापूर

दिनांक : / /

संशोधक

श्री. राजेंद्र रघुनाथ सोनावले

# ऋणनिर्देश

"मलकापूर नगरपालिकेचा इतिहास (इ.स.१८८४ ते इ.स.२०१०)" या शिर्षकाचा शोधप्रबंध तात्विक व सामाजिकशास्त्रे विद्याशाखांतर्गत इतिहास विषयातील पीएच.डी. शोधप्रबंध विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवीसाठी सादर करीत आहे. कोल्हापूर संस्थानांतर्गत विशाळगड जहागिरीचा समावेश होता. या जहागिरीचा कारभार परशुरामपंत प्रतिनिधी पाहत होते. या कारभारासाठी केंद्रस्थान म्हणून मलकापूरची निवड केली. पुढे ब्रिटीश शासनाने या प्रदेशाचा कारभार पाहण्यासाठी एका कमिशनरची नियुक्ती केली. त्या कमिशनरने मलकापूर शहराच्या गरजा लक्षात घेवून मलकापूर नगरपालिकेची स्थापना केली. याच नगरपालिकेने मलकापूर शहराचा विकास करण्यासाठी मोठे योगदान दिले. त्यामुळे नगरपालिकेची माहिती प्रकाशात आणण्याच्या हेतूने मी हा विषय निवडला आहे.

माझे मार्गदर्शक प्राचार्य डॉ.अमर पांडे यांनी मला संशोधनासाठी त्यांचा कामाचा व्याप सांभाळून आस्थेने व सातत्यपूर्ण मार्गदर्शन केले. त्यांचे प्रोत्साहन व कौटुंबिक जिव्हाळा यामुळे मी माझे संशोधन पूर्ण करू शकलो. मी माझ्या गुरूवर्यांचा अंत:करणपूर्वक सदैव ऋणी राहीन.

टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे आदरणीय प्रा.डॉ.बी.डी.कुलकर्णी(अधिष्ठाता, सामाजिक शास्त्रे विभाग) यांनी माझ्या या संशोधन कार्यात मोलाचे सहकार्य केले. तसेच इतिहास विभाग प्रमुख डॉ.सौ.नलिनी वाघमारे व प्रा.डॉ.स्वराली कुलकर्णी यांनीही महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले. याबद्दल मी या सर्वांचे ऋण व आभार मानतो. याशिवाय विद्यापीठातील कार्यालयीन सेवकांचा देखील मी आभारी आहे.

मलकापूर नगरपालिकेचे मुख्याधिकारी श्री. सव्वाखंडे पी.एच. व श्री. गोसावी एस. व्ही. तसेच कार्यालयीन प्रमुख श्री. पाटील ए.के. तसेच सेवक श्री.वारकरी व्ही.डी., श्री.हर्डीकर पी.एस., श्री.पाटील ए.जी. व श्री. पडवळ ए.बी. यांनी माझ्या संशोधनासाठी नगरपालिकेतील रेकॉर्ड विभागातील आवश्यक ती कागदपत्रे उपलब्ध करून दिली. तसेच नगरपालिकेतील सर्व विभागातील अधिकारी व सेवक या सर्वांनी सर्वतोपरी सहकार्य केले. त्याबद्दल मी सर्वाचे आभार मानतो.

माझ्या संशोधनासाठी कोल्हापूर पुराभिलेखागार, नगर वाचनालय मलकापूर, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथील बॅरिस्टर खर्डेकर ग्रंथालय, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे येथील

ग्रंथालय, प्रा.डॉ.एन.डी.पाटील महाविद्यालय, मलकापूर येथील ग्रंथालय, आर्टस्, सायन्स ॲण्ड कॉमर्स कॉलेज, रामानंदनगर येथील ग्रंथालय इत्यादी ठिकाणी मला संशोधनपूरक माहिती उपलब्ध झाली. त्याबद्दल ग्रंथपाल व सर्व सेवकांचे आभार.

मलकापूर नगरपालिकेचे विद्यमान नगराध्यक्ष श्री. केसरकर ए. एम., उपनगराध्यक्ष श्री. पाटील डी. ए., माजी नगराध्यक्ष श्री.राजू भोपळे, श्री. रमेश पडळकर, श्री.रंगराव घेवदे, श्री.दिनानाथ सक्रे, श्री.शामराव कारंडे, सौ. गीता वारंगे, सौ.स्वाती बंके, श्री. बाबासाहेब पाटील तसेच मलकापूर गावातील प्रतिष्ठीत नागरिक श्री. आबा देशपांडे, श्री.जयवंतरावजी काटकर, श्री. राजू प्रभावळकर, श्री.हिरवे सर, श्री. अनिकेत हिरवे, श्री. रोहित जांभळे इत्यादीनी संशो–धनासाठीची आवश्यक माहिती पुरविली. याशिवाय मलकापूर शहरातील ग्रामस्थ श्री.रूपेश वारंगे, श्री. नानासाो कोकरे–देसाई, श्री. अमर खटावकर, श्री. सदाशिव पाटील, श्री.राजमाने यांनीही मला सहकार्य केले. त्याबद्दल सर्वाचे आभार मानतो.

प्रा. डॉ. एन. डी. पाटील महाविद्यालय, मलकापूरचे तत्कालीन प्राचार्य व सध्याचे सहसचिव प्राचार्य डॉ. विजयसिंह सावंत(रयत शिक्षण संस्था, सातारा), प्राचार्य के. एच. शिंदे (आर्टस, कॉमर्स कॉलेज, पुसेगाव), प्राचार्य डॉ. सुनील कांबळे(आर्टस, सायन्स अँड कॉमर्स कॉलेज, रामानंदनगर), प्रा. घाटगे डी. ए., प्रा.भोगे डी. बी., प्रा. रणधीर डी. एस., प्रा. डॉ. पाटील व्ही. एम. प्रा. डॉ. महाले के. एल., प्रा. डॉ. पाटील ए. के., प्रा. वाघमारे आर. व्ही., प्रा. गिरी जी. ए., प्रा. डॉ. कोरडे डी. डी., प्रा. डॉ. माने एस. व्ही., प्रा. डॉ. लवटे एन. एम., प्रा. डॉ. शिंदे एस. पी., प्रा. डॉ. सौ. खोत एम. आर., प्रा. डॉ. जाधव डी. बी., श्री. प्रविण इंगवले इत्यादींनी मला सहकार्य केले त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. तसेच माझ्या नोकरी कालावधीतील विविध महाविद्यालयातील सर्व स्टाफचे मला सहकार्य मिळाले, त्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार.

माझ्या शोधप्रबंधाचे व्याकरणदृष्टया सूक्ष्म वाचन व दुरूस्त्या केल्याबद्दल प्रा.डॉ.सौ.विद्या नावडकर यांचाही आभारी आहे.

माझे आदरणीय वडील(आप्पा) व आई यांचे आशिर्वाद, पत्नी प्रा. सौ. कांचन, भाऊ श्री. अनिल, भावजय सौ. पार्वती, बहीण सौ. सुरेखा, मेव्हुणे श्री. मिलींद, मुलगा चि. प्रतिक,

मुलगी कु. प्रतिमा, पुतणी कु. प्रतिक्षा, भाचे चि. सुमित व चि. अमित, भाची कु. स्मिता या सर्वांच्या प्रोत्साहन व प्रेमामुळे मी हे संशोधन पूर्ण करू शकलो.

या शोधप्रंबधाचे टायपिंगचे अचूक व सुबक काम करून दिल्याबद्दल समृद्धी टायपरायंटींगच्या प्रोप्रा.सौ. वैशाली कोरडे यांचेही आभार.

अभ्यासक

श्री.राजेंद्र रघुनाथ सोनावले

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | प्रकरणाचे नांव | पृष्ठ क्रं |
|---|---|---|
| ● | प्रमाणपत्र | I |
| ● | प्रमाणपत्र(इंग्रजी) | II |
| ● | प्रतिज्ञापत्र | III |
| ● | ऋणनिर्देश | IV-VI |
| १. | मलकापूर शहराची पार्श्वभूमी | १ ते ४५ |
| | विषयाची पार्श्वभूमी आणि महत्त्व, संशोधनाची उद्दिष्टे, संशोधनाची | |
| | गृहितके, संशोधनाची व्याप्ती, संशोधन पद्धती, मलकापूरची व्युत्पत्ती, | |
| | मलकापूरचे भौगोलिक स्थान, विशाळगड आणि मलकापूरची | |
| | ऐतिहासिक पार्श्वभूमी, मलकापूरचे समाज जीवन, आर्थिक जीवन, | |
| | धार्मिक जीवन, मलकापूरातील चळवळी, समारोप | |
| २. | मलकापूर नगरपालिकेच्या स्थापनेचा इतिहास | ४६ ते ७० |
| ३. | मलकापूर नगरपालिकेच्या विकासातील नगराध्यक्षांची भूमिका | ७१ ते १३५ |
| ४. | नगरपालिकेचे सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य विषयक आणि इतर कार्ये | १३६ ते १७८ |
| ५. | मलकापूर नगरपालिकेचे शहराच्या विकासातील योगदान | १७९ ते २०७ |
| ६. | उपसंहार | २०८ ते २२७ |
| | संदर्भ ग्रंथ सूची | २२८ ते २३४ |
| | परिशिष्टे | २३५ ते २४० |
| | नकाशे | २४१ ते २४२ |
| | छायाचित्रे | २४३ ते २५१ |

## प्रकरण पहिले

# मलकापूर शहराची पार्श्वभूमी

१. प्रस्तावना

२. विषयाची  पार्श्वभूमी आणि महत्त्व

३. संशोधनाची उद्दिष्टे

४. संशोधनाची गृहितके

५. संशोधनाची व्याप्ती

६. संशोधन पद्धती

७. मलकापूरची व्युत्पत्ती

८. मलकापूरचे भौगोलिक स्थान

९. विशाळगड आणि मलकापूरची ऐतिहासिक पार्श्वभूमी

१०. मलकापूरचे समाज जीवन

- १) जाती प्रवर्ग व त्यांची कामे
- २) वेशभूषा व अलंकार
- ३) आहार
- ४) सण–समारंभ
- ५) घरे
- ६) सामाजिक व धार्मिक चालीरिती
- ७) धर्मशाळा

११. आर्थिक जीवन

- १) मलकापूरची जमीन
- २) शेती हंगाम
- ३) शेतकरी जीवन
- ४) जलसिंचन
- ५) कृषी उत्पादने
- ६) शेतीची मशागत

७) शेतीसाठी खतांचा वापर

८) मलकापूरातील उद्योगधंदे किंवा व्यवसाय

९) वाहतूक आणि दळणवळण

१०) मलकापूरातील सहकारी बँका

१२. धार्मिक जीवन

१) विठ्ठलेश्वर मंदिर

२) हनुमान मंदिर

३) भीमाशंकर मंदिर

४) महादेव मंदिर

५) अंबाबाई (भवानी) मंदिर

१३. मलकापूरातील चळवळी

१) वसतिगृह चळवळ

२) स्वातंत्र्य लढयातील मलकापूरची भूमिका

३) मंदिर प्रवेश चळवळ आणि सार्वजनिक पाणी चळवळ

१४. समारोप

# प्रकरण पहिले
# मलकापूर शहराची पार्श्वभूमी

## १. प्रस्तावना :–

भारत हा प्राचीन काळापासून ऐतिहासिक आणि राजकीयदृष्टया एक महत्त्वाचा देश समजला जातो. या देशावर अनेक राजघराण्यांनी सत्ता स्थापन केल्या. तत्कालीन सत्ताधीशांनी सत्ता टिकविण्यासाठी लोकांच्या लोककल्याणार्थ अनेक संस्था स्थापन केल्या. या संस्थांच्या माध्यमातून सामाजिक, धार्मिक, आर्थिक, राजकीय आणि न्यायालयीन कामे करण्यात आली. ऋग्वेदकाळात 'गावसभा' अस्तित्वात होती. सुलतान आणि मुघल कालखंडात पंचायतीच्या माध्यमातून स्थानिक लोकांच्या समस्या सोडविल्या जात असत. शिवकाळात गावातील गरजा गावातच भागविल्या जात होत्या. त्यामुळे 'स्वंयपूर्ण खेडी' उदयास आली.मध्ययुगात विशेषतः मुघल राजवटीमध्ये भारतात मोठया प्रमाणात शहरे उदयास आली. आधुनिक काळाचा विचार करता भारताच्या इतिहासात खेडयाबरोबर शहरानांही सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि सांस्कृतिक महत्त्व आहे.

प्रारंभी पोर्तुगीज, डच, इंग्रज, डेन आणि फ्रान्स या देशातील लोक भारतात प्रथम व्यापारकर्ते म्हणून आले आणि ते इथले राज्यकर्ते बनले या सत्तांचा भारतावर कळत न कळत परिणाम झाला. भारतातील पूर्वीची एकत्र कुटुंब पद्धती लयास गेली. ग्रामीण सामुदायिक जीवन नष्ट झाले. तसेच स्वयंपूर्ण खेडी ऱ्हास पावली. विशेषतः ब्रिटीश राजवटीचे भारतावर अनेक सामाजिक, आर्थिक आणि राजकीय परिणाम झाले. राजकीयदृष्टया हा देश प्रथमच एका मध्यवर्ती सत्तेखाली आला. कायदा व सुव्यवस्था, एकात्म प्रशासन आणि न्यायव्यवस्था निर्माण झाली. ब्रिटीश प्रशासन व्यवस्थेचा आजही केंद्रीय, प्रांतीय आणि स्थानिक प्रशासनावर प्रभाव दिसून येतो. यातूनच सन १८५० पासून देशात मोठ–मोठया शहरात नगरपालिका आणि महानगरपालिका स्थापन करण्यात आल्या. महाराष्ट्रामध्ये अनेक नगरपालिका आहेत. त्यामध्ये कोल्हापूर जिल्हयातील शाहूवाडी तालुक्यातील विशाळगड किल्ल्याला ऐतिहासिक महत्त्व आहे आणि याच विशाळगड किल्ल्याच्या पायथ्याशी मलकापूर वसल्याने येथील मलकापूर नगरपालिकेला व शहराला महत्त्व प्राप्त झाले.

या प्रस्तुत प्रकरणामध्ये मलकापूरचा ऐतिहासिक दृष्टिकोनातून अभ्यास करणे. भौगोलिक स्थान, हवामान, क्षेत्रफळ, मलकापूरची व्युत्पत्ती आणि मलकापूरची ऐतिहासिक पार्श्वभूमी इत्यादी बाबींचा अभ्यास करण्याचा प्रयत्न आहे.

## २. विषयाची पार्श्वभूमी आणि महत्त्व :–

भारतात ब्रिटिश राजवटीपासून नवनव्या प्रशासन पद्धतीचा अवलंब होण्यास सुरूवात झाली. स्थानिक कारभाराचे क्षेत्र म्हणून त्यास नागरी स्थानिक स्वराज्य संस्था असे म्हणतात. यातूनच सन १८८४ मध्ये मलकापूर नगरपालिका स्थापन झाली. कारण मलकापूर शहरालगत विशाळगडची जहागिरी प्रसिद्ध होती आणि याच जहागिरीत नगरपालिकेचे बीजारोपण झाले. परंतु काही कारणास्तव नगरपालिकेचे कार्यालय मलकापूरात हलविले. मलकापूर हे शहर अतिशय दुर्गम भागात वसलेले आहे. विशाळगड किल्ल्यामुळे या शहराला ऐतिहासिक वारसा लाभला आहे. या ठिकाणी मोठया प्रमाणात पर्यटक येत असतात. त्यामुळे याचा स्थानिक प्रशासनावर ताण पडत असे. या कारणास्तव नगरपालिकेची निर्मिती झाली. त्यानंतर गव्हर्नर जनरल लॉर्ड रिपन यांच्या कारकिर्दीत १८८२ मध्ये स्थानिक स्वराज्य संस्था विषयक कायदा पास झाल्याने नगरपालिकेसारख्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना महत्त्व प्राप्त झाले.

स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर काळात नगरपालिकेमध्ये समाजकल्याण, महिला व बाल कल्याण, शिक्षण, आरोग्य, बांधकाम, बाजार समिती, यात्रा समिती, विद्युत आणि पाणी पुरवठा विभाग इत्यादी अनेक विभाग सुरू करण्यात आले. या विभागामार्फत नगरपालिकेने सार्वजनिक, शैक्षणिक, आरोग्य, शहर नियोजन, रस्ते, गटार, विद्युत व पाणी पुरवठा, उद्यान व मार्केट, खेळाचे मैदान इत्यादी मुलभूत सेवा–सुविधा मलकापूरातील नागरीकांना व पर्यटकांना पुरविण्यात नगरपालिकेने महत्त्वाची भूमिका बजावली. तसेच मलकापूरच्या नागरीकरणात व विस्तारीकरणात नगरपालिकेची महत्त्वाची भूमिका आहे.

मलकापूर नगरपालिका ही लहान लोकसंख्येसाठी कार्यरत असणारी आणि ऐतिहासिक दृष्टया महत्त्व असणारी नागरी स्थानिक स्वराज्य संस्था आहे. शहरी जनतेचे राहणीमान सुधारणेमध्ये महत्त्वाची भूमिका पार पाडत आहे. परंतु या नगरपालिकेचा ऐतिहासिक दृष्टिकोनातून अभ्यास अद्याप झालेला नाही. शहरी भागातील पायाभूत सुविधांच्या विकासातील योगदानाचा अभ्यास उपयुक्त ठरणारा होता. म्हणून प्रस्तुत अभ्यासासाठी शहरी

पातळीवर काम करणाऱ्या 'मलकापूर नगरपालिका' या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेची निवड करण्यात आली.

प्रस्तुत संशोधनाचा मुख्य उद्देश हा शहरी भागात नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेअंतर्गत लोकांचे जीवनमान समृद्ध करण्यासाठी राबविलेल्या योजना आणि प्रकल्पांचा अभ्यास करणे तसेच लोकांना मिळणाऱ्या पायाभूत सुविधा उदा.पिण्याचे पाणी, शिक्षण, आरोग्य, स्वच्छता आणि महिला सबलीकरण इत्यादी विषयी मलकापूर नगरपालिकेची विस्कळीत असलेली माहिती प्रस्तुत अभ्यासाद्वारे एकत्रितरित्या उपलब्ध होईल आणि त्याद्वारे मलकापूर नगरपालिकेच्या एकूण कार्यावर प्रकाशझोत पडेल अशी आशा आहे.

## ३.संशोधनाची उद्दिष्टे :–

१. मलकापूर शहराची ऐतिहासिक पार्श्वभूमी जाणून घेणे.

२. मलकापूर नगरपालिकेच्या उदय व विकासाचा आढावा घेणे.

३. नगरपालिकेच्या सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य व स्वच्छताविषयक कार्याचा अभ्यास करणे.

४. मलकापूर नगरपालिकेच्या विकासातील नगराध्यक्षांची भूमिका अभ्यासणे.

५. मलकापूर शहर विकासातील नगरपालिकेच्या योगदानाचा आढावा घेणे.

६. नगरपालिकेचे आर्थिक दृष्टिकोनातून कार्य समजावून घेणे.

## ४. संशोधनाची गृहितके :–

१. मलकापूर शहरातील नागरी कारभाराकरीता नगरपरिषदेची स्थापना करण्यात आली.

२. मलकापूर नगरपालिकेत वेळोवेळी राजकीय स्थित्यंतरे झालेली आहेत.

३. नगरपालिकेने प्रशासकीय संरचना विकसनशील केली.

४. नगरपालिकेने मलकापूर शहर विकासात मोलाचे योगदान दिले.

५. मलकापूर नगरपालिकेने उत्पन्नापेक्षा खर्च अधिक केला.

## ५. संशोधनाची व्याप्ती :–

मलकापूर नगरपालिकेचा इतिहास हा विषय स्थानिक इतिहासामध्ये येतो. त्यामुळे संशोधन विषयामध्ये सखोलता यावी, अभ्यासाच्या दृष्टीने सोयीचे व्हावे, मलकापूर नगरपालिकेच्या कार्याचा चिकित्सकपणे अभ्यास करता यावा म्हणून प्रस्तुत संशोधनासाठी ङ्कमलकापूर नगरपालिकेचा इतिहास (सन १८८४ ते २०१०)ङ्ख हा कालावधी जवळजवळ

१२६ वर्षाचा निश्चित केला आहे. यात राजकीय, सामाजिक, आर्थिक आणि प्रशासकीय घडामोडीचा उहापोह करण्यात आला आहे.

## ६.संशोधन पद्धती :-

मलकापूर नगरपालिकेचा अभ्यास करण्यासाठी ऐतिहासिक संशोधन पद्धत, संदर्भ पद्धत, सर्वेक्षण आणि मुलाखत पद्धतीचा वापर करण्यात आला आहे. प्रस्तुत अभ्यासात मराठी विश्वकोश, नगरपालिकेचे वार्षिक प्रशासन अहवाल, नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेवरील विविध पुस्तके, वृत्तपत्रे शिवाय महाराष्ट्र शासनाच्या सरकारी अधिकृत पत्रिका (गॅझेटिअर) अशा अनेकविध प्राथमिक व दुय्यम संदर्भ साधनांचा वापर करण्यात आला आहे. तसेच काही साधनग्रंथ व अप्रकाशित कागदपत्रांचा आधार घेण्यात आला.

## ७. मलकापूरची व्युत्पत्ती :-

मलकापूर हे कोल्हापूर राज्याच्या पंतप्रतिनिधींचे राहण्याचे मुख्य ठिकाण होते. मलकापूर हे गाव जनार्दन पंतप्रतिनिधींनी वसविले. १८४४ मध्ये प्रतिनिधी घराण्याचे प्रमुख ठाणे विशाळगडाहून मलकापूरला हलविल्यानंतर मलकापूरचे महत्त्व वाढले. पंतप्रतिनिधी हे मलकापूर वाडयातूनच विशाळगड जहागिरीचा कारभार करू लागले. त्यावेळी मलकापूर हे मंगलपूर नावाने पूर्वी प्रचलित होते.[१] विशाळगड जहागिरीच्या अधिपत्याखाली आताचा गडहिंग्लज व  कागल तालुका आणि कोल्हापूरचा काही भाग होता. त्यामध्ये विशेष करून गडहिंग्लज तालुक्यातील महागाव हे समाविष्ट होते. या गावाला ऐतिहासिक महत्त्व आहे. हया भूमीवर शिवछत्रपतीचे तसेच वीर संभाजी राजे यांचे काही काळ येणे जाणे होते. ते साधारण १७ व्या शतकातील आहे. एके काळी संभाजी राजांनी मलकापूर येथे मुक्काम करून संगमेश्वर मुक्कामी गेले. मलकापूर हे गाव ‘मलिक काफूर’ या मोगली सरदाराने जिंकल्यामुळे याचा अपभ्रंश होऊन मलकापूर हे नाव प्रचलित झाले.[२] अशी आख्यायिका सांगितली जाते.

## ८. मलकापूरचे भौगोलिक स्थान :-

मलकापूर (शाहूवाडी तालुका, १६° ५५ उत्तर, ७३° ५५ पूर्व) हे गाव कोल्हापूरच्या वायव्येला ४५.६६ कि.मी.वर ङ्कशाळीङ्क नदीच्या डाव्या तीरावर वसलेले आहे. येथे विश्वेश्वर आणि भीमाशंकराचे देऊळ आहे. शिवाय गावच्या पश्चिमेस श्री. गजानन महाराजांचे नवीन बांधलेले मंदिर आहे. येथे शासकीय विश्रामगृह आहे.[३] मलकापूर नगरपालिकेचे क्षेत्र ८६.६८

हेक्टर इतके आहे.[४] मलकापूर शहर कोल्हापूर–रत्नागिरी महामार्गावर आहे. हवामान व पर्जन्याच्या दृष्टिकोनातून विचार करता मलकापूर हे सहयाद्रीच्या पर्वतरांगात असल्यामुळे पावसाळयात येथे भरपूर पाऊस पडतो. हिवाळयात थंडी तर उन्हाळयात उष्णता असते. नैसर्गिक रचनेमुळे येथील जमीन भिन्न भिन्न स्वरूपात आढळते. जमीन मुरमाड व गाळापासून तयार झालेली आहे. विशेष म्हणजे येथील तांबडी जमीन चांगली पाणी निचऱ्याची व उथळ स्वरूपाची असून ही जमीन चुनखडीयुक्त आहे. हया जमीनीत फॉस्फरीक गुणधर्म आढळतो. या जमिनीतून भात, नाचणी आणि वरी इत्यादी प्रमुख पीके घेतली जातात.

## ९. विशाळगड आणि मलकापूरची ऐतिहासिक पार्श्वभूमी :–

विशाळगड (शाहूवाडी तालुका, १६$^{\circ}$ ५० उत्तर, ७३$^{\circ}$ ४५ पूर्व) हा मजबुत किल्ला कोल्हापूरच्या वायव्येस ७२ कि.मी. अंतरावरील गजापूर डोंगरावर प्राचीन काळापासून उभा आहे. किल्ल्यापासून गजापूर गाव पूर्वेस ५ किलोमीटर अंतरावर आहे.[५] किल्ला पन्हाळगडा प्रमाणेच विशाळगड किल्ल्यालाही प्राचीन कालखंडात महत्त्व होते. विशाळगड हा किल्ला केव्हा बांधला याची तारीख उपलब्ध नसली तरी शिलाहार राजा भोज दुसरा याने कोल्हापूरला ११८७ मध्ये शिलाहार घराण्याची राजधानी स्थापन केल्यापासून किल्ल्याचा इतिहास उपलब्ध आहे . इ.स.११९१–९२ मध्ये राजा भोज यांनी पन्हाळगडावर आपले राजसिंहासन प्रस्थापित केले. नंतर महाराष्ट्रातील प्रसिद्ध १५ किल्ले बांधले. हे १५ किल्ले म्हणजे पन्हाळा, विशाळगड, बावडा, भुदरगड, सामानगड, पावणगड, वसंतगड, सातारा, चंदन, वंदन, नांदगिरी, वैराटगड आणि पांडवगड इ.होय. शिलाहार घराण्याचा अस्त झाल्यानंतर यादव घराण्याने पन्हाळा, विशाळगड हा प्रदेश आपल्या राज्यात समाविष्ट केला. तेराव्या शतकाच्या प्रारंभी हा सर्व परिसर देवगिरीच्या यादव राज्याचा एक महत्त्वाचा भाग बनला. देवगिरीचे राज्य समाप्त झाल्यानंतर विशाळगड बहामनी सुलतानाच्या ताब्यात गेला. इ.स.१४७० मध्ये बहामनी सुलतानाचा वजीर महमुद गवाण याने अदमासे नऊ महिन्याच्या वेढयानंतर विशाळगड जिंकून घेतला. सन १४८९ साली बहामनी घराण्याचा ऱ्हास झाल्यानंतर विशाळगड विजापूरच्या आदिलशाहीच्या ताब्यात गेला. सन १६५९ मध्ये शिवाजी महाराजांनी खेळणा, रांगणा, पावणगड आणि वसंतगड हे किल्ले लढाई करून ताब्यात घेतले. महाराजांनी खेळणा किल्ल्यालाच पुढे 'विशाळगड' हे नाव दिले. हा गड संरक्षणाच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचा

होता. ६ नोव्हेंबर १६८९ मध्ये मराठयांच्या ताब्यातून रायगड किल्ला गेल्याने त्याची अवस्था बिकट झाली. त्यावेळी हे एक चांगले आश्रयाचे ठिकाण होते. जिंजीच्या मोहिमेतून छत्रपती राजाराम महाराज सुखरूपपणे २२ फेब्रुवारी १६९८ रोजी विशाळगडावर येऊन पोहोचले. यावर्षी हा किल्ला महाराजांकडून झुल्फिकारखान याने जिंकून घेतला. हा किल्ला मोगलांकडे फारच थोडे दिवस राहिला. राजारामाच्या मृत्यूनंतर सन १७०० मध्ये महाराणी ताराबाईने आपला मुलगा शिवाजी दुसरा यास विशाळगडावर राज्याभिषेक करून गादीवर बसविले. ताराबाई स्वतःच राज्यकारभार चालवत होती. ताराबाई व शिवाजी दुसरा विशाळगड व पन्हाळगडावर आलटून पालटून राहत असत. तथापि पन्हाळा अधिक बळकट असल्याने संकटसमयी ते पन्हाळयावरच राहत असत.[६]

थोरल्या छत्रपतीनी (शिवाजी महाराजांनी) विशाळगड किल्ल्याचे महत्त्व ओळखून परशुराम त्रिंबक प्रतिनिधी यास हा किल्ला इनामादाखल दिलेला होता. सन १६६१ मध्ये हा किल्ला पुन्हा मिळविण्यासाठी विजापूरच्या आदिलशाही सैन्याने अनेक महिने वेढा दिला होता. विजापूरच्या प्रचंड सैन्याची छावणी गडाजवळील लहान खेडयांमध्ये पसरली होती. या भागात सैन्याला पाणी पुरवठा करण्यासाठी अनेक विहिरी खोदल्या होत्या. आजही गजापूरच्या परिसरात काही विहिरींचे अवशेष अद्याप शिल्लक आहेत.

२८ मे १७०१ रोजी औरंगजेब बादशहाने पन्हाळगड किल्ला जिंकला. त्यानंतर त्यांनी विशाळगडाकडे मोर्चा वळविला. १६ जानेवारी १७०२ रोजी औरंगजेब बादशहा विशाळगडाच्या पायथ्याशी जाऊन पोहोचला. त्यावेळी मराठयांच्या फौजा गडापासून फार दूरवर (वऱ्हाड, माळवा व तेलंगण प्रांतात) गेलेल्या होत्या.[७] अशा संकट समयी मोगलांच्या सैन्याने विशाळगडावर तोफांचा भडीमार केला. त्याप्रसंगी परशुराम त्रिबंक प्रतिनिधी यानी अप्रतिम शौर्य आणि विलक्षण कौशल्य दाखविले. गडावर फारसे सैन्य नसल्यामुळे त्याने वरून दगडांचा मारा केला आणि मोगल सैन्याला जेरीस आणले. परशुराम त्रिंबकने सतत पाच महिने किल्ला मोठया निकराने लढविला. मोगलांना यश मिळण्याची चिन्हे दिसेनात. मे १७०२ पर्यंत अशीच परिस्थिती चालू राहिली. पावसाळा जवळ आला होता. बादशहाने गड हस्तगत करण्यासाठी सेनापतीवर दबाव आणला. शेवटी काही मोगल सरदारांनी परशुरामपंताकडे आतून बोलणी केली. बादशहाने हा प्रतिष्ठेचा प्रश्न बनविला. त्याने परशुरामपंताला पत्र पाठवून धमकी दिली

व अमिषही दाखविले. गडावरही टिकाव धरता येईल एवढे धान्य व दारूगोळयाची तरतूद नव्हती. परशुरामपंतांची ही कसोटीची वेळ होती म्हणून बादशहाकडून सामोपचाराचा निरोप परशुराम त्रिंबकने काही अटी घालून विशाळगड मोगलांच्या स्वाधीन करण्याचे मान्य केले. त्यासाठी त्याने तीन अटी घातल्या. १) विशाळगड घेतल्यावर बादशहाने दुसरे किल्ले न घेता या मुलखातून निघून जावे. २) गडावरील लोकांच्या जीवास धक्का पोहचवू नये. ३) हे सर्व मान्य असल्याबद्दल प्रत्यक्ष बादशहाने लेखी आश्वासन द्यावे. बादशहाने या सर्व अटी मान्य करून दोन लाख रूपये परशुरामपंताला दिले. पाच–सहा महिन्यांच्या या लढाईत मोगलांचे सहा हजार सैन्य मारले गेले. २७ मे १७०२ रोजी औरंगजेबने विशाळगडाचे नाव 'सकरूल्लाना' असे ठेवले. औरंगजेब विशाळगडावरून परत निघाला तो पर्यंत पावसाळा सुरू झालेला होता. पंचगंगा, कृष्णा इत्यादी नदबया ओलांडाव्या लागल्या. बादशहाच्या सैन्यातील हत्ती, घोडे आणि उंट बेसुमार मरण पावले. मोगल लष्कराची विलक्षण दुर्दशा झाली.

पुढे मराठयांनी विशाळगड मोगलांकडून परत मिळविला. तेव्हा पासून विशाळगडाचे महत्त्व फार वाढले. विशाळगडाच्या इतिहासाशी परशुराम त्रिंबक प्रतिनिधी यांचे नाव निगडीत आहे. म्हणून परशुराम त्रिंबकची ताराबाईंनी प्रतिनिधीपदावर नेमणूक केली.[८] विशाळगडाच्या प्रतिनिधी घराण्याचा हाच पहिला पुरूष होय. ताराबाईचा प्रमुख सल्लागार म्हणून प्रतिनिधी परशुराम त्रिंबक हा काम पहात होता.

परशुराम त्रिंबक प्रतिनिधी यांचा आणि कोल्हापूरच्या राज्याचा निकटचा संबंध होता. किबंहुना खेडच्या लढाईच्या वेळी धनाजी जाधव, खंडो बल्लाळ यांच्यासारखे पराक्रमी आणि एकनिष्ठ लोकही ताराबाईचा पक्ष सोडून शाहू महाराजांना जाऊन मिळाले. पण परशुराम त्रिंबक यांनी मात्र शेवटपर्यंत ताराबाईच्या पक्षाशी आपली निष्ठा कायम राखली. साताऱ्याचा किल्ला लढविल्याबद्दल त्यांना शाहू महाराजांची अवकृपा सहन करावी लागली. त्यानंतर ते साताऱ्यात कैदेत पडले  असता त्यांच्या प्राणावर दोन वेळेला संकट बेतले असतानाही त्यांनी ताराबाईचा पक्ष सोडला नाही. ताराबाईंचा विश्वासही इतरांपेक्षा प्रतिनिधींवर अधिक होता. परशुरामपंतांच्या कर्तबगारीचा आरंभ ते विशाळगडी जाऊन रामचंद्रपंत अमात्य यांचे वडील निळो सोनदेव अमात्य यांचे पदरी राहिल्यापासून झाला. त्यांनी आपले मूळगाव किन्हई (सातारा जिल्हयात वर्धनगडानजीक) सोडले आणि अमात्यांच्या हाताखाली कामगिरी सुरू

केली. त्यावेळच्या स्थितीप्रमाणे ते लेखणीप्रमाणे तलवार चालविण्यातही तरबेज होते. रामचंद्रपंत आणि परशुरामपंत हे समवयस्क असल्यामुळे त्यांनी अनेक वर्षे एकत्र काम केले. परशुरामपंतांनी 'समशेरबहाद्दूर शहाजंग' असे पद मिळविले.[९]

राजाराम महाराजांच्या नंतर पंतांनी ताराबाईचा विश्वास संपादन केला. शाहू महाराज दक्षिणेत आले तेव्हा ताराबाईंनी, रामचंद्रपंत अमात्य, परशुराम प्रतिनिधी, शंकराजी नारायण सचिव, नीळकंठ मोरेश्वर प्रधान, सेनापती धनाजी जाधव, खंडोबल्लाळ या प्रमुख मंडळीस जमवून कळविले की, संभाजीने दौलत गमावली. ती राजारामाने कष्ट सोसून राखिली तर शाहू खरा असो किंवा खोटा असो त्यास नाहीसा करावा. दूधभाताचे ताट आणवून त्यावर हात ठेवून तिने वरील मंडळींकडून शपथक्रिया घेतली.[१०]

खेडच्या लढाईसाठी ताराबाईंनी परशुराम त्रिंबक प्रतिनिधी आणि धनाजी यांना चाळीस हजार फौज देऊन शाहू महाराजांच्या फौजेवर रवाना केले. त्याबरोबर खंडो बल्लाळ यास दिले असता स्वामीस (शाहू महाराजांस) गुप्तरूपे भेटून सेनापती व सरदार यांच्या खातरजमा करून सर्वास स्वामीचे लक्षी आणिले. लढाई झाली. प्रतिनिधी पळून गेले. असा उल्लेख चिटणीसांच्या सनदेत केलेला आहे. परशुरामपंत आणि त्यांचे सैनिक यांचा पराभव झाला. तो प्रामुख्याने सेनापती धनाजी जाधव लढाईच्या वेळी तटस्थ राहिल्यामुळे प्रतिनिधींना आपल्या फौजेसह पुण्याला पळून जावे लागले. तेथून ते साताऱ्याला गेले व राजधानीचा किल्ला ताब्यात ठेवून बसले. शाहू महाराजांच्या फौजा त्यांचा पाठलाग करीत निघाल्या. साताऱ्याचा किल्ला स्वाधीन करावा अशी पत्रे शाहू महाराजांनी प्रतिनिधींना पाठविली. पण प्रतिनिधींनी किल्ला लढविण्याचेच ठरविले. शेवटी किल्लेदार शेख मिऱ्याला पेचात पकडून शाहू महाराजांनी किल्ला काबीज केला. प्रतिनिधींना कैद करण्यात आले. कैदेत असतानाही त्यांनी शाहू महाराजांचा पक्ष स्विकारला नाही. यामुळे त्यांना जबरदस्तीने होकार देण्यास भाग पाडावे असे प्रयत्न झाले. त्यातही महाराजांना यश येऊ शकले नाही. पुढे परिस्थिती बदलली व नंतर परशुराम पंतांनी शाहू महाराजांशी समजुतीने घेण्याचा प्रयत्न केला. त्यांनी एका पत्रात शाहू महाराजांना कळविले की, ङ्गस्वामींनी आज्ञा सांगून पाठविली. तदनुरूप श्रीवरील पुष्पे व रोटी शपथ पाठविली आहे. आमचे चित्त निखालस स्वामींच्या पायाशी आहे. हे जीवीत केवळ स्वामींच्या अन्नाचे आहे. स्वामींनी दया करून प्राण वाचविला. हा कृतोपकार आयुष्य असेतो विसरणार नाही. या उपरी

स्वामींनी मनात संदेह येऊ नेदून पत्री संदेहास्पद लिहित न जावे. स्वामींनी आपला पाठिंबा उभा केला ऐसे चित्तात येऊ दयावे.ङ्क यानंतर २० ऑगस्ट १७०८ रोजी शाहू महाराजांनी परशुरामपंतांस अमात्य पद दिले. पुढे काही काळ प्रधानपद सुद्धा १७१० मध्ये दिले. त्यात पुन्हा बदल होऊन त्यांच्याकडे प्रतिनिधीपद आले. सन १७११ च्या अखेरीस चंद्रकांत जाधवाचे हल्ले झाले होते त्यात परशुरामपंतांचे अंग असावं. अशी शंका शाहू महाराजांना आली आणि त्यांनी, ङ्कत्यावर पंतांकडून स्वामीसेवेस अंतर पडले हे सबने सरदेशमुखी, वतन तारीख २० नोव्हेंबर १७११ रोजी अनामत करण्यात आले. मशारनिल्हेस कैद करून सरंजाम घर जिंदगी सुद्धा जप्त केले.ङ्क याच वेळी परशुरामपंतांना दहशत बसावी म्हणून त्यांचे डोळे काढावयाचा शाहू महाराजांनी हुकूम दिला, पण हे वर्तमान खंडो बल्लाळास समजताच ते महाराजांकडे धावत गेले आणि, ङ्कअशा अविचारी क्रूर कृत्याने आपल्याच पक्षाची शक्ती कमी होईल.पराक्रमी सेवक माणूस असे मारू नये. अघटीत कामावर घालून मारावे.ङ्क[११] अशी महाराजांची समजूत घातली व महाराजांनीही नंतर परशुरामपंतांची शिक्षा रद्द करून त्यांना कैदेत ठेवले. त्यानंतर एक वर्षाने म्हणजे १७१२ च्या अखेरीस खंडो बल्लाळ व बाळाजी विश्वनाथ यांच्या शिफारशीवरून शाहू महाराजांनी परशुरामपंतांना पुन्हा प्रतिनिधीपद दिले. त्यासंबंधीच्या सनदा मात्र ८ मार्च १७१४ रोजी दिल्याचा उल्लेख आहे.

शाहू महाराजांकडून परशुराम त्रिंबक यांना प्रतिनिधीपदाची जी सनद मिळाली, त्यांच्या पराक्रमाचा व कामगिरीचा उल्लेख केलेला आहे. परशुरामपंतांना कृष्णाजी, त्रिंबकराव, श्रीपाद ऊर्फ श्रीनिवास, सदाशिव आणि जगजीवन ऊर्फ दादोबा असे पाच मुलगे होते. रियासतकार सरदेसाई यांनी म्हटले आहे, ङ्कपरशुरामपंतांची योग्यता ठरविण्याइतकी माहिती उपलब्ध नाही. तो चतुर व अनुभवी होता. काही दिवस त्याने पेशवेगिरीचे व अमात्याचेही काम केल्याचा उल्लेख सापडतो. त्यांचे अंगी अनेक गुण होते. ताराबाईची सेवा त्याने एकनिष्ठपणे केली. शाहू आल्यावर याची तारांबळ झाली आणि त्याचा पराक्रम गाजला नाही. जमीन महसूलाच्या व हिशेबी कामात परशुराम त्रिंबक फार चांगला वाकबगार होता. त्याने जमीनीची पाहणी करून वसुलाचे धारे बांधिले. २७ मे १७१८ रोजी परशुरामपंत त्रिंबक प्रतिनिधीचे निधन झाले. त्यांचे वृंदावन माहुलीस आहे. परशुराम त्रिंबक यांचे चिंरजीव कृष्णराव व त्यांचे वंशज कोल्हापूर येथे पिढीजाद प्रतिनिधी होते. विशाळगडच्या प्रतिनिधी घराण्याचे हेच पहिले पुरूष होते. त्यांचे

दुसरे पुत्र श्रीनिवासराव ऊर्फ श्रीपतराव व त्यांचे वंशज सातारा राज्याचे शेवटपर्यंत प्रतिनिधी होते.ङ्ख[१२]

ताराबाईच्या राज्यकारभारात परशुरामपंत प्रतिनिधींचे पुत्र कृष्णाजी परशुराम प्रतिनिधी यांचाही सहभाग होता. दादोबा ऊर्फ जगजीवन आणि त्यांचे मुतालिक यमाजी शिवदेव हे दोघेही ताराबाईच्या बाजूचे होते. प्रतिनिधीकडे ङ्कसांगोलाङ्ख आणि ङ्कमंगळवेढेङ्ख ही दोन्ही ठाणी आपल्याला द्यावीत अशी मागणी पेशव्यांनी केली. प्रतिनिधींनी प्रथम ती मागणी नाकारली. पण त्यांच्यावरही पुण्याच्या मुक्कामात असे दडपण आणल्यामुळे शेवटी त्यांनाही ठाणी नाइलाजाने पेशव्यांच्या हवाली करावी लागली. त्यासाठी त्यांनी आपले मुतालीक यमाजी शिवदेव यांना सांगोल्याला पोहोचताच युद्धाची तयारी केली. पेशव्यांच्या हुकमाने ठाणी देण्यास आपण तयार नाही असे कळविले. त्यामुळे पेशवे आणि प्रतिनिधी यांच्या दरम्यान युद्धाचा प्रसंग निर्माण झाला. पेशव्यांनी सदाशिवराव भाऊ आणि रामराजे यांच्याबरोबर फौजा देऊन सांगोल्याला पाठविले. रामराजे पुण्याला गेल्यापासून पेशव्यांच्या कलाने वागू लागले. सांगोल्याच्या लढाईच्या निमित्ताने पेशव्यांनी रामराजे यांच्या मनात प्रतिनिधी विरूद्ध पूर्वग्रह निर्माण केला. त्यामुळे रामराजे सदाशिवरावभाऊ बरोबर सप्टेंबर १७५० मध्ये मोठया लष्करानिशी सांगोल्याच्या मोहिमेवर गेले. ही परिस्थिती ताराबाईंना असहय ठरणारी होती. सांगोला येथे यमाजी शिवदेवाची फौज पेशव्यांच्या फौजेपुढे टीकू शकली नाही. २५ सप्टेंबर १७५० रोजी तो शरण आला.[१३]

रामराजे यांनी दादोबा प्रतिनिधी आणि त्याचा मुतालिक यमाजी शिवदेव यांना ताबडतोब कामावरून दूर केले. रामराजे ४ जानेवारी १७५० रोजी मोठया समारंभपूर्वक शाहूनगरात येऊन दाखल झाले आणि त्याच दिवशी सायंकाळी ते राजसिंहासनावर आरूढ झाले. प्रथेप्रमाणे अशा वेळी छत्रपतींचे प्रतिनिधी उपस्थित असावे लागतात. पण त्यावेळचे प्रतिनिधी जगजीवन परशुराम आणि त्यांचे मुतालिक यमाजी शिवदेव तुरूंगात असल्यामुळे ताराबाईच्या बाजूचे भवानराव यांना प्रतिनिधीपद देण्यात आले. भवानराव हे विशाळगडाच्या कृष्णाजी प्रतिनिधीचे चिरंजीव होते.[१४] पेशव्यांच्या बाजूचे भवानराव याला प्रतिनिधी नेमले व यमाजी शिवदेवाचा पुतण्या वासुदेव अनंत यास त्यांचा मुतालिक केले.

शिवाजीराजे यांच्या कारकिर्दीत सिंधुदुर्गचा किल्ला इंग्रजांच्या ताब्यात देण्यात आला होता. त्यावेळी झालेल्या कराराप्रमाणे किल्ल्यातील सर्व सामान छत्रपतींनी बाहेर काढून न्यावे आणि किल्ला इंग्रजांना मोकळा करून द्यावा असे ठरले होते. त्याला अनुसरून त्यावेळी छत्रपतींनी आपल्या सर्व तोफा किल्ल्यातून बाहेर काढून टाकल्या होत्या. त्या घाटाखाली अनेक गावांच्या रानोरान विखरून पडलेल्या होत्या. वरघाटी नेण्यास त्यानंतर बरीच वर्षे अवसर मिळाला नाही. बुवासाहेबांनी त्या सर्व तोफा जमा करून कोल्हापूरला आणण्याचे ठरविले. अशाच स्वरूपाची परतभेट म्हणून बुवासाहेब १८२६ मध्ये सातारला जात असावेत. पण ते कदाचित इंग्रज अधिकाऱ्यांना आवडले नसावे आणि म्हणून शेवटी तो बेत रहीत करण्यात आला असावा.

असाच मानहानीचा आणखी एक प्रसंग त्यावेळी बुवासाहेबांवर आला होता. महाराज २० ऑगस्ट १८२५ रोजी विशाळगड पाहण्यासाठी गेले होते. पण तेथे महाराजांची बेअदबी करून चौकीदारांनी गोळ्या झाडल्या. त्यावेळी त्यांच्याबरोबर फौज नव्हती. फक्त काही हुजरे होते. महाराज गजापूरला गेले आणि त्यांनी तेथून आज्ञापत्रे देऊन हुजरे पाठविले. परंतु त्यांच्यावरही माधवराव पंडित प्रतिनिधी यांनी गोळ्या घालून बदनामी केली. त्यामुळे बुवासाहेबांनी प्रतिनिधीकडील सरंजामाचा तालुका जप्तीत ठेवला. त्या तालुक्याचा वसूल प्रतिनिधीकडे देऊ नये अशी ताकीदपत्रे अंमलदाराकडे रवाना केली. त्याचप्रमाणे या सर्व घटनेची माहिती रत्नागिरीच्या इंग्रज अधिकाऱ्याला कळविण्यात आली. पण हे प्रकरण तेथेच थांबले नाही. त्यानंतर माधवराव पंतप्रतिनिधी यांनी छत्रपतींचे वर्चस्व नाकारले. आपण महाराजांच्या पदरचे आहोत. हे मनात न आणता त्यांचा अपमान केला आणि म्हणून बुवासाहेबांनी प्रतिनिधींचा वाडा जाळला. प्रतिनिधीनी महाराजांच्या या कृत्याबद्दल इंग्रजांकडे तक्रार केली. तेव्हा धारवाडचा सरकलेक्टर वेबरने बुवासाहेबांना पत्र पाठवून इंग्रज व छत्रपती यांच्यादरम्यान झालेल्या तहाची आठवण करून दिली आणि छत्रपतींनी अधिक फौजदल ठेवणार नाहीत असे तहात कबूल केले आहे. शेवटी असे म्हटले की, 'मुलखाचे अबादी व आरामीबाबत सरकारी इंग्रज बहाद्दर सलाह देतील त्याप्रमाणे वहिवाट ठेवण्यात येईल. असे करारात आहे. अशास प्रतिनिधी विशाळगडकर हे कदीम संस्थानिक अब्रुदार यांजवरही काही गैरवाजवी दस्तरराजी झाल्यास त्यांनी व इतर सरंजामदार वगैरे एकत्र होऊन काही तंटा

करतील किंवा काही नुकसान करतील वस्तुतः प्रतिनिधीशी काही भांडणतंटा असल्यास लढाईपर्यंत प्रकरण न नेता आपसात मिटवावे किंवा इंग्रजांच्या मार्फत त्याचा फैसला करून घ्यावा. पण परस्पर काही गैर अंमल केला जाऊ नये.[१५] प्रतिनिधींचे हे प्रकरण आपसातच मिटले आणि महाराजांनीही त्यांचे पूर्वीचे अधिकार व मानमरातब हे कायमच त्यांच्याकडे ठेवले.

वारणेच्या तहानंतर कोल्हापूरच्या संभाजी राजाने जनार्दनपंत प्रतिनिधी यांच्या नावे नवीन सनद देऊन किल्ल्याचे इनाम चालू ठेवले. सन १८४४ पर्यत या घराण्याचे विशाळगडावर मुख्यालय होते. तथापि १८४४ मध्ये बंडखोरांनी विशाळगड ताब्यात घेतल्यावर इंग्रज फौजानी प्रचंड भडीमार करून किल्ला परत मिळविला आणि त्यावरील तटबंदी नष्ट केली. या किल्ल्याचा पुन्हा उठावाकरिता उपयोग करणे अशक्य व्हावे या दृष्टीने ब्रिटिशांनी गडाची नासधूस केली. तेव्हापासून प्रतिनिधींचे मुख्यालय मलकापूर येथे स्थलांतरित करण्यात आले.[१६]

सन १८५३ च्या सुमारास पंतप्रतिनिधी यांनी विशाळगड हे राजधानीचे ठिकाण येथून हालवून मलकापूर नगरी नव्याने निर्माण केली. प्रतिनिधीनी ङ्कशाळीङ्क व ङ्ककडवीङ्क नदीच्या जुन्या संगमावर सरकारी वाडा बांधला आणि याच वाडयातून प्रतिनिधी जहागिरीचा कारभार करू लागले. याच सरकारी वाडयात ३ ऑक्टोबर १८८४ रोजी मलकापूर नगरपालिकेची स्थापन केली.[१७] सन १९४० च्या दरम्यान नगरपालिका स्वतंत्र जागेत आली. सन १९४७ च्या पूर्वी म्हणजे स्वातंत्र्यपूर्व काळात देशातील संस्थाने आणि जहागिरीचा कारभार इंग्रज सरकारच्या वतीने एकच पोलिटीकल एजंट नावाचा अधिकारी पहात असत. जहागिरदारांचे अधिकार स्वातंत्र्यानंतर संपून सरकारकडून त्यांना तनखा मिळू लागला. त्यावेळी मलकापूर गावची लोकसंख्या २६०० ते २८०० च्या दरम्यान असल्याने जहागीरदारांनी स्थापन केलेली नगरपालिका बरखास्त करण्याचा प्रस्ताव शासनापुढे होता. परंतु मलकापूरचे जहागीरदार पंतप्रतिनिधी साहेब यांनी देशाच्या राष्ट्रपतीकडे नगरपालिका बरखास्त करू नये अशी विनंती केली. कारण मलकापूर नगरपालिका ही संस्थानकालीन असल्याने ती बरखास्त न करता ती नगरपालिका म्हणून रहावी. अशाप्रकारे देशात खास बाब म्हणून राहिलेली मलकापूर गावची नगरपालिका ही एक आहे. जहागीरदारांची विनंती मान्य करून त्यावेळच्या राष्ट्रपतींनी खास

वटहुकूम काढून ही नगरपालिका कार्यरत ठेवली. ही घटना देशाच्या इतिहासात अभूतपूर्व म्हणावी लागेल. या गावची लोकसंख्या ६५०३ इतकी आहे. आज अखेर मलकापूर नगरीची संस्कृती लोकांनी जतन करून ठेवली.[१८]

आबासाहेबांचा कालावधी १८७० ते १९४६ असा आहे. आबासाहेबांचे सहाय्यक म्हणून अनंत देशमुख हे मलकापूर मधून काम पहात होते. सन १९४५ साली आबासाहेबांचे निधन झाले. ही नगरपालिका कै.आबासाहेब पंतप्रतिनिधी यांच्या पुण्याईमुळेच अस्तित्वात आहे. त्यांची समाधी मलकापूर गावच्या पूर्वेला शाळी नदी काठी भग्न अवस्थेत आजही उभी आहे. या समाधीच्या चारही बाजूंनी मुरलीधर देव, आबा विश्वेश्वर(महादेव मंदिर), दत्त मंदिर, राम मंदिर आणि कार्तिक स्वामी इत्यादी दैवतांची मंदिरे उभी आहेत.[१९]

यांनी सदरहू देवालयाच्या जीर्णोद्धार श्रीमंतराज श्री.आबाजीराव कृष्णाजी पंडित पंतप्रतिनिधी साहेब विशाळगड यांचे आज्ञेवरून कृष्णाजी बाबाजी गंभीर यांचे इच्छेप्रमाणे त्यांचे कापशी अन्न छत्रसंस्थेतून करणेत आलेला आहे.[२०] मलकापूरच्या पश्चिमेला महादेव डोंगर उभा आहे. सहयाद्रीच्या पूर्व बाजूच्या उतारावरचा छोटासा डोंगर आहे. मंगलपूर या गावची फार पूर्वीपासून धार्मिक व सांस्कृतिक परंपरा आहे. पूर्वी या डोंगरावर ध्यान धारणेसाठी शंभू महादेवाचे मंदिर स्थापन केले. त्यावरून त्या डोंगराला महादेव खडी हे नाव प्रचलित झाले. पूर्वीच्या काळी या डोंगराच्या रम्य परिसरात ऋषीमुनी ध्यान धारणेस बसत. त्यामध्ये नाना महाराज पुराणिक व पुरोहित गुरूजी ही ज्ञान योगी व धर्मयोगी त्या ठिकाणी ध्यान धारणा करीत होती. स्वातंत्र्यानंतर सन १९७० च्या दशकात वनखात्याने त्याठिकाणी वृक्षारोपन करून राखीव जंगल ठेवून निसर्गात समतोल व सौंदर्य राखण्याचा प्रयत्न केला.

## १०. मलकापूरचे समाज जीवन :–

१९ व्या शतकात कोल्हापूर जिल्हयाची समाजरचना ही तत्त्कालीन महाराष्ट्रातील समाजरचेनेला धरूनच होती. कोल्हापूर जिल्हयात मराठा, जैन व लिंगायत समाजातील लोक मोठया प्रमाणावर राहतात. धनगर समाज मुख्यतः डोंगरावर राहतात. या घटकात मलकापूर गावच्या समाज व्यवस्थेचा आढावा घेणार आहे. मलकापूर येथे अनेक जातीजमातीचे लोक पूर्वीपासून एकत्र राहताना दिसतात. जातीजमातीत अनेक पोटजाती आहेत. ब्राह्मण, मराठा, सोनार, कुंभार, सुतार, बुरूड, गवंडी, कासार, शिंपी, न्हावी, तांबोळी, भंडारी, भोई, परीट,

धनगर, वाणी, महार, मांग, चांभार आणि ढोर इत्यादी व्यावसायिकदृष्टया विविध जाती आहेत. मलकापूर या गावी हिंदू, मुस्लिम आणि बौद्ध धर्मीय लोकांचा समावेश आहे.

**१) जाती प्रवर्ग व त्यांची कामे :–**

ब्राह्मण म्हणजे ज्याला परंपरेने व धर्मशास्त्रीय आधाराने पूजा–अर्चा करण्याचा अधिकार होता. ब्राह्मण समाजात धार्मिक विधी करणारे, पुरोहितपणा करणारे, अध्ययन–अध्यापन करणारे, भजन–पूजन आणि होम करणारे वेदशास्त्रात पारंगत असणारे ब्राह्मण होते. यावरून असे दिसते की, ब्राह्मण समाजातही कोकणस्थ आणि देशस्थ या जाती आढळून येतात. या जातीमध्ये ऋग्वेदी, यजुर्वेदी, कऱ्हाडे, चित्पावन या उपजाती होत्या. देशमुख, देशपांडे, कुलकर्णी आणि आजरेकर अशी त्यांची आडनावे होती.[२१] तसेच मलकापूरमध्ये मराठा समाजही वास्तव्यास आहे. कोल्हापूर राज्यातील मराठे हे सूर्यवंशी, चंद्रवंशी, शेषवंश व ब्रह्मवंश या चार वंशाचे होते. या प्रत्येक वंशाला २४ कुळया लागत होत्या. म्हणून मराठयांना ९६ कुळी मराठा म्हणून ओळखले जाते. अस्सल मराठे, लेकवळे मराठे व इतर मराठे असे तीन मराठयांचे प्रकार पडतात. ९६ कुळी मराठयांची आडनावे भोसले, घाटगे, घोरपडे, चव्हाण, गावडे, नलगे, सरनाईक, सरनोबत, नलावडे, फडतरे, मोहिते, पवार आणि शिंदे इत्यादी असतात.[२२]

कोल्हापूर जिल्हयात लिंगायतांचे चार वर्ग आहेत. ते म्हणजे १) जंगम उर्फ उपाध्याय, २) वाणी म्हणजे व्यापारी, ३)पंचम अथवा पंचमसाळी म्हणजे कारागीर, शेतकरी व गोपाल ४) न्हावी, धोबी, महार वगैरे सेवक वर्ग[२३] मलकापूरमध्ये वाणी समाज मोठया संख्येने आहे. त्यांच्याकडून जास्तीतजास्त व्यापारी माल खरेदी–विक्री केला जातो. त्यांच्या उपजाती आढळून येतात. उदा. वैश्य लिंगायत आणि तेली इत्यादी होय. जंगमांच्या खालोखाल वाणी हे महत्त्वाचे समजले जातात. शीलवंत व लोकवंत असे त्यांचे दोन विभाग आहेत.

मलकापूर येथे सर्वात जास्त शिंपी समाज आहे. त्यांची लोकसंख्या जवळजवळ १००० च्या वर आहे. त्यांच्यात उपजाती असल्याचे आढळून येते. उदा. रंगारी, शिंपी, भासर शिंपी, कोकणस्थ शिंपी, आणि नामदेव शिंपी इत्यादी होय. त्यांच्यात व्यवसायावरून हया पोटजाती पडल्या होत्या. नवीन कपडे शिवणे व विकणे आणि जुनी कपडे शिवणे इत्यादी कामे करणे, असा या समाजाचा व्यवसाय आहे. याबरोबर मलकापूरात सणगर समाजही वास्तव्यास आहे. सणगर समाज हा घोंगडे तयार करणे आणि विकणे हा व्यवसाय करत असताना दिसून येतो.

श्री.शंकर रामचंद्र पलसनदे (सणगर गुरूजी) असे म्हणाले की, ङ्ककाळाबरोबर या जातीतील लोकांनी शिक्षण घेवून शासकीय सेवेत भरती होण्याचे प्रमाण वाढविलेले आहे. आणि मला सन १९६१ मध्ये आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाला होता.ङ्क[२४]

धनगर समाजही या ठिकाणी आहे. धनगर म्हणजे गुरेढोरे व मेंढया पाळणारा होय. ते प्रामुख्याने डोंगराळ भागात राहतात. या जातीचे नाव कन्नड भाषेत दनगार असे आहे. दन म्हणजे गुरेढोरे(गोधन) त्यावरून दनकार–दनगार–धनगर(गुरेढोरे पाळणारा) असा क्रमाने शब्द बनला आहे. बरेचसे धनगर जिल्हयातील मूळ रहिवाशी आहेत. गोपालन, मेंढीपालन, घोंगडया विकणे आणि शेती इत्यादी व्यवसाय या समाजाचा आहे. धनगर काटक, कष्टाळू, मितव्ययी व आतिथ्यशील असतात.[२५]

गावगाडयातील चांभार जातीचा एक स्वतंत्र पारंपरिक धंदा होता. शेतकऱ्यांच्या शेती व्यवसायाला उपयुक्त असणाऱ्या कातडी वस्तू तयार करीत. परीट समाजाचे लोक हे कपडे धुण्याचे काम करीत. विशेषतः श्रीमंत घरचे कपडे धुण्याचे काम करीत. याशिवाय गुऱ्हाळाच्या दिवसात गूळ भरण्याकरिता परीट पासोडया देत. कोल्हापूर राज्यात सोनार समाज होता. यांनाच पोतदार असेही म्हणत, सोन्या–चांदीचे दागिने बनविणे हे सोनारांचे मुख्य काम होते. कोल्हापूर जिल्हयातील शहरात व खेडयात न्हावी समाज आढळतो. न्हाव्यामध्ये मराठे न्हावी व लिंगायत न्हावी अशा दोन जाती होत्या. न्हावी या जातीचा केस कापणे हा मुख्य धंदा होता. या व्यवसायासंदर्भात बाळू शंकर सप्ताळ यांनी असे सांगितले की, ङ्कहा व्यवसाय चांगला आहे. या व्यवसायातून दिवसाकाठी ५०० ते ६०० रूपये मिळतात. यामुळे आर्थिक प्राप्ती चांगली होते. या पैशातूनच मुलांचे शिक्षण आणि घरखर्च चालविला जातो. आमच्या समाजाचे रोजगाराचे मुख्य साधन आहे.ङ्क.[२६]

महार हा गावचा संरक्षण करणार अत्यंत महत्त्वाचा बलुतेदार होता. ते गावाबाहेर राहत असल्याने त्यांना ङ्कवेसकरङ्क म्हणत. गाव स्वच्छ ठेवणे, रात्रीच्यावेळी गस्त घालणे, दवंडी देणे, गावातील गुन्हे शोधून काढणे यासारखी कामे त्यांना करावी लागत होती.[२७] मांग हा बलुतेदार घायपातापासून वाख तयार करणे, त्यापासून दोरखंड, नाडे, चऱ्हाटे तयार करणे, शिंदीच्या झाडाच्या फांद्यापासून झाडू तयार करणे, अशी कामे त्यांना करावी लागत होती. मलकापूर मध्ये मुस्लिम धर्मिय लोकांचे वास्तव्य आहे. कोल्हापूर जिल्हयातील मुसलमान हे सय्यद,

पठाण व शेख कुळातील आहेत. व्यवसायानुसार मुसलमानामध्ये अत्तार, मणियार, बागवान, नालबंध इत्यादी पोटजाती मोडतात.[२८] पूर्वी शहरात राहणारे पठाण शिपाई, पोलिस, जासुद इत्यादी कामे करीत असत व खेडयातील पठाण शेती करीत असत. मलकापूरमध्ये अशा रितीने वेगवेगळया जाती आपला व्यवसाय करत असताना दिसून येतात.

**२) वेशभूषा व अलंकार :–**

कोल्हापूर भागातील लोकांची वेशभूषा आणि अलंकार हे आजच्यापेक्षा पूर्वी वेगवेगळे असलेले दिसून येतात. सर्वसाधारणपणे त्यावेळी पुरूष पोषाखामध्ये अंगरखा, पागोटे घालत त्याचबरोबर धोतर किंवा तुमान अगर चोळणा वापरत असत. डोक्याला पागोटयाऐवजी रूमाल किंवा पटका बांधत असत. स्त्रिया पोषाखामध्ये लुगडी व चोळीचा वापर करत असत. डोक्यावर पदर घेत आणि कासोटा घालत. स्त्रिया कपाळावर कुंकू लावत आणि हनुवटी व हाताच्या पोटरीवर गोंदण काढत असत. मराठा स्त्री व पुरुष सण आणि लग्न समारंभाच्यावेळी चांगली कपडे व दागिने घालत.

कोल्हापूरच्या पश्चिमेस विशेषतः कोकणालगच्या भागात पुरूष पोशाखात लंगोटी, कुडते, मुंडासे, व अंगावर काळी कांबळी (घोंगडे) इत्यादी वापरत. ब्राह्मण पुरूष नेसूचा पंचा व डोक्यालाही तसेच एक वस्त्र गुंडाळत असत. तसेच कोल्हापूरच्या पूर्वेकडील भागात पुरूष कमरेला धोतर, अंगात कुडते, पैरण, डोक्यास पागोटा बांधत तर काही पुरूष अंगरखा, डगला आणि बाराबंदी अशी वस्त्रे परिधान करत. श्रीमंत वर्गातील स्त्री व पुरुष महागडया किमतीची कपडे वापरत. पुरूष पितांबर, मुकटे, शाली, शेले आणि रेशमी व लोकरीची वस्त्रे वापरत असत.

तत्त्कालीन समाजातील स्त्री, पुरुष, मुले, मुली यांच्या अलंकाराकडे मोठी तफावत असल्याचे दिसते. श्रीमंत घरातील लोक सोन्यापासून तयार केले. दागिने वापरतात आणि गरीब लोक हे चांदी, तांबे आणि पितळेपासून तयार केलेल्या अलंकाराचा वापर करत असत. श्रीमंत पुरूष लोक भिकबाळी, गोफ किंवा कंठा घालत आणि लहान मुले करगोटे, कडी इत्यादी दागिने वापरत. स्त्रिया अलंकारामध्ये केसात मूद, अग्रफूल, केवडा, केतकी, वेणी, गुलाबाचे फूल, बिंदी, राखडी, सूर्य, चंद्र, नागगोंडे आणि गोंडे –फुले इत्यादी सोन्याचे अलंकार घालत. साखळया आणि तोडे हे चांदीचे अलंकार पायात घालत.

विवाहित स्त्रियांच्या गळयातील मंगळसूत्र हे सौभाग्याचे लेणं मानलं जात असत. पूर्वी मंगळसूत्राच्या वाटया साध्या काचेच्या मण्यामध्ये असत. स्त्रिया समारंभ प्रसंगी गळयात चंद्रहार, जोंधळी, पोत, सरी, तांदुळी पोत, पोहेहार, बकुळीहार, बोरमाळ, मोहनमाळ, एकदाणी व वज्रटीका पुतळयाची माळ आणि कोल्हापूरी साज इत्यादी अलंकाराचा वापर करत असत. तन्मणी, पोत व पोंडे हे रत्न–मोत्याचे अलंकार श्रीमंत स्त्रिया घालत. स्त्रिया हातात बांगडया, पाटल्या आणि गोठ घालत. स्त्रियांच्या नाकात मुरणी, चमकी, फुली आणि मुगवटा हे अलंकार वापरत. बिंदल्या, मनगटया, कडीतोळे, वाळे, तोरडया, चाळ, साखळया इत्यादी अलंकार हे लहान मुलांसाठी वापरत असत. सुवासिनीचा 'कुंकू' हा सौभाग्याचा अलंकार होता आणि हळद व काजळ ही सौंदर्य प्रसाधने वापरली जात होती.

सर्वसाधारणपणे पुरूष पोषाखामध्ये धोतर, अंगरखा, पागोटे वापरत असत. परंतु अलिकडे सध्या पाश्चात्य पद्धतीची वेशभूषा करत असल्याचे दिसून येते. पूर्वी स्त्रिया लुगडी, चोळी इत्यादी पोशाखाचा वापर करत. परंतु सध्या स्त्रिया फॅशन वेशभूषेत असाल्याचे दिसून येते. अलंकार भूषणामध्ये स्त्रिया कोल्हापूरी साज वापरतात. उदा. सौ.आर्चना राजेंद्र पाटील यांनी सांगितले की, स्त्रिया दागदागिन्यामध्ये कोल्हापूरी साज, पाटल्या, नथ, बाळया, बुगडया, मासोळी, पैंजण, मंगळसूत्रे, डुले, तोडे, कमरपट्टे आणि बाजूबंद इत्यादी वापरतात आणि सध्या स्त्रिया नेकलेसचे विविध डिझाईन असलेले दागिने वापरत आहेत.[२९]

**३) आहार :–**

मलकापूर येथील लोक दैनंदिन जेवणात तांदळाची, ज्वारीची आणि नाचण्याची भाकरी आणि डाळीची आमटी, भात, पालेभाज्या, दही, दूध, तूप, ताक इत्यादीचा आहारात वापर करत. सण–समारंभावेळी पुरणपोळी खास करून तेल्याच्या पोळया या भागाचे वैशिष्टये आहे. श्रीखंड, जिलेबी, लाडू या गोड पदार्थाचाही जेवणात वापर करत. मांसाहारामध्ये कोल्हापूरी पद्धतीचा तांबडा आणि पांढरा रस्सा असतो. पूर्वी पाहुण्यांचा पाहुणचार गुळपाणी, पानसुपारी देऊन केला जात असे. परंतु सध्या चहा, थंड पेय देऊन केला जातो.

**४) सण–समारंभ :–**

मलकापूर या भागात हिंदू धर्मातील सर्वच सण व उत्सव मोठया आनंदाने साजरे केले जातात. त्यामध्ये गुढीपाडवा, वटपौर्णिमा, नागपंचमी, गणेशोत्सव, गौरीपूजन, नवरात्रोत्सव, दसरा, दिपावली, मकरसंक्रात, महाशिवरात्री इत्यादी सण–उत्सव साजरे केले जातात.

**१) गुढीपाडवा :–**

चैत्रशुद्ध प्रतिपदेचा गुढीपाडवा हा सण मोठया उत्सवात साजरा करत. चैत्र महिन्यातील पहिला दिवस आणि मराठी नववर्षाची सुरूवात या दिवसापासून होते. म्हणूनच हा सण गुढी उभारून आणि पोळया करून साजरा केला जातो. साडेतीन मुहुर्तापैकी हा एक असल्याने या दिवसाला महत्त्व आहे. या दिवशी नामकरण विधी केला जातो.

**२) पोळा(बेंदूर) :–**

आषाढी पौर्णिमेला पोळा(बेंदूर) हा सण या ठिकाणी साजरा केला जातो. या सणादिवशी शेतकरी बांधव आपल्या बैलांना धुतात व सजवतात. त्यांची वाजतगाजत मिरवणूक काढतात. मात्र पोळयादिवशी पाटलाची बैले प्रथम मिरवणूकीने वेशीतून आत येत असत.

**३) दसरा :–**

समाजातील सर्व स्तरातून दसरा सण मोठया उत्सवात साजरा केला जातो. दसरा हा सण साडेतीन मुहुर्तापैकी एक असल्याने कोणत्याही शुभकार्याची सुरूवात या दिवसापासून केली जाते. कागदपत्रामध्ये दसरा सणाचा उल्लेख 'विजयादशमी' असा सापडतो. गावोगावी सीमोल्लंघन मोठया उत्सवात वाजत–गाजत आबाल वृद्धासह साजरे करीत. त्यावेळी आपटयाची पाने सोने म्हणून लुटले जाते आणि एकमेकांना वाटले जाते.

**४) दिपावली :–**

या सणाला सामाजिक व धार्मिक परंपरा असल्याने प्रत्येक घरोघरी सण साजरा केला जातो. दिपावली सणाच्यावेळी बलिप्रतिपदा, लक्ष्मीपूजन, भाऊबीज हे दिवस मोठया उत्साहाने साजरे केले जातात. या सणाला गोड पदार्थ तयार करून दीपोत्सव व फटाक्यांची आतीषबाजी करून आनंद व्यक्त केला जातो.

## ५) मकर संक्रात :–

दिपावली नंतरचा महत्त्वाचा सण म्हणजे मकर संक्रात या दिवशी स्त्रिया एकमेकींना तिळगूळ देऊन मोठया प्रमाणात सण साजरा करतात. यादिवशी स्त्रिया नवीन कपडे आणि दागदागिने घालत तसेच वेगवेगळया सौंदर्य प्रसाधनाचाही वापर करत. एकमेकातील स्नेह वृद्धिंगत व्हावा हा उद्देश तिळगूळ देण्या–घेण्यामागे होता.

## ६) होळी (शिमगा) :–

हा सण फाल्गुन पौर्णिमेस साजरा केला जातो. सुगी संपल्यावर हा सण येत असल्याने सर्व लोक हौस, मौज व करमणूक करत असत. खेडयातून या सणादिवशी सोंगे आणली जात. होळी पेटविण्याचा मान गावच्या पाटलाचा असे. होळीला पुरणपोळीचा नैवेद्य दाखविल्यानंतर होळी भोवती फेर धरून बोंबलण्याची पद्धत होती. होळीच्या दुसऱ्या दिवशी धुळवड ही मटण आणि मद्यपान करून साजरी केली जात. या सणाशिवाय मलकापूरमध्ये गोकुळाष्टमी, गणेशचतुर्थी हे उत्सव साजरे करत. ख्रिश्चन लोक नाताळ, गुडफ्रायडे आणि मुस्लिम लोक मोहरम, बकरी ईद, ईद–ए–मिलाद इत्यादी सण साजरे करत. मलकापूरमध्ये मोहरम हा सण मोठया उत्सवात साजरा केला जातो. या उत्सवामध्ये हिंदू आणि मुस्लिम बांधव मोठया संख्येने सहभागी होतात.

## ५) घरे :–

शहरातील श्रीमंत लोकांची घरे आणि वाडे कौलारू असत. ही घरे पक्क्या विटांनी बांधली जात. तर खेडयामधील घरे ही दगड, मातीची आहेत. काही घरांच्या मातीच्या भिंतीना सिमेंटने दरजा भरलेल्या दिसतात. खेडयात घराच्या चौकट आणि दरवाजासाठी बाभळ, जांभूळ आणि आंबा इत्यादी झाडाचा वापर करत. श्रीमंत लोक घरकामासाठी सागवान लाकडाचा वापर करत. कोल्हापूर जिल्हयात चार प्रकारची घरे आढळतात. पहिल्या प्रकारातील घरेही बहुधा दोन मजली आणि चौकाची होती. ही घरे दगडात आणि पक्क्या विटांनी बांधली जात आणि त्यावर कौलारू छप्पर घालत असत. या घर बांधकामात ओसरी आणि सोपा तयार करत. या सोप्यामध्येच घराचा मालक ऊठ–बस करत असत. श्रीमंत लोक या घरात माजघर, देवघर, अशा स्वतंत्र खोल्या बांधत या घराच्या पाठीमागील बाजूस जनावरांचा गोठा असे. घराच्या एका बाजूस स्वच्छतागृह असे. या प्रकारातील घरांना परडे ठेवत आणि या परडयात

घर मालक फूलझाडे आणि केळीची झाडे लावत. ही घरे हवेशीर नसत आणि कोंदट असत. अशा घराच्या समोरील प्रवेशद्वाराची बाजू लाकडी कमानीने कोरीव, सुशोभित केलेली असे. या घराच्या भिंतीना चुना लावून तांबडे पट्टे ओढले जात. याबरोबर भिंतीवर देव-देवतांची आणि जंगली प्राण्यांची चित्रे काढली जात. तांबडया पट्ट्यामुळे भुताखेताची व जरीमरीआईची पीडा टळते अशी सर्वच लोकांची समजूत होती.[३०]

दुसऱ्या प्रकारातील घरे एक मजली असून कच्च्या विटांची, कौलारू आणि धाब्याच्या छप्पराची होती. अशी घरे दुकानदार किंवा कारागीर लोकांची देखणी व प्रशस्त होती. हे लोक घराच्या दर्शनी बाजूस दुकान उभा करत असे. तिसऱ्या प्रकारात ही घरे बरीच मोठी असून त्यात जनावरांसाठी मोठा गोठा असे. ही घरे कच्च्या विटांची आणि दोन खोल्यांची होती. अशी घरे शेतकऱ्यांची असत. चौथ्या प्रकारच्या घरास एक खोली आणि त्यावर छप्पर असे. यासाठी गवत व पाल्याचा वापर केला जात. या घराच्या भिंती मातीच्या किंवा मातीने लिंपलेल्या तुरकाटयांच्या कुडाच्या असत. अशी घरे मजूर, गरीब लोकांची राहण्याची ठिकाणी आहेत. कोल्हापूर जिल्हयात अशा प्रकारच्या घराची विविधता दिसून येते.

अशाप्रकारे मलकापूर नगरीत माती, विटा आणि दगडी भिंतीचे दुमजली वाडे आणि कौलारू घरे दिसतात. ओटी, पडवी, माजघर, स्वयंपाकघर, देवघर, स्नानगृह इत्यादी घरांचे विभाग पाडलेले दिसतात. जनावरांच्या निवाऱ्यासाठी घराच्या मागील बाजूस गोठा केला जात असे.

## ६) सामाजिक व धार्मिक चालीरिती :-

सामाजिक जीवनाचे सामाजिक व धार्मिक चालीरिती हे प्रमुख अंग आहे. या चालीरितीमध्ये जन्मोत्सव, समारंभ, स्त्रियांची स्थिती आणि वेठबिगारी इत्यादी घटकांचा समावेश होतो.

### १) जन्मोत्सव :-

कोल्हापूर भागात पूर्वी मुलींचा जन्म हा दुय्यम मानला जात. मुलगा जन्माला आला की आनंदोत्सव साजरा करून साखर वाटली जात होती उदा. छत्रपती संभाजी महाराज पहिले (१७१४-१७६०) यांची राणी कुसाबाईंना १६ मे १७६१ रोजी मुलगा झाला. तेव्हा करवीर

राज्याची महाराणी जिजाबाई यांनी इचलकरंजीच्या अनुबाई घोरपडे यांना साखर पाठविली होती. त्यास साखरेचा स्वीकार करावा म्हणून तसे पत्रही पाठविले होते.[३०]

**२) उपनयन :–**

मुलांच्या लहानपणी मुंज किंवा उपनयन समारंभ केला जात होता. हा समारंभ फक्त उच्च जातीमध्येच साजरा केला जातो. उदा.छत्रपती शिवाजी तिसरे उर्फ बाबासाहेब महाराज यांच्या वयाच्या दहाव्या वर्षी उपनयन करण्यात आले.

**३) लग्न समारंभ :–**

मानवी समाज जीवनामध्ये लग्न हा महत्त्वाचा घटक मानला जातो. प्राचीन काळापासून विवाहास धार्मिक महत्त्व आहे. स्त्री–पुरुष यांना पती–पत्नी या नात्याने एकत्र आणण्याचा कार्यक्रम म्हणजे लग्न होय. लग्न समारंभ प्रसंगी कन्यादान, होमविधी, पाणी ग्रहणविधी अग्नी परिनयन, अश्वारोहण, लज्जाहोम या सप्तपदी हे सात विवाहविधी केले जात होते.

**४) बालविवाह :–**

कोल्हापूर भागात बालविवाहाची पद्धत अस्तित्वात होती. मुलगा अथवा मुलगी ८–९ वर्षाची झाली की त्यांची लग्ने केली जात. काही वेळा वयाने जास्त असणाऱ्या पुरूषासोबत मुलींची लग्ने लावली जात. परंतु विधवा विवाह फारसे केले जात नव्हते.

**५) बहुपत्नीत्व :–**

कोल्हापूर भागात बहुपत्नीत्त्वाची पद्धत अस्तित्वात होती. छत्रपती आणि त्यांचे सरदार हे एकापेक्षा अनेक मुलींशी विवाह करत असत. उदा. कोल्हापूरच्या छत्रपतींना कमीत–कमी दोन बायका होत्या.

**६) स्त्रियांची स्थिती :–**

पुरूषांपेक्षा कमी महत्त्वाच्या अबला, दुबळया स्त्रिया म्हणून त्यांच्याकडे बघितले जाते. ‘स्त्री’ हा सामाजिक कुटुंबातील एक महत्त्वाचा घटक आहे. परंतु कुटुंबात मुलगा जन्माने जेवढा आनंद होतो. तेवढा आनंद मुलीच्या जन्माने होताना दिसत नाही. १९च्या शतकात याला कोल्हापूरातील समाज अपवाद नव्हता. समाजातील स्त्रीचे स्थान हे तिचे शिक्षण, आर्थिक स्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य आणि पुरूषाबरोबरीचे स्थान यावर अवलंबून असते.

राजघराण्यातील आणि सरदार घराण्यातील स्त्रियांना परंपरागत शिक्षण दिले जात होते. परंतु गरीब खालच्या वर्गातील स्त्रिया शिक्षणापासून वंचित होत्या. सन १८५३ पर्यंत अशी परिस्थिती होती. सन १८५३ साली कोल्हापूरात मुलींची शाळा सुरू झाली तेव्हापासून स्त्रियांना शिक्षण घेण्यास वातावरण खुले झाले. १९ व्या शतकातील समाजात पडदा पद्धत होती. श्रीमंत मराठा वर्गात पडदा पद्धत अस्तित्वात होती. ब्राह्मण  व मध्यमवर्गीय स्त्रिया सहसा घराबाहेर पडत नसत. काही कारणाने बाहेर जाताना डोक्यावर पदर घेत आणि पोक्त व्यक्तीला बरोबर घेवून जावे लागत. शेतकरी वर्गातील स्त्रिया पुरूषाच्या बरोबरीने काम करत असत. वरच्या वर्गात हुंडा घेण्याची प्रथा होती. जास्त हुंडा देणारा आणि घेणारा श्रीमंत समजला जात. एकंदरीत मागासलेल्या स्त्रियांचे फार हाल होत आहेत.

**७) सती :–**

कोल्हापूर राज्यात पूर्वी सतीची चाल अस्तित्वात होती. मृत पतीच्या चितेवर स्त्रीने स्वतःला जाळून घेण्याचा हा भयंकर प्रकार नेमका कधी व कोणत्या कारणाने सुरू झाला. हे सांगता येत नाही. पण सती जाण्यामागे पती निधनानंतरची असुरक्षितता हे कारण महत्त्वाचे असू शकेल. सध्या सतीची चाल अस्तित्वात नाही. ती कायद्याने गुन्हा आहे.

**८) वेठबिगारी :–**

प्राचीन काळापासून ही वेठबिगारीची प्रथा चालू आहे. समाजातील गरिब लोकांना सरकारी कर देता येत नसल्याने त्यांना आपली सेवा सरकारला व समाजाला कामाच्या स्वरूपात देण्याची पद्धत रूढ होती. शुद्र बलुतेदारांना 'वेठबिगारी' असे म्हणत. कोल्हापूर भागात वेठबिगारीची प्रथा अस्तित्वात होती. उदा. 'मौजे आडवली तर्फ साळसी या गावातील मिराशी व साठम यांच्या वेठीच्या धास्तीमुळे गावचे लोक पळून जात असल्याची तक्रार सुभेदार कृष्णाजी विश्वनाथ यांच्याकडे करण्यात आली. या तक्रारीवरून आडवली तर्फ साळसी येथील वेठबिगारीची चाल बंद केली आहे. असे तुळाजी नाईक–साठम, मिराशी व रयतेला कृष्णाजी विश्वानथ सुभेदार यांनी सन १७६३ मध्ये कळविले होते.[३२] सन १७६३ पासून ही वेठबिगारीची प्रथा बंद करण्यात आली.

**७) धर्मशाळा :–**

पूर्वी वाटसरूंना आश्रय घेण्यासाठी रात्रीचा निवारा म्हणून धर्मशाळा अस्तित्वात होत्या. अशा धर्मशाळा मुख्य रस्त्यावर व धार्मिक स्थळांच्या ठिकाणी असत. या ठिकाणी यात्रेकरूंची विनामूल्य किंवा अत्यल्प शुल्क घेऊन राहण्याची सोय केली जात असे. अशा दोन धर्मशाळा मलकापूर येथे आहेत.

## ११) आर्थिक जीवन :–

या घटकात मलकापूर गावच्या लोकांच्या आर्थिक जीवनावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न आहे. नैसर्गिक अनुकूल हवामान, पाऊस, जमिनीची सुपीकता, मानवी कष्ट, सुधारित शेती अवजारे, जमिनीला होणारा कृत्रिम पाणी–पुरवठा आणि बी–बियाणे इत्यादी घटकांवर पिकांची उत्पादन क्षमता अवलंबून असते. यामध्ये मलकापूरचा शेतकरी वर्ग आणि कृषी व्यवस्था याचा आढावा घेतला आहे. याठिकाणी स्वातंत्र्यपूर्व काळात आर्थिक दुर्बलता होती. शेतमजूर, कारागीर, लहान शेतकरी आणि किरकोळ व्यापारी यांची आर्थिक परिस्थिती बिकट होती. अनेक कुटुंबे खाजगी सावकारीच्या विळख्यात गुरफटलेली होती. त्यांना कामातून मिळालेले पैसे व्याजावर खर्च होत. परंपरागत कृषी पद्धत, अज्ञान, अनियमित पाणी पुरवठा आणि शेतीमालाचे अनिश्चित भाव इत्यादी समस्या शेतकऱ्यांच्या होत्या. शेतकरी शेती कामासाठी आणि शेतीपूरक व्यवसायासाठी कर्ज काढत पण कर्जाची परतफेड करताना शेतकऱ्यांना अडचणी येत असत. खाजगी सावकाराच्या भरमसाठ व्याजामुळे शेतकऱ्यांची पिळवणूक होत असे. शेतकऱ्यांचे दारिद्रय, मागासलेपणा दूर करून त्यांना मदतीची गरज होती. महाराष्ट्रात सहकार चळवळ सुरू झाल्यानंतर त्यांच्यात सुधारणा होवू लागली.

**१) मलकापूरची जमीन :–**

कोल्हापूर जिल्हयात काळी, तांबडी, मळी व खारी अशा चार प्रकारची उत्तम, मध्यम आणि हलकी जमीन आढळते. विशेषतः मलकापूर भागात काळी, तांबडी आणि खारी स्वरूपाची जमीन आढळते. उत्तम प्रकारच्या जमिनीतून बागायती पिके घेतली जात. या जमिनीला वर्षभर पाणी पुरवठा केला जात. उत्तम प्रकारात काळी आणि तांबड जमिनीचा समावेश होतो. काळी जमीन नद्यांच्या खोऱ्यात आणि तांबडी जमीन सहयाद्रीजवळच्या डोंगर उतरणीवर व ओढयांच्या खोऱ्यात आढळते. तांबडया जमिनीत लोहाचे प्रमाण अधिक असते.

अशी जमीन जिल्हयात पन्हाळा, भुदरगड पेटयात व विशाळगड आणि बावडा जहागिरीत मोठया प्रमाणात आढळते.

तांबडी मातीयुक्त जमीन चांगल्या निचऱ्याची, धुपणारी व उथळ आहे. ही जमीन आम्ल व चुनखडीयुक्त असून तिच्यात फॉस्फरिक गुणधर्म कमी आढळतो. अशा जमिनीत ओलसरपणा टिकून राहत नसल्याने तेथे फक्त वरी, नाचणी, सावा, राळा इत्यादी पिके घेतात. या जमिनीत नत्र व स्फुरदच्या वापराने भाताचे पीकसुद्धा घेता येते. या भागातील वनांमध्ये साग, उंडी, जांभूळ इत्यादी मौल्यवान झाडे आढळतात. वनांतील जमीन मूलभूत द्रव्ययुक्त व सुपीक आहे. तांबडी माती खडकापासून बनलेली असून साधारणतः तपकिरी काळसर व ओलसरपणा टिकवून ठेवणारी असून तेथे भाताचे पीक घेतात.[३३]

**२) शेती हंगाम :–**

शेती व्यवसायात खरीप आणि रब्बी असे दोन हंगाम असतात. नैऋत्य मान्सून पावसावर जी पीके घेतली जातात त्यांना 'खरीप' पीके म्हणत आणि ईशान्य मान्सून पावसावर जी पीके घेतली जातात. त्यांना रब्बी हंगाम म्हणतात.[३४] मलकापूरमधील शेतकरी खरीप हंगामासाठी नैऋत्य मान्सून पावसावर अवलंबून असतो. रोहिणी नक्षत्रातील पावसाच्या सरीचा शेतीच्या मशागतीसाठी चांगला उपयोग होतो. या भागातील शेतकरी या हंगामात भात, नाचणी, वरी, सावा, राळा, खरीप ज्वारी, भुईमूग, कापूस आणि तंबाखू इत्यादी पिकांचे उत्पादन घेत असत. तसेच रब्बी हंगाम हा ऑक्टोबर महिन्यापासून सुरू होवून तो मार्चमध्ये संपतो. मलकापूरातील शेतकरी या हंगामात ईशान्य मान्सून पावसावर आधारित रब्बी ज्वारी किंवा शाळू, हरभरा आणि गहू इत्यादी पीकांचे उत्पादन मोठया प्रमाणात घेतात.

**३) शेतकरी जीवन :–**

मलकापूरच्या लोकांचा उदरनिर्वाह हा शेतीवर आधारित आहे. जिल्हयातील शेतकरी अतिशय कष्टाळू व प्रयोगशील असलेला दिसतो. शेती सुधारणा करून जास्त उत्पन्न घेण्याकडे त्यांचा कल दिसतो. शेतीत काम करणाऱ्या शेतकऱ्यांना कुणबी म्हणत. शेतकरी मध्यम उंचीचे, सुदृढ बांध्याचे आणि भात, भाकरी व मसालेदार भाजी खाणारे आहेत. स्त्रिया घरकाम सांभाळून पुरूषाच्या बरोबरीने शेतात काम करतात. कुणब्याशिवाय शेती काम करण्यामध्ये लिंगायत, जैन, ब्राह्मण, मराठा, मुसलमान, बेरड, धनगर, कोळी, महार व कारागीर इत्यादी

जातीचा समावेश होता. कुणबी शेतकरी मेहनती व जुन्या चालीरिती न सोडणारे होते. जैन आणि लिंगायत शेतकरी कष्टाळू होते. ब्राह्मण  व मराठा शेतकरी शेतात स्वतः काम न करता गडी लावून शेती करत. कुणब्यापेक्षा मुसलमान शेतकरी कष्ट कमी करत असत. शेती कमी किफायतशीर असल्यामुळे बेरड, धनगर, कोळी आणि महार इत्यादी शेतकरी व कारागीर लोक आपला व्यवसाय सांभाळून शेती करीत.

शेती हेच उपजीविकेचे प्रमुख साधन आहे. या भागातील शेतकरी देवावर विश्वास ठेवत आणि शेतातील सर्व कामेही मुहूर्त पाहून करतात. उदा. पेरणी, कापणी, मळणी, गुराळ चालू करताना इत्यादी. शेतकरी कुटुंबातील बायका म्हशीच्या दुधापासून तूप तयार करून विकत. शेतकरी सोमवार दिवशी कधीही बैलांचा नांगर धरत नव्हते. कारण बैल(नंदी) हे महादेवाचे वाहन असल्याने सोमवारी दिवशी नांगर धरत नसत.[३५] शेतकऱ्यांची घरे ही भली मोठी असत. त्या घरामध्ये एक जनावरांसाठी गोठा असे. ही घरे कच्च्या विटांची बांधलेली एक मजली असत. शेतकरी कुटुंबाची स्थिती फार चांगली नव्हती. परंतु खाऊन–पिऊन सुखी कुटुंबे होती. अनिश्चित पावसामुळे शेतकऱ्यांचे आणि जनावरांचे हाल होते. शेतकरी पोशाखात अंगावर कांबळी(घोंगडे) बंडी व धोतर, डोक्यास रूमाल(पटका) आणि पायात पायताण इत्यादी साहित्याचा वापर करत. शेतकऱ्यांच्या बायका एक–दीड रूपये किमतीचे लुगडे व दोन–तीन आण्याचा चोळीचा खण वापरत.[३६]

**४) जलसिंचन :–**

पूर्वी कोल्हापूर जिल्हयातील सर्व शेती पावसावर अवलंबून होती. शेतीला कृत्रिम पाणी पुरवठयाची सोय केल्यावर उत्पादनात वाढ होईल. हे शासनाच्या, शाहू महाराजांच्या आणि शेतकऱ्यांच्या लक्षात आल्यानंतर यांनी शेतीला कृत्रिम पाणी पुरवठा करण्यासंदर्भात महत्वाची भूमिका बजावली. त्यांनी त्यासाठी नद्यावर धरणे, तळी, विहिरी आणि प्रकल्प इत्यादी पाणी साठयाचा उपयोग शेती कामासाठी केला.

**१) कालवे :–**

कोल्हापूर भागात राजर्षी शाहू महाराजांनी 'राधानगरी' धरण बांधल्यानंतरच या भागात कालवे झाले. विशेषतः कासारी, कडवी आणि जांभळी मध्यम प्रकल्पांने शाहूवाडी तालुक्यातील बरीचशी जमीन बागायताखाली आली आहे. जिल्हयात कालव्याद्वारे जलसिंचनाखाली विशेष

क्षेत्र नाही. परंतु नद्यावर कोल्हापूर पद्धतीचे बंधारे बांधून उपसा जलसिंचनाद्वारे जास्त क्षेत्र ओलिताखाली आणले आहे.

**२) धरणे व पाट :–**

पावसाळयात नदी व ओढयांना भरपूर पाणी असते. या नदी नाल्यावरती तात्पुरते बांध घालून शेतीला पाणी पुरवठा केला जातो. मलकापूरच्या डोंगराळ भागात बांध व पाट हे मातीने घालत असत. हे पाट जानेवारी–फेब्रुवारी दरम्यान कोरडे पडतात. नद्या–ओढयांच्या पाण्याला उतार असल्याने हे पाट कोरडे पडत असत.

**३) विहिरी :–**

मलकापूर भागात जी बागायती शेती केली जात होती ती विहिरीच्या पाण्यावर आधारित केली जात होती. पूर्वी विहिरीतील पाणी मोटेच्या सहाय्याने काढून शेतीला दिले जात होते. या भागात विहिरीचे प्रमाण बऱ्यापैकी आहे. पाऊस पाणी चांगला झाला तर विहिरीला पाणी असत. कोल्हापूर जिल्हयात सन १८९३ मध्ये विहिरींची संख्या १२,०१६ इतकी होती.[३७] पाट बांधण्यासाठी आणि विहिरी खोदण्यासाठी सरकारकडून शेतकऱ्यांना मदत केली जाते. शेतीत विहिरीच्या पाण्यावर नगदी पिके आणि भाजीपालाही घेतला जातो.

अशाप्रकारे राज्यात पाऊस विषम व अनिश्चित स्वरूपाचा असल्यामुळे शेतीतून मुबलक उत्पन्न निघत नव्हते. यावर मात करण्यासाठी शेतीसाठी जलसिंचनाच्या विविध उपाययोजना राबविल्या. नदी व नाल्यावरती धरणे, बंधारे, तलाव आणि बांध घालून पाणी अडविले आणि त्याचा उपयोग शेती आणि उद्योगधंद्यासाठी करण्यात येवू लागल्याचे दिसून येते. आडवलेले पाणी इंजिन आणि इलेक्ट्रिक मोटरच्या सहाय्याने शेतीसाठी वापरण्यात येवू लागले. परंतु उंचावर असलेल्या भागावर पाण्याची सुविधा नसल्यामुळे त्याठिकाणी उत्पादनाचे प्रमाण फार कमी असल्याचे आढळते. नारायण केरबा पाटील यांच्या मुलाखतीतून अशी माहिती मिळाली की नदीवरील धरणे, बंधारे आणि तलावाच्या पाणी साठयाचा शेती कामासाठी चांगला उपयोग झाला. शेतीतून मिळणाऱ्या ऊस व भात उत्पादनात वाढ झाली. त्यामुळे आमची आर्थिक परिस्थिती सुधारत आहे. असे त्यांनी सांगितले.[३८]

**५) कृषी उत्पादने :–**

मलकापूरातील बहुतांशी लोकांचा शेती हा मुख्य व्यवसाय आहे.मानवी कष्ट व शेतीची मशागत करण्यासाठी वापरली जाणारी अवजारे हे धान्य उत्पादनातील महत्त्वाचे घटक आहेत. कृषी उत्पादने खरीप व रब्बी अशा दोन हंगामात घेतली जातात. तृणधान्यामध्ये गहू, ज्वारी, मका, राळे, वरी, भात, ही पीके घेतली जात. कडधान्यामध्ये हरभरा, हुलगा, मूग, उडीद, चवळी आणि मटकी ही कडधान्ये घेत. तेलबियामध्ये जवस, करडई, भुईमूग, तीळ, कारळे इत्यादी आणि बागायती पीकात ऊस, तंबाखू, कापूस तसेच आंबा, नारळ, केळी, पेरू इत्यादी पीके शेतकरी घेत असतात.

**१) भात :–**

मलकापूरच्या डोंगराळ भागात भात पीक मोठया प्रमाणात घेतात. सोयीनुसार पाभरीच्या सहाय्याने, टोकण पद्धतीने किंवा लावणी पद्धतीने भाताची पेरणी शाहूवाडी, पन्हाळा, बावडा, राधानगरी, भुदरगड आणि आजरा तालुक्यातील शेतकरी करतात. लावणी पद्धतीत प्रथम रोपे तयार करण्यात येतात. त्यासाठी योग्य जमिनीचा तुकडा निवडून तो तुकडा मार्च–एप्रिल महिन्यात नांगरून व ढेकळे फोडून भुसभूशीत करून गादी वाफे तयार करतात. पाऊस पडल्यानंतर वाफ्यांमध्ये बी पेरून साधारणतः २० ते २५ दिवसानंतर रोपास सहावे पान फुटल्यावर ती रोपे काढून त्यांची पिकासाठी तयार केलेल्या जमिनीत लावणी करतात. या भागात अनेक प्रकारचा भात पिकवला जातो. उदा. मुगद, शिरेसाळ, करणेमाळ, आंबेमोहोर, सोमसाळ, वायंगणी, पडवळ, बरगळ, रावळी, तामसाळ, जिरगे इत्यादी.[३९]

**नाचणी :–**

जिल्हयात तृणधान्य पिकांमध्ये नाचणीचा तिसरा क्रमांक लागतो. हे पीक प्रामुख्याने जिल्हयातील आजरा, भुदरगड, चंदगड, गडहिंग्लज, राधानगरी व शाहूवाडी मलकापूर या ठिकाणच्या डोंगराळ व जास्त पावसाच्या भागात हलक्या प्रतीच्या जमिनीत घेतात. नाचणीचे हे पीक मुख्यतः पावसावर अवलंबून असते. नाचणीची रोपे टणक असल्यामुळे हलक्या प्रतीच्या जमिनीत चांगली वाढतात. हे पीक नोव्हेंबर महिन्यात तयार होते. जिल्हयाच्या पश्चिम भागातील गरीब लोकांचे नाचणी हे प्रमुख अन्न आहे. नाचणीचा तृणधान्य पीकांमध्ये जरी तिसरा क्रमांक असला तरी सध्या या पिकासाठी उपयुक्त असलेल्या जमिनीत संकरित

ज्वारीची लागवड मोठया प्रमाणात करण्यात येत असल्यामुळे नाचणी खालील क्षेत्रात सारखी घट होत आहे.[४०]

**३) गहू :–**

जिल्हयात तृणधान्य पिकात भात, ज्वारी आणि नाचणीच्या पिकानंतर गव्हाचा क्रमांक लागतो. या पिकाखालील क्षेत्र शाहूवाडी, मलकापूर, हातकणंगले व शिरोळ या भागात जास्त आहे. प्रामुख्याने गव्हाचे पीक हे रब्बी हंगामात जलसिंचन करून घेतात. खपली नामक जातीची लागवड लोकप्रिय आहे. गव्हाची पेरणी ही ऑक्टोबर–नोव्हेंबर मध्ये केली जाते आणि कापणी व मळणी फेब्रुवारी–मार्च महिन्यात केली जाते. जिल्हयातील हवामान व जमिनीचा गुणधर्म यानुसार जिल्हयासाठी शासनाच्या कृषी विभागाने निफाड–४, केनफाड–४ या जातींची शिफारस केली आहे. सध्या अधिक उत्पादन देणाऱ्या जातींच्या प्रसारामुळे गव्हाच्या लागवडीत सारखी वाढ होत आहे.[४१]

**४) मकाः–**

मलकापूर भागात मक्याचे पीक हे ऊस व हळदीच्या पिकात मिश्रपीक म्हणून शेतकरी घेत असतात. हे पीक जरी बारमाही असले तरी ते प्रामुख्याने रब्बी हंगामात जास्त घेतले जाते. पूर्वी १९५९ सालामध्ये मलकापूर व शाहूवाडी या भागात शेतीतील मक्याच्या पिकांवर हुमणी रोगाचा प्रादुर्भाव झाला होता. या रोगामुळे मक्याचे सारे पीक वाया जाण्याच्या मार्गावर होते. त्यामुळे येथील शेतकरी हवालदिल झाला होता. त्यावेळी मलकापूर नगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांनी शेतकऱ्यांना या रोगासंदर्भातल विविध औषधांचे व फवारणीचे मार्गदर्शन केले होते.[४२] सध्या या भागात संकरीत मक्याचीही लागवड सुरू झालेली आहे.

**५) ऊस :–**

कोल्हापूर जिल्हयातील सर्वात महत्त्वाचे नगदी पीक ऊस आहे. जिल्हयाची अर्थव्यवस्था ऊस या पीकावर आधारित आहे. येथील हवामान व जमीन ऊसाच्या लागवडीसाठी अतिशय पोषक असल्याने या पिकाची लागवड मोठया प्रमाणात केली जाते. लागवडीखालील क्षेत्र आणि उत्पादनाच्या दृष्टीने राज्यात जिल्हयाचा अग्रक्रम लागतो. येथील ऊसाचे वैशिष्टये म्हणजे ऊसापासून तयार होणारा गूळ देशभर प्रसिद्ध आहे. तसेच ऊस साखरेच्या उताऱ्याचा दृष्टीनेही प्रसिद्ध आहे. त्यामुळे सन १९८५ मध्ये जिल्हयात एकूण

अकरा साखर कारखाने अस्तित्वात होते. ऊसाची लागवड ही आडसाली, पूर्वहंगामी आणि सुरू या तीन हंगामात केली जाते.[४३] ऊसाच्या पिकास भरपूर पाण्याची आवश्यकता लागते. या भागातील वाढत्या जलसिंचनाच्या सोयीमुळे ऊस पिकाखालील क्षेत्रात दिवसेंदिवस वाढ होत आहे. अशा पाण्याच्या सोयी–सुविधानुसार मलकापूर भागातही ऊसाचे उत्पादन कमी–अधिक प्रमाणात घेतले जाते.

**६) कॉफी व बटाटा :–**

कोल्हापूर जिल्हयात कॉफी लागवडीचा प्रयोग पन्हाळा–भुदरगड, विशाळगड आणि बावडा येथे करण्यात आला होता. या पिकाचे उत्पादन डोंगर उतारावरील जमिनीत शेतकरी घेतात. यापासून त्यांना आर्थिक फायदा होत आहे. पन्हाळा तालुक्यातील तीन दरवाजा बाग आणि भुदरगड या ठिकाणी वेलदोडे लागवडीचा प्रयोग झाला होता. पन्हाळा आणि मलकापूर या भागात शेतकरी मोठया प्रमाणात बटाटयाचे उत्पादन घेत आहेत. शेतकऱ्यांना या पिकापासून चांगला मोबदला मिळत आहे.

**६) शेतीची मशागत :–**

मलकापूर भागातील शेतकरी शेतीची मशागत करण्यासाठी औजारांचा वापर करत. नांगर, कोळपे, ज्वारी पेरण्यासाठी तिफण, विळा, कुऱ्हाड, कुदळ, खोऱ्या, टोपली आणि बैलगाडी इत्यादी साहित्याचा शेतकरी शेती कामासाठी उपयोग करत असत. पूर्वी शेतकरी शेती नांगरण्यासाठी बैले, रेडे यांचा वापर करत असत. सध्या मात्र तंत्रज्ञानात प्रगती झाल्याने शेती मशागतीसाठी ट्रॅक्टरचा वापर केला जात आहे. पहिली नांगरट जमीन छेदून नांगरली जात. दुसऱ्या कुळवणीने जमीन पूर्ण सपाट केली जात. त्यानंतर जमिनीतील वाळलेले गवत वेचून काढत आणि पेरणीसाठी जमीन तयार ठेवत. हाताच्या सहाय्याने बी जमिनीत टोचले जात किंवा कुरीच्या सहाय्याने रेषा आखून बी टोकले जात असत. तिफणीच्या सहाय्याने पेरणी केली जात. पेरणी केल्यानंतर फक्त लाकडी दिंड शेतातून फिरविले जात. पिकातील गवत काढण्यासाठी कोळप्याचा वापर करीत. ज्वारी, नाचणी, भात, ऊस, तंबाखू, कापूस, भाजीपाला इत्यादी पिकांची अंतर्गत मशागत वेगवेगळया पद्धतीने केली जाते.

### ७) शेतीसाठी खतांचा वापर :-

मलकापूरातील शेतकरी शेती उत्पादनात वाढ होण्यासाठी सेंद्रिय खतांचा वापर करत. जिरायत व बागायत जमिनीत कमी-अधिक प्रमाणात खत टाकत. पूर्वी या परिसरात जनावरांच्या शेणखताचा व मुतारीचा खत म्हणून जास्त प्रमाणत वापरत. त्यावेळी रासायनिक खते वापरली जात नव्हती. सध्या मात्र या खताचा वापर होतांना दिसत आहे. भाताच्या शेतीसाठी नेहमी खत घालत असत. जिरायत जमिनीत शेतकऱ्याला वाटेल त्यावेळीच खत घातले जात असे. नदी काठच्या मळी जमिनीत कधीच खत घातले जात नसत. काळया व उत्तम प्रतीच्या तांबडया जमिनीस तीन वर्षातून एकदा खत दिले जाते. लाल व हलक्या तांबडया जमिनीला दोन वर्षातून एकदा खत दिले जाते. लाल व हलक्या तांबडया जमिनीला व शेतकरी शेतीसाठी पाच प्रकारच्या खताचा वापर करत होते. या सेंद्रिय खतांमध्ये जनावरांचे शेणखत, शेळया-मेंढयाचे लेंढीखत, राब आणि हिरवळीचे खत इत्यादी खतांचा वापर करत. सोनखत, ही तंबाखू या नगदी पिकासाठी वापरत. शेळया-मेंढया शेतात बसविल्यामुळे लेंढया व मूत्र शेतात पडत. हे एक उत्तम प्रकारचे खत आहे. एक हजार मेंढरे एक रात्र बसविली असता चाळीस शेरापासून साठ शेरापर्यंत धान्य शेतकरी धनगरास देत असे. याबरोबर शेतकरी हिरवळी खत तयार करण्यासाठी ताग व तीळ शेतात पेरून वाढवत आणि फुले आले की जमिनीत गाडत असत. अशा पाच प्रकारच्या खताचा वापर कमी-जास्त प्रमाणात केला जाई. बागायत शेतीला खताचा वापर करीत. मात्र जिरायत शेतीत शेतकऱ्यांना वाटल्यास खत वापरत असत.

### ८) मलकापूरातील उद्योगधंदे किंवा व्यवसाय :-

भारत हा कृषीप्रधान देश म्हणून ओळखला जातो. आर्थिक जीवनात व्यापार व उद्योगधंदे यांना महत्त्व आहे. देशाची आर्थिक समृद्धी आणि भरभराट ही शेतीवर अवलंबून आहे. स्वावलंबन हे ग्रामीण व्यवसायाचे ध्येय होते. ग्रामीण भागात लोकांचा शेती हा मुख्य व्यवसाय आहे. शेती व्यवसायावरच शहरी व्यवसाय अवलंबून आहेत. पूर्वी खेडी ही स्वयंपूर्ण मानली जात होती. कारण गावातील लोकांच्या गरजा गावातच भागविल्या जात होत्या. अशाप्रकारे मलकापूर शहरात लहान स्वरूपात व्यवसाय आढळून येतात. कोल्हापूर रत्नागिरी महामार्गावर मलकापूर नगरी आहे. मलकापूरच्या सभोवती डोंगराळ भाग आहे. मलकापूर येथे

शुक्रवार या दिवशी आठवडी बाजार भरतो. याठिकाणी आसपासच्या खेडयातून लोक बाजार करण्यासाठी येतात. तसेच लहान मोठे व्यापारीही येथे येतात. येथील लोकांचा शेती हा मुख्य व्यवसाय आहे. या घटकात मलकापूरातील उद्योगधंदे या विषयीचा आढावा घेण्यात येणार आहे.

**१) हातमाग उद्योग :-**

कोल्हापूर जिल्हयात हातमाग उद्योगासाठी इचलकरंजी प्रसिद्ध आहे. दुसऱ्या महायुद्धपूर्व काळात इचलकरंजीत उत्तम कलाकुसरीच्या नवनवीन तऱ्हेच्या पातळांचे किंवा साडयांचे उत्पादन घेतले जात होते. त्यामुळे इचलकरंजी शहराला ‘महाराष्ट्राचे मँचेस्टर’ असे म्हणतात. सन १८४५ मध्ये हातकणंगले तालुक्यात ६३६ हातमाग होते. त्यापैकी २३६ हातमाग एकटया इचलकरंजी गावात होते. हा व्यवसाय मुख्यत्वेकरून साळी, कोष्टी, जिनगर व मुसलमान हे लोक करीत असत. ते खादी, धोतर, पंचा, रेशमी व बिगररेशमी घडीची लुगडी आणि रूमाल इत्यादी प्रकारचे उत्पादन करीत असत १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात कोल्हापूर संस्थानात एकूण ३१०२ हातमाग होते. हा उद्योग प्रामुख्याने गडहिंग्लज, करवीर, शिरोळ, भुदरगड, बावडा, पन्हाळा, कागल, इचलकरंजी आणि विशाळगड मलकापूर येथे सुरू होता.[४४] याठिकाणी हातमागावर कापड विणण्याचा उद्योग मोठया प्रमाणात चालत होता.

**२) गूळ उद्योग :-**

कोल्हापूर परिसरात गूळ तयार करणे हा फार जुना उद्योग आहे. ऊसापासून रस काढून मोठया काहीलीत उकळवून गूळ तयार केला जातो. सन १८४५ पासून गूळाची निर्यात या भागातून कच्छ, काठेवाड आणि गुजरातमधील इतर भागात केली जात असे. कोल्हापूरच्या पश्चिमेकडे अनुस्कुरा घाटातून गूळ रायगड जिल्हयातील नागोठाणे बंदरात जात असे तेथून त्याची जलमार्गाने निर्यात होत असे. पन्हाळा पेठयात व आजरा भागात गूळ बनविण्याचा व्यवसाय मोठया प्रमाणात आढळतो. याबरोबर मलकापूर परिसरातही तीन गूळ तयार करणारे ऊसाचे घाणे आहेत. तेथील तयार होणारा गूळ हा कोकण भागात विक्रीसाठी पाठविला जातो. मलकापूर येथील गूळाची बाजारपेठ प्रसिद्ध आहे. सुरेश विकास घोरपडे यांनी सांगितले की, गूळाच्या उत्पादनातून शेतकऱ्यांना चांगला फायदा होतो. आणि मजूरांनाही रोजगार उपलब्ध झाला आहे. यावरती त्यांचा उदरनिर्वाह चालत आहे.[४५]

गूळाच्या व्यापाराला उत्तेजन देण्यासाठी शाहू महाराजांनी सन १९०५ मध्ये कोल्हापूरात शाहुपूरी बाजारपेठेची स्थापना केली. ही गुऱ्हाळ घाणे मोठया शेतकऱ्यांच्या मालकीची होती. जाळवी, गुळवी, तोडकर हे कामगार या व्यवसायात काम करत. हे लोक गूळाशिवाय 'काकवी' हा पदार्थही तयार करत. अशाप्रकारे जिल्हयातील हवा, पाणी आणि जमीन ऊसाच्या पिकाला अगदी योग्य असल्यामुळे येथे चवदार व टिकाऊ गूळ तयार होतो. त्यामुळे कोल्हापूरी गूळ संपूर्ण भारतात प्रसिद्ध आहे.[४६]

**३) सराफ उद्योग :–**

मलकापूर या ठिकाणी सोन्या–चांदीचे दागदागिने तयार करणारी लहान मोठी दुकाने आहेत. खेडयातील लोक दागिने तयार करण्यासाठी याठिकाणी येतात. याठिकाणी सोन्या चांदीची नऊ दुकाने आहेत. येथे सोन्या चांदीचे दागिने तयार करतात. मलकापूरातील हा एक चांगला उद्योग आहे. कोल्हापूर जिल्हयातील कोल्हापूरी साज हे दागिने महाराष्ट्रात प्रसिद्ध आहे. सन १९०४ मध्ये हुपरी येथे कृष्णाजी रामचंद्र पोतदार यांनी पहिला चांदी कामाचा कारखाना सुरू केला. शाहू महाराजांच्या पसंतीला उतरतील असे हत्ती, घोडयांचे अलंकार या कारखान्याने बनविले होते. त्यामुळे पोतदारांना दरबाराचे काम मिळाले आणि हुपरीत चांदीचा व्यवसाय स्थिरावला. 'हुपरी' हे गाव चांदीच्या कलाकुसरीच्या कामासाठी भारतात प्रसिद्ध आहे. या व्यवसायात सोनारा व्यतिरिक्त मराठा, ब्राह्मण, जैन आणि मुसलमान इत्यादी समा–जातील कारागीरही काम करतात. हे कारागीर सोन्या चांदीच्या दुकानदारांच्या मागणीप्रमाणे दागिने तयार करून देतात. उदा. कोल्हापूरी साज, बोरमाळ, नेकलेस, बांगडया, गोफ, अंगठया, भांडी, पायातील जोडवी आणि देवादिकांच्या मूर्ती इत्यादीचे उत्पादन घेतले जाते.[४७]

**४) कुंभार उद्योग :–**

कुंभार समाजातील लोक प्रामुख्याने मातीची भांडी, विटा आणि कौले तयार करण्याच्या कामात गुंतलेले आहेत. शहरातील मक्तेदार कारागीरांना विटा व कौले तयार करण्याकरिता रोजंदारीवर ठेवत.मातीची भांडी तयार करण्यासाठी लाकडी चाकाचा उपयोग केला जातो. सध्या विजेवर चालणारे 'शैला' नावाचे नविन सुधारित चाकाचा वापर करत. या समाजातील लोक ग्रामीण भागातील काही कुंभार अजूनही परंपरागत बलुतेदार पद्धतीने व्यवसाय करतात. वीटा, कौले व मातीची भांडी बनविण्याचा उदयोग कोल्हापूर, हलकर्णी,

जयसिंगपूर, वडगाव, हुपरी, कोडोली, मलकापूर, राशिवडे इत्यादी ठिकाणी हा व्यवसाय मोठया प्रमाणात चालतो.[४८]

**५) बुरूड उद्योग :–**

मलकापूर या ठिकाणी बांबूपासून वेगवेगळया प्रकारच्या वस्तू बनविण्याचा उद्योग प्रामुख्याने 'बुरूड आणि कोरवी' या जमाती करतात. बांबुपासून सूप, दूरडी, तट्टे, पाटया, शिबरी आणि ईरली अशा अनेक वस्तू यापासून तयार करतात. विशेषता 'कोरवी' जमातीचे लोक धान्याचा साठा करण्यासाठी शेतकऱ्यांना लागणाऱ्या 'कणग्या' तयार करतात. तसेच बुरूड हे लोक घरगुती उपयोगासाठी लागणाऱ्या वस्तू तयार करत. बांबूपासून तयार होणाऱ्या वस्तूसाठी मलकापूर बाजारपेठ प्रसिद्ध आहे. या भागात भरपूर पाऊस असल्याने पावसापासून बचाव करण्यासाठी येथील लोक ईरल्याचा वापर शेतीकामासाठी सर्रास करतात. त्यामुळे ईरल्याचे उत्पादन जास्त प्रमाणात घेतले जाते. या उदयोगातून 'बुरूड व कोरवी' जमातीचा आर्थिक दृष्टिकोनातून फायदा होत आहे.

**६) चर्मोद्योग :–**

मलकापूर या ठिकाणी चांभार आणि ढोर लोक हा व्यवसाय करत. जनावरांच्या कातडीपासून वस्तू तयार करत याचा समावेश चर्मोद्योगात होतो. चामडयापासून कातडी वस्तू तयार करण्यासाठी कातडयावर विविध प्रक्रिया करावी लागते त्यास कातडी कमावणे असे म्हणतात. हा उद्योग ढोर लोक करत असत आणि कमावलेल्या कातडी पासून चांभार लोक चपला, जोडे, मोट (विहिरीतून पाणी काढण्यासाठी) पखाल (पाणी वाहून नेण्याची कातडी पिशवी) आणि लगाम तयार करत.[४९]

**९. वाहतूक आणि दळणवळण :–**

आर्थिक विकासावर वाहतूक व दळणवळण साधनाचा फार मोठा परिणाम होतो. लोकांच्या दैनंदिन गरजा आणि आर्थिक गरजांची पूर्तता ही या साधनामुळे पूर्ण होते. आर्थिक विकासातील समतोलपणा साधण्यासाठी दळणवळणाचा उपयोग होतो. पूर्वी सन १९४४ पर्यंत वाहतूक व दळणवळणासाठी बैलगाडया, टांगे, घोडे या साधनाचा वापर करत.१९व्या शतका अखेरीस जिल्हयात अनेक नव–नवीन रस्ते होण्यास सुरूवात झाली. पुढे २० व्या शतकात वाहतुकीमध्ये रेल्वे, ट्रक, टेम्पो, चार चाकी आणि दोन चाकी इत्यादी सर्व वाहनांचा वापर

करत आहेत. दळणवळणामध्ये घाट, रस्ते, जलमार्ग, लोहमार्ग, पूल, पोस्ट व तार ऑफिस इत्यादींचा वापर केला जातो.

**१) रस्ते :-**

कोल्हापूरातून कोकण समुद्रकिनारी जाण्यासाठी आंबा, फोंडा आणि आंबोली घाटात मोठे रस्ते बांधले आहेत. आंबा घाटाचा रस्ता रत्नागिरीला जातो. हा रस्ता कोल्हापूरातून पंचगंगा नदीवरून नावली, आवळी, बांबवडे आणि मलकापूर मार्गे आंबा गावास जातो. आंबा या गावाच्या नावावरून रस्त्याला 'आंबा घाट' असे नाव पडले.

**२) घाट :-**

वाहतूक दळणवळणासाठी घाटांना ऐतिहासिक महत्त्व आहे. हे घाट डोंगर रांगाच्या व भूपृष्ठांच्या विभाजनामुळे झाले आहेत. डोंगररांगेचा माथा व त्याच्या पलिकडील भू-भागाला घाटमाथा असे म्हणतात. कोल्हापूर जिल्हयाच्या व्यापार व वाहतूकीसाठी आंबा, फोंडा आणि आंबोली हे तीन घाट महत्त्वाचे आहेत. त्यामध्ये विशेषतः मलकापूर संदर्भातील आंबा घाटाचा आढावा घेण्यात आला. आंबा घाटातून रत्नागिरी-कोल्हापूर- मिरज-विजापूर हा राज्य महामार्ग जातो. कोल्हापूर-रत्नागिरी वाहतूक या घाट मार्गेच होते. आंबा घाटमाथा कोल्हापूर जिल्हयातील शाहूवाडी तालुक्यात असून कोल्हापूरच्या वायव्येस ६० कि.मी. अंतरावर आहे. आंबा घाटमाथ्याच्या दक्षिणेस २० कि.मी.अंतरावर प्रसिद्ध विशाळगड किल्ला आहे. शाहूवाडी तालुक्यातील विशाळगड किल्ल्याच्या उत्तरेस असणाऱ्या गजापूर गावाजवळून रत्नागिरी जिल्हयातील देवडा आणि प्रभानवल्ली या गावी जाण्यासाठी दोन वाटा होत्या. या ठिकाणी एक निमुळती गजापूर खिंड होती. या खिंडीतून विशाळगडच्या सुमारे १३ कि.मी.अंतरावर असलेल्या घोडखिंडीत जाता येत होते. या अतिशय निमुळत्या घोडखिंडीत जुलै १६६० मध्ये विजापूरच्या सिद्दी जोहारच्या बलाढय सैन्यास पराक्रमी बाजीप्रभू देशपांडे यांनी निवडक मराठा सैन्यानिशी झुंज देऊन पन्हाळगडावरून निघालेले छत्रपती शिवाजी महाराज विशाळगडावर पोहोचेपर्यंत थोपवून ठेवले होते. परंतु या लढाईत बाजीप्रभू देशपांडे यांना या खिंडीत वीरमरण आले. तेव्हापासून घोडखिंडीस 'पावनखिंड' असे म्हणतात.

देवडा आणि प्रभानवल्ली वाटांच्या सुमारे १८ कि.मी.दक्षिणेस आणि कोल्हापूरच्या वायव्येस सुमारे ४८ कि.मी. अंतरावर अणुस्कुरा घाट आहे. रत्नागिरी जिल्हयातील राजापूरहून येणारा शाहूवाडी तालुक्यातील सद्याच्या राजापूर–मलकापूर मार्ग याच घाटातून जातो.[५०]

**३) पूल :–** वाहतुकीसाठी 'शाळी' नदीवर मलकापूरजवळ ३० फूट रूंदीचा ५ कमानी असलेला दगडी पूल बांधण्यात आला आहे. या पुलाच्या बांधकामासाठी ३८०५० रूपये एवढा खर्च आला. तसेच मलकापूर शहराच्या पश्चिम बाजूस गाडेगौडाजवळ कडवी नदीवर पूल बांधला आहे. हा पूल पूर्णतः दगडात असून ३० फूटाच्या ५ कमानी आहेत. या पूलाच्या बांधकामासाठी ३५४०० रूपये खर्च आला. सन १८८२ साली या पूलाचे काम पूर्ण झाले.[५१]

**१०.ि मलकापूरातील सहकारी बँका :–**

प्राथमिक सहकारी संस्था एकत्र येऊन जिल्हा मध्यवर्ती बँक स्थापन करतात. प्राथमिक सहकारी संस्थाच जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे सभासद असतात. प्राथमिक सहकारी संस्था जे प्रतिनिधी निवडून देतात तेच बँकेचे कामकाज पाहतात. प्राथमिक सहकारी बँकाचे सभासद आणि व्यक्तीगत सभासदाकडून मिळणारे सभासद शुल्क, लोकाकडून स्विकारलेल्या ठेवी आणि राज्य सहकारी बँकेकडून मिळणारी कर्जे, सरकारी कर्जे इत्यादी मार्गानी या बँकेला वित्तीय साधने उपलब्ध होतात. सन १९३८ मध्ये कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक स्थापन करण्यात आली.[५२] कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक स्थापन झाल्यानंतर सहकारी चळवळीची वाढ झपाटयाने झाली. याचा परिणाम मलकापूर मध्येही झाला. यातूनच पुढे मलकापूरमध्ये वेगवेगळे उद्देश ठेवून अनेक बँका स्थापन केल्या. यामध्ये कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, पलूस सहकारी बँक, आजरा सहकारी बँक, वसंतराव चौगुले सहकारी बँक, राजर्षी शाहू सहकारी बँक, लोकमान्य नागरी सहकारी बँक, आजरा व्यापारी सहकारी बँक, जयवंतराव काटकर सहकारी बँक, मलकापूर अर्बन बँक, इचलकरंजी अर्बन बँक, बी.वाय.पाटील सहकारी बँक, सहयाद्री नागरी सहकारी बँक आणि श्री वीरशिव सहकारी बँक इत्यादी बँका मलकापूरच्या विकासात महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहेत. तसेच मलकापूर येथे जिल्हा प्राथमिक सहकारी बँकेची पाचवी शाखा सुरू झाली. सहकारी संस्थांचे उपनिबंधक श्री.बी.बी.शेळके यांचे हस्ते उद्घाटन झाले. समारंभाच्या

अध्यक्षस्थानी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाचे अध्यक्ष श्री.शिवाजीराव पाटील हे होते.[५३]

या बँकांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना बी–बियाणे, रासायनिक खते, किटकनाशके, पाणी व वीज बील इत्यादी कारणाकरीता प्राथमिक संस्थामार्फत अल्प मुदतीची कर्जे दिली जातात. त्याशिवाय हया बँका शेतकऱ्यांना गाई, म्हैशी, बैल, बैलगाडी, इंजिन, मोटर आणि पाईप लाईन्स इत्यादीच्या खरेदीसाठी व विहीर खोदण्यासाठी आणि दुरूस्तीसाठी साधारतः ३ ते ५ वर्षे मध्यम मुदतीची कर्जे देत असतात.

## १२. धार्मिक जीवन :–

मलकापूर नगरीला ऐतिहासिक दृष्टिकोनातून महत्त्व आहे. हे ठिकाण कोल्हापूर–रत्नागिरी महामार्गावर असल्याने व्यापारी बाजार पेठेसाठी प्रसिद्ध आहे. मलकापूरातील पडक्या अवस्थेत असलेला पंतप्रतिनिधींचा वाडा हा प्रतिनिधी घराण्याचा साक्षीदार आहे. प्रारंभी येथील लोकांनी जेथे–जेथे जागा मिळाली तेथे त्यांनी कोणत्याही नकाशाविना घरे बांधली. या शहराची लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत आहे. या घटकात मलकापूरातील धार्मिक दृष्टिकोनातून महत्त्वपूर्ण मंदिरांचा आढावा घेण्याचा प्रयत्न केला.

### १) विठ्ठलेश्वर मंदिर :–

मलकापूर नगरीच्या मध्यभागी विठ्ठलेश्वर मंदिर आहे. हया मंदिराची पूर्व–पश्चिम लांबी २२ मीटर आणि दक्षिणोत्तर रूंदी ७ मीटर आहे. या मंदिराचे बांधकाम दगडामध्ये केले आहे. मंदिरात विठ्ठल–रूक्मिणी मूर्ती लगत गणपती व शिवलिंगाची मूर्ती आहे. पंढरपूरचे विठ्ठल–रूक्मिणी मंदिर देशभरात धार्मिक दृष्टिकोनातून प्रसिद्ध आहे. आषाढी, कार्तिकी, माघी आणि चैत्री वारीला लोक मोठया प्रमाणात जातात. या वारीच्या दिवशी मलकापूरातील लोक विठ्ठलेश्वर मंदिरात भजन, कीर्तन आणि प्रवचनाचे आयोजन करतात. या कार्यक्रमात आसपासचे लोक मोठया संख्येने सहभागी होतात. नेहमी या मंदिरात लोकांची वर्दळ असते.

### २) हनुमान मंदिर :–

मलकापूर शहरातील हनुमान मंदिर हे प्रमुख आहे. मंदिराच्या बांधकामासाठी सिमेंट, विटा आणि दगड याचा वापर केला आहे. मंदिरातील हनुमानाची मूर्ती ही अखंड दगडात कोरली आहे. या मूर्तीला शेंदूर लावला जातो. हनुमान जयंती ही चैत्र महिन्यात साजरी केली

जाते. लग्न समारंभावेळी हनुमान मंदिराला धार्मिक महत्त्व आहे. या देवाला रूईच्या झाडाच्या पानांची माळ घातली जाते. देवाचा शनिवार हा दिवस असल्याने या दिवशी गावातील लोक तेल घालून दिवा लावतात आणि पूजा, कीर्तन, भजन आणि प्रवचन इत्यादी कार्यक्रम घेतात.

### ३) भीमाशंकर मंदिर :-

गुरूवार पेठेत शाळी बँक आहे. तेथे भीमाशंकर मंदिर आहे. (१६.७६१ द ८.८४१द ५.४९ ा). मंदिराची इमारत सिमेंट आणि दगडामध्ये आहे. हे शंभर वर्षापूर्वीचे शिवलिंग मंदिर आहे. या मंदिरासमोर नंदीची मूर्ती आहे. मंदिराच्या सुरूवातीच्या गाभाऱ्यात गणपतीची मूर्ती आणि मंदिरात शिवलिंगाची मूर्ती आहे. अमरकोशात शिवलिंगाची ४८ नावे दिली आहेत. उदा. भीमाशंकर, विश्वेश्वर, पशुपती, मंजुनाथ इत्यादी ईश्वराची उपासना करण्यासाठी येथील लोक या मंदिरात जात असतात. निलेश गायकवाड हा या मंदिरातील देवाचा सेवक असून त्यांनी सांगितले की, ङ्कमहाशिवरात्री दिवशी या ठिकाणी यात्रा भरते. येथे शेकडो लोक येतात. ईश्वराची आराधना व पूजा करतात. त्या दिवशी उपवासाचा प्रसाद वाटप केला जातो.ङ्ख[५४]

### ४)महादेव मंदिर :-

या मंदिराचे बांधकाम दगडामध्ये आहे. महादेवाच्या मंदिरालाच विश्वेश्वराचे मंदिर असे म्हणतात. मंदिरात शिवलिंगाची मूर्ती आहे. मंदिराच्या बाजूला नंदी आहे. या मंदिराची भरपूर मोकळी जागा आहे. नगरपालिकेने १९२४ साली या मंदिराच्या डाव्या बाजूला आचळ पाडला आहे. तसेच व्यायामशाळा स्थापन केली. या मोकळया जागेत दत्ताचे व ब्रम्हदेवाची मंदिरे आहेत. या जागेचे सौंदर्य वाढवण्यात नगरपालिकेचा मोठा हातभार आहे.

### ५) अंबाबाई (भवानी) मंदिर :-

प्रतिनिधींच्या राजवाडयाच्या ठिकाणी भवानी देवीचे मंदिर आहे. हे मंदिर प्रतिनिधींची खाजगी बाब आहे. दगडामध्ये या मंदिराचे बांधकाम केले. पंतप्रतिनिधींनी कुलदैवताची, कुलस्वामीनीची उपासना, आराधना करण्यासाठी अंबाबाईचे मंदिर बांधले आहे. सन २००४ साली या मंदिराची दुरूस्ती केली.

## १३. मलकापूरातील चळवळी :-

मलकापूर नगरीला मलकापूर जहागिरी म्हणून ऐतिहासिक दृष्टिकोनातून महत्त्व आहे. कोकणचे प्रवेशद्वार म्हणूनही मलकापूरची ओळख आहे. मलकापूर जहागिरीतील लोकांनी

शिक्षण क्षेत्रात, स्वातंत्र्य लढयात आणि अस्पृश्य निर्मूलनात घेतलेला सहभाग यामुळे मलकापूर प्रसिद्ध आहे. यामध्ये वसतिगृह चळवळ, स्वातंत्र्य लढा आणि मंदिर प्रवेश व सार्वजनिक पाणीपुरवठा इत्यादी चळवळीचा आढावा घेतला आहे.

**१) वसतिगृह चळवळ :-**

डिसेंबर १८९९ मध्ये मलकापूर जहागिरीतील सरूड वडगाव या गावचा शेतकरी घराण्यातील पांडुरंग चिमणाजी पाटील हा कोल्हापूरातील राजाराम हायस्कूल मधून चांगल्या गुणांनी मॅट्रिकची परीक्षा पास झाला. शाहू महाराजांना ही बातमी समजली तेव्हा त्यांना मराठा घरातील एक मुलगा मॅट्रिक परीक्षा उत्तीर्ण होतो. याचा खूप आनंद झाला. महाराजांनी पांडुरंग पाटील यांना पन्हाळयावर भेटीस बोलावले. त्या भेटीत महाराजांना पांडुरंगाची व्यथा अशी समजली की, पांडुरंग सरकारी तालमीत कुठेतरी झोपत होता. त्याला अभ्यासालाही जागा नव्हती. शाहू छत्रपतींनी पांडुरंग चिमणाजी पाटील (रावबहाद्दूर पी.सी.पाटील म्हणून नामांकित झाले.) यांच्या तोंडून बहुजन समाजातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी होणारी कुतरओढ, हालअपेष्टा ऐकल्या आणि हीच घटना शाहू महाराजांच्या वसतिगृह चळवळीचा प्रारंभ झाला. त्यामधूनच पहिले जातवार वेगळे वसतिगृह सुरू झाले.[५५] उदा. १८ एप्रिल १९०१ रोजी हे वसतिगृह 'महाराणी व्हिक्टोरिया मराठा बोर्डींग इन्स्टिटयुशन' म्हणून अस्तित्वात आले.

**२) स्वातंत्र्य लढयातील मलकापूरची भूमिका :-**

ब्रिटीश लोक भारतावर राज्य करीत होते. ब्रिटिशांच्या जोखडातून भारताला मुक्त करण्यासाठी देशातील अनेक नेत्यांनी आणि जनतेने मोठे लढे उभे केले. सन १९४२ साली महात्मा गांधीजींच्या नेतृत्वाखाली 'छोडो भारत' चा लढा सुरू झाला. या लढयाला अनेक स्तरावरून प्रतिसाद मिळाला. या लढयात मलकापूरच्या तरूणांनीही मोठा हातभर लावला. त्यामध्ये लहान मुलांसाठी 'सेवा दल' स्थापून त्यांना कवायत वगैरे शिक्षण देणे सुरू केले.

माजी रेव्हयुन्यू मंडल निरीक्षक मलकापूर येथील वसंत गोपाळ शिरगांवकर यांनी मुलाखतीतून असे सांगितले की, मौजे येळाणे येथे पलिकडच्या पेठेत पी.डब्ल्यु. डी.ची इमारत आहे. या इमारतीच्या पाठीमागे कै.केशव लक्ष्मण मोरे(गुरूजी) हे कवायत शिकवू लागले. त्यामध्ये त्यांनी मला कवायत शिकवून त्या 'सेवादलाचा' मुख्य म्हणून नेमले. नंतर मी मुलांना रोज कवायत शिकवू लागलो. त्यावेळी माझेही शालेय शिक्षणही सुरू होते.

मलकापूर येथील मंगळवार पेठेतील गोविंद वासुदेव बेर्डे, कै.दत्तात्रय विठ्ठल धर्मे, कै.काशिराम गोपाळ शिरगांवकर आणि कै.पांडुरंग गोपाळ शिरगांवकर हे चार स्वातंत्र्य सैनिक होते. त्यांनी स्वातंत्र्य लढयात भाग घेऊन हालअपेष्टा सहन केल्या. त्यांच्या जोडीला कै.दत्तोबा तांबट(कोल्हापूर) आणि कै.तुकाराम भुर्के(मलकापूर) हे होते. त्यांनीही लढयात हालअपेष्टा सोसल्या. मौजे येळवण जुगाई येथे कै.ताबंट, कै.भुर्के यांचे सोबत बरेच लोक भूमिगत होते. त्यांच्या कँपात वसंत गोपाळ शिरगावकर यांचाही सहभाग होता. वरील लोक हे नेहमी कै.दत्तात्रय विठ्ठल धर्मे व कै.गोविंद वासुदेव बेर्डे यांचे घरी व आमचे घरी रात्रीचे अधुनमधून यायचे व जेवण करून निघून जात असत. असे त्यांनी सांगितले.[५६]

### ३) मंदिर प्रवेश चळवळ आणि सार्वजनिक पाणी चळवळ :–

रत्नागिरी जिल्हयातील 'साखरपा' या गावी कै. साने गुरूजी यांची सभा घेतली. त्या सभेला. कै.गोविंद वासुदेव बेर्डे(स्वातंत्र्य सैनिक), कै.पांडुरंग गोपाळ शिरगावकर (स्वातंत्र्यसैनिक) आणि वसंत गोपाळ शिरगावकर हे तिघेजण बैलगाडीतून सभेला गेले होते. साखरपा गावातील गणपती मंदिरासमोर कै.साने गुरूजींची सभा भरली. ही सभा संपल्यानंतर हे तिघेजण साने गुरूजींना भेटले. त्यावेळी त्यांनी मलकापूरला येण्याचे निमंत्रण दिले. त्यावेळी गुरूजीनी विचारले की, कार्यक्रम काय ठेवला आहे. या तिघांनी सांगितले की, सर्व देवळात हरिजनांना प्रवेश देणे व सार्वजनिक विहिरीवर पाणी भरण्यास लावणे हे ऐकल्यावर साने गुरूजींनी मलकापूरला येण्याचे मान्य केले. त्यावेळी साने गुरूजी यांच्यासमवेत मलकापूरातील हरिजनसहित सर्व लोक श्रीविठ्ठल मंदिरात एकत्र जमले आणि त्यांच्या समक्ष हरिजनांनी विठ्ठल मूर्तीस पाणी घातले. त्यानंतर मिरवणुकीस सुरूवात झाली. देवळास वेढा काढून मिरवणूक मंगळवार पेठेकडे वळली. मिरवणुकीत पुढे कै. साने गुरूजी होते. त्यांच्यापुढे तिरंगी झेंडा घेऊन वसंत गोपाळ शिरगांवकर चालले होते. मिरवणूक मंगळवार पेठेत आल्यानंतर कै. दत्तात्रय विठ्ठल धर्मे यांच्या घरातील बायकांनी व शिरगांवकर घरातील बायकांनी त्यांच्या पायावर पाणी घालून त्यांची आरती केली. नंतर मंगळवार पेठेतील विहिरीवर दोर लावून विहीरीतील पाणी काढून ते पाणी पुन्हा विहिरीत ओतून तेथून मिरवणूक परत फिरली. नंतर बुरूड गल्लीतील विहिरीवर त्याचप्रमाणे कार्यक्रम करून तसेच इतर विहिरीवर कार्यक्रम केले. भीमाशंकरच्या समोरील विहिरीतून पाणी काढून त्यातील पाणी देवळात आणून ते देवाला

घातले तेथून मिरवणूक निघून पुढे गेली. त्यानंतर गावातील सर्व देवळातून व विहिरीवर जाऊन परत विठ्ठल मंदिरात येऊन मिरवणूक समाप्त झाली. त्यानंतर साने गुरूजी सर्वांना भेटून निघून गेले.[५७] मलकापूरातील या चळवळी इतिहासप्रसिद्ध आहेत.

## १४. समारोप :–

विशाळगड किल्ल्यामुळे या भागात प्राचीन काळापासून ते आधुनिक काळात अनेक स्थित्यंतरे घडून आली. या भागाला ऐतिहासिक, धार्मिक आणि राजकीय वारसाही लाभलेला आहे. शिलाहार, यादव, बहामनी, मोघल, मराठे, इंग्रज अशा अनेक घराण्यांनी व राजसत्तांनी राज्य केले. या सर्व सत्तांचा अमंल या भागावर प्रस्थापित झाला होता. या सर्वांची सत्ता उलटवून टाकण्यात मराठयांना सहाय्य करण्यात परशुराम त्रिंबक प्रतिनिधी आणि त्यांच्या वंशजांनी महत्त्वाची भूमिका बजावली. विशाळगडचे जहागिरदार म्हणून प्रतिनिधींचे नाव पुढे नावारूपास आले. मलकापूर येथील प्रतिनिधींचा राजवाडा आजही वरील सर्व घटनेचा साक्षीदार आहे. संस्थानकालीन नगरपालिका आजही अस्तित्वात आहे. ही इतिहासातील अभूतपूर्व घटना आहे. मलकापूर हे ठिकाण कोल्हापूर–रत्नागिरी महामार्गावर असल्याने त्यास महत्त्व आहे. गूळाच्या बाजारपेठेसाठी मलकापूर प्रसिद्ध आहे. बांबू पासून तयार होणाऱ्या वस्तूकरिता मलकापूरची वेगळी ओळख आहे. याबरोबर मलकापूर जहागिरीने वसतिगृह चळवळ, स्वातंत्र्य लढयातील भूमिका आणि मंदिर प्रवेश चळवळ व सार्वजनिक पाणी चळवळ इ. घटनात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. याठिकाणी विठ्ठलेश्वर मंदिर, हनुमान, भीमाशंकर आणि अंबाबाई इ. मंदिरे प्रसिद्ध आहेत. अशाप्रकारे मलकापूरला ऐतिहासिक, आर्थिक, धार्मिक आणि पर्यटनांच्या दृष्टिकोनातून महत्त्व प्राप्त झाले आहे.

## संदर्भ :–


१) चौधरी कि.का., कोल्हापूर जिल्हा गॅझेटियर, दर्शनिका विभाग, महाराष्ट्र शासन मुंबई, १९८९, पृ.६८६

२) मोडक बालाजी प्रभाकर, कोल्हापूर प्रांताचा अर्वाचीन इतिहास, कोल्हापूर १४ एप्रिल १८८६, पृ. १७, १८, १९

३) चरहरीरिहीर ीरींश ऋूशीींशशी, घेश्रहरीी उळीीळलीं, १९६०, झ. ८८४

४) मलकापूर नगरपरिषद तपासणी अहवाल, दि.२१ जानेवारी १९८५ ते २३ जानेवारी १९८५, पृ. ५

५) चौधरी कि.का., उपरोक्त, पृ. ६८८

६) कित्ता, पृ. ६८८

७) गर्गे स.मा., करवीर रियासत, कल्पना मुद्रणालय, पुणे, प्रथमावृत्ती, १९६८, पृ. ५३

८) कित्ता, पृ. ५४

९) इहरसींरीं अपरपव छरीरूरप, ढ्हश कळीीू`ष झीरींळपळवहळ ऋराळश्रू, अींपवह, १९२४, झ.३१

१०) गर्गे स.मा., उपरोक्त, पृ. ९४

११) भागवत अ.ना., उपरोक्त, पृ. ५७

१२) गर्गे स.मा., उपरोक्त, पृ. ९५

१३) कित्ता, पृ. १७८

१४) कित्ता, पृ. १७१

१५) कित्ता, पृ. ३३६

१६) चौधरी कि.का., उपरोक्त, पृ. ६८९

१७) मलकापूर नगरपरिषद तपासणी अहवाल, सन १९८५–८६, पृ. १

१८) मोडक बालाजी प्रभाकर, उपरोक्त, पृ. १७

१९) कित्ता, पृ. १९

२०) महादेव मंदिर टेकडी कोनशिला(१९३५)

२१) शिंदे(डॉ.) खंडेराव, कोल्हापूर राज्याचा इतिहास, (१८३८ ते १८९४), मंजुळा प्रिंटर्स, कोल्हापूर, जानेवारी २००९, पृ. ८९

२२) चौधरी कि.का., उपरोक्त, पृ. १४६

२३) कित्ता, पृ. १५४

२४) मुलाखत– श्री शंकर रामचंद्र पलसनदे(सणगर गुरूजी), गुरूवार, दि.१० डिसेंबर २०१५

२५) चौधरी कि.का., उपरोक्त, पृ. १५९

२६) मुलाखत– श्री.बाळू शंकर सप्ताळ,(व्यावसायिक) गुरूवार, दि.१० डिसेंबर २०१५

२७) शिंदे(डॉ.) खंडेराव, उपरोक्त, पृ. ९७

२८) चौधरी कि.का., उपरोक्त, पृ. १७०

२९) मुलाखत– सौ.अर्चना राजेंद्र पाटील, मंगळवार, दि.१० मे २०१६

३०) कोल्हापूर जिल्हा गॅझेटियर, १८८३, पृ.५८, ५९

३१) पवार आप्पासाहेब(संपा.), जिजाबाईकालीन कागदपत्रे, कोल्हापूर, १९७८, पृ. ५०

३२) कित्ता, पृ. १६१, १६२

३३) चौधरी कि.का., उपरोक्त, पृ. १९३

३४) कित्ता, पृ.१९४

३५) कोल्हापूर जिल्हा गॅझेटियर, १८८३, पृ.२२१

३६) मोडक बालाजी प्रभाकर, उपरोक्त, पृ. १८

३७) झरींळश्र झ.ऊ, ठशसळेपरश्र ड्रीींशू`ष एलेपोळल ठर्ीीीलशी, खपवळर. घेश्रहरीीी, १९५०, झ.५४

३८) मुलाखत– नारायण केरबा पाटील (शेतकरी), रविवार, दि. २८ ऑगस्ट २०१६

३९) मोडक बालाजी प्रभाकर, उपरोक्त, पृ. १९

४०) चौधरी कि.का., उपरोक्त, पृ. २०२

४१) कित्ता, पृ.२०३

४२) दैनिक पुढारी, कोल्हापूर, दि. ६ नोव्हेंबर १९५९, पृ.९

४३) चौधरी कि.का., उपरोक्त, पृ.२०४

४४) कित्ता, पृ.२८८

४५) मुलाखत– सुरेश विकास घोरपडे(शेतकरी) शुक्रवार, दि.२० मे २०१६

४६) चौधरी कि.का., उपरोक्त, पृ. २७७

४७) कित्ता, पृ.२९५

४८) कित्ता, पृ.२९३

४९) शिंदे(डॉ.) खंडेराव, उपरोक्त, पृ. १६४, १६५

५०) चौधरी कि.का., उपरोक्त, पृ.४२०

५१) शिंदे(डॉ.) खंडेराव, उपरोक्त, पृ. १८८, १८९

५२) चौधरी कि.का., उपरोक्त, पृ. ३५१

५३) दैनिक पुढारी, कोल्हापूर, दि. ५ नोव्हेंबर १९८५, पृ.७

५४) मुलाखत – श्री.निलेश गायकवाड(सेवक), शनिवार दिनांक– १२ मार्च २०१६

५५) रावबहाद्दूर पी.सी.पाटील, माझ्या आठवणी, मौज प्रकाशन, मुंबई, १९६४, पृ. २१२–१५

५६) मुलाखत– वसंत गोपाळ शिरगावकर(माजी रेव्हयून्यू मंडल निरीक्षक मलकापूर) सोमवार दि. ५ डिसेंबर २०१६

५७) शिरगावकर वसंत गोपाळ, शब्दगंध, सार्वजनिक वाचनालय मलकापूर, शतकोत्तर रौप्य–महोत्सव स्मरणिका, लायन प्रिटिंग प्रेस कोल्हापूर, २००७, पृ. ३८

## प्रकरण दुसरे

# मलकापूर नगरपालिकेच्या स्थापनेचा इतिहास

१. प्रस्तावना

२. भारतातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचा उदय

३. प्राचीन व मध्ययुगीन कालखंडातील स्थिती

४. नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या विकासाचे टप्पे

१) पहिला टप्पा (१६८७–१८८१)

अ) लॉर्ड मेयोचा ठराव (१८७०)

२) दुसरा टप्पा (१८८२ ते १९१९)

अ) लॉर्ड रिपनचा ठराव(१८८२)

ब) रॉयल कमिशन

३) तिसरा टप्पा (१९२० ते १९३६)

४) चौथा टप्पा (१९३७ ते १९४७)

५) पाचवा टप्पा(१९५० पुढे)

५. नगरपालिकेची रचना व निवडणूका

अ) परिषद

१) परिषदेची रचना

२) पात्रता

ब) पदाधिकारी

१) नगराध्यक्ष व उपनगराध्यक्ष

२) नगराध्यक्षांची कार्ये

३) राजीनामा

क) समित्या

१) स्थायी समिती

२) इतर समित्या

ड) प्रशासन

१) मुख्याधिकारी (उहळशष जषषळलशी) आणि त्यांची कार्ये

६. नगरपालिकेची कार्ये

१) आवश्यक कार्ये

२) ऐच्छिक कार्य

७. मलकापूर नगरपालिकेची स्थापना (३ ऑक्टोबर १८८४)

८. मलकापूर नगरपालिकेची कार्यालयीन इमारत

९. समारोप

# प्रकरण दुसरे

# मलकापूर नगरपालिकेच्या स्थापनेचा इतिहास

## १. प्रस्तावना :-

पहिल्या प्रकरणात मलकापूर शहराच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीचा आढावा घेतला आहे. तसेच प्रस्तुत प्रकरणात नगरपालिकेचा उदय व विकास कसा झाला याचा अभ्यास केला आहे. भारतात प्रारंभी शहरी व ग्रामीण भागाचा कारभार गावातील वयोवृद्ध लोकच पहात असत. गावातील लोकांनीच आपला कारभार करण्याच्या सहकारी भावनेतूनच पंचायतीची निर्मिती केली परंतु भारतावर अनेक परकीय आक्रमणे व नैसर्गिक संकटे टिकून आहेत. यावरून संस्थांचे महत्त्व लक्षात येत, म्हणून मलकापूर नगरपालिकेची स्थापना एक महत्त्वपूर्ण घटना आहे. मलकापूर शहर विकासात नगरपालिकेने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. अशा या नगरपालिकेच्या उदय व विकासातील महत्त्वाच्या टप्प्याचा आढावा घेण्यात आला.

## २. भारतातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचा उदय :-

मलकापूर नगरपालिकेच्या उदय व विकासाचा अभ्यास करण्यापूर्वी नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचा इतिहास पाहणे आवश्यक आहे. राष्ट्राचा एक घटक म्हणून स्थानिक स्वराज्य संस्थेकडे बघितले जाते. कारण भारत देशाने स्वतंत्र सरकारची स्थापना केली असली तरी त्यातून स्थानिक स्वराज्य संस्थेचे महत्त्व स्पष्ट करताना एन.पी.शर्मा असे म्हणतात की, ङ्गलोकशाही यशस्वी व्हायची असेल तर स्थानिक स्वराज्य संस्थांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे.ङ्ग[१]

## ३. प्राचीन व मध्ययुगीन कालखंडातील स्थिती :-

प्राचीन काळात स्वशासनाचे ग्राम व नगर अशा दोन गटात विभाजन केले होते. प्राचीन काळीही स्थानिक स्वराज्य संस्था ही संकल्पना अस्तित्वात होती. कारण प्राचीन कालीन चंद्रगुप्त मौर्यांच्या काळात नगरांचा कारभार पाहण्यासाठी स्वतंत्र नियामक मंडळे होती.[२] उदा.पाटलीपुत्र हे ठिकाण मौर्याची राजधानी असून या शहराचा कारभार पाहण्यासाठी स्थानिक नगरपालिका समिती होती. तिला 'नगरसभा' असेही म्हणतात. तसेच मॅगेस्थेनिसने लिहिलेल्या 'इंडिका' ग्रंथातून पाटलीपुत्र शहराच्या नगरपालिका समितीमध्ये तीस सदस्यांचे मंडळ होते

आणि या समितीमध्ये सहा समित्या कार्यरत होत्या. या समितीत प्रत्येक पाच सदस्यांचा समावेश होता. या समित्याच्या माध्यमातून उदयोगधंदे, जन्म–मृत्यूच्या नोंदी, परकियांची देखभाल, व्यापार व व्यवसाय, उत्पादने आणि कर वसूली इत्यादी कामे पार पाडली जात होती. या नगराच्या प्रमुख अधिकाऱ्याला 'नगराध्यक्ष' किंवा 'नगर–नियामक' असेही म्हणतात.[३] खेडयातील स्थानिक प्रशासनाकडून नागरी सुखसोयीकडे अधिक लक्ष देता येते. या संदर्भात श्री. डी. आर. सचदेव म्हणतात की, ङ्ग्रामीण भागातील कारभार सुद्धा स्थानिक लोकांकडून चालविला जात असे.ङ्ख[४]

मुघल सम्राट अकबराच्या (१५५६ ते १६०६) काळात प्रशासनात अनेक महत्त्वपूर्ण बदल झाले. त्यावेळी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विकासाला कमी वाव मिळाला. सम्राट अकबराने आपल्या साम्राज्याचे १५ भागात विभाजन करून प्रमुख म्हणून सुभेदार नेमला. त्याचबरोबर निझाम, काझी आणि बक्षी ही पदे निर्माण केली. प्रांताचे विभाजन सरकारमध्ये करून त्यावर प्रमुख म्हणून फौजदार नेमला. याशिवाय अमलगुजार, कोतवाल आणि खजिनदार इत्यादी कर्मचाऱ्यांची निवड केली. सरकारचे विभाजन परगणा यात केली आणि त्यावर कानुंगो व पोतदार या अधिकाऱ्यांची प्रमुख म्हणून निवड केली.[५] अशाप्रकारे मुघाल प्रशासन चालविले जात होते.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या राजवटीत अष्टप्रधान मंडळ अस्तित्वात होते. त्याद्वारे कार्यक्षम व सुव्यवस्थित प्रशासन राबविले. याबाबत कर्नल टोन म्हणतो की, मराठयांचे राज्य म्हणजे 'लष्करी' राज्य होय.[६] अशा पद्धतीने प्राचीन व मध्ययुगीन कालखंडामध्ये स्थानिक कारभार कार्यक्षम व सुव्यवस्थित चालविला जात होता.

### ४. नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या विकासाचे टप्पे :–

मध्ययुगीन काळ हा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विकासाला पोषक नव्हता, कारण तत्कालीन अधिकारी हे राजसत्ता बलिष्ठ व्हावी म्हणून आपले कर्तृत्व पणाला लावत होते. परंतु आधुनिक काळाचा विचार करता भारतामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थेचा विकास अधिक झाला. याबाबत डॉ. महेश्वरी यांच्या मतानुसार, भारतामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थेच्या विकासाचे पाच टप्पे सांगितले आहेत. त्या प्रत्येक टप्प्याचे उद्देश व हेतू मात्र वेगळे होते.[७] असे टप्पे पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**१) पहिला टप्पा (१६८७–१८८१) :–**

भारतामध्ये ब्रिटिशांनी आपली राजकीय सत्ता स्थापन केल्यानंतर त्यांनी स्वराज्य प्रशासनातील कारभार सुव्यवस्थित चालावा यासाठी भारतातील अनेक शहरात नगरपालिका स्थापन केल्या. यांचा मुख्य उद्देश वस्तुवरील जकात कर गोळा करणे होता. परंतु स्थानिक व्यापाऱ्यांनी कर देण्यास नकार दिल्याने हा प्रयोग फसला गेला. नंतर सन १७२६ साली चार्टर ॲक्ट पास झाला. यानुसार नगरपालिकेच्या स्थापनेचा आदेश रद्द झाला. याच धर्तीवर मुंबई व कलकत्ता येथे नविन न्यायालयाची स्थापना केली.[८]

सन १७९३ च्या चार्टर ॲक्टने भारतीयांना स्थानिक स्वराज्य संस्था देण्यात आली.[९] या संस्थेचे प्रशासन व कारभार पाहण्यासाठी 'जस्टीस ऑफ पीस' यांची निवड करण्यात आली. यांच्या निवडीचे अधिकार गव्हर्नर जनरलला देण्यात आले. यानुसार कलकत्ता, मुंबई व मद्रास या तीन शहरासाठी गव्हर्नर जनरलकडून अध्यक्षाची निवड केली. त्यांच्यामार्फत स्थानिक कारभार कार्यक्षम व सुव्यवस्थित चालविण्याचा प्रयत्न झाला. तसेच शहरात सामाजिक, सार्वजनिक आरोग्य व स्वच्छता, पोलीस यंत्रणा, पाणीपुरवठा आणि दिवाबत्ती इत्यादी सुखसोयीच्या सुविधा पुरविल्या जात.

सन १८४२ मध्ये 'बंगाल कायदा' पास झाला.[१०] या कायद्यान्वये नगरपालिका प्रशासन जिल्हा पातळीवर पोहचले. शहरी भागात 'शहर समिती' स्थापन केली. या समितीचा उद्देश असा की, शहरी लोकांच्या आरोग्याचे रक्षण करणे हा होता. परंतु यासाठी काही आर्थिक तरतुदी केल्या पण स्थानिक लोकांनी त्यास विरोध केला.

सन १८५० चा कायदा स्थानिक स्वराज्य संस्थेच्या विकासात महत्त्वाचा आहे.[११] या कायद्यानुसार देशात 'म्युनिसिपल बोर्डाची' स्थापना केली. याच धर्तीवर स्थानिक नागरिकांनी सरकारकडे मागणी केल्यास नगरपालिका स्थापन केल्या जात. १८५० ते १८५५ या कालावधीत देशात अनेक लहान मोठया नगरपालिका अस्तित्वात आल्या. लोकांना लोकशाही मार्गाने एकत्र येण्याची चांगली संधी मिळाली.

**अ) लॉर्ड मेयोचा ठराव (१८७०):–**

सन १८६५ मध्ये शहर सुधार कायदा समंत करण्यात आला. तसेच सन १८६९ ते १८७२ या कालावधीत लॉर्ड मेयोच्या ठरावाने भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेच्या विकासात आणखी भर पडली. लॉर्ड मेयोने १८७० मध्ये आर्थिक विकेंद्रीकरणाचा ठराव पास केला. यानुसार केंद्राकडे एकवटलेली आर्थिक खाती प्रांताकडे काही प्रमाणात सुपूर्त केली. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्था आर्थिक क्षमतेने मजबूत झाल्या.[१२]

**२) दुसरा टप्पा (१८८२ ते १९१९)**

**अ) लॉर्ड रिपनचा ठराव(१८८२) :-**

स्थानिक स्वराज्य संस्थाकडे लोकशिक्षण व राजकारणाचे ठळक हत्यार म्हणून पाहिले जात होते. ब्रिटिश भारतातील उदारमतवादी व्हॉईसरॉय लॉर्ड रिपन यांनी मे १८८२ मध्ये 'स्थानिक स्वराज्य संस्थांचा कायदा' संमत केला. या कायद्यानुसार प्रत्येक प्रांतात 'लोकल बोर्डस' स्थापन करण्यात आले. या संस्थांचा अध्यक्ष हा सरकार नियुक्त करण्यात आला. त्यामुळे लॉर्ड रिपन यास 'स्थानिक स्वराज्य संस्थांचा' जनक किंवा पितामह म्हटले जाते.[१३] कारण स्थानिक विकास आणि लोकांच्या कल्पकतेला वाव मिळणार होता.

**ब) रॉयल कमिशन ः-**

सन १९०१ साली 'मुंबई जिल्हा पालिका कायदा' समंत करण्यात आला. पुढे सन १९०८ मध्ये विकेंद्रीकरणासाठी 'रॉयल कमिशन' हा आयोग अस्तित्वात आला.[१४] या आयोगाच्या शिफारशी १५ एप्रिल रोजी स्वीकारण्यात आल्या. त्या शिफारशी खालीलप्रमाणे

१) प्रत्येक खेडयाला स्वराज्य संस्थेचा मूळ घटक म्हणून मान्यता द्यावी.

२) स्थानिक सभासद बहुमताने निवडले जावेत.

३) म्युनिसिपालिटीनी त्यांचा 'अध्यक्ष' सभासदातून निवडावा.

४) म्युनिसिपालिटीनी त्यांना लागणाऱ्या खर्चाची आर्थिक तरतूद त्यांनी स्वतः करावी.

५) शहरातील मुलांना प्राथमिक शिक्षण देण्याची जबाबदारी स्विकारावी.

**३) तिसरा टप्पा (१९२० ते १९३६) ः-**

सन १९१९ मध्ये 'माँटेग्यू-चेम्सफोर्ड' अधिनियम पारित करण्यात आला. या अहवालात असे नमूद केले होते की, स्थानिक मंडळावर जास्तीत जास्त नियंत्रण जनतेचे असावे आणि ती मंडळी बाहय नियंत्रणातून मुक्त असावी.[१५] या कायद्याने प्रांताना जबाबदार

शासन प्रणाली तयार करण्यात आली. आणि आरोग्य, बांधकाम, शिक्षण, महसूल, वन, पाणीव्यवस्था आणि सहकारी संस्था इत्यादी खात्याचा समावेश प्रातांच्या यादीत करण्यात आला. पुढे १९२५ साली 'मुंबई शहर पालिका कायदा' समंत करण्यात आला.

**४) चौथा टप्पा (१९३७ ते १९४७):–**

सन १९३५ च्या कायद्याने प्रांतिक सरकारला पूर्ण स्वायतत्ता देण्यात आली.[१६] या कायद्याने भारतमंत्र्याचे स्थानिक स्वराज्य संस्थेवर नियंत्रण प्रस्थापित झाले. आर्थिक विकासाची रूपरेखा आखण्याचा अधिकार स्थानिक समितीला मिळाला. परिणामी दुसऱ्या महायुद्धानंतर परिस्थिती बदलली. भारतमंत्र्यांनी राजीनामा दिला. स्थानिक स्वराज्य संस्थेला पुन्हा खीळ बसली.

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाल्यानंतर पुन्हा स्थानिक स्वराज्य संस्थेला महत्त्व प्राप्त झाले. केंद्रिय आरोग्य मंत्री राजकुमारी अमृत कौर यांच्या अध्यक्षतेखाली १९४८ मध्ये सर्व प्रांतातील स्थानिक स्वराज्य संस्थेमधील मंत्र्यांना बैठकीस बोलावून सभा घेतली. त्यावेळचे तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू या बैठकीस उपस्थित राहिले आणि आपल्या भाषणात म्हणाले की, स्थानिक स्वराज्य संस्था हया खऱ्या अर्थाने लोकशाहीचा पाया आहे. वास्तविक पाहता आपल्याला उच्च लोकशाही विषयी विचार करणेची सवय लागायला हवी तर उच्च लोकशाहीचा पाया भक्कम होईल.[१७]

**५) पाचवा टप्पा(१९५० पुढे):–**

भारत सरकारने स्थानिक स्वराज्य संस्थांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी १९४९ ला 'लोकल फायनान्स इन्कवायरी' समिती स्थापन केली. या समितीने आपला अहवाल १९५७ मध्ये सादर केला. २६ जानेवारी १९५० रोजी भारतात राज्यघटनेची अमंलबजावणी सुरू झाली. भारतीय राज्यघटनेने सर्व राज्यांना स्थानिक स्वराज्याचा दर्जा बहाल केला. लोकल फायनान्स इन्कवायरी अहवालानुसार स्थानिक स्वराज्य संस्थांच्या उत्पन्नवाढीसाठी आणि आर्थिक स्थिती भक्कम होण्यासाठी संस्थांकडून काही सूचना व हरकती मागविल्या जातात. त्यासाठी त्यांना वेळ दिला जातो. या कायद्यातील नियम ४ नुसार अंतिम नोटीस पाठवून नगरपालिका स्थापनेस बंदी आदेश दिला जातो.

भारतातील वाढत्या लोकशाही प्रोत्साहनामुळे स्थानिक स्वराज्य संस्था जास्त प्रमाणात कर्तव्यक्षम व कार्यक्षम होत आहे. या संस्था नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी संबंधित आहेत. तरी या संस्थांच्या विकासासाठी प्रयत्न करणे हे प्रत्येक नागरिकांचे कर्तव्य आहे.

## ५) नगरपालिकेची रचना व निवडणूका :–

सन १९०१ साली 'मुंबई जिल्हा नगरपालिका कायदा' करण्यात आला.[१८] नगरपालिका हा प्रांतिक सरकारचा विषय मानण्यात आला. विविध प्रांतात आवश्यक ते कायदे झाले. तसेच बॉम्बे म्युनिसिपल बरोज ॲक्ट १९२५ ला पास झाला. या कायदयानुसार पालिकेला व्यवस्थापनाबाबत अधिक अधिकार नगरपालिकेला प्राप्त झाले. सन १९२६ च्या त्रैवार्षिक निवडणूकीपासून प्रथमच मुसलमान मतदार संघ वेगळा करण्यात आला.[१९]

महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम १९६५ नुसार प्रत्येक प्रभागातून एकच सभासद निवडला जातो. मतदाराला एकच मत देता येईल. तसेच १९४७ च्या कायदयाने अध्यक्ष मतदाराने निवडून द्यावयाची तरतूद आहे. मतदारांची वयोमर्यादा १८ व उमेदवारांची २१ वर्षे करण्यात आली.[२०]

नगरपालिकेची रचना ही त्या ठिकाणच्या विभिन्न घटकावर अवलंबून असते. यामुळे सर्वत्र लागू पडेल, अशी रचना देणे शक्य नाही. या संदर्भात महाराष्ट्रातील नगरपालिकेची रचना व कार्य यांचा विशेष अभ्यास या ठिकाणी केलेला आहे. नगरपालिकेच्या रचनेत व कार्यपद्धतीत एकसूत्रीपणा आणण्यासाठी १९९३ च्या ७४ व्या घटना दुरूस्तीनुसार तीन प्रकारच्या महानगरपालिकांची स्थापना करण्यात येऊन त्यावर अनुसूचित जाती, जमाती, मागास प्रवर्ग व महिलांसाठी राखीव जागांची तरतूद करण्यात आली आहे. या घटना दुरूस्तीने नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांची रचना व कार्यपद्धती कशी असावी याबाबत राज्यशासनाला फारसे अधिकार देण्यात आले नाहीत. जसे त्रिस्तरीय रचना म्हणजे ग्रामीण अवस्थेतून शहरीकरणाकडे परिवर्तन होऊ लागलेल्या भागासाठी नगर पंचायत लहान शहरांसाठी नगरपरिषद व मोठया शहरांसाठी नगरपालिका अशी व्यवस्था करण्यात आली आहे. भारतीय राज्यघटना कलम २४३(ठ) नुसार संबधित राज्यांना कायद्यानुसार नगरपंचायत, नगरपरिषद, महानगरपालिका या नागरी स्थानिक स्वराज्य संस्था स्थापन करता येतात. नगरविकास खात्याकडून १० हजारांहून अधिक लोकसंख्येच्या गावांचे रूपांतर नगरपंचायतीमध्ये तर २५

हजारांहून अधिक लोकसंख्येच्या गावांचे रूपांतर नगरपरिषदेमध्ये केले जाते.[२१] ७४ व्या घटनादुरूस्तीने वॉर्ड समित्या स्थापन करण्याची सोय करण्यात आली. स्वतंत्र निवडणुक आयुक्त ठेवण्यात आला. याबरोबर आर्थिक स्वायत्तता मिळण्यास मदत झाली. याशिवाय आरक्षणाची तरतूद करण्यात आली. यासर्व गोष्टीमुळे नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचे स्वरूप निश्चित आणि स्पष्ट होण्यास मदत झाली. नगरपालिकेच्या रचनेत पुढीलप्रमाणे महत्त्वाचे घटक येतात.

१. परिषद
२. पदाधिकारी
३. समित्या
४. मुख्याधिकारी व प्रशासन

महाराष्ट्र सरकारला नगरपालिकेची फेररचना आणि श्रेणी ठरवण्याचा अधिकार आहे. साधारणपणे प्रत्येक जनगणनेनंतर लोकसंख्या निश्चित केली जाते. त्यावरून नगरपालिकेचे वर्गीकरण आणि दर्जा ठरविला जातो. तसेच नगरपालिकेच्या क्षेत्रात बदल झाल्यास म्हणजे काही नविन स्थानिक क्षेत्र नगरपालिकेच्या अधिकार क्षेत्रात आणणे किंवा काही कारणाने स्थानिक क्षेत्र नगरपालिकेच्या अधिकार क्षेत्रातून काढून टाकणे. राज्यशासनाच्या अधिकारात आहे.

वरील सर्व गोष्टी करण्यासाठी यासंबधीची माहिती राजपत्रात प्रसिद्ध केली जाते. त्यानुसार खालील बाबी केल्या जात.

१. नगरपालिका क्षेत्राच्या सीमेत फेरफार बदल करणे.
२. एक नगरपालिका क्षेत्र तयार करण्यासाठी तसेच दोन किंवा अधिक नगरपालिका क्षेत्राचे एकत्रीकरण करणे.
३. कोणत्याही नगरपालिकांचे विभाजन दोन किंवा त्यापेक्षा अधिक विभागात करणे.
४. नगरपालिका क्षेत्राअंतर्गत असलेल्या एखादया स्थानिक क्षेत्राला नगरपालिका क्षेत्रात अंतर्भूत करणे. इत्यादी यामुळे नगरपालिकेच्या रचनेत फरक पडू शकतो.

**अ) परिषद :–**

सन १९६५ साली महाराष्ट्र स्थापनेनंतर 'महाराष्ट्र नगरपालिका कायदा' अस्तित्त्वात आला. या कायद्यानुसार महाराष्ट्रातील नगरपालिकांचे कार्य चालते.[२२] राज्यातील ज्या स्थानिक क्षेत्राची लोकसंख्या १५ हजाराहून कमी नसते व ३ लाखाहून अधिक नसते. अशा कोणत्याही स्थानिक क्षेत्रात नगरपालिका अस्तित्त्वात येते. लोकसंख्येच्या प्रमाणात नगरपालिकांचे वर्गीकरण खालील प्रमाणे अ, ब, क वर्गामध्ये करण्यात येते.

| अ.क्र. | लोकसंख्या | नगरपालिकांचा वर्ग | संख्या |
|---|---|---|---|
| १. | १ लाखाहून अधिक | ङ्कअङ्क वर्ग | १८ |
| २. | ४०,००० ते १ लाख | ङ्कबङ्क वर्ग | ६२ |
| ३. | ४०,००० हुन कमी | ङ्ककङ्क वर्ग | १५० |

याशिवाय थंड हवेच्या ठिकाणासाठी तेथील लोकसंख्या दहा हजारापेक्षा कमी असली तरी नगरपालिका स्थापन करण्याचा अधिकार राज्यशासनाला देण्यात आला. १९७० साली महाराष्ट्रात ङ्कअङ्क वर्ग–२१, ङ्कबङ्क वग–४५, ङ्ककङ्क वर्ग – १४९, थंड हवेच्या ठिकाणच्या ६ अशा एकूण २२१ नगरपालिका कार्यरत होत्या.[२३] सध्या मे २०१७ अखेर महाराष्ट्रात २३० नगरपालिका अस्तित्त्वात आहेत. नगरपालिकेत किमान १७ ते कामल ६५ सदस्य असतात. मलकापूर नगरपालिका ही 'क' वर्गात आहे. अशाप्रकारे लोकसंख्येतील बदल लक्षात घेऊन सदस्य संख्या ठरविली जाते. महाराष्ट्रात एक प्रतिनिधी मतदारसंघातून प्रतिनिधींची निवड केली जाते. यासाठी गावच्या लोकसंख्येची समान प्रमाणात विभागणी करून मतदार संघ तयार केले जातात, त्यास वॉर्ड म्हटले जाते. अशा नगरपालिकांच्या निवडणूका पार पाडण्याची जबाबदारी राज्यसरकारने त्या–त्या जिल्हयाच्या जिल्हाधिकाऱ्यावर टाकली आहे. [२४]

परिषद ही प्रामुख्याने लोकप्रतिनिधीची सभा असल्याने धोरणविषयक निर्णय घेण्याचा अधिकार सभेला आहे. नागरी प्रश्नावर चर्चा करणे आणि नियम तयार करणे हे या संघटनेचा मुख्य हेतु आहे. त्यांची अंमलबजावणी करण्याच्या कामावर देखरेख व नियंत्रण ठेवणे हे या संघटनेचे प्रमुख काम होते. अर्थात हे नियम किंवा कायदे नगरपालिका कायद्यानुसार दिलेल्या विषयापुरतेच व त्या कायद्याच्या चौकटीत राहूनच करावे लागतात. नगरपालिकेचे अंदाजपत्रक

तयार करणे, कामासाठी समिती नेमणे आणि समितीला कार्य करण्यासाठी आवश्यक अधिकार देणे ही कामे परिषदेला करावी लागत.

**१. परिषदेची रचना :–**

१. सर्व दर्जाच्या नगरपालिकेत १/३ जागा महिलांसाठी आरक्षित ठेवण्यात आल्या.

२. अनुसूचित जाती–जमातीसाठी लोकसंख्येच्या प्रमाणात राखीव जागा ठेवण्याची व्यवस्था करण्यात आली.

३. इतर मागासवर्गीयांसाठी २७ टक्के जागा राखीव ठेवण्याची तरतूद आहे.

४. तज्ज्ञ, अनुभवी व्यक्तिला सामावून घेण्यासाठी स्वीकृत सदस्यांची तरतूद करण्यात आली.

**२. पात्रता :–**

परिषदेचे सदस्य होण्यासाठी कायद्याने पुढील पात्रता निश्चित केली आहे.

१. तो भारताचा नागरिक असावा.

२. त्याचे वय २५ वर्षे पूर्ण झालेले असावे.

३. त्या भागातील मतदार यादीत नाव असले पाहिजे.

४. तो फौजदारी गुन्हयाबद्दल शिक्षा झालेला असू नये.

५. तो सरकार किंवा नगरपालिकेच्या नोकरीत बडतर्फ झालेला असू नये.

६. तो नगरपालिकेचा थकबाकीदार नसावा.[२५]

**ब) पदाधिकारी :–**

महाराष्ट्रात १९६५ च्या कायद्यानुसार अध्यक्ष, उपाध्यक्षाची निवड निर्वाचित प्रतिनिधीकडून म्हणजे अप्रत्यक्ष पद्धतीने होत असे. परंतु १९७३ साली बदललेल्या कायद्यानुसार अध्यक्ष हा लोकांकडून प्रत्यक्ष निवडला जात असे व उपाध्यक्ष हा अध्यक्षाकडून नेमला जात होता. अध्यक्ष आणि उपाध्यक्षाची कालमर्यादा परिषदेच्या कालमर्यादे इतकीच ठेवण्यात आली होती. पण नंतर या कालमर्यादेत बदल करण्यात येऊन एक वर्षाचीच कालमर्यादा ठेवण्यात आली.

अध्यक्षपदाची निवड प्रत्यक्षरित्या करण्याची पद्धत यशस्वी झाली नाही. उत्तर प्रदेशात हा प्रयोग महाराष्ट्रा अगोदर करण्यात आला पण यशस्वी झाला नाही. सदस्य व अध्यक्ष असे दोन गट नगरपालिकेत पडतात व दोघात सत्तेसाठी संघर्ष निर्माण होऊन प्रत्यक्ष कामावर

त्याचा परिणाम होतो. यामुळे ही पद्धत बदलून टाकण्यात आली. शिवाय महाराष्ट्र सरकारने या प्रश्नाच्या हितार्थ कायदेमंडळाची एक उपसमिती नेमली होती. या समितीचे अध्यक्ष श्री.दिघे होते. या समितीने आपला अहवाल १९५६ मध्ये राज्य सरकारला सादर केला व प्रत्यक्ष निवडणूकीच्या तत्त्वाविरूद्ध आपले मत नोंदवून पूर्वीचीच अप्रत्यक्ष निवडणूकीची पद्धत सुरू करावी असे सुचविले आहे.[२६] या अहवालच्या सूचना लक्षात घेवून राज्य विधीमंडळाने या संदर्भात योग्य तो बदल केला आणि पूर्वीचीच पद्धत ठेवण्यात आली.

**१. नगराध्यक्ष व उपनगराध्यक्ष :–**

नगरपालिकेच्या सदस्यांना नगरसेवक म्हणतात. नगरपालिकेच्या प्रमुखास(अध्यक्षास) नगराध्यक्ष म्हणतात. नगराध्यक्ष हा शहराचा 'प्रथम नागरिक' असतो. मे २०१६ पूर्वी नगराध्यक्षाची निवड नगरसेवकाकडून अप्रत्यक्ष मतदान पद्धतीने केली जात होती. सध्या मात्र १० मे २०१६ च्या राज्य मंत्रिमंडळाच्या निर्णयानुसार यापुढे महाराष्ट्रात नगरपालिकांच्या नगराध्यक्षांची निवड पुन्हा थेट मतदारांमधून म्हणजेच प्रत्यक्ष निवडणुकीद्वारे जनतेकडून केली. नगरपालिकांमध्ये ४ ऐवजी आता २ सदस्यांचा एक प्रभाग राहील. (१ महिला+१ सर्वसाधारण उमेदवार) महत्त्वाचे म्हणजे नगराध्यक्षांवर सुरूवातीच्या दोन वर्षामध्ये अविश्वास ठराव मांडता येत नाही. त्यानंतर अविश्वास ठराव मांडायचा असल्यास किमान एक द्वितीयांश सदस्यांनी तशी मागणी करावी लागते. अविश्वास ठराव संमत होण्यासाठी तीन चतुर्थांश बहुमत आवश्यक आहे. असा ठराव पाच वर्षाच्या कालावधीत केवळ एकदाच मांडता येतो. उपनगराध्यक्षांची निवड नगरसेवकांकडून अप्रत्यक्षपणे केली जाते. नगराध्यक्षांचा कार्यकाल अडीच वर्षाचा आहे आणि उपनगराध्यक्षांचा कार्यकाल पण अडीच वर्षाचा आहे. नगरपालिकांची निवडणूक दर पाच वर्षांनी होते.

**२. नगराध्यक्षांची कार्ये :–**

नगराध्यक्ष हा नगरपालिकेचा कार्यकारी प्रमुख असतो. नगरपालिकांच्या सभा बोलावणे व त्यांचे अध्यक्षस्थान भूषविणे. नगरपालिकेच्या प्रशासकीय कामकाजाचे नियंत्रण करणे. नगराध्यक्षांच्या अनुपस्थितीत उपनगराध्यक्ष हे त्यांचे काम पाहतात. नगराध्यक्षांच्या गैरहजेरीत नगरपालिकांच्या सभांचे अध्यक्षपद उपनगराध्यक्ष भूषवितात. [२७]

**३. राजीनामा :-**

नगरसेवक व उपनगराध्यक्ष आपला राजीनामा नगराध्यक्षांकडे देतात आणि नगराध्यक्ष आपला राजीनामा जिल्हाधिकाऱ्यांकडे देतात.

**क) समित्या :-**

दैनंदिन कामकाज सुव्यवस्थित चालावे व प्रशासनावर योग्य नियंत्रण राहावे, यासाठी नगरपालिकामध्ये स्थायी समिती व विषय समित्यांची निर्मिती केली जाते. या समित्यांच्या माध्यमातून नगरपालिकांचे कामकाज पाहिले जाते. लोकप्रतिनिधी आणि लोकांचा संपर्क अधिक यावा व लोकांना आपल्या प्रतिनिधींशी संपर्क ठेवून आपल्या भागातील प्रश्नाविषयी आणि इतर अडचणीविषयी माहिती देता यावी. या उद्देशाने वॉर्डस समिती(मतदार समिती) निर्माण करण्यात आली. तीन लाखांपेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या नगरपालिकेला अशी समिती स्थापन करणे आवश्यक आहे. परंतु जर त्यापेक्षा कमी लोकसंख्येच्या नगरपालिकेने अशी समिती स्थापन केली तरी हरकत नाही. या समितीचे अध्यक्षपद त्या भागातील नगरसेवकाकडे ठेवण्यात आले. महाराष्ट्रात प्रशासकीय सोयीसाठी 'अ' व 'ब' वर्गीय नगरपालिकांसाठी एक स्थायी समिती व इतर सहा विषय समित्या असतात.[२८] त्या पुढीलप्रमाणे

१) स्थायी समिती

२) सार्वजनिक बांधकाम समिती

३) शिक्षण समिती

४) स्वच्छता विषयक, वैद्यकिय आणि आरोग्य समिती

५) पाणी पुरवठा आणि जल निस्सारण समिती

६) नियोजन व विकास समिती

७) महिला व बालकल्याण समिती

**१) स्थायी समिती :-**

स्थायी समिती ही नगरपालिकेची सर्वात महत्त्वाची समिती आहे. स्थायी समितीत एकूण ९ सदस्य असतात. नगराध्यक्ष हाच स्थायी समितीचा पदसिद्ध अध्यक्ष असतो.[२९] स्थायी समितीची सामान्य सभा महिन्यातून एकदा होते. पहिली सभा ही समितीच्या स्थापनेनंतर १५

दिवसांच्या आत घ्यावी लागते. ही समिती अतिशय महत्त्वाची मानली जाते. कारण परिषदेनंतर हीच समिती सर्व महत्त्वाचे निर्णय घेत असते. साधारणतः ही समिती पुढीलप्रमाणे कामे करीत असते.

१) सर्व कार्याचा समन्वय करणे.

२) नगरपालिकेच्या कामकाजावर सामान्य स्वरूपात नियंत्रण ठेवणे.

३) अंदाजपत्रकाची रूपरेषा ठरविणे.

४) नगरपालिकेच्या कामासंबंधी महत्त्वाचे निर्णय घेणे.

**२) इतर समित्या :-**

विषय समित्यांचे अध्यक्ष व प्रत्येकी तीन सभासद नगरपालिकेच्या सभेकडून (परिषदेकडून) प्रमाणशीर प्रतिनिधीत्त्वाच्या पद्धतीने निवडले जातात. यामुळे विरोधी प्रतिनिधींनादेखील यात सहभागी होण्याची संधी प्राप्त होते. याबरोबर सभागृहातील सर्वच पक्षाच्या आणि गटाच्या प्रतिनिधींना प्रतिनिधीत्त्व मिळाल्यामुळे सर्वकष असे स्वरूप मिळण्यास मदत झाली आहे.

विषय समित्यांची सदस्य संख्या सर्वसाधारणपणे परिषदेच्या सदस्य संख्येच्या १/३ किंवा १/४ असते. 'क' दर्जाच्या नगरपालिकेला फक्त स्थायी समिती नाही यांचा निर्णय नगरपालिकेलाच घ्यावा लागतो.[३०]

**ड) प्रशासन :-**

नगरपालिकेची वाढ व विकासासाठी प्रशासन हा महत्त्वाचा घटक आहे.कारण नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचा विकास हा कार्यक्षम व निर्दोष प्रशासनामुळे होत असतो. प्रशासन यंत्रणा योग्य असेल तरच लोकोपयोगी कामे चांगल्या पद्धतीने पार पाडली जातात. नगरपालिका प्रशासन यंत्रणेचा थेट मुलभूत समस्यांशी संबंध येतो. सार्वजनिक आरोग्य, रस्ते, बांधकाम, शहर स्वच्छता, पाणी पुरवठा, सांडपाण्याची व्यवस्था आणि दिवाबत्ती इत्यादी कामे नगरपालिकेकडून पूर्ण केली जातात. त्याचप्रमाणे लोक प्रतिनिधीच्या कार्यक्षमतेवर दुय्यम दर्जाची कामे अवलंबून असतात. थोडक्यात स्थानिक लोकांच्या सामाजिक, शारीरिक, मानसिक आणि सांस्कृतिक विकासाची गुरूकिल्ली म्हणजेच स्थानिक स्वराज्य संस्था होय.[३१]

प्रशासकीय यंत्रणा कार्यक्षम व गतीमान होण्यासाठी संस्थेअंतर्गत अनेक वेगवेगळे विभाग स्थापून त्यामार्फत कामे चोखपणे पार पाडली जातात.आरोग्य विभागाकडून लोकांना चांगल्या आरोग्य सेवा पुरविल्या जातात. संसर्गजन्य व साथीच्या रोगाचा प्रसार होवू नये म्हणून पालिकेकडून प्रतिबंधात्मक उपाययोजना केली जाते. शहरातील घनकचरा व स्वच्छतेविषयक व्यवस्थापनात विशेष लक्ष दिले जाते. बांधकाम विभागामार्फत शहरातील रस्ते, गटारे आणि सार्वजनिक इमारतीचे बांधकाम पूर्ण केले जाते. शहरात दिवाबत्तीची सोय, नियमित व स्वच्छ पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, लोकांची आपत्तीच्या वेळी सुटका करणे, शहरातंर्गत वाहतूक योजना, लोकांना स्वस्त धान्य दुकानातून धान्याचा पुरवठा करणे इत्यादी भौतिक सुधारणांची कामे या विभागामार्फत पार पाडली जातात. शहर विकासामध्ये शहर रचना, उदयाने, प्राणी संग्रहालय, पोहण्यासाठी तलाव, वस्तू संग्रहालय आणि ग्रंथालय इत्यादी घटकांचा समावेश होतो.

नगरपालिकेकडून पुरविल्या जाणाऱ्या सेवा आणि कार्यक्रमांची परिणामकारकता ही पालिकेच्या कार्यपद्धतीवर अवलंबून असते. नगरपालिकेवरील लोकनियुक्त प्रतिनिधी यांनी एखादा कायदा पास केला आणि एखादे धोरण ठरविले तर मात्र कायदयाची किंवा धोरणाची अंमलबजावणी करण्याचा महत्त्वाचा प्रश्न नगरपालिका प्रशासनावर येऊन पडतो. टेड ऑर्ड वे या तज्ज्ञाच्या मतानुसार 'प्रशासन नैतिक कायदा आहे आणि प्रशासक म्हणजे नैतिकतेचा प्रतिनिधी आहे.'[३२]

नगरपालिकांचे प्रशासन सुरळीत व सुनियंत्रित चालविण्यासाठी नगरपालिकांना आपला कर्मचारी वर्ग नेमावा लागतो. नगरपालिकेच्या कामकाजात एकसुत्रीपणा व नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीने मुख्याधिकाऱ्यांची नेमणूक सरकार करते. १९६५ च्या नगरपालिका कायदयात महाराष्ट्रात देखील मुख्याधिकारी व इतर अधिकारी उदा. इंजिनियर्स, आरोग्य अधिकारी, लेखा परिक्षक, शिक्षण अधिकारी, यांची नेमणूक करण्यासाठी राज्य पातळीवर एक स्वतंत्र केडर निर्माण करावे अशी तरतूद करण्यात आली. परंतु प्रत्यक्षात अशी केडर निर्माण झाली नाही. कनिष्ठ दर्जाच्या कर्मचाऱ्यांची निवड करण्याचा आधिकार स्थायी समितीला देण्यात आला. अशा नेमणूकीला नगरपालिकेची मान्यता घ्यावी लागते.

### १. मुख्याधिकारी (उहळशष जषषळलशी) आणि त्यांची कार्ये :-

नगरपालिकेच्या प्रशासकीय कार्याची अंमलबजावणी करण्यात मुख्याधिकारी महत्त्वाची भूमिका बजावतात. त्यांचा दर्जा साधारणतः मामलेदार पदाचा असून त्याची पगारावर नेमणूक केली जाते. नगरपालिकेचा प्रमुख प्रशासकीय अधिकारी म्हणून मुख्याधिकारी काम पहातात. नगरपालिकेतील इतर कर्मचाऱ्यांना त्यांच्या हाताखाली काम करावे लागते. महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम ॲक्ट १९६५ कलम ७५ मध्ये मुख्याधिकारी पात्रतेचे नियम शासनाने केले आहेत.[३३]

मुख्याधिकारी हा नगरपालिकेचा प्रशासकीय प्रमुख असतो. त्यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत (चझडउ) निवड केली जाते आणि नेमणूक राज्यशासन करते. मुख्याधि–काऱ्यांना पुढील महत्त्वाची कामे पार पाडावी लागतात.

१. नगरपालिकेचे निर्णय व ठराव यांची अंमलबजावणी करणे.
२. अंदाजपत्रक तयार करून स्थायी समितीस सादर करणे.
३. मुख्याधिकारी हा नगरपालिकेचा पदसिद्ध सचिव असतो.
४. नगरपालिकेचे लेखे(दप्तर) सांभाळणे.
५. सभांना उपस्थित राहून इतिवृत्त लिहिणे.
६. कर्मचाऱ्यांवर नियंत्रण ठेवणे व प्रशासनात सुसंवाद प्रस्थापित करणे.[३४]

मुख्याधिकारी हा नगरपालिकेचा प्रमुख प्रशासकीय अधिकारी असल्याने त्यांच्या कार्यक्षमतेवर नगरपालिकेचा विकास अवलंबून असतो. लोकप्रतिनिधींनी घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याचे काम त्यांचे असते. त्यामुळे लोकप्रतिनिधी व मुख्याधिकारी यांचे संबंध सलोख्याचे असतील तर त्यांनी घेतलेल्या निर्णयाची योग्य अंमलबजावणी होऊन लोकांना नगरपालिका अधिक चांगली सेवा देऊ शकते. नगरपालिकेचा मुख्याधिकारी कार्यक्षम व दक्ष असेल, तरच नगरपालिका प्रशासन सुनियंत्रित चालते.

## ६.नगरपालिकेची कार्ये :-

स्थानिक स्वराज्य संस्थांप्रमाणेच नगरपालिकेला दोन प्रकारची कार्ये करावी लागतात. त्यामध्ये एक म्हणजे आवश्यक काम आणि दुसरे म्हणजे ऐच्छिक काम अशी कामे करावी लागतात. आवश्यक कामात अशा गोष्टींचा समावेश केला जातो की जी कामे केली गेली

नाहीत तर नगरपालिका बरखास्त केली जाऊ शकते. परंतु ऐच्छिक कामाबाबत मात्र नगरपालिकेला निर्णय घेण्यास बरीच सवलत असते. आर्थिक परिस्थिती पाहून त्यासंबंधात ती कामे करावयाची किंवा नाही हे नगरपालिकेला ठरविता येते. १९६५ च्या नगरपालिकेच्या कायदयानुसार महाराष्ट्रात पुढील कार्याचा समावेश केलेला आहे.[३५]

**१. आवश्यक कार्ये :–**

१. शहरात पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणे.

२. सांडपाण्याची व्यवस्था करणे.

३. सार्वजनिक रस्ता बांधणे, दुरूस्त करणे व त्यांची देखभाल करणे.

४. सार्वजनिक रस्त्यावर व सार्वजनिक ठिकाणी दिवाबत्तीची सोय करणे.

५. सार्वजनिक स्वच्छतेची व्यवस्था करणे.

६. सार्वजनिक आरोग्य, रोगप्रतिबंधक उपाययोजना, दवाखाने स्थापन करणे आणि कुटूंब नियोजन केंद्रे निर्माण करणे.

७. कसाईखान्याची व्यवस्था करणे.

८. जन्म– मृत्यूची नोंद ठेवणे.

९. शिक्षणाची सोय करणे.

१०. घरबांधणीवर नियंत्रण ठेवणे आणि नवीन घरबांधकामास परवानगी देणे.

११. नगररचना व नियोजन, शहरी सौंदर्यीकरण, शहरी वनीकरण, पर्यावरण, झोपडपट्टी विकास व सुधारणा इत्यादी.

१२. स्मशानभूमी, जनसुविधा, आर्थिक, सामाजिक विकासाचे नियोजन अग्निशमन इत्यादी.

१३. मागासवर्ग विकास, अपंग, मनोदुर्बलांना साहाय्य.

**२. ऐच्छिक कार्य :–**

१. विद्युत पुरवठा निर्माण करणे.

२. सार्वजनिक वाहतुक व्यवस्था निर्माण करणे.

३. सार्वजनिक सभागृह बांधणे त्यांची व्यवस्था पाहणे.

४. सार्वजनिक सभागृह बांधणे

५. ग्रंथालय स्थापन करणे.

६. धर्मशाळा व विश्रामगृह बांधणे.

७. उच्च शिक्षणाची सोय करणे.

८. नगरपालिकेच्या सेवकवर्गाला राहण्याच्या जागा उपलब्ध करून देणे.

## ७. मलकापूर नगरपालिकेची स्थापना (३ ऑक्टोबर १८८४)

### अ) नगरपालिका म्हणजे काय :–

श्री.लक्ष्मणशास्त्री जोशी म्हणतात की, ङ्गशहरात नागरी सुखसोयी पुरविण्याचे काम करणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेला नगरपालिका असे म्हणतात.ङ्ग[३६]

भारतात नगरपालिका स्थापन करण्याचा अधिकार १८५० च्या कायदयाने केंद्र सरकारला मिळाला. एखाद्या शहरातील नागरिकांनी आपल्या शहरात नगरपरिषद स्थापन करण्यात यावी त्यासंबंधी कायदयाचे आम्ही पाालन करू व रीतसर कर भरू असा अर्ज केल्यानंतर सरकार नगरपरिषद स्थापन करण्यासाठी हालचाल करत. १८५० नंतर भारतातील अनेक शहरात नगरपरिषदा स्थापन करण्यात आल्या.

सरकारने नगरपरिषदा स्थापन करण्याचा निर्णय घेतल्यानंतर गव्हर्नर ८ ते १५ जणांची म्युनिसिपल कमिशनर म्हणून नियुक्ती करित असत. वेगवेगळ्या जाती धर्मातील प्रतिष्ठित नागरिकांना प्रतिनिधीक पंच म्हणून नेमले जाई. जिल्हाधिकारी हा नगरपालिकेचा अध्यक्ष असे. कामकाजविषयक नियम प्रत्येक नगरपालिकेने बनवायचे व गव्हर्नरांनी ते मंजूर केल्यानंतर अंमलात आणण्याची प्रथा होती. घरपट्टी व जकात हे कर बसविण्याचा अधिकार नगरपरिषदेस असे व रस्ते सफाई, पाणी पुरवठा इत्यादी कामे केली जात. जिल्हाधिकाऱ्यांना नगरपालिकेच्या कामात लक्ष देण्यास वेळ कमी असल्याने १८८५ पासून नगरपालिकेवर बिनसरकारी सदस्यातून अध्यक्षांची निवड करण्यात आली. नगरपालिका प्रांतिक सरकारचा विषय मानण्यात आला आणि त्यावर स्वतंत्र अधिकाऱ्यांची निवड केली.

मलकापूर नगरपालिकेची स्थापना ३ ऑक्टोबर १८८४ रोजी करण्यात आली. ही नगरपालिका 'क' वर्गात येते. मलकापूर नगरपालिकेचे क्षेत्र ८६.६८ हेक्टर एवढे आहे.[३७] मलकापूर नगरपालिकेच्या स्थापनेपासून १८९१ सालापर्यंत म्हणजे श्रीमंत पंतप्रतिनिधीसाहेब यांना मुखत्यारी मिळेपर्यंत म्युनिसिपालिटीची व्यवस्था रावसाहेब डि.ऑफिसर कोल्हापूर व रावसाहेब कारभारी विशाळगड यांचे नजरेखाली होत असे. मुखत्यारीनंतर इतर सर्व

खात्याप्रमाणे कमिटीची व्यवस्थाही श्रीमंत सरकार स्वारीकडे पूर्णपणे आली. कमिटीचे कामकाज पहाणेसाठी सहा सरकारी नोकर व आठ बिन–सरकारी सरकार नियुक्त असे चौदा मेंबर कमिटीत नेमून रावसाहेब कारभारी यांना तिचे कायमचे प्रेसिडेंट नेमण्यात आले. दर तीन वर्षांनी वरील चौदा मेंबरांची फेर नेमणूक होत असे. मेंबर लोकांच्या बहुमताने ठराव होऊन ते प्रेसिडेंटकडून श्रीमंत हुजूरास पाठविण्यात येतात व मंजुरी मिळाल्यानंतर त्याची अंमलबजावणी होत असे.

वरील व्यवस्था सन १३४८ फसली सालाच्या अखेर अव्याहत चालू होती. सन १३४९ फसली सालचे आरंभापासून मलकापूर म्युनिसिपालिटीच्या इतिहासात श्रीमंत हुजूराकडून एक अभिनव व महत्त्वाचा उपक्रम सुरू करण्यात आला. त्यांची हकीगत थोडक्यात पुढीलप्रमाणे आहे.

हुकूमाप्रमाणे रावसाहेब कारभारी यांनी इतर म्युनिसिपालिटयाकडून माहिती आणवून मलकापूर रहिवाशांचे म्हणने ऐकून घेऊन त्यावेळच्या कमिटीकडून कमिटीचे मताप्रमाणे एक योजना तयार करून मागितली. कमिटीने या बाबतीत एक सब–कमिटी नेमली. सब–कमिटीने इतर म्युनिसिपालिटयाकडून आणलेली माहिती विचारात घेऊन व शहरवाशीयांच्याबरोबर विचार–विनिमय करून शहराच्या लोकस्थितीच्या मानाने नियम तयार करून ते जनरल कमिटीपुढे विचारार्थ ठेवला. जनरल कमिटीने केलेल्या सूचना वरील योजनेत समाविष्ट करून रावसाहेब कारभारी यांनी हु.आ.नं.४४७ ता. १५ डिसेंबर १९३८ रोजी आपल्या रिपोर्टसह सदर योजना श्रीमंत हुजूर पाठविली. तिचा श्रीमंताकडून योग्य तो विचार होऊन मु.र.न.८२३ दि.२४ फेब्रुवारी १९३९ रोजी हुकूम रावसाहेब कारभारी यांच्याकडे पाठविण्यात आला. त्यातील महत्त्वाचा भाग पुढील प्रमाणे :–

म्युनिसिपालिटीचा कारभार शक्यतो लोकमतास अनुसरून चालतो. लोकनियुक्त कौन्सिलरांची संख्या प्रेसिडेन्टनेसुद्धा एकंदर कौन्सिलरांच्या संख्येपैकी निम्यापेक्षा कमी असू नये अशी तरतूद केली आहे. त्यादृष्टीने विचार करता सब–कमिटीने ठरविल्याप्रमाणे म्युनिसिपल डिस्ट्रीक्टचे तीन वॉर्ड पाडून त्यातून त्या कमिटीने शिफारस केल्याप्रमाणे प्रत्येकी दोन सभासद मतदारांना निवडून देण्याऐवजी प्रत्येक वॉर्डातून तीन सभासद निवडणेचे आहेत. व त्यांची नेमणूक मु.र.नं.३३० ता. २१ सप्टेंबर १९३८ रोजी हुकूमास अनुसरून सरकारातून

करणेची आहे. वरील सबब जनरल कमिटीने मान्य केली.

कमिटीने लोकनियुक्त कौन्सिलरांची संख्या आठ असावी अशी शिफारस आपल्या रिपोर्टमध्ये केली होती. श्री.सरकारांनी आणखी एक पाऊल पुढे जाऊन ती नऊ केली. यावरून म्युनिसिपालिटीचा कारभार होईल तितका करून लोकनियुक्त सभासदाकडून व्हावा याबद्दल श्रीमंताची किती तीव्र इच्छा आहे हे दिसून येते.

नवीन घटनेप्रमाणे म्युनिसिपल कौन्सिलरांची संख्या पुढीलप्रमाणे राहिल त्यामध्ये रावसाहेब कारभारी (प्रेसिडेन्ट) १, हुदबदयाच्या नात्याने २ (महालकरी व्हाइस प्रेसिडेंट १, पोलिस सब–इन्सपेक्टर –१), सरकार नियुक्त ३, आणि लोकनियुक्त व सरकारने मान्य केलेले ९ अशी एकंदर सभासदांची संख्या १५ होती.[३८] उदा. १५ म्युनिसिपल कमिटीच्या मेंबरांची यादी ही सन १३४८ फसली सालातील आहे. ती खालीलप्रमाणे.[३९]

| अ.क्र. | मेंबरचे नाव | शेरा |
|---|---|---|
| १ | रावसाहेब गोपाळ विष्णू खांडेकर कारभारी ज. विशाळगड (अध्यक्ष) | हुदबदयाचे नाव |
| २ | रा.रा.पंढरीनाथ बापूजी शिरवळकर महालकरी ज.विशाळगड (उपाध्यक्ष) | हुदबदयाचे नाव |
| ३ | रा.रा.भिकाजी भास्कर कुलकर्णी पोलिस सब–इन्स्पेक्टर ज. विशाळगड | हुदबदयाचे नाव |
| ४ | रा.रा.रामचंद्र गोपाळ पेटकर सब–ॲसिस्टंट सर्जन | सरकारी नोकर |
| ५ | रा.रा.व्यंकटेश विनायक दिवेकर, ओव्हरसिअर | सरकारी नोकर |
| ६. | रा.रा.गंगाधर महादेव दामले, अव्वल कारकून | सरकारी नोकर |
| ७. | रा.रा.रघुनाथ बाळकृष्ण कोळेकर, नाझर | सरकारी नोकर |
| ८. | रा.रा.दत्तात्रय नारायण गोगटे, वकील | सरकारने नेमलेले |
| ९. | रा.रा.विश्वनाथ नारायण सबनीस, वकील चेअरमन | सरकारने नेमलेले |
| १०. | रा.रा. रघुनाथ गणेश लिमये. | सरकारने नेमलेले |
| ११. | रा.रा.गोविंद नारायण लांबेकर, वकील | सरकारने नेमलेले |
| १२. | रा.रा.सखाराम दत्तात्रय जोशी. | सरकारने नेमलेले |
| १३. | रा.रा.कृष्णा हरशेट भिंगार्डे. | सरकारने नेमलेले |
| १४. | रा.रा.गोविंद कृष्ण बेरडे. | सरकारने नेमलेले |
| १५. | रा.रा. नाना खंडो मिरजकर | सरकारने नेमलेले |

सध्या मात्र मलकापूर नगरपालिकेची सदस्य संख्या २० एवढी आहे.

## ८. मलकापूर नगरपालिकेची कार्यालयीन इमारत :–

सन १८४४ मध्ये प्रतिनिधी घराण्याचे प्रमुख ठाणे विशाळगडाहून मलकापूरला हलविल्यानंतर मलकापूरचे महत्त्व वाढले.[४०] कै. आबासाहेब पंतप्रतिनिधी यांनी ३ ऑक्टोबर १८८४ रोजी मलकापूर या ठिकाणी नगरपालिकेची स्थापना केली.[४१] मलकापूर गावाचा स्थानिक कारभार सन १८८४ मध्ये स्थापन झालेली नगरपालिका पाहते. प्रतिनिधी यांनी मलकापूर नगरीत शाळी व कडवी नदीच्या जुन्या संगमांवर सरकारी वाडा बांधला आणि या वाडयातूनच जहागिरीचा कारभार सुरू केला अशा या प्रशस्त सरकारी वाडयातून त्यावेळी जहागीरदार यांनी नियुक्त केलेल्या प्रतिनिधी मार्फत नगरपालिकेचा कारभार सुरू झाला. या वाडयातून सन १९४० च्या दरम्यान नगरपालिकेचे कार्यालय स्वतंत्र जागेत आले. सन २००६–०७ मध्ये या सरकारी वाडयाजवळ नवी मोठी इमारत बांधली आहे.

ब्रिटिश काळात सन१८८३ मध्ये मलकापूर जवळील शाळी नदीवर ३० फूट रूंदीच्या ५ कमानी असलेला दगडी पूल बांधला. या पूल बांधकामासाठी ३८ हजार ५० रूपये खर्च आला होता.[४२] मलकापूरच्या या बांधकामाच्या कामात कै. आबासाहेब पंतप्रतिनिधी यांचे महत्त्वपूर्ण योगदान लाभले आहे.कै.आबासाहेब पंतप्रतिनिधी यांच्यानंतर आप्पासाहेब पंत, बाबासाहेब पंत, कुमारसाहेब पंत आणि कृष्णराव राजेसाहेब पंत इत्यादी आबासाहेबाच्या कुटुंबातील वारसदार मंडळी होती. आबासाहेब प्रतिनिधी यांच्यानंतर वारसदारांचा गावा बरोबरचा संपर्क कमी झालेला दिसतो.

मलकापूर शहराच्या मध्यभागी विठ्ठलेश्वर मंदिर आहे. हे मंदिर रस्त्यापासून सातशे मीटर अंतरावर असून त्याठिकाणी एक मार्केट आहे. याच्या पूर्वेला 'मलकापूर नगरपालिकेची इमारत' आहे. या ठिकाणी नगरपालिकेचे क्षेत्रफळ १.९४ चौ.कि.मी.इतके आहे.[४३] मलकापूर नगरपालिकेचे मुख्य प्रवेशद्वार पश्चिमेस आहे. या प्रवेशद्वारालगतच एक नगारखाना होता. सध्या तो पडक्या अवस्थेत आहे. ही इमारत पूर्णतः दगडामध्ये बांधली आहे. या इमारतीला दोन्ही बाजूने दोन दरवाजे आहेत. या सरकारी वाडयात शंभर मीटरची मोकळी जागा आहे. त्या मोकळया जागेत राजाचे दोन घोडे बांधले जात होते. येथे पूर्वेला दोनशे मीटर अंतरावर धान्याचे कोठार होते. आता त्याठिकाणी या जागेत गवत उगवलेले दिसते. या इमारतीला दक्षिण बाजूस दुसरा दरवाजा आहे. त्या दरवाजावर चांगले सुशोभित नक्षीकाम केले आहे.

येथे दगडामध्ये एक खांब बनविला आहे. या प्रवेशद्वाराचा पूर्वेकडील भाग चांगला दिसत नव्हता. मात्र त्यावेळचे बांधकाम चांगले होते. नगरपालिकेची मुख्य इमारत ही पूर्णतः दगडात बांधली आहे. या इमारतीला पश्चिम आणि दक्षिण बाजूला दरवाजे आहेत. येथे सुरक्षित खोली आहे आणि त्या खोलीत पुस्तके आणि ऑफिस रेकॉर्ड ठेवण्यासाठी सहा कपाटे आहेत. याबरोबर टेबल आणि खुर्च्या इत्यादी साहित्य आहे. जवळच भवानी देवीचे मंदिर आहे. हे मंदिर प्रतिनिधींच्या खाजगी मालकीचे आहे.

## ९. समारोप :–

नागरी आणि ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांचा कारभार सुरळीत व व्यवस्थित चालविण्यासाठी अनेक संस्था उदयास आल्या. भारतात पूर्वी ग्रामीण भागातील लोकांनीच सहकारी भावनेतून कारभार करण्यासाठी पंचायतीची निर्मिती केली आणि शहरी भागाचा कारभार करण्यासाठी नियामक मंडळे व नगरसभा निर्माण केल्या. प्राचीन व मध्ययुगीन काळात या पंचायतीचे स्वरूप हे न्यायदान, सहकार्य आणि संरक्षण असे होते. परंतु आधुनिक काळाचा विचार करता विशेषतः ब्रिटिशांनी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या संदर्भात अनेक ठराव, आयोग, घोषणा आणि कायदे करून फक्त वस्तूवरील जकात कर गोळा करणे आणि लोकांवर वचक ठेवणे एवढेच काम केले. पण भारत स्वतंत्र झाल्यानंतर मात्र स्थानिक स्वराज्य संस्थेचा विकास, लोकशाहीचे विकेंद्रीकरण व्हावे, प्रशासनातील लोकांचा सहभाग वाढावा आणि स्थानिक नेतृत्व वृद्धिंगत व्हावे यासाठी भारत व राज्य सरकारने अनेक समित्या नेमल्या.

निरनिराळया राज्यात समित्यांचे अधिकार व कार्ये त्यांची रचना व कार्यपद्धती ही वेगवेगळी असल्याचे दिसते. पूर्वी यात खूप फरक असे. आता नवीन घटना दुरूस्तीमुळे यांच्यात सुसूत्रीपणा व निश्चित रचना व कार्यपद्धती प्राप्त झाली आहे. पूर्वी जो फरक होता तो मोठया प्रमाणात कमी झाला. अशा प्रकारे या प्रकरणात नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या उदय व विकासाचा आढावा घेतला. याबरोबरच मलकापूर नगरपालिकेच्या स्थापनेच्या इतिहासावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे.

## संदर्भ :–


१) शर्मा एन.पी., लोकल सेल्फ गव्हर्मेंट इन इंडिया, हिंद किताब लिमिटेड, मुंबई, १९७४, पृ.८

२) दीक्षित राजा, प्राचीन आणि मध्ययुगीन भारताचा इतिहास, निराली प्रकाशन, पुणे, पृ.६५

३) पाटील वा.भा., स्थानिक स्वराज्य संस्था, प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव, २००९, पृ. ५

४) ज्ञ्लहरवर्शीं ऊठ., र्डीवळशी ळप खपवळरप अवाळपळीीरींळेप, घळींरल ारहरश्र, अश्रश्ररहरलरव, १९८१, झ.३५७

५) बंग के.आर., भारतातील स्थानिक स्वशासन विशेष संदर्भ महाराष्ट्र राज्य, नागपूर, २००५, पृ. ६२

६) ठरूलहरपवीर ड.उ., क्लीीीू`ष चेवशीप खपवळर, र्डीक्षशशीं र्झीलश्रळलरींळेप, १९८०, झ.२३१

७) चरहशीहुरीळ ड.ठ., डेलरश्र र्ङ्गीीं. ळप खपवळर, उक्षश्रहळ जीळशपीं डेपसारपी, १९७१, झ.११४

८) रॉयचंद्र एस.सी., उपरोक्त, पृ. २१३

९) कित्ता, पृ. २१४

१०) कित्ता, पृ. २१५

११) उहरलीर ऋड., अर्वींरपलशव र्डीवू ळप ींहश क्लीीीू`ष चेवशीप खपवळर तेश्र. खख र्डींशीश्रळपस र्झील., छ्शु उक्षश्रहळ, १९७१, झ.४७१

१२) शिरसाठ व बैनाडे भगवानसिंग, भारतीय स्थानिक स्वशासन, औरंगाबाद, जून २०१०, पृ. २३, २४

१३) रॉयचंद्र एस.सी., उपरोक्त, पृ. २१४

१४) पाटील अ.आ., आधुनिक भारत, राविले पब्लिकेशन, कोल्हापूर, १९९९, पृ.११८

१५) ग्रोवर बी.एल., आधुनिक भारताचा इतिहास, एस.चंद आणि कंपनी लि.,नवी दिल्ली, २००३, पृ. २४३

१६) कित्ता, पृ. २४२

१७) एखेळीकर (डॉ.)रमेश, भारतातील स्थानिक स्वराज्य संस्था, औरंगाबाद, जून १९१९, पृ. ३०

१८) जोशी (तर्कतीर्थ) लक्ष्मणशास्त्री, मराठी विश्वकोश खंड–८, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, १९७९, पृ. २७८

१९) एखेळीकर रमेश, उपरोक्त, पृ. १३६

२०) जोशी व.श., कायमखाने लिला– महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम १९६५, ज्ञानदिप प्रकाशन, मुंबई, १९९५, पृ. २२

२१) दैनिक लोकमत, कोल्हापूर, दि.१९ मार्च २०१५, पृ. १

२२) चौधरी कि.का., कोल्हापूर जिल्हा गॅझेटियर, दर्शनिका विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९८९, पृ.५६५

२३) जोशी(तर्कतीर्थ) लक्ष्मणशास्त्री, उपरोक्त, पृ.२७७

२४) कित्ता, पृ. २७८

२५) एखेळीकर रमेश, उपरोक्त, पृ. १३६

२६) कित्ता, पृ. १३७

२७) कित्ता, पृ. १३८

२८) कित्ता, पृ. १३९

२९) जोशी(तर्कतीर्थ) लक्ष्मणशास्त्री, उपरोक्त, पृ.२७८

३०) एखेळीकर रमेश, उपरोक्त, पृ. १३९

३१) हेरमन किनर, द ब्रिटिश सिव्हिल सर्व्हिस पे., पृ. ५

३२) ट्रेड आर्ड वे, ॲडमिनिस्ट्रेशन इटस प्रपोजल अँड प्रेफरन्स, पृ.६७

३३) जोशी व.श., उपरोक्त, पृ. २४, २५

३४) जोशी(तर्कतीर्थ) लक्ष्मणशास्त्री, उपरोक्त, पृ.२७७

३५) एखेळीकर रमेश, उपरोक्त, पृ. १४०

३६) जोशी(तर्कतीर्थ) लक्ष्मणशास्त्री, उपरोक्त, पृ.२७७

३७) मलकापूर नगरपरिषद ऑडीट, सन १९८५–१९८६, पृ.१

३८) मलकापूर टाऊन म्युनिसिपालिटी, ॲडमिनिस्ट्रेशन रिपोर्ट, सन १३४८ फसली, पृ.१, २, ३

३९) कित्ता, पृ. २१, २२

४०) चौधरी कि.का., उपरोक्त, पृ. ६८६

४१) मलकापूर नगरपरिषद तपासणी अहवाल, सन १९८५–८६, पृ. १

४२) शिंदे खंडेराव, कोल्हापूर राज्याचा इतिहास, मंजुळा प्रिंटर्स, कोल्हापूर, जानेवारी २००९, पृ. १८८

४३) दैनिक पुढारी, कोल्हापूर, दि. ३१ मार्च २००१, पृ. ४

# प्रकरण तिसरे

# मलकापूर नगरपालिकेच्या विकासातील नगराध्यक्षांची भूमिका

## १. प्रस्तावना : –

शाहूवाडी तालुक्यातील एक प्रमुख बाजारपेठ व मध्यवर्ती ठिकाण असलेले मलकापूर शहर आता विविध राजकीय पक्षांचे हालचालीचे प्रमुख केंद्र बनले आहे. कोल्हापूर–रत्नागिरी महामार्गावरील तालुक्यातील हे एकमेव शहर आहे. पूर्वीपासूनच येथील बाजारपेठेत मोठी उलाढाल होते. तालुक्याच्या पश्चिम डोंगराळ भागातील सुमारे ३७ गावांचा दररोजचा संपर्क या बाजारपेठेशी येतो. शिवाय अवघ्या ३ किलोमीटर अंतरावर शाहूवाडी येथे तालुका शासकीय कार्यालये असल्याने येथील बाजारपेठ नेहमीच गजबजलेली असते. ही परिस्थिती लक्षात घेऊन तालुक्यातील सर्वच राजकीय पक्षांनी येथे संपर्क कार्यालये उभारली आहेत.

मलकापूर शहरात काँग्रेस, शेतकरी कामगार पक्ष, शिवसेना, भाजप, राष्ट्रवादी आणि जनसुराज्य इत्यादी पक्षाची कार्यालये असल्याची दिसतात. या पक्षाच्या कार्यालयातून या भागातील स्थानिक स्वराज्य संस्था, नागरी स्थानिक स्वराज्य संस्था आणि विधानसभेच्या विविध हालचाली होत आहेत. दररोजच्या संपर्क दौऱ्यांचे नियोजन, सभा, मेळावे याशिवाय विविध शासकीय परवानग्या घेण्याचे कामही गटप्रमुख याच संपर्क केंद्रातून करीत आहेत. येथील शुक्रवारचा आठवडा बाजार म्हणजे शेतकऱ्यांच्या सुट्टीचा दिवसच असतो. परिसरातील लोक मोठया संख्येने बाजाराला येतात. या स्थितीचा फायदाही अनेक राजकीय गटांनी घेतला आहे. गटनेते, प्रमुख कार्यकर्ते बाजारादिवशी येथील संपर्क कार्यालयात थांबूनच मतदारांशी संवाद साधत आहेत. गावोगावच्या संपर्क दौऱ्यात न भेटणाऱ्या व्यक्ती बाजाराच्या निमित्ताने भेटतात. एकंदरीत येथील बाजारपेठेचा व बाजाराच्या दिवसाचा फायदा मतदारांना भेटण्यासाठी राजकीय नेतेमंडळी घेत आहेत. या प्रस्तुत प्रकरणात मलकापूर शहर विकासात नगरपालिकेच्या पदाधिकाऱ्यांची विशेषतः आजपर्यंतच्या नगराध्यक्षांच्या कार्याविषयीचा आढावा घेण्यात आला.

## २. मलकापूरातील प्रमुख राजकीय पक्षः –

सन १९६० च्या राज्य पुनर्रचना कायदयानुसार द्वैभाषिक मुंबई राज्याचे विभाजन होऊन महाराष्ट्र आणि गुजरात ही दोन नवीन राज्ये अस्तित्त्वात आली. १ मे १९६० रोजी

महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली . त्यावेळी महाराष्ट्रात २६ जिल्हे, २२९ तालुके, २८९ शहरे आणि ३५७७ खेडी होती. महाराष्ट्र शासनाने सत्तेचे विकेंद्रीकरण करून लोकशाहीचा प्रसार करण्याच्या दृष्टिकोनातून १९६२ साली जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम संमत करून १ मे १९६२ रोजी महाराष्ट्रात पंचायतराजची स्थापना केली. जिल्हा पातळीवर जिल्हा परिषद, तालुका स्तरावर पंचायत समिती आणि ग्राम स्तरावर ग्रामपंचायत अशी त्रिस्तरीय रचना करण्यात आली. तसेच महाराष्ट्र नगरपालिका व महानगरपालिका अधिनियम १९६५ अन्वये लहान शहरात नगरपालिका आणि मोठया शहरात महानगरपालिका अस्तित्वात आल्या. महाराष्ट्र राज्याचे कायदेमंडळ द्विगृही असून विधान सभेच्या निवडणूकीत ज्या राजकीय पक्षाला बहुमत मिळते त्या पक्षाच्या प्रमुखाला राज्यपाल मुख्यमंत्री म्हणून नेमणूक करतात. राज्यपाल मुख्यमंत्र्यांच्या सल्ल्याने मंत्रीमंडळाची निर्मिती करतात.

मराठा काळात अनेक सरदार, जहागिरदार राष्ट्रप्रेमाने व सामाजिक बांधिलकीने भारावलेले होते. ते राष्ट्रप्रेमासाठी आपल्या राजाशी एकनिष्ठ राहिले. विशाळगडाचे जहागिरदार परशुराम त्रिंबक पंतप्रतिनिधी हे मराठयांचे एकनिष्ठ जहागिरदार म्हणून त्यांची सर्वदूर ओळख होती. त्यामुळे विशाळगड जहागिरीला आणि मलकापूरच्या इतिहासाला एक वेगळी ओळख आहे. शाहूवाडी हा जरी तालुका असला तरी अनेक हेतुनी मलकापूरला महत्व आहे. कारण मलकापूर शहरातील लोकांनी सन १९४२ च्या लढयात व भारतीय स्वातंत्र्य चळवळीमध्ये सहभाग आणि सानेगुरूजींच्या अस्पृश्य लढयासाठी मोठे योगदान दिले. देशप्रेमाने, सामाजिक बांधिलकीने कार्यकर्त्यांनी विविध राजकीय पक्षात प्रवेश केला. सुरूवातीच्या काळात प्रामुख्याने मलकापूर शहरात काँग्रेस पक्ष, शेतकरी कामगार पक्ष, समाजवादी पक्ष, शेडयुल्ड कास्ट फेडरेशन, शिवसेना, भारतीय जनता पक्ष (भाजपा), राष्ट्रवादी आणि आताचा जनसुराज्य पक्ष इत्यादी पक्षांचा प्रभाव कळत नकळत मलकापूरातील लोकांच्यावर पडलेला दिसतो. या प्रमुख राजकीय पक्षाबरोबर स्थानिक विकास आघाडयानांही महत्व आहे. अशा पक्ष व आघाडयातून मलकापूर नगरपालिका, तालुका, जिल्हा आणि महाराष्ट्रासाठी नेतृत्व उदयास आले आहे.

**१) काँग्रेस पक्ष : –**

जनमत जागृत करण्यासाठी देशपातळीवर राजकीय व्यासपीठ असण्याच्या आवश्यकतेनुसार राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना २८ डिसेंबर १८८५ रोजी करण्यात आली. ॲलन

ऑक्टेव्हियन उर्फ ए.ओ.हयूम या निवृत्त ब्रिटीश सनदी अधिकाऱ्यांच्या पुढाकाराने डिसेंबर १८८५ मध्ये राष्ट्रीय सभेची स्थापना करण्यात आली. भारतीय राष्ट्रीय सभेच्या स्थापनेने भारताच्या राजकीय जीवनात लोकशाहीचे नवे युग सुरू झाले. काळाच्या ओघात अनेक प्रवाह व संस्था या चळवळीत निर्माण होऊन ती दखलपात्र राष्ट्रीय संघटना बनली. धर्मनिरपेक्ष, समाजवादी अशी राष्ट्रीय सभा ही स्वातंत्र्य चळवळीतील प्रमुख प्रवाह ठरली.

**राष्ट्रसभेच्या स्थापनेमागची कारणमीमांसा : –**

१. १९व्या शतकात भारतात सुरू झालेले प्रबोधनयुग व धर्मसुधारणा चळवळी.

२. समाजसुधारकांनी केलेले प्रयत्न.

३. पाश्चात्य शिक्षणाचा आधुनिक भारतीयाच्या मनावर झालेला परिणाम.

४. वृत्तपत्रे व राष्ट्रीय ग्रंथ यांनी राष्ट्रभावनेस दिलेले उत्तेजन .

५. दळणवळण व भौतिक सुधारणांचा परिणाम.

६. इंग्रजांच्या सत्तापिपासु व शोषित वृत्तीची भारतीयांना झालेली जाणीव.

७. राष्ट्रीय सभेच्या स्थापनेपूर्वी भारतातील विविध प्रांतात उदयास आलेल्या राष्ट्रवादी संस्था.

या सर्व पार्श्वभूमीवर देशात राष्ट्रभक्तीचे नवे वारे वाहू लागले व सर्वांना एकत्रित करणारी संघटना भारतात असावी या विचारातून व तत्कालीन ब्रिटीश प्रशासकांच्या सहानुभूतीतून राष्ट्रीय सभा अस्तित्वात आली.

सन १८८५ ते १९४७ हा कालखंड राष्ट्रीय काँग्रेसच्या स्वातंत्र्य चळवळीचा कालखंड होय. महाराष्ट्रात १९५२ च्या विधानसभेच्या निवडणुकीपासून १९९५ च्या निवडणुकीपर्यंत १९७८ ते १९८० हा पुरोगामी लोकशाही दल सरकारचा अपवाद वगळता राष्ट्रीय काँग्रेस पक्ष सत्तारूढ होता. सन १९६९ साली काँग्रेस पक्षात फुट पडल्यामुळे इंडिकेट व सिंडिकेट असे दोन गट निर्माण झाले. काँग्रेसमध्ये राष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीत व्ही.व्ही.गिरी निवडून आल्यामुळेच इंडिकेट व सिंडिकेट असे गट निर्माण झाले. त्याचा परिणाम महाराष्ट्रातील काँग्रेसवर झाला. १९७२ च्या विधानसभेत इंडिकेटला बहुमत मिळाले व सिंडिकेट काँग्रेस दुर्बल बनला. इंडिकेट पक्षाला विरोध करणारा जनता पक्ष उदयास आला. एस काँग्रेस व इंदिरा काँग्रेस हे दोन गट निर्माण झाले. हे सरकार अल्पजीवी ठरले यातून शरद पवारांच्या नेतृत्वाखाली समांतर काँग्रेस निर्माण होऊन या गटाने जनता पक्ष व इतर पक्षांच्या सहकार्याने पुरोगामी

लोकशाही दलाचे (पुलोद) सरकार स्थापन केले. केंद्रातील जनता पक्षाचे सरकार कोसळल्याने इंदिरा काँग्रेस पक्षाला स्पष्ट बहुमत प्राप्त झाले. सन १९८० साली घेण्यात आलेल्या निवडणूकीत इंदिरा काँग्रेस सत्तेवर आले व महाराष्ट्रातील पुलोद सरकार संपुष्टात आले. सन १९८० ते १९९५ या कालखंडात महाराष्ट्रात काँग्रेस पक्ष सत्तारूढ होता. सन १९९५ च्या निवडणुकीत काँग्रेसला ८० जागा मिळाल्याने विरोधी पक्ष म्हणून काँग्रेसने भूमिका बजावली. पुढे १९९९ साली काँग्रेस पक्षात फूट पडून राष्ट्रीय काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस असे विभाजन झाले. काँग्रेस पक्ष हा वेगवेगळया ध्येय धोरणातूनच उभा राहीला. मिश्र अर्थव्यवस्थेचा पुरस्कार, ओद्योगिक विकास, शेती विकास, धर्मनिरपेक्ष लोकशाही राज्यांचा पुरस्कार, शिक्षण विकास, रोजगार उपलब्ध करून देणे, गरिबी हटाव, साक्षरता प्रसार इत्यादी ध्येय–धोरणे समोर ठेवून राष्ट्रीय काँग्रेस पक्ष वाटचाल करीत आहे. काँगेस पक्षाच्या ध्येयधोरणाचा आणि पक्षातील पंडित नेहरू, महात्मा गांधी, इंदिरा गांधी, राजीव गांधी, यशवंतराव चव्हाण, वसंतराव नाईक, आणि शरद पवार, विलासराव देशमुख अशा अनेक प्रभावशाली नेत्यांच्या नेतृत्वाचा प्रभाव कळतनकळत मलकापूर शहरातील लोकांवर पडलेला दिसतो. मलकापूरमध्ये राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे कार्यालय आहे. या कार्यालयातून स्थानिक नेतृत्व पुढे येत आहे आणि या नेतृत्वाच्या माध्यमातून मलकापूर शहराच्या विकासाकरिता आणि जनतेच्या समस्या, अडीअडचणी शासन दरबारी पोहचविण्याचे काम केले जाते. या काँगेस पक्षाची धुरा मलकापुरातील पाटील, वारंगे आणि गांधी घराण्याने सांभाळलेली दिसते.

मलकापूर शहरात काँग्रेस पक्षाची वाढ खऱ्या अर्थाने स्वातंत्र्योत्तर काळात आणि सहकार चळवळीच्या माध्यमातून झाली. महाराष्ट्रात पंचायतराजची निर्मिती आणि नागरी स्थानिक स्वराज्य संस्था निर्माण झाल्या यातून हा पक्ष अधिकच भक्कम झाला. मध्यवर्ती काँग्रेस पक्षात घडणाऱ्या घडामोडीचा प्रभाव या स्थानिक स्वराज्य संस्थात आणि शहरी ग्रामीण भागातील काँग्रेस शाखेत व कार्यालयात पडत होता.

**२) शेतकरी कामगार पक्ष :–**

भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यात राष्ट्रीय काँग्रेसने महत्त्वाची भूमिका बजावली. राष्ट्रीय काँग्रेसवर जोपर्यंत महात्मा गांधीचा प्रभाव होता. तोपर्यंत देशातील सर्व नेते मंडळी काँग्रेस पक्षाच्या झेंडयाखाली एक होते. स्वातंत्र्यानंतर महात्मा गांधीचा काँग्रेस पक्षावरील प्रभाव कमी

होत गेला. नंतर काँग्रेस पक्षात सत्ता प्राप्तीसाठी स्पर्धा सुरू झाली. काँग्रेस पक्षात भांडवलदार, जमीनदार व उच्चकुलीन घराण्यातील लोकांची घट्ट पकड असल्याने या पक्षात कामगार, भूमीहीन मजूर आणि शेतकरी यांना फारसे स्थान उरले नव्हते. याची जाणीव महाराष्ट्रातील बहुजन समाजातील नेत्यामध्ये निर्माण झाली. त्यांनी काँग्रेस पक्षातून बाहेर पडून १३ जून १९४८ रोजी ‘शेतकरी कामगार पक्षाची’ स्थापना केली. या पक्षाच्या स्थापनेसाठी केशवराव जेधे, शंकरराव मोरे, दत्ता देशमुख, भाऊसाहेब राऊत, यशवंतराव मोहिते, तुळसीदास जाधव, गणपतराव देशमुख आणि एन.डी.पाटील इत्यादी प्रमुख नेत्यांचा समावेश होता.[१] शेतकरी कामगार पक्षाने मार्क्सवादाचा स्वीकार करून समतावादी समाजनिर्मितीचे उद्दिष्टे ठेवले. शेतकरी व कामगारांचे प्रश्न सोडवण्यास प्राधान्य देणे, शेतमजुरांच्या संघटना स्थापने, रोजगार हमी योजना सुरू करणे, शेती मालाला योग्य भाव मिळवून देणे, सहकारी शेतीस प्रोत्साहन, खाजगी उद्योगधंद्याच्या नफ्यावर नियंत्रण ठेवणे इत्यादी ध्येयधोरणांचा पुरस्कार केला. याच धर्तीवर या पक्षाच्या माध्यमातून मलकापूरच्या समस्या सोडविणे आणि विकासाकरिता ६ मे १९७५ रोजी मोर्चा व मेळाव्याचे आयोजन केले होते. शाहूवाडी तालुक्यातील शेतकरी कामगार पक्षाच्या कार्यकर्त्यांचा व्यापक मेळावा मलकापूर येथील नरसिंह मंदिरामध्ये भाई शंकरराव कुंभार यांच्या अध्यक्षतेखाली झाला. या मेळाव्याला ७०० कार्यकर्ते उपस्थित होते. या मेळाव्यामध्ये पालेश्वर धरण झाले पाहिजे. अणुस्करा घाट फोडून रस्ता केला पाहिजे. मागेल त्याला काम आणि केलेल्या कामाचे योग्य ते दाम मिळाले पाहिजे. या भागात कॉलेज निघाले पाहिजे. माणसी १२ किलो धान्य मिळाले पाहिजे इत्यादी मागण्या ठरावाने करण्यात आल्या आणि या मागण्या मिळविण्यासाठी चळवळीचा कार्यक्रमही या मेळाव्यात आखण्यात आला. या मागण्या मान्य करण्यासंबंधी पक्षाचे ज्येष्ठ नेते भाई दाजीबा देसाई, भाई डी.एस.नार्वेकर, भाई राम पाटील, भाई कृष्णा पाटील भोगाव यांनी मार्गदर्शन केले आणि शेवटी सुभाष चौकात म्यु.कौन्सिलर श्री.प्रभावळकर मास्तर यांच्या अध्यक्षतेखाली जाहीर सभा होऊन या मेळाव्याची सांगता झाली.[२] प्रा.एन.डी.पाटील यांनी महाराष्ट्रात विशेषतः कोल्हापूर जिल्हयात शेतकरी कामगार पक्षाची पाळेमुळे रोवली गेली. प्रा.पाटील यांच्या नेतृत्वाचा प्रभाव जिल्हयातील सर्वच भागामध्ये जाणवतो. शाहूवाडी तालुक्यातही शेतकरी कामगार पक्षाचा गट होता. या शाहूवाडी तालुक्याचे शेतकरी कामगार पक्षाचे आमदार म्हणून श्री.राऊ धोंडी पाटील यांना काम करण्याची संधी

मिळाली होती.[३] यांनी शाहूवाडी तालुक्याचा व शेतकऱ्यांची समस्या सोडवण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. सध्या या तालुक्यात शेतकरी कामगार पक्षाचे नेते भाई भारत पाटील हे प्रमुख आहेत. त्यांनी आपल्या पक्षाच्या विचाराच्या प्रसारासाठी आणि गावोगावच्या जनतेच्या समस्या सोडविण्यासाठी अनेक ठिकाणी संपर्क कार्यालये स्थापन केली आहेत. मलकापूर या ठिकाणीही शेकापचे कार्यालय आहे. या कार्यालयातून त्यांनी जनसंपर्क वाढविण्याचा प्रयत्न केला आहे.[४]

### ३) समाजवादी पक्ष :–

काँग्रेसमधून सन १९३४ मध्ये समाजवादी गट स्थापन झाला. अशाप्रकारे राष्ट्रीय सभेच्या समाजवादी तरूणांनी नाशिकच्या तुरूंगात असताना राष्ट्रीय सभेतंर्गत समाजवादी पक्ष स्थापण्याचा निर्णय घेतला. यामध्ये आचार्य नरेंद्र देव, जयप्रकाश नारायण, मिनू मसानी, राममनोहर लोहिया आदी नेत्यांचा समावेश होता. सन १९३४ मध्ये काँगेस समाजवादी पक्षाची स्थापना करण्यात आली. समाजवादी पक्षाने शेतकरी व कामगारांच्या प्रश्नांना प्राधान्य दिले आणि १९४२ च्या 'छोडो भारत' चळवळीत समाजवादी तरूण अग्रभागी होते.[५] या पक्षाच्या विचाराचा प्रभाव मलकापूरातील तरूण पिढीवर आजही दिसतो. या पक्षाच्या प्रेरणेने मलकापूरातील अनेक लोकांनी १९४२ च्या लढयामध्ये सहभाग नोंदविला होता. पण या पक्षाचे कार्यालय मलकापूर शहरात अस्तित्वात नाही.

### ४) शिवसेना पक्ष :–

शिवसेनेची स्थापना बाळासाहेब ठाकरे यांनी १९ जून १९६६ रोजी मुंबई येथे केली. सन १९९५ साली झालेल्या विधानसभा निवडणूकीत शिवसेना सर्वात मोठा पक्ष म्हणून निवडून आला. शिवसेनेने भारतीय जनता पक्षाशी युती करून महाराष्ट्रात युतीचे सरकार स्थापन केले. मराठी माणसाची अस्मिता जपणे, मुंबईत वाढणाऱ्या परप्रांतीयांचे वर्चस्व रोखणे, मुंबईतील बेकार मराठी माणसाच्या बेकारीचा प्रश्न सोडवणे, दारिद्र्य निर्मूलन, कामगार कल्याण, शिक्षण, आरोग्य, गृहबांधणी आणि वाहतूक सुधारणा इत्यादी उद्दिष्टे शिवसेनेची आहेत.

पहिल्यापासून मलकापूर भागावर शिवसेनेचा प्रभाव असलेला दिसून येतो. सध्या शाहूवाडी तालुक्यातून शिवसेना–भाजप पुरस्कृत आमदार सत्यजित पाटील सरूडकर हे विधानसभेवर निवडून गेले आहेत. यांचा जनसंपर्क मोठा असल्याने लोकांबरोबर संवाद

साधण्यासाठी आणि जनतेच्या अडचणी सोडविण्यासाठी शिवसेना पक्षाचे शाखा कार्यालय मलकापूर याठिकाणी स्थापन केले आहे. मलकापूर नगरीचा सर्वांगीण विकास करणे, हेच माझे ध्येय असून सर्वसामान्य नागरिक म्हणून नगरीतील रेंगाळलेले सर्व प्रश्न मार्गी लावणार असल्याचे मत शिवसेना–भाजपाचे नूतन आमदार सत्यजित पाटील सरूडकर यांनी व्यक्त केले.

मलकापूर येथील नगरपालिकेच्यावतीने आयोजित केलेल्या सत्कार प्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी नगराध्यक्ष राजू भोपळे होते. सरूडकरांचा सत्कार शाल, श्रीफळ व फेटा बांधून नगरविकास आघाडीचे अध्यक्ष सदानंद नागवेकर यांच्या हस्ते करण्यात आला. सरूडकर पुढे म्हणाले, नगरीतील रेंगाळलेल्या प्रश्नांबाबत बैठक घेवून विकास आराखडा तयार करून प्रश्न मार्गी लावण्याचा प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले.[६]

नगराध्यक्ष राजू भोपळे म्हणाले, सिटी सर्व्हेचा प्रश्न आमदारांनी सोडवावा. स्थलांतरित आय.टी.आयचे वर्ग पूर्ववत मलकापूरात न आल्यास 'रास्ता रोको' आंदोलन करणार असल्याचा इशारा दिला. नगरसेवक शामराव कारंडे म्हणाले, आमदारांनी नगरीतील रेंगाळलेले प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रयत्न करावेत. शिवसेना जिल्हा उपप्रमुख जयवंतराव काटकर म्हणाले, आमदार फंडाचे नियोजन करून कामे करावीत. तालुक्यातून होणारी खनिज संपत्तीची लूट थांबविण्यसाठी सर्वानी एकत्र येवून प्रयत्न करावेत, असे या सभेत ठरले. या भागावर शिवसेनेचा बालेकिल्ला आहे. शिवसेनेच्या पक्षाच्या विचारधारेला मानणारा मोठा तरूण वर्ग याठिकाणी कार्यरत आहे.

**५) भाजप :–**

जनता पक्षात फूट पडल्यानंतर १९८० साली भारतीय जनसंघाच्या नेत्यांनी भारतीय जनता पक्ष स्थापन केला. सन १९९५ साली भारतीय जनता पक्षाने(भाजप) शिवसेना पक्षाशी युती करून महाराष्ट्रात युतीची सत्ता स्थापन केली. समान नागरी कायदा, शेती औद्योगिक विकास, भाववाढीस आळा, गोवध बंदी, बेकारी निवारण, लोकपाल, लोकायुक्ताच्या नेमणुका, छोटी राज्ये स्थापन करण्यासाठी आयोग स्थापन करणे, केंद्र राज्य संबंधाच्या पुनर्बांधणीसाठी राज्यांना अधिक स्वायतत: देणे आणि भारताची संरक्षण व्यवस्था सुधारण्यासाठी प्रक्षेपणास्त्रे व अणुबॉंब तयार करणे ही भारतीय जनता पक्षाची उद्दिष्टे आहेत.

अशाप्रकारे भारतीय जनता पक्षाच्या विचारधारेचाही प्रभाव मलकापूर शहरामध्ये असल्याचा दिसतो. मलकापूर शहरामध्ये भाजप पक्षाची धूरा सांभाळण्याची जबाबदारी भाजपचे ज्येष्ठ कार्यकर्ते प्रभाकर प्रभावळकर यांच्या खांद्यावर सोपविण्यात आली आहे. मलकापूर शहर विकासात आणि नगरपालिकेच्या प्रभावशाली राजकारणात प्रभावळकरांचा मोठा हातखंडा आहे. शहराची समस्या सोडविण्यासाठी, जनतेच्या अडचणी जाणून घेण्यासाठी सर्वसामान्यांचा विकास करणे आणि भाजप पक्षाची ध्येय धोरणे विचार कामे तळागाळापर्यंत पोहचविण्यासाठी प्रभाकर प्रभावळकर यांच्या नेतृत्वाखाली भाजप पक्षाचे कार्यालय मलकापूर शहरामध्ये स्थापन केले आहे. प्रभावळकर हे मलकापूर नगरपालिकेचे सन १९७८ ते १९८० या कालखंडात नगराध्यक्ष म्हणून कार्यरत होते.[७]

**६) राष्ट्रवादी :–**

१० जून १९९९ रोजी शरद पवार व त्यांच्या सहकाऱ्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची स्थापना केली. लष्करी जवान  व अधिकारी यांच्यासाठी कायम स्वरूपी वेगळा वेतन आयोग, स्वतंत्र सॅटेलाईट यंत्रणा, हरितक्रांतीला प्राधान्य देणारे शेती धोरण, सर्वकष महिला धोरण, उत्पादकता रोजगारावर भर इत्यादी राष्ट्रवादी काँग्रेसची ध्येय धोरणे आहेत. सन १९९९ च्या विधानसभेत राष्ट्रवादी काँग्रेसला समाधानकारक जागा मिळाल्यामुळे या पक्षाने राष्ट्रीय काँग्रेस पक्षाबरोबर सत्तेत भागीदारी करून महाराष्ट्रात आघाडीचे सरकार स्थापन केले. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचाही प्रभाव या भागावर पडला आहे. या पक्षाची जबाबदारी बाबासाहेब पाटील, प्रकाश पाटील या दोघा बंधूवर टाकण्यात आली आहे. प्रकाश पाटील यांनी राष्ट्रवादी पक्षाच्या अनेक पदावर काम केले आहे. यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी पक्षाचे कार्यालय मलकापूर शहरात आजही अस्तित्वात आहे. या पक्षाच्या माध्यमातून मलकापूरातील अनेक कार्यकर्ते घडले. उदा. बाबासाहेब पाटील यांनी मलकापूर नगरपालिकेचे उपनराध्यक्ष आणि नगराध्यक्ष म्हणून काम केले.[८]

**७) जनसुराज्यशक्ती :–**

सन २००४ मध्ये श्री विनायकरावजी तात्यासाहेब कोरे यांनी वारणानगरमध्ये ङ्कजनसुराज्यशक्ती पक्षाचीङ्क स्थापना केली. हा पक्ष अनेक उद्दिष्टे समोर ठेवून निर्माण केला. शेतकऱ्यांच्या शेतीमालाला दर मिळावा, जनतेच्या समस्या निवारण, कामगार व मजुरांच्या

समस्या सोडविणे, ऊसाल दर मिळवून देणे आणि शिक्षण व औद्योगिक विकास अशा अनेक उद्दिष्टांनी हा पक्ष उदयास आला. या पक्षाचे संस्थापक श्री विनायकजी कोरे यांचा पन्हाळा आणि शाहूवाडी मतदारसंघ हा त्यांचा बालेकिल्ला आहे. या पक्षाचे प्राबल्य मलकापूर शहरात जास्त आढळते. सन २००८ साली मलकापूर शहरात जनसुराज्यशक्ती पक्षाची शाखा स्थापन करण्यात आली. सध्याचे जिल्हा परिषद सदस्य सर्जेराव पेरीडकर–पाटील यांच्या नेतृत्वाखाली मलकापूर शाखेतून या पक्षाचे कार्य चालू आहे. या पक्षाच्या माध्यमातून जनतेच्या समस्या सोडविणे, लोकांच्या अडचणी शासन दरबारी पोहचविणे आणि मलकापूर शहर विकासाच्या दृष्टिकोनातून महत्त्वपूर्ण काम चालू आहे.

## ३) मलकापूर विकासात नगराध्यक्षांची कार्ये :–

मलकापूर नगरपालिकेची स्थापना ३ ऑक्टोबर १८८४ रोजी आबासाहेब पंतप्रतिनिधी यांनी केली.[९] सन १८८४ ते २०१० या कालखंडातील नगरपालिकेच्या कार्यावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु सन १८८४ ते १९४५ सालातील नगरपालिकेची माहिती घेण्याचा प्रयत्न केला पण नगरपालिकेतील रेकॉर्ड ऑफिसचा धांडोळा घेतला असता या कालावधीतील माहिती उपलब्ध होवू शकाली नाही. मात्र सन १९४५ सालापासूनची माहिती या नगरपालिका कार्यालयातून उपलब्ध आहे. या कागदपत्राच्या आधार १९४५ ते २०१० या कालावधीत चेअरमन आणि अध्यक्षांच्या कार्यावर भर देण्याचा प्रयत्न केला आहे. या पदाधिकाऱ्यांच्या कार्यकाळातील माहिती संक्षिप्त स्वरूपात देण्यात आली आहे. सन १९४६ ते २०१० या कालावधीत २७ लोकांनी नगरपालिकेचे नगराध्यक्ष म्हणून काम केले. प्रत्येकांनी आपापल्या कारकिर्दीत मलकापूर शहराच्या सर्वांगीण विकासासाठी अनेक महत्त्वपूर्ण कार्य केले. ते पुढीलप्रमाणे सांगता येईल.

### १) डी.एन.हावळ (चेअरमन) (१९४६ ते १९५५) :–

मलकापूर नगरपरिषदेच्या मॅनेजिंग कमेटीची २० जून १९४६ च्या नोटीसावरून बोलव–ण्यात आलेली सभा रविवार दि.२३ जून रोजी सायंकाळी सहा वाजता नगरपरिषदेच्या हॉलमध्ये भरली असता मे.डी.एन.हावळ(चेअरमन) सखाराम रंगनाथ पाथरे आणि भिकू हरशेट कारेकर हे तीन सभासद सभेसाठी उपस्थित होते. मलकापूर नगरपरिषदेचे चेअरमन म्हणून डी.एन.हावळ यांनी शहर विकासात महत्त्वाची कामगिरी केली. सरकारची जागा, गुरांच्या बाजाराकरिता

वहिवाटीत होती. ती जागा नगरपालिकेला मालकी हक्काने मिळणे जरूरीचे होते. कारण सदर जागेत कायम स्वरूपी काही कामे करावयाची होती. उदा. सावलीसाठी झाडे लावणे, पावसाकरिता पत्र्याची शेड मारणे इत्यादी. हया जागेच्या कामात चेअरमन हावळ यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. नगरपरिषदेकडील भंगी, झाडूवाले आणि शिपाई इत्यादी कर्मचाऱ्यांना पावसाळयाकरिता घोंगडी व छत्र्या देण्यासाठी एकशे सहा रूपये खर्चास मंजुरी दिली. उदा. आबा भाऊ जाधव(मुकादम) यांना छत्री घेण्याकरिता सहा रूपये दिले. भीमा गोविंद पवार(शिपाई) यास सहा रूपये दिले आणि भंगी व झाडूवाले यांना घोंगडी घेण्यासाठी प्रत्येकी वीस रूपये दिले. तसेच नगरपालिकेच्या इमारतींना पावसाळयात पावसापासून धोका पोहचू नये म्हणून नगरपालिकेच्या सर्व इमारतींना झडया लावण्यात आल्या. याबरोबर सोनापूरातील धर्मशाळेच्या भिंतीना भेगा पडल्या होत्या. त्याची रिपेरी करून घेतली. भाजी मंडईच्या पश्चिमेस असलेली खुली जागा ७२ द ४० अशी असलेली जमीन घेण्यासाठी प्रयत्न केले.[१०]

चेअरमन हावळ यांनी मलकापूर शहरातील रस्त्याच्या संदर्भात शुक्रवार पेठ ते कोल्हापूर आंबा रस्ता, आंबा कोल्हापूर रस्त्यापासून ते सबनीस यांच्या घरापर्यतचा रस्ता(गवळी रस्ता), मंगळवार पेठ ते कोल्हापूर आंबा रस्ता इत्यादी रस्ते पक्के करून घेतले आणि भोसले गल्ली विहीर रस्ता, बापट गल्ली रस्ता, आष्टेकर पानोया रस्ता, देसाई पानोया रस्ता, सबनीस पानंद रस्ता आणि खाटीक गल्ली रस्ता इत्यादी रस्त्याचे काम मुरूम टाकून भरून घेतले. नगरपालिका हद्दीतील सर्व रस्त्याच्या दुरूस्तीची कामे तुकाराम काशीबा भोसले यांच्याकडून कठीण मुरुमाची` करून घेतली. त्याचे टेंडर ब्रासला साडेनऊ रूपये देण्याचे मंजूर केले होते.[११]

याबरोबर म्युनिसिपालिटी हद्दीच्या विहिरीतील पाणी पालापाचोळा पुडया आणि झाडेझुडपे वाढल्यामुळे घाण झाले होते. शहराच्या आरोग्याच्यादृष्टीने शहरातील सर्व विहिरीवर स्वच्छतेसाठी व देखरेख ठेवण्यासाठी भीमा गोविंद पवार यास दरमहा २ रूपये प्रमाणे पगार देवून कामावर ठेवले. मंगळवार पेठेतील उचतकडे जाणारा रस्ता त्यावरील पुलाचा धक्का(कट्टा) पडला होता. त्याची दुरूती करून घेतली. सन १९४७ साली कृष्णा गोपाळा यास मलकापूर गावचा दर आठवडी बाजार भरायचा या बाजारदिवशी लोकांना पिण्याच्या पाण्याची सोय व्हावी याकरिता त्यांना पाणीपुरवठा करण्यासाठी प्रती बाजार सव्वा रूपये दिले जात होते. याच वर्षी

मलकापूर शहराच्या स्वच्छतेसाठी नानक आबा भंगी यांना नेमले होते. यास त्याच्या पोटगी खर्चासाठी पालिकेकडून तब्बल सात रूपये दिले जात होते.[१२]

पूर्वी नगरपालिका ऑफिसच्या मागील बाजूस मोकळी जागा होती. ती मोकळी जागा पालिकेला मिळावी, यासाठी यांनी प्रयत्न केले. कारण पालिकेचे डेडस्टॉक सामान ठेवण्यासाठी याचा वापर व्हावा, याकरिता ती जागा ताब्यात घेतली. तसेच मलकापूर म्युनिसिपालिटीकडे पूर्वी असलेली जनावरांच्या बाजाराची जागा अपूरी पडत होती. मलकापूर हे गाव व्यापाराचे मोठे केंद्र होते. याठिकाणी मालाने भरलेल्या बैलगाडया मोठया संख्येने येत असत. बैलगाडी सोडण्यासाठी येथे गाडी तळ नसल्यामुळे गाडया पेठेतील रस्त्यालगत सोडत. त्यामुळे रहदारीस मोठी अडचण व्हायची बाजाराच्या शेजारची जागा रामू भिकनगिरी गोसावी यांच्या मालकीची होती. ती जागा जनावरांच्या बाजारासाठी मिळावे यासाठी चेअरमन यांनी मोठे प्रयत्न केले. मलकापूर शहरातील मोटार स्टँडवरील सोयीकरिता आणि स्वच्छतेसाठी शौचालयाचे बांधकाम केले. कै.श्रीमंत आबासाहेब पंतप्रतिनिधी यांच्या समाधीस हार घालण्यासाठी महादेव विठोबा गांधी यांना दोन रूपये चार आणे देण्याच्या खर्चास मंजुरी दिली. पालिकेमध्ये चेअरमन यांच्या अध्यक्षतेखाली स्वातंत्र्य दिन साजरा करण्यात आला. या दिनानिमित्त मुलां–मुलींना बताशे, कांडया, बर्फी, पेढे आणि चिरमुरे इत्यादी मेवामिठाई आणून वाटली. ही मेवा मिठाई, बाबू तुकाराम वारंगे यांच्याकडून आणली. त्यांना त्यापोटी १३३ रूपये देण्यास मंजुरी दिली. तसेच रामचंद्र कृष्णा जिनगर यांच्याकडून आतिषबाजीचे साहित्य व बंदुकीच्या बाराचे साहित्य आणले. त्यांना त्यापोटी १६ रूपये देण्यास मंजुरी दिली. हा स्वातंत्र्य दिन मोठया उत्साहात साजरा करण्यात आला होता. त्यावेळी मलकापूर शहरवासीयांनी आनंदोत्सव साजरा केला. सर्व नागरिकांमध्ये आनंदमय वातावरण निर्माण झाले होते.[१३]

तुकाराम काशिबा भोसले यांनी स्वातंत्र्य दिनानिमित्त नगरपालिकेच्या इमारतीला दोन दिवस रंग दिला त्याची मजूरी सहा रूपये देण्यास मंजूरी दिली. देवजी बजाप्पा भोसले यास नगरपालिका विहिरीवर देखरेख ठेवणे व रहाटात तेल घालणे या कामाकरिता माहे दोन रूपये देण्यात आले. मलकापूर शहरातील कचरा वाहतूक मक्तेदार दौलू लक्ष्मण गायकवाड यास माहे पगार १३३ रूपये देण्याची तरतूद केली. शंकर कुशाप्पा सुतार यांच्याकडून मैला वाहतूक गाडी तयार करून घेतली. त्या कामासाठी त्यांना २५० देण्यात आले.[१४]

सोनू विठू लोहार यास मंगळवार पेठेतील पुलाचे धक्याचे बांधकामापोटी तसलमात ७५ रूपये देण्यास मंजूरी दिली. चेअरमन यांनी कोल्हापूरहून व्हौचर फॉर्म ५०० व साडेसहा रूपये आकार व राष्ट्रीय ध्वज आणला ते पाच रूपये मिळून अकरा रूपये आठ आणे बिलाप्रमाणे आदा केले त्यास मंजुरी दिली. महादेव विठोबा गांधी यांनी मलकापूर शहरास नळाने पाणी पुरवठा करणेबाबत पाहणी करण्याकरिता कोल्हापूर कंबायनींग इंजिनियर्समधील मि.लेले यांना मलकापूर येथे आणून चेअरमन यांना घेऊन विहिरीची व शाळी नदीच्या उगमाची पाहणी केली. मे.सेक्रेटरी यांना वेळोवेळी भेटण्याकरिता झालेला मोटार, टांगा भाडे खर्च आणि पाणी पत्रके छापून आणली याचा खर्च मिळून १६३ रूपये गांधी यांना आदा करण्यास मंजुरी दिली. कोल्हापूर विधीमंडळ निवडणुकीच्या मतदाराच्या याद्या तयार करण्याची माहिती घेण्याकरिता मे.प्रेसिंडेंट व मे.चेअरमन कोल्हापूरास गेले. त्यावेळी मोटार भाडे टांगा भाडे व भोजन खर्च मिळून चौदा रूपये खर्च झाला त्यास मंजूरी दिली.[१५]

सन १९४९ साली मलकापूर नगरपालिकेने शहर विकासाकरिता विविध कामे केली. त्यामध्ये तुकाराम काशीबा भोसले यांच्याकडून पालिका परिसरात पक्क्या गटाराची बांधकामे करून घेतली. त्या कामापोटी २२५ रूपये त्यांना दिले. म्यु.ऑफिस कामाकरिता एक शाईची बाटली घेण्यासाठी आण्णा बसप्पा कल्लोळ यास एक रूपया दीड आणा आदा केले. रामू भागोजी लोहार यास मच्छी मार्केटमध्ये विटेच्या पडद्या घालण्यासाठी १०० रूपये दिले. परसू गोविंद भोसले यास शहरात दिवाबत्या लावण्याच्या कामापोटी पन्नास रूपये आदा केले. पावतीस लावण्याची तिकीटे आणण्याकरिता एक रूपये खर्चास मंजूरी दिली. मनु गणु म्हार यास शहरातील कचरा वाहतूक स्वच्छता कामासाठी माहे डिसेंबरकरिता पालिकेने त्यास अठ्ठावन रूपये आदा केले. बाळकृष्ण लक्ष्मण शेटे यांच्या दुकानातून नगरपालिका ऑफिस कामाकरिता वेळोवेळी आणलेल्या साहित्याचे बील १५२ रूपये देण्यात आले.[१६]

सन १९५० या वर्षी रामू भागोजी लोहार यांच्याकडून अणुस्कुरा रस्त्यावरील धक्याचे बांधकाम करून घेतले. नगरपालिकेच्या सार्वजनिक विहिरी भोवताली दगडी फरश्या बसविल्या व जुन्या दुरूस्त करून घेतल्या. दत्तू रामा सुतार यांच्याकडून पालिकेच्या सार्वजनिक विहिरीवरील नवीन रहाट बसवले आणि जुन्या रहाटाचे नुतनीकरण करून घेतले. त्याच्यासाठी अकरा रूपये देण्यास मंजूरी दिली. शहरातील कचरा वाहतूक करण्यासाठी हरी बाळकृष्ण

बारटक्के यांना माहे सव्वा दोनशे रूपये देण्यास मंजूरी दिली. नगरपालिका कामगार म्हादू सदू घोलप यास कर्जाऊ आठ रूपये आदा करण्यास मंजूरी दिली. मे.कलेक्टर साहेब कोल्हापूर यांनी मलकापूर नगरपालिकेकडे २६ नोव्हेंबर १९४९ रोजी भेट दिली. त्यावेळी नगरपालिकेतर्फे त्यांचा आदर सत्कार करण्यात आला. याकामी हारतुरे, बिस्किटे, फळफळावळ, पानसुपारी वगैरे सामान आणण्याचे बिल अठ्ठेचाळीस रूपये सहा आणे खर्च झाले, त्यास मंजूरी दिली. मे. कलेक्टरसाहेब कोल्हापूर यांचा मुक्काम आंबा येथे झाला. त्यावेळी शौचालयाच्या व्यवस्थेकरिता भंगी पाठवला त्यास तीन रूपये आदा केले. त्यास मंजूरी दिली. यावरून आपणाला असे दिसून येते की, तत्कालीन परिस्थितीमध्ये सुद्धा स्वच्छतेच्या दृष्टिकोनातून महत्त्वपूर्ण पावले उचलली जात होती. नगरपालिकेकडील ऑफीस स्टाफ झाडू, भंगी इत्यादी नोकरांना माहे नोव्हेंबरचा पगार व महागाईभत्ता पाचशे रूपये आदा करण्यास मंजूरी दिली. रामू भागोजी लोहार यांच्याकडून नगरपालिकेसाठी मैला डबा दुरूस्त करून घेतला. त्याची मजूरी, पत्रा, नट बोल्ट मिळून पस्तीस रूपये आदा करण्यास मंजूरी दिली. मे. चेअरमन यांनी घराची बीलबुके, मोहार स्टँड हशील(कर) वसुलीची पावती बुके कोल्हापूरहून छापून आणली. त्याचा आकार सव्वीस रूपये खर्चास मंजूरी दिली. तसेच मे.चेअरमन हे कोल्हापूरहून खानेसुमारी कामाबाबत सामान आणणेकरिता भाडे खर्च, मिळून सात रूपये खर्चास मंजूरी दिली. ७ जानेवारी १९५० रोजी कोल्हापूर जिल्हयातील सर्व नगरपालिकेची आर्थिक बाबीविषयी सभा कोल्हापूरात भरली त्या सभेस मे.व्हा.प्रेसिडेंट आणि चेअरमन मलकापूर हे उपस्थित राहिले. त्यावेळी भाडेखर्च व भोजन खर्च मिळून अकरा रूपये खर्च झाला. त्यास मंजुरी दिली.[१७]

नगरपालिकेने सार्वजनिक वाचनालय मलकापूर या संस्थेस साठ रूपये आदा केले. त्यास मजुरी दिली. शंकर कृष्णा बुरूड यांच्याकडून नगरपालिकेने शौचालयामध्ये पाटया ठेवण्याकरिता घेतल्या होत्या. त्या खर्चास मंजुरी दिली. कृष्णा गोविंद जिनगर यांचेकडून घरफळा कीर्द व खतावणी शिवून घेतलेची मंजूरी आदा करण्यात आली. गांधी व्यायाम मंडळास २५ रूपये ग्रँट दिली. गणपती देवजी भोसले यांनी शाळी नदीच्या पात्रात नगरपालिकेतर्फे झरा काढला होता. त्याची मजुरी सहा रूपये देण्यात आली. नगरपालिकेच्या सर्व सार्वजनिक विहिरीवरील पाटथर, फरशा व कोपिंगचे दगड नादुरूस्त झालेले बसवून घेतले ते काम रामू भागोजी लोहार यांचेकडून करून घेतले. त्यास मजुरी म्हणून १२० रूपये देण्यात आले. अब्दुल

रहमान आदम देवळेकर यांचेकडून सोनापुरा (स्मशानभूमी) करिता जळाऊ लाकूड तीन खंडी दोन मण घेतले. त्याचा आकार ऐंशी रूपये नऊ आणे आदा करण्यात आले. बाळकृष्ण लक्ष्मण शेंडे यांच्या दुकानातून नगरपालिकेने माल आणला, त्याचे बिल २०१ रूपये देण्यात आले. पूर्वी शहरात नळाच्या पाण्याची व्यवस्था नव्हती. शहरात मात्र आठवडी बाजार प्रत्येक शुक्रवारी भरत. बाजारासाठी येणाऱ्या लोकांना पिण्याचे पाणी पुरविण्यासाठी बाळू तुकाराम कुंभार यांची रोजंदारीवर नियुक्ती केली होती. त्याची पाणी घालण्याची मजुरी दहा रूपये देण्यात आली होती. मलकापूर शहरातील लोकांना पालिकेतर्फे दिवाबत्तीची सोय करण्यात आली. फेब्रुवारी व मार्चमध्ये शहरात संध्याकाळी बत्त्या लावण्यासाठी दत्तात्रय कृष्णा कोठावळे याची नियुक्ती केली. या कामाचा आकार १५८ रूपये आदा करण्यात आले. पूर्वी शहरात दिवाबत्तीची सोय करण्याकरिता रॉकेल तेलाचा सर्रास वापर केला जात असे. नगरपालिकेने शहरातील दिवाबत्तीकरिता ज्ञानोबा राघोबा शेटे गांधी यांच्या दुकानातून रॉकेल डबे आणले होते. त्याचा आकार ५०० रूपये आदा करण्यात आले. पालिका कर्मचाऱ्याच्या हिताकरिता सुद्धा महत्त्वपूर्ण कामगिरी केली. नगरपालिकेकडील ऑफिस कर्मचाऱ्यांना माहे मार्चचा पगार व महागाई मिळवून दिली. नगरपालिकेने ऑफिस कामात आणि शहरातील स्वच्छतेसाठी महत्त्वाचे योगदान दिले. दत्तू रामा सुतार याचेकडून ऑफिसमध्ये नवीन खुर्च्या घेतल्या आणि जुन्या दुरूस्त करून घेतल्या. तसेच शहरातील शौचालयाचे दरवाजे दुरूस्त करून घेतले. या कामाची मजुरी अडतीस रूपये बारा आणे देण्यात आले. दगडू हरी पोवार यांच्याकडून उंदराचे पिंजरे दुरूस्त करून घेतले. त्याची मजुरी साडे अठ्ठावन रूपये आदा करण्यात आले. चेअरमन हे सन १९५१ साली किर्द व खतावणी आणणेकरिता कोल्हापूरास गेले त्यावेळी भाडे खर्च वगैरे मिळून सहा रूपये बारा आणे खर्च आदा करण्यात आला. दारूबंदी सप्ताह साजरा करणेकरिता फलक रंग वगैरे सामान बजापा भोसले याने आणले त्याचा खर्च भागविण्यात आला.[१८]

**नगरपालिकेचे सन १९५० सालातील कार्य :**

१) मे.चेअरमन हे म्युनिसिपालिटीचे ॲन्युअल ॲडमिनिस्ट्रेशन रिपोर्ट छापणेकरिता गेले त्यावेळी भोजनखर्च व भाडेखर्च मिळून सव्वा आठ रूपये खर्चास मंजुरी दिली.

२) पुंडलिक कृष्णा महाजन यांनी नगरपालिकेतर्फे शाळी नदीतील मंगळवार पेठेतील झरा काढून उपसा केला त्याची मजुरी सतरा रूपये देण्यात आली.

३) बापू भाऊ सुतार यास मैलागाडीचा डबा दुरूस्त करण्याच्या कामापोटी तसलमात पंचाहत्तर रूपये आदा करण्यात आले.

४) रामू भागोजी लोहार याच्याकडून नगरपालिकेच्या विहिरीवरील एक लोखंडी रहाट दुरूस्त करून घेतला त्याची मजुरी पाच रूपये देण्यात आली.

५) कृष्णा गोपाळ बागट यांनी म्यु.तर्फे जनावरांच्या बाजारातील आलेल्या लोकांना बाजारादिवशी पाणी घातले. त्याची मजुरी सहा रूपये त्यास अदा केली.

६) नगरपरिषद शिपाई यास कर्जाऊ शंभर रूपये आदा केले त्यास मंजूरी दिली.

७) नगरपरिषद मलकापूरकडील मस्टर मधील मजुरांची माहे एप्रिलची मंजुरी ५१ रूपये आदा केली त्यास मंजुरी दिली.

८) पालिकेकडील ऑफिस स्टाफ झाडू भंगी यांना माहे एप्रिलचा पगार व महागाई मिळून ७४८ रूपये आदा केले.

९) बाळू तुकाराम कुंभार यांनी म्यु.तर्फे बाजारादिवशी विठ्ठल मंदिरात लोकांना माहे एप्रिलमध्ये पाणी घातले, त्याची पाणी आणण्याची व घालण्याची मजुरी तीस रूपये आदा केली.

१०) सखाराम कृष्णाजी नलवडे याने म्यु.पल विहिरीतील झाडेझुडपे म्यु.तर्फे तोडली व शाळी नदीचे पात्रात झरा वगैरे उपसले त्याची मजुरी सत्तेचाळीस रूपये आदा केली.

११) पुंडलीक कृष्णा महाजन याने मंगळवार पेठेतील विहिरीतील गाळ काढला त्याची मजुरी सहा रूपये दिली.[१९]

१२) रत्नाकर गोपाळ बारटक्के यांनी नॉमिनेशन अर्जासोबत भरलेले पंचवीस रूपये त्यास आदा केले त्यास मंजुरी दिली.

१३) पांडू गोपाळ बागट याने बाजाराचे दिवशी श्री विठ्ठल मंदिरात लोकांना पाणी घातले त्याची आणण्याची मंजुरी पंधरा रूपये त्यास आदा केले.

१४) सखाराम कृष्णाजी नलवडे याने गुरांच्या बाजारातील विहिरीतील गाळ काढला त्याची मजुरी दहा रूपये त्यास दिले.

१५) मुरलीधर लक्ष्मण पालकर याने भट नजीकचे विहिरीतील गाळ काढला त्याची मजुरी दहा रूपये त्यास आदा केले.

१६) म्यु.सेक्रेटरी तातोबा दाजी पाटील यांनी कोल्हापूरातून बेरियम कार्बोनेट उंदिर मारणे कामाकरिता आणले त्यास खर्च भाडे वगैरे मिळून पाच रूपये पंधरा आणे खर्च आला. त्यास मंजुरी दिली.

१७) मनू गणू कांबळे यास कचरा वाहतूक कामापोटी त्यास पाच रूपये आदा केले.

१८) पांडू गोपाळ बागट याने म्यु.तर्फे श्री विठ्ठल मंदिरात बाजाराचे दिवशी लोकांना पाणी घातले त्यास पाणी आणण्याचे व घालण्याची मजुरी आठ रूपये दोन आणे आदा केली.

१९) पालिकेचे शिपाई देवजी भोसले याजकडून पावतीस लावण्याची तिकीटे एक रूपयाची आणली त्यास मंजुरी दिली.

२०) नगरपरिषद मलकापूरकडील ऑफिस स्टाफ, झाडू, भंगी वगैरे नोकरांना माहे मे चा पगार व महागाई भत्ता मिळून सातशे एक्केचाळीस रूपये पाच आणे सतरा पैसे आदा केले त्यास मंजुरी दिली.

२१) बाळू बाबाजी कांबळे याने मैलागाडीच्या दोन खेपा केल्या त्याची मजुरी तीन रूपये त्यास आदा केले.

२२) मे.चेअरमन यांनी इ.स.१९५०–५१ सालीकरिता किर्द व खतावणी छापून आणली ऑफिसकरिता फाईल, फ्लॉवर पॉट एक जोडी व स्टेनलेस ग्लास आणले त्याचे बील चौपन रूपये एक आणा तीन पैसे झाले होते.

२३) कृष्णा गोपाळ बागट याने गुराचे बाजारातील विहिरीवर बाजारचे दिवशी म्यु.तर्फे लोकांना पाणी घातले त्याची मंजुरी तीन रूपये त्यास आदा केली.[२०]

२४) पालिका हद्दीतील मुंग्या बांधणेबाबत एस.जी. भोसले ओव्हर शीयर कोल्हापूर यांचे कडून आलेले प्लॅन एस्टीमेंट मंजुर केले.

२५) पालिका हद्दीत स्मशान भूमीत पत्र्याची शेड बांधणे बद्दल एस.जी.भोसले यांच्याकडून आलेला प्लॅन एस्टीमेंट यास मंजुरी दिली.

२६) पालिका कौन्सिल भिकू हरशेट कारेकर यांना म्यु. कडे मैलागाडीचा डबा आणण्याकरिता तसलमात तीनशे रूपये आदा करण्यात आले.

२७) रामू भागोजी लोहार रा. येळाने यास म्यु.पल हद्दीत छावण्या व गार्ड स्टोन बसविलेचे बील सत्यात्तर रूपये आदा करण्यात आले.

२८) धोंडीराम ज्ञानू सणगर रा.सरूड यांचेकडून म्युनिसिपल नोकरांना देण्याकरिता घोंगडी घेतलेचे बिल एकशे सहा रूपये आठ आणे आदा करण्यात आले.

२९) पालिकेकडील ऑफिस स्टाफचा झाडू भंगी वगैरे नोकरांचा माहे जुलैचा पगार व महागाई सातशे आठेचाळीस रूपये सहा पैसे आदा करण्यात आले.

३०) म्युनिसिपल मलकापूर कडील मस्टर मधील मजूरांची माहे जुलैची मजुरी ५४/– रूपये अदा करण्यात आले.

३१) मनू गणू कांबळे यास कचरा वाहतुकीचा माहे जुलैचा पगार सव्वा दोनशे रूपये आदा करण्यात आला.

३२) म्युनिसिपल शिपाई देवजी भोसले यासकडून म्यु.कडे टपाल पाठवणे पोस्टाची तिकिटे पाच रूपयाची आणली.

३३) महमंद आबासो भटारी यास रस्ते रीपेरींगचे कामापोटी तसलमात तीनशे रूपये आदा करण्यात आले.

३४) मलकापूर हायस्कूलमधील विद्यार्थ्यांना माहे ऑगस्ट १९५० करीता मदत चव्वेचाळीस रूपये बारा आणे आदा करण्यात आले.

३५) पालिकेकडील मस्टरमधील मजुरांची माहे ऑगस्टची मजुरी एकशे आकरा रूपये आदा करण्यात आले.

३६) वसंत कृष्णा कोठावळे यास गॅसबत्त्या लावणेचे कामापोटी तसलमात दोनशे रूपये आदा करण्यात आले.

३७) नामदेव महादेव महाडिक यास कडून म्यु.कडील दफ्तर बांधणे करता रूमाल आणलेचे बील सहा रूपये नऊ आणे आदा करण्यात आले.

३८) ज्ञानू कृष्णा चांभार यास मैला गाडीच्या सापत्या करण्याची मजुरी सव्वा रूपये आदा करण्यात आले.

३९) ज्ञानोबा राघोबाशेट गांधी यास त्याचे इमारतीचे एकसालचे भाडे दोनशे आदा करण्यात आले.[२१]

**१) १९५१ सालातील कार्ये :–**

१) बापू भाऊ सुतार रा. येळाणे यांचेकडून स्मशानातील शेडचे काम करून घेण्यात आले.

२) म्यु.चेअरमन यांनी स्मशानात बांधलेले शेडचे इमारतीचे बील मंजूर केले.

३) मोनू विठ्ठू लोहार याने सोनापूरातील शेणी, लाकडे ठेवण्याच्या इमारतीच्या दरवाजाचे काम केले त्यास मजुरी तेरा रूपये आदा केली.

४) गणपती देवजी भोसले यानी म्यु.कडील कंदीलांना आईल पेन्टचा रंग दिला.त्याची मजुरी व रंगाचे बील मिळून सत्तावीस रूपये आदा करण्यात आले.

५) आदम हुसेन भंगी यास कर्जाऊ शंभर रूपये आदा करण्यात आले.

६) पालिका मलकापूरकडील ऑफिस स्टाफ झाडू, भंगी वगैरे नोकरांना माहे जानेवारीचा पगार व महागाई मिळून सातशे पंचावन रूपये दोन आणे आदा करण्यात आले.

७) नगरपालिकेकडील मस्टर मधील मजुरांची माहे जानेवारीची मजुरी अठ्ठावन रूपये आदा करण्यात आले.

८) रामू भागोजी लोहार यास म्यु.पल पक्की गटारे बांधणेचे कामापोटी तसलमात चारशे रूपये आदा करण्यात आले.

९) कचरा वाहतूक मक्तेदार मनू गणू कांबळे यास कचरा वाहतुकीचा माहे जानेवारीचा पगार दोनशे पंचवीस रूपये आदा करण्यात आले.

१०) मे. चेअरमन यांनी म्यु.कडील स्मशानात रोड बांधणे करता व मुंग्या बांधणे करता लोखंडी अँगल्स, गर्डल्स, पत्रा, नटबोल्ट, सळया वगैरे सामान पुणे, सांगलीहून आणले त्याचा खर्च सातशे साठ रूपये चौदा आणे सहा पैसे खर्च आदा करण्यात आला.[२२]

११) गणपती रामा कारंडे यास म्यु.कडील मोटार स्टँडवरील गॅरेजच्या मागील बाजूची पक्के गटार बांधणेचे कंत्राट दिले. परंतु सदर ठिकाणी मातीचा व मुरूमाचा बराच मोठा उंचवठा असल्याने सदर मातीची खुदाई करून व वाहतूक करून दुसरीकडे माती टाकणे जरूरीचे आहे. त्या मातीच्या खुदाई या कामाबद्दल सहा रूपये चार आणे प्रमाणे दर देऊन सदरचे खुदाईचे काम करून घेतले.

१२) म्यु.सेक्रेटरी तातोबा दाजी पाटील हे म्यु.कडील मूंग्या बांधणेचे कामाकरिता सिंमेटचे परमीट घेऊन कोल्हापूरास गेले. त्यावेळी भाडे खर्च व भोजनखर्च सहा रूपये दोन आणे खर्च झाला.

१३) मे. चेअरमन व मे.प्रिसिडेंट हे मे.कलेक्टरसाो जि. कोल्हापूर यांना म्यु.भेट देण्याचे आमंत्रण दिले.

१४) कचरा वाहतूक मक्तेदार मनू गणू कांबळे यास माहे एप्रिलचा पगार दोनशे तेहतीस रूपये पाच आणे आदा करण्यात आले.

१५) म्यु.ऑफिस करता कार्बन पेपर व फाईल्स आणण्याचे बील चार रूपये बारा आणे शंकर बाळशेट साडवीलकर यास आदा करण्यात आले.

१६) इ.स.१९५१–५२ सालाकरिता कीर्द खतावणी मे. चेअरमन यांनी रॉयल प्रेस कोल्हापूरहून आणली त्यास सदतीस रूपये खर्च करण्यात आला.[२३]

१७) बापू भाऊ सुतार यास स्मशानातील शेड बांधणेचे कामाकरिता तसलमात शंभर रूपये आदा करण्यात आले.

१८) रामू भागोजी लोहार यास कडून नरहरी देवालयाच्या समोरील मोरी सिमेंटमध्ये बांधून घेतली त्याचे बिल बावन्न रूपये आदा करण्यात आले.

१९) प्रोप्रा. पाथरे आणि कंपनी दुकान मलकापूरकडून म्यु.कडे गॅस बत्त्या करता रॉकेल डबे आणले, त्याचे बील सहाशे सदतीस रूपये आठ आणे त्यास आदा करण्यात आले.

२०) प्रभाकर बाळकृष्ण देशपांडे यांनी भट गल्लीतील विहिरीचा उपसा करून गाळ काढला त्याची मजुरी सहा रूपये त्यास आदा करण्यात आली.

२१) बापू भाऊ सुतार यांना स्मशानात शेड बांधणेचे कामापोटी तसलमात चारशे पन्नास रूपये आदा करण्यात आले.

२२) मनोहर शंकर साखरे याने जनावरांच्या बाजारातील विहिरीचा उपसा करून गाळ काढला त्यास त्याची मजुरी पाच रूपये आदा करण्यात आली.

२३) नानू ज्ञानू पाटील याने कडवी नदीत श्री मरीमाईच्या सभेचे वेळी येणाऱ्या लोकांनकरिता झरा काढला त्याची मजुरी पाच रूपये त्यास आदा करण्यात आली.

२४) म्यु.पल ऑफिस स्टाफ झाडू भंगी वगैरे नोकरांना माहे मे १९५१ चा पगार व महागाई भत्ता मिळून सातशे नव्यानव रूपये आदा करण्यात आले.

२५) दगडू हरी पोवार यास कडून कंदिलाच्या दौती तयार करून घेतल्या कंदिलाच्या काचा कापून व टोपने बसवून घेतली त्याची मजुरी तेरा रूपये दोन आणे त्यास आदा करण्यात आले.

२६) विनायक विष्णू कुलकर्णी यास त्याचे कबजातील घर म्युनिसिपलतर्फे बोर्डिंगचे सोयीकरिता भाडयाने घेतले त्याचे भाडे दीडशे रूपये त्यास आदा करण्यात आले. [२४]

**२) १९५२ सालातील कार्य :–**

१) नगरपालिकेच्या हद्दीतील गटारे चुण्यातील अगर सिमेंट वाळूतील पक्की बांधून घेतली आणि नगरपालिकेच्या विहिरीचे नजीक धुण्याच्या सोयीकरता फरशी बसवून घेतली.

२) पांडूरंग विष्णू भिंगार्डे यांनी आपल्या घरापुढील नगरपालिकेच्या व्यापाऱ्याच्या सोयी करता मांडव घालण्यास परवानगी दिली.

३) नगरपालिकेचा शिपाई बाळकृष्ण बाबू कडवेकर याने आपणास घराचे दुरूस्तीकरता दीडशे रूपये कर्ज पालिकेकडे मागितले त्यास मंजुरी देण्यात आली.

४) हिरालाल चतुर भंगी याने मैलागाडीला जीभ बसवली व कण्यास लोखंडी पट्टया मारल्या त्याची मजुरी पाच रूपये त्यास आदा केले.

५) पांडू हरी चव्हाण याने नगरपालिका तर्फे कचरा उचलण्याचे काम केले. त्याची मजुरी आठरा रूपये त्यास आदा केली.

६) रघुनाथ गणेश लिमये याचेकडून सागवानी १६ डांब घेतले त्याची किंमत छप्पन रूपये त्यास आदा केली.

७) हिरालाल चतुर भंगी याने नवीन कोंडाळी तयार केली त्याची मजुरी साडेसात रूपये त्यास आदा केली.

८) नगरपालिकेने कचरा वाहतुकीकरता मोटार, ट्रक विकत घेतला. [२५]

**३) १९५३ सालातील कार्य : –**

१) बुरूड गल्ली ते मोटार स्टँड या सार्वजनिक रस्त्यावर केशव रघुनाथ जोशी यांनी घातलेले कुंपन काढून टाकण्यात आले.

२) म्यु.हद्दीतील औटे यांचे गिरणी समोरील मोरी व बुरूड गल्लीतील मोरी बांधणेचे कामास मंजुरी दिली.

३) स्मशानातील जळावू लाकडे ठेवणीचे खोलीची भिंत बांधली.

४) नवीन कोंडाळी तयार करून घेतली.

५) बाजार पेठेतील मुख्य रस्त्यावर सुभाष चौकात ज्या ठिकाणी रस्ता रूंद आहे. अशा ठिकाणी नवीन झाडे लावून घेतली.

६) म्यु.चे ऑफिस इमारतीच्या पाठीमागे गटाराचे बरोबर कंपाऊंड वॉल बांधून घेतली.

७) बबन आबा भंगी यासकडून म्यु.तर्फे मा.पंतप्रधान पंडित नेहरू यांचे स्वागताकरिता तीन कमानी बांधून घेतल्या त्यास मजुरी पंधरा रूपये आदा करण्यात आली.

८) सदाशिव तुकाराम कुंभार मलकापूर यांच्याकडून पालिकेच्या चार विहिरीचा उपसा करून गाळ काढला त्यास मजुरी तेवीस रूपये आदा करण्यात आली.

९) पांडुरंग विष्णु भिंगार्डे रा. मलकापूर यांच्याकडून रॉकेल डबे सहा व दोन डांब घेतले त्याचे सर्व मिळून पंच्चावन रूपये बारा आणे त्यास आदा करण्यात आले.

१०) गोपाळ हरिशेठ कोळवणकर यांचे दुकानातून गॅसबत्या टांगणेकरिता सुती कांडणी आणली. त्याचे बिल बावीस रूपये तीन पैसे आदा करण्यात आले.

११) कचरा वाहतूक मक्तेदार मनू गणू कांबळे यास कचरा गाडीस रेडे घेण्यास व वैरण घेणे करीता तसलमात सहाशे रूपये त्यास आदा करण्यात आले

१२) सदाशिव तुकाराम कुंभार रा मलकापूर याने मंगळवार पेठेतील शाळी नदीच्या पात्रातील झरा उपसून गाळ काढला.

१३) मे.चेअरमन हावळ यांनी म्यु.च्या चतुःसिमा प्रसिद्ध पत्रके गॅझेटच्या सही शिक्के नकाशा कोल्हापूरातून आणला.

१४) सदाशिव गोपाळ कोळवणकर (मलकापूर) यांनी नगरपालिकेला रॉकेल पुरविण्याचा मक्ता घेतला होता.[२६]

१५) शंकर कृष्णा बुरूड रा.मलकापूर याजकडून नगरपालिकेसाठी डालगी व पाटया घेतल्या त्याचे बील बारा रूपये आदा केले.

१६) बाळा तुकाराम कुंभार याने म्यु.तर्फे बाजाराचे दिवशी उन्हाळयात लोकांना पाणी घातले. त्याचे बिल ४५ रूपये आदा करण्यात आले.

१७) म्यु.ऑफिस स्टॉफ भंगी झाडू वगैरे नोकारांना मे महिन्याचा पगार व महागाई मिळून ७४८ रूपये अकरा आणे आदा केले.

१८) बाजारपेठेतील रस्त्याकरिता काळी खडी फोडून घेतली.

१९) बाजारपेठेतील रस्त्यावर मलमा वाळू पसरली.

२०) म्यु.पल विहिरीतील उपसे करून गाळ काढला.

२१) म्युनिसिपलकडील गॅसबत्या करता शंभर रॉकेल डबे खरेदी केले.

२२) फर्निचर दुरूस्तकरून घेतले व नवीन फर्निचर आणण्यात आले.

२३) बुरूड गल्ली मागील नवीन भंगी पॅसेज तयार करून घेतला.

२४) मंगळवार पेठेत मशीदी मागील पॅसेज तयार करून घेतला.

२५) केसरकर याचे मागील भंगी पॅसेज कोल्हापूर आंबा रस्त्यास जोडला.

२६) म्युनिसिपल इमारतीची किरकोळ दुरूस्ती केली.[२७]

२७) महमंद भटारी यास पक्के गटाराचे कामापोटी तसलमात चारशे रूपये आदा केले.

२८) ज्ञानू बाबाजी जिनगर यास कडून किर्द व खतावणी शिवून घेतलेची मजुरी दोन रूपये आदा केले.

२९) म्युनिसिपल सेक्रेटरी यांनी गॅसबत्या करता रॉकेल डबे कोल्हापूरातून आणले त्यास एकशे अठ्ठावीस रूपये चार आणे खर्च आला.

३०) गांधी व्यायाम मंदिर मलकापूर या संस्थेस पंचवीस रूपये मदत केली.

३१) बोर्डिग कडील विद्यार्थ्यांना कंदील, लहान दिवे व वाती पुरविण्यासाठी सहा रूपये तीन आणे खर्च केला.

३२) गणपती देवजी भोसले यासकडून नवीन बाजार योजनेकरिता पाटया तयार घेतल्या त्यास साडेपाच रूपये आदा केले.

३३) अनंत शंकर नागवेकर यासकडून बालदिन दिवशी मुलांना देण्याकरिता खाऊ घेतला त्याचे बील आठ रूपये त्यास आदा केले.

३४) पांडुरंग विष्णू लिगाडे यासकडून फिनेल १२ ग्रॅम आणले त्याची किमंत एकोणतीस रूपये बारा आणे होती ती आदा केली.

३५) दत्तू रामा सुतार यांच्याकडून नवीन १६ डांब तयार करून घेतले व रहाट पाचरले त्याची मजुरी एक्कावन रूपये त्यास आदा केले.

३६) नाना बाळा मांगले यासकडून रॉकेल डबे घेतले त्याचे बिल एकशे सासष्ट रूपये आठ आणे त्यास आदा केले.

३७) ज्ञानू हरी मस्कर यासकडून नवीन भंगी पॅसेजच्या रस्त्यालगत झाडे लावून घेतली. त्याची मजुरी बावीस रूपये तीन आणे त्यास आदा केले.

३८) बाळू तुकाराम कुंभार याने म्यु.तर्फे बाजारच्या दिवशी लोकांना पाणी घातले. त्याची मजुरी नऊ रूपये त्यास आदा केले.

३९) सखाराम शंकर कडवेकर यासकडून म्यु.नोकरांना ड्रेस शिवून घेतला, गाद्या व तक्के शिवून घेतले त्याचे बील पन्नास रूपये बारा आने त्यास आदा केले.

४०) सार्वजनिक वाचनालय मलकापूर या संस्थेस शंभर रूपये अनुदान दिले.

४१) वसंत कोठावळे याने माहे मार्चमध्ये बत्या लावण्याचे काम केले त्याचे एकसष्ठ रूपये साडेसात आणे त्यास आदा केले.

४२) अब्दुल गफूर भटारी याने गुरांचे बाजारातील विहिरीलगत धुण्याकरिता फरशी बसवली. त्याचे बील दोनशे सत्तर रूपये साडे सात आणे आदा केले.

४३) फकीर महंमद भटारी याने बुरूड गल्लीतील धक्के आणि गटाराचे बांधकाम केले. त्याचे बिल पस्तीशे चौदा रूपये चार आणे त्यास आदा केले.

४४) धोडिंबा गोविंद भोसले यासकडून सोनापूराकरिता शेणी घेतल्या त्याचा आकार एकोणतीस रूपये अकरा आणे त्यास आदा केले.

४५) मे.चेअरमन यांनी पी.डब्ल्यू.डी. चा बंगला मे.पी.ये टू दी कलेक्टर यांचे सोयीकरिता रिझर्व करणेस कोल्हापूरास गेले त्यावेळी नऊ रूपये दोन आणे खर्च केले.

४६) शंकर कृष्णा बुरूड यासकडून सार्वजनिक शौचालयामध्ये ठेवणेकरिता पाटया व खोरी टिकाव व त्यांना दांडे घेतले त्याचे बिल चौदा रूपये आठ आणे त्यास आदा केले.[२८]

तसेच पालिकेने सन १९५४ मध्ये बाळू तुकाराम यांच्याकडून शहर स्वच्छतेसाठी कचरा कोंडाळी तयार करून घेतली. त्यास तीस रूपये दिले. पुंडलिक कृष्णा महाजन यास बुरूडगल्ली ते मोटार स्टँडपर्यंतचा नवीन रस्ता तयार केल्याचे बील एकशे एकोणचाळीस

रूपये आदा केले. रामू भागोजी लोहार यास सोनापूरात खोली बांधण्याच्या कामापोटी दोनशे रूपये आदा केले. नगरपालिकेचे शिपाई देवजी बजाप्पा भोसले याने पालिकेच्या निवडणुकीच्या वेळी किरकोळ सामान आणले. त्याचे बील तीन रूपये आदा केले. श्रीधर शंकर भिंगार्डे अध्यक्ष व्यायाम मंडळ मलकापूर यास दरसाल प्रमाणे मदत पंधरा रूपये देण्यास पालिकेने मंजूरी दिली. त्यावरून नागरिकांच्या आरोग्याच्यादृष्टीने नगरपालिकेने महत्त्वपूर्ण योगदान दिल्याचे दिसते. तुकाराम काशीबा भोसले यास स्टँडवर गॅरेज बांधण्यासाठी पंच्याहत्तर रूपये आदा केले. शंकर कृष्णा बुरूड यांच्याकडून नगरपालिकेने शौचालयाकरिता बांबूपासून तयार केलेल्या पाटया घेतल्या. त्याचे बील बारा रूपये त्यास दिले.[२९]

## २) दत्ता केसरकर (१९५५ ते १९५८):-

दत्ता केसरकर यांची सन १९५५ या वर्षी मलकापूर नगरपालिकेच्या चेअरमनपदी निवड झाली.[30] सन १९५५ ते १९५८ या काळात दत्ता केसरकर यांनी मलकापूर नगरपालिकेचे चेअरमन म्हणून काम पाहिले. त्यांनी आपल्या कार्यकाळात शहराच्या विकासावर भर दिला. यांनी दौलू कृष्णा चौगुले यांच्या घराच्या मागील बाजूस असलेल्या रस्त्यांच्या गटाराचे बांधकाम पूर्ण करून घेतले. कृष्णा नाना पाटील यांनी घराच्या किरकोळ दुरूस्ती कामाच्या बाबतीत नगरपालिकेकडे अर्ज केला होता. त्यास मंजुरी दिली. यांनी नगरपालिकेच्या रस्त्याची स्वच्छता आणि गटारी साफसफाईचे काम मस्टरकडील मजुराकडून करून घेतले. मासळी मार्केट बंधण्याच्या कामास परवानगी दिली. बाजारपेठेतील रस्त्यावर आठवडयातून एक वेळ पाणी मारण्याच्या कामास मंजुरी दिली. शहरातील सुभाषरोडचे आणि त्या रस्त्यावरील गटारीची बांधकामे त्याच्या कार्यकाळात पूर्ण झाली.[31] शहरामध्ये दिवाबत्तीच्या सोयीकरिता यांनी रॉकेलवर चालणाऱ्या दिवाबत्तीची सोय केली. शहरात जागोजागी कंदील दिव्याची व्यवस्था केली होती. या दिव्यासाठी दोनशे रॉकेल डब्याची खरेदी केली होती. यांनी शहरात रस्त्याच्या स्वच्छतेसाठी आणि दिवाबत्तीची चांगली सोय उपलब्ध करून दिली.

## ३) पा.ल.मोरे (१९५८ ते १९५९):-

पा.ल.मोरे यांनी सन १९५८-५९ मध्ये नगरपालिकेचे चेअरमन म्हणून काम पाहिले. यांनी आपल्या कारकिर्दीत कुंभार खाणीची व त्यालगतची दक्षिणेकडील दरडापर्यंतची सर्व जागा

क्रीडांगणासाठी राखीव ठेवण्यात आली. नगरपालिकेच्या इमारतीच्या पश्चिम बाजूकडील गटार काढून शहाबादी फरशी बसवून घेतली आणि शौचालयाचे बांधकाम केले. नगरपालिकेच्या छपाई कामाचे टेंडर देण्यात आले. सुभाष रोडवर योग्य त्याठिकाणी व गावात सोईच्या ठिकाणी भाजी मार्केट आणि जनावरांच्या बाजारात सावलीसाठी यांनी नगरपालिकेतर्फे झाडे लावली. नगरपालिकेच्या विहिरीवरील रहाटाचे कणे मोडल्यामुळे शहरातील पिण्याच्या पाण्याची मोठी अडचण निर्माण झाली. त्यावेळी दोन विहिरी वरील रहाटाचे कणे घालून ते दुरूस्त करून घेतले. त्या कामासाठी बारा रूपये खर्च करण्यात आला. नगरपालिकेच्या विहिरीतील पाणी स्वच्छ करण्यासाठी पोटॅशियम पॅरामॅगनेट कोल्हापुरहून दहा पौंड विकत आणले होते.[३२] नदीपात्रात कपडे धुण्यासाठी दगडाची सोय नव्हती. या ठिकाणी धक्के बांधावेत अशी येथील जनतेची मागणी होती. त्यानुसार यांनी या नदीपात्रात दगडे टाकून धक्के बांधले. मोटार स्टँडवरील इमारत दुरूस्त करून घेतली. शहरातील सर्व रस्त्यावरील धक्के त्यांनी बांधून घेतले. साडवीलकर बोळ, मंगळवार पेठ व इतर नादुरूस्त झालेले रस्ते दुरूस्त करून घेतले. शहरातील गटार बांधणीचे काम केले आणि कुंभारवाडयातील रस्त्याचे काम करून घेतले. अशी अनेक कामे शहर विकासाच्या दृष्टिकोनातून केलेली आपणास दिसून येतात.

**४) व्ही.पी.पाठक (१९५९ ते १९६२):-**

सन १९५९ ते १९६२ या काळात व्ही.पी.पाठक यांनी मलकापूर नगरपालिकेचे प्रमुख म्हणून काम पाहिले.[३३] यांनी मलकापूर नगरपालिकेला एक कृतीशील, सौजन्यपूर्ण आणि वैचारिक नेतृत्व दिले. त्यांच्या कार्याबद्दल लोकांच्यामध्ये आदर व जिव्हाळा होता. शहरामध्ये त्यांनी जागोजागी धक्के बांधून घेतले. शहरातील विविध भागात रस्त्याची बांधकामे पूर्ण केली. शहरातील सांडपाण्याची व्यवस्था करण्यासाठी त्यांनी गटार व्यवस्थेची कामे करून घेतली. शहरातील प्रमुख चौकात दिवाबत्तीची सोय करण्यात आली. हे दिवे रॉकेलवर चालणारे होते. पण दिवाबत्तीच्या सोयीकरिता मलकापूर येथे विद्युत वीज पुरवठा उदबघाटन समारंभ ३० मे १९६१ रोजी देशभक्त रत्नाप्पाआण्णा कुंभार यांच्या हस्ते झाला. पण त्या दिवशी महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाकडून उदबघाटन प्रसंगी वीजपुरवठा काही तांत्रिक अडचणीमुळे होऊ शकला नाही.[३४] परंतु काही दिवसांनी मलकापूर शहरास कोयना वीज प्रकल्पातून वीजेचा पुरवठा नियमितपणे होऊ लागला. रॉकेलवर चालणाऱ्या दिव्यापासून मिळणाऱ्या प्रकाशापासून

मुक्तता होऊन स्वच्छ, प्रदुषण विरहीत दिवाबत्तीची सोय झाल्याने शहर प्रकाशमय होण्यास मदत झाली. तसेच चेअरमन व्ही.पी.पाठक यांनी सार्वजनिक पाणी पुरवठयासाठी पालिकेच्या विहिरीची स्वच्छता व दुरूस्ती करून घेतली. अशी अनेक कामे यांनी केल्याचे दिसून येते.

**५) गणपती वारंगे (१९६२ ते १९६६):–**

सन १९६२ मध्ये मलकापूर नगरपालिकेच्या चेअरमनपदी गणपती वारंगे यांची निवड झाली.[३५] यांनी सन १९६२ ते १९६६ या काळात मलकापूर नगरपालिकेचे नगराध्यक्ष म्हणून काम केले. यांनी मलकापूर नगरपालिकेची सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य, बांधकाम, पाणीपुरवठा आणि स्वच्छताविषयक गरज लक्षात घेवून महत्त्वपूर्ण कार्य केले. त्यांनी शहरातील रस्त्याची कोंडी सोडविण्याचा प्रयत्न केला. लोकांना पाणी पिण्यासाठी व वापरासाठी मुबलक प्रमाणात उपलब्ध करून दिले. शहराच्या स्वच्छतेच्या दृष्टिकोनातून विचार केला असता यांनी घनकचरा गोळा करण्यासाठी मजुरी देऊन लोकांची निवड केली. सांडपाण्याच्या व्यवस्थेकरिता शहरात अनेक ठिकाणी गटाराची बांधकामे केली. शहरात दिवाबत्तीची सोय करण्याकरिता रॉकेलवर चालणाऱ्या दिव्याची उपलब्धता करून दिली. तसेच सन १९६३ सालात पालिकेने केलेल्या कार्याचा विचार करता मलकापूर नगरपालिकेने स्वतःच्या मालकीची मुरलीधर धर्मशाळेची इमारत युवक क्रीडा मंडळास सन १९६३–६४ सालाकरिता दहा रूपये भाडयांनी दिली. यातून मलकापूरातील युवकांच्या क्रीडा वृत्तीस चालना मिळाली. नगरपालिकेतर्फे शहरातील तरूणांच्या अभ्यासाच्या सोयीच्या दृष्टीकोनातून याठिकाणी स्वतंत्र लायब्ररी बांधण्यात आली. तसेच मलकापूर, बांबवडे, सरूड या तीन ठिकाणी माध्यमिक शिक्षणाची सोय होती. परंतु विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाकरिता बाहेर परगावी जाणे परिस्थितीच्या मानाने फार त्रासाचे होते. म्हणून मलकापूर येथे कॉलेज काढण्यास परवानगी मिळावी. याकरिता मलकापूर नगरपालिकेने शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरूकडे पाठपुरावा केला होता.[३६] यावरून आपणास असे दिसून येते की, मलकापूर नगरपालिकेने शहराच्या शैक्षणिक विकासासाठी मोलाचे योगदान दिले आहे.

**६) शांताराम वासुदेव वारंगे (१९६८ ते १९७०) :–**

दि.२४ जून १९६८ चे अन्वये अध्यक्ष व उपाध्यक्ष यांची निवड करण्याबद्दल ही खास सभा बोलविण्यात आली. मे.मामलेदारसाहेब यांनी सांगितल्याप्रमाणे अध्यक्ष पदासाठी उमेदवारी

अर्ज आले. यामध्ये श्री.शांताराम वासुदेव गांधी आणि श्री नारायण ज्ञानोबा गांधी या दोघांचे नॉमिनेशन अर्ज आले. आणि ते सभेपुढे वाचून दाखविण्यात आले. पुढे उमेदवारी अर्ज माघारी घेण्याकरिता पंधरा मिनिटाचा अवधी देण्यात आला. पण कोणीही अर्ज परत घेतला नाही. नंतर प्रत्येक सदस्याला अध्यक्षांची निवड करण्याकरिता मतपत्रिका देण्यात आल्या. मतदान घेण्यात आले. मतदान पूर्ण झाल्यानंतर मत मोजणी करण्यास सुरूवात केली. त्यामध्ये शांताराम वासुदेव वारंगे यांना ८ वैध मते आणि नारायण ज्ञानोबा गांधी यांना ७ वैध मते पडली. सबब शांताराम वासुदेव वारंगे हे बहुमताने नगराध्यक्ष निवडून आल्याचे मे.मामलेदार साहेब यांनी जाहीर केले. यानंतर उपनगराध्यक्ष पदासाठी श्री.अनंत तुकाराम तडावळेकर आणि शिवाजी महादेव फल्ले यांचे आलेले नॉमिनेशन अर्ज सभेपुढे वाचून दाखविणेत आले. अर्ज माघारी घेण्याकरिता पंधरा मिनिटाचा वेळ देण्यात आला. शिवाजी महादेव फल्ले यांनी आपला अर्ज पंधरा मिनिटाच्या अवधीत परत घेतल्याचे लिहून दिल्यानंतर अनंत तुकाराम तडावळेकर हे एकमताने (बिनविरोध) उपनगराध्यक्ष निवडून आलेचे मे. मामलेदार साहेब यांनी जाहीर केले.[३७]

मलकापूर नगरपरिषदेचा नगराध्यक्ष म्हणून शांताराम वारंगे यांनी सार्वजनिक कामे केली ती खालीलप्रमाणे सांगता येतील.

१) सार्वजनिक वाचनालयाला पूर्वी दोनशे रूपये मदत दिली जात होती. ती त्यांनी दोन हजार रूपये देण्याची तरतूद केली.

२) मलकापूर पाणी पुरवठा योजनेकरिता आयुर्विमा कार्पोरेशनकडून कर्ज मिळविले. एकूण कर्जापैकी एक लाख रूपये संबंधित खात्यात भरण्याची तरतूद केली.

३) कंपोस्ट खताच्या स्किमकरिता जागा संपादनेचे काम चालू असून त्या कामाच्या खर्चासाठी दोन हजार रूपयाची तरतूद केली.

४) टाऊन प्लॅनिंग करिता तीन हजार रूपये खर्चास मंजुरी दिली.

५) नगरपालिका ऑफिस कामाच्यादृष्टीने मराठी व इंग्रजी टाईपरायटर घेण्याकरिता दोन हजार पाचशे रूपयाची तरतूद केली.

६) पोलिओ प्रतिबंधक लस गावातील मुलांना मोफत देण्याकरिता लसीची किंमत म्हणून एक हजार रूपयाची तरतूद करण्यात आली.

७) स्मशानभूमीतील शेणी व लाकडे ठेवण्याचे शेड पडले होते. त्याच्या खर्चास चार हजार रूपये मंजुर केले.[३८]

नगराध्यक्ष शांताराम वासुदेव वारंगे यांनी मलकापूर विकासात अशी अनेक कामे केली.

**७) नारायण ज्ञानोबा गांधी (१९७० ते १९७४):-**

मलकापूर नगरपालिकेच्या आस्थिर राजकीय वातावरणाचा शेवट होऊन ६ डिसेंबर १९७० रोजी नूतन नगराध्यक्ष म्हणून श्री.नारायण ज्ञानोबा गांधी यांची निवड झाली. ही निवड शाहूवाडी तालुक्याचे तहसिलदार श्री. पाटील यांचे अध्यक्षतेखाली नगरपालिकेच्या छत्रपती शिवाजी सभागृहात झाली.[३९] नारायण गांधी यांची सन १९७० ते १९७४ या वर्षाकरिता मलकापूर नगरपरिषदेवर नगराध्यक्ष म्हणून निवड झाली. त्यांनी या कार्यकाळात मलकापूर गावच्या विकासावर भर दिला. यामध्ये मलकापूर शहरात उन्हाळयात पाणी टंचाई असते म्हणून दुर्मिळ असलेल्या भागातील नागरिकांना मोफत पाणीपुरवठा करण्याकरिता सहाशे रूपयाची तरतूद केली. शहरात चांगली शौचालय ड्रेनेज व्यवस्था व्हावी आणि व्ही टाईप प्रकाराची गटारे बांधण्यासाठी यांनी पाच हजार रूपयास मंजुरी दिली. शहरातील मटण मार्केट व मासळी मार्केटच्या दुरूस्ती कामासाठी चार हजार रूपयाची तरतूद करण्यात आली.[४०]

नगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांना गणवेश मोफत वाटप करण्यासाठी ७३२६ रूपयाच्या खर्चास मंजुरी दिली. नगरपालिकेचे शिपाई शंकर रामचंद्र लगारे यास शिपायाच्या जागेवर कायम करण्यात आले. विद्या मंदिर मलकापूर शाळेतील विद्यार्थ्यांने पिण्याच्या पाण्यासाठी नगरपालिकेकडे मागणी केली होती. याच्या कार्यकाळात नगरपालिकेने विद्यार्थ्यांच्या पिण्याच्या पाण्याची समस्या सोडविण्यासाठी पन्नास रूपये खर्चास मंजुरी दिली होती.[४१] तसेच बंडू भिकू खटावकर हे मलकापूर येथील बेघर रहिवासी होते. सबब त्यांना मलकापूर येथील स.नं.६८ अ क्षेत्र ३२-३० आकार या गायरानपैकी ४०द४० या मापाची मलकापूर मुटकलवाडी रस्त्यालगतची जागा घर बांधून राहण्यास परवानगी मिळवून दिली. मलकापूर नगरपालिकेकडे असलेला सरकारी रेडिओचा खर्च जास्त होता. म्हणून १९७२ पासून बंद करण्यात आला. याला सर्वानुमते मंजुरी दिली. याबरोबर त्यांनी महादेव मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्यालगतच्या पोल नं.१२२ आणि १२८ वर विद्युत बल्ब बसवून शहरात दिवाबत्तीची सोय केली. हुतात्मा दिनी मलकापूर नगरपरिषदेचो नगराध्यक्ष नारायण गांधी यांच्या अध्यक्षतेखाली नगरसेवक व नोकर

यांनी हुतात्म्यांना उभे राहून अभिवादन केले व खालीलप्रमाणे प्रतिज्ञा केली. ‌‌‌‌‌‌‌‌‌‌‌‌‌‌‌‌‌‌‌‌‌‌‌‌‌‌‌‌‌‌‌‌‌‌‌‌‌‌‌‌‌‌‌‌‌‌‌‌‌‌"आम्ही सामाजिक न्याय, समता व स्वाधीनता यांची प्रस्थापना व्हावी म्हणून सर्व तऱ्हेचे वंशिक, धार्मिक, सामाजिक, जातीय, प्रांतिय व इतर सर्व भेदभाव विसरून प्रयत्नांची पराकाष्ठा करू व देश सुखी समृद्ध व बलशाली बनवू" याप्रमाणे सदस्य व नोकर यांनी प्रतिज्ञा केली. तसेच भारतीय स्वातंत्र्य रौप्य महोत्सव सालात मलकापूर शहरात आरोग्याच्या आणि शहर सुधारण्याच्या दृष्टिकोनातून खालीलप्रमाणे कामे करून घेतली. त्यामध्ये अनेक नवीन सार्वजनिक शौचालये शहरात बांधली आणि जुनी नादुरूस्त शौचालये दुरूस्त करून घेतली. मोऱ्या मोठया पाईपा घालून दुरूस्त केल्या. शहरात व्ही टाईप गटाराची बांधकामे केली. शहरातील रस्त्यावर कठीण मुरूम टाकून रस्ते दुरूस्त करून घेतले आणि रस्त्याचे डांबरीकरण केले. याबरोबर शहरातील रस्त्यावरून धूळ माती उडू नये, म्हणून पाणी मारण्याची व्यवस्था केली होती.[४२] तसेच शहरातील कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी व टाकाऊ कचऱ्यापासून कंपोस्ट खत तयार करण्याचा प्रयत्न झाला. त्यामध्ये मलकापूर नगरपालिकेने शहरातून जमा झालेल्या कचऱ्यापासून कंपोस्ट खत तयार करण्याकरिता पालिका हद्दीबाहेरील मौजे उचत हद्दीतील रहिवाशी ज्ञानोबा दाजी पाटील यांची जमीन दरसाल पाचशे रूपये भाडयाने घेण्यास मंजूरी दिली. याबरोबर नगराध्यक्ष गांधी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सभेत कु.दिलीप वसंतराव नागवेकर राहणार मलकापूर यांची झूआलॉजिकल सर्वे ऑफ इंडिया तर्फे उच्च शिक्षणासाठी निवड झाली. हा पहिला महाराष्ट्रीयन विद्यार्थी होता. सदर सभेने दिलीप नागवेकर याच्या गुणवत्तेबद्दल त्याचे हार्दिक अभिनंदन केले.[४३] अशाप्रकारे यांनी मलकापूरच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण कार्य केले.

### ८) जगदीश वारंगे (१९७४ ते १९७६):–

जगदीश वारंगे यांनी सन १९७४ ते १९७६ या कालावधीत नगराध्यक्ष पदाचा कार्यभार सांभाळला. मलकापूर शहराची पाणी समस्या सोडविण्यासाठी यांनी महादेव रामचंद्र शेंडे राहणार मलकापूर यांच्याकडून १० हॉर्स पॉवरची इलेक्ट्रिक मोटर शहरास टेंपररी पाणी पुरवठा करण्याकरिता पहिल्या वर्षी विना भाडयाने वापरण्याकरिता घेतली होती. ती शॉर्ट सर्किटमुळे जळाली. ती पुन्हा जोशी इलेक्ट्रिकल कोल्हापूर यांच्याकडून भरून घेतली. त्या कामासाठी चारशे रूपये खर्च झाला. त्यास मंजुरी दिली.[४४] तसेच नगरपालिकेचा वर्धापन दिन साजरा करणे

पूर्वी शहरातील सर्व भागाची स्वच्छता करावी अशी सूचना श्री.ना.घोडे नगरसेवक यांनी केली. सूचना केल्याप्रमाणे स्वच्छता करण्यासाठी नगराध्यक्ष यांनी आश्वासन दिले.[४५] त्याच्या कार्यकाळात शहराची स्वच्छता, रस्ते सुधारणा आणि गटार बांधणीची कामे पूर्ण केली. शहराच्या पिण्याच्या पाण्याची समस्या सोडविण्यात महत्त्वपूर्ण कार्य केले.

**९) प्रभाकर रामकृष्ण प्रभावळकर (१९७८ ते १९८०):–**

सन १९७८ ते १९८० या वर्षी मलकापूर नगरपालिकेचे नगराध्यक्ष म्हणून प्रभाकर रामकृष्ण प्रभावळकर यांनी कार्यभार सांभाळला. त्यांनी आपल्या कार्यकाळात श्री.नरहर मंदिराच्या ठिकाणी सांस्कृतिक धाम बांधण्यास मंजुरी दिली. नगरपालिका नोकरांना सरकारी नोकराप्रमाणे १५ रूपये हंगामी वाढ देण्यास मान्यता देण्यात आली. मार्केट कमिटीने गुरांच्या बाजाराची मागणी केली. त्यानुसार गुरांचा बाजार मार्केट कमिटीच्या ताब्यात देण्यास मान्यता दिली. नगरपालिकेच्या हद्दीत असलेली पण पी.डब्ल्यू.डी.च्या ताब्यात असलेली 'हत्तीमहाल' नावाची इमारत होती. ती इमारत व्यायाम शाळेसाठी नागरिकांनी मागणी केली होती. त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली. वाचनालय हे सार्वजनिक असल्याचे व सर्वांच्या उपयोगाचे असल्याने तत्कालीन चालू साली दोन हजार रूपये आणि गेल्या सालचे एक हजार रूपये अनुदान देण्याचे मान्य केले. नागरिकांच्या साध्या शौचालयाचे रूपांतर सेफ्टीक शौचालयामध्ये करण्याकरिता प्लॅन व एस्टिमेंट करून घेण्यास व बांधकामास मंजुरी दिली. मंगळवार पेठेत आणि मांगवाडयात नळाचे पाणी अपुरे पडत असल्याने पाण्याची टंचाई निर्माण झाली. त्यावेळी या भागात नगरपालिकेच्या टँकरने पाणी देण्याची व्यवस्था केली. यांनी १५ ऑगस्ट १९७८ रोजी भारतीय स्वातंत्र्य दिन नगरपालिकेत मोठया उत्सवात साजरा केला. त्यावेळी यांनी मुलांना पेढे वाटले. नगरपालिकेच्या इमारतीवर रोषणाई केली. माध्यमिक शाळा व मराठी शाळा, ज्युनिअर कॉलेज, एन.सी.सी. विद्यार्थी उर्दू शाळा आणि बालवाडीतल्या विद्यार्थ्यांना झेंडा वंदनासाठी बोलविण्यात आले. या कार्यक्रम प्रसंगी निबंध स्पर्धा जयप्रकाश नारायण यांचे जीवन व कार्य आणि थोर स्वातंत्र्यवीर सावरकर या विषयावर माध्यमिक शाळा व ज्यूनियर कॉलेज करिता स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेतील विजेत्यांना पारितोषिक वाटप करण्यात आली, या कार्यक्रमाच्या खर्चास मंजुरी दिली.[४६]

मलकापूर शहराचे टाऊन प्लॅनिंगमधील साईट नंबर मध्ये महिला मंडळासाठी जागा राखीव ठेवली. सदर जागेत महिला मंडळाची इमारत बांधण्यास यांनी प्रयत्न केले. तसेच मलकापूर नगरपालिकेच्या टाऊन प्लॅनिंग स्कीम साईट नं.१४ मध्ये मल्टी पर्पज हॉलचे बांधकाम करण्याचे ठरले होते. परंतु सदर साईट नं.१४ मध्ये सांस्कृतिक धाम बांधला तर रहदारीची समस्या निर्माण होणार होती. म्हणून नगराध्यक्ष यांनी सदर साईट नं.१४ मध्ये नरहर मंदिर समाविष्ट करण्यास प्रयत्न केला. मंगळवार पेठेत धक्का(कट्टा) बांधून घेतला. त्यांनी हरिजन वसाहतीमधील आरोग्याच्या दृष्टिकोनातून त्या भागात रस्ते व रस्त्याकडेला व्ही.टाईप प्रकारची गटारे आणि सेप्टीक शौचालयाची बांधकामे बांधून पूर्ण केली. यांनी मलकापूर नगरपालिकेचा ९४ वा वाढदिवस ३ ऑक्टोबर १९७८ रोजी साजरा केला. शिवाय त्या दिवशी मंगलधाम वास्तूंचे भूमीपूजन आणि भाजी मंडईची पायाभरणी समारंभ मा.श्री.उत्तमरावजी पाटील (महसुल व पुनर्वसन मंत्री, महाराष्ट्र राज्य) यांच्या शुभहस्ते झाला.[४७] याबरोबर अनंत महादेव कोठावळे ते सरकारी दवाखाना यांच्यामधून ब्रम्हपूरी विहिरीपर्यंत जाणारा रस्ता तयार करून घेतला. ३ ऑक्टोबर १९७९ रोजी मलकापूर नगरपालिकेचा ९५ वा वाढदिवस साजरा केला. परिषदेच्या या वाढदिवशी हरिजन वसतीमध्ये बालवाडी सुरू करण्यासाठी बोलविलेल्या सभेमध्ये खालीलप्रमाणे चर्चा झाली होती. ती अशी बालवाडीला डॉ.बाबासाहेब आंबेडकर असे नाव द्यावे बालवाडीतील मुलांना वर्षातून दोन ड्रेस द्यावेत. मुलांना दुपारच्या वेळी एक कप दूध व जास्तीत जास्त २४ पैसे खर्च करावेत. मुलांना खेळण्यासाठी साहित्य खरेदी करण्यासाठी एक हजार रूपये खर्च करावेत. बालवाडी चालविण्यासाठी ट्रेंड बाईंची नेमणूक करावी. ङ्कदाईङ्ख म्हणून हरिजन वस्तीतील स्थानिक स्त्रीची नेमणूक करावी. बालवाडीवर पालिकेच्या शिक्षण समितीच्या सदस्यांनी नियंत्रण ठेवावे. नगराध्यक्ष यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सभेत इत्यादी बाबी विचारात घेण्यात आल्या.[४८]

### १०. बी.बी.रूगे (१९८० ते १९८५):-

**स**न १९८० ते १९८५ या वर्षात बी.बी.रूगे यांनी मलकापूर नगरपरिषदेचे नगराध्यक्ष म्हणून काम केले. यामध्ये महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम १९६५ चे कलम ४९(१) ट अनुसार आर्थिकदृष्टया दुर्बल व मागासलेल्या घटकातील रूग्णांना घातक किंवा संसर्गिक रोगांनी त्रस्त असलेल्यांना ५० टक्के अनुदानातून मोफत औषधोपचार करण्यास परवानगी दिली.

त्याच्या कारकिर्दीत महादेव टेकडीवर झाडे लावली व संगोपनाचे काम केले. तसेच मलकापूर विकास योजनेतून १६ बेघरांना घरे बांधून देण्यासाठी प्रयत्न केला. श्री.छत्रपती शिवाजी बाल मंदिरास आणि महिला मंडळास महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम १९६५ चे कलम ४९(३) (९) प्रमाणे ३०० रूपये अनुदान देण्यास मंजुरी देण्यात आली. नगरपालिका कार्यालयातील जुनी वायरींग लाईट फिटींग काढून नवीन पॉंईट फिटींग वगैरे बसविण्यास परवानगी दिली. सार्वजनिक वाचनालय मलकापूर याच्या शताब्दी महोत्सवाकरिता नगरपालिकेतर्फे चार हजार रूपये अनुदान देण्यास यांनी मंजुरी दिली. नगरपालिकेच्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर बालवाडीच्या मुलांना मोफत गणवेश वाटप करण्यास व त्याच्या खर्चास मंजुरी दिली. शहरातील रस्त्याला ज्या ज्या ठिकाणी खाचखळगे खड्डे पडले होते. त्यावर कठीण मुरूम टाकण्याचे टेंडर बाबूराव पाटील यांना देवून त्यांच्याकडून हे काम पूर्ण करून घेतले. नगरपरिषदेच्या ऑफिस कर्मचाऱ्यांना छत्र्या व रेनकोट देण्यासाठी येणाऱ्या १३७० रूपयांच्या खर्चात मंजुरी दिली. नगराध्यक्ष बी.बी.रूगे यांच्या कार्यकाळात मलकापूर नगरपरिषदेचा शताब्दी महोत्सव कार्यक्रम ३ ऑक्टोबर १९८४ रोजी झाला. या महोत्सव कार्यक्रमासाठी ४००० हजार रूपयाच्या खर्चाची तरतूद करण्यात आली होती.[४९]

### ११) शांताराम वासुदेव वारंगे (१९८५ ते १९८५):-

शांताराम वासुदेव वारंगे यांनी सन १९८५ मध्ये काही ठराविक दिवस मलकापूर नगरपालिकेचे नगराध्यक्ष म्हणून काम केले. यामध्ये त्यांनी नगरपालिका विकास योजने अंतर्गत फुलेनगर, आंबेडकरनगर, बेघर वसाहत, भटगल्ली, मांगवाडा वसाहत आणि नवीन मंडई इत्यादी ठिकाणी सेफ्टीक शौचालये आणि दोन सीटच्या मुताऱ्याचे बांधकाम पूर्ण करून घेतले.[५०] तसेच मंगळवार पेठेत दोन सीटचे सार्वजनिक सेप्टीक शौचालये टँक बांधण्याचे टेंडर महादेव कृष्णा चाळके यांना दिले. त्यासाठी ३८५० रूपये खर्चास मंजुरी मिळवून दिली. शहरात त्यांनी अल्पकाळात अशी कामे केलेली दिसतात.

### १२) दिनानाथ शाम सक्रे (१९८५ ते १९८७):-

मलकापूर नगरपालिकेच्या अध्यक्ष पदाची रिक्त जागा झाली होती. मलकापूर नगरपालिकेत अध्यक्ष निवडण्यासाठी प्रथम उपविभागीय अधिकारी साहेब शाहूवाडी विभाग कोल्हापूर हे उपस्थित राहिले. देशमाने, सोनावले आणि सक्रे या तिघांचे उमेदवारी अर्ज आले.

त्यानंतर पोवार, कोठावळे, कडवेकर आणि सोनावले हे ११.२० वाजता बाहेर निघून गेले. त्यावेळी अनंत शंकर देशमाने यांनी आपली उमेदवारी मागे घेण्यासाठी अर्ज दिला. तो मान्य करण्यात आला. पुढे केरबा बापू सोनावले आणि दिनानाथ शाम सक्रे या दोघांचे उमेदवारी अर्ज राहिले. ११.३५ वाजता पुन्हा कोठावळे पोवार, कडवेकर, सोनावले हे परत सभागृहात येऊन बसले. नंतर ११.४५ वाजता मतदान चालू झाले. ११.५५ वाजता विरोधी सदस्य निघून गेले. मतदान बरोबर १२ वाजता समाप्त करण्यात आले. याबरोबर १२ नंतर मतमोजणी चालू करण्यात आली. दिनानाथ शाम सक्रे यांना १५ वैध मते आणि केरबा बापू यांना ४ वैध मते पडली. केरबा बापू सोनावले यांच्यापेक्षा दिनानाथ शाम सक्रे यांना ११ मते अधिक पडल्यामुळे दिनानाथ शाम सक्रे हे निवडून आल्याचे जाहीर करण्यात आले.[५१] सन १९८५ ते १९८७ या काळात दिनानाथ सक्रे यांनी नगराध्यक्ष म्हणून काम पाहिले. नगरपरिषद हद्दीतील बुरूड गल्ली येथील सहयाद्री मध्यालयाच्या पूर्व बाजूस पूर्वीपासून कचरा टाकला जात होता त्याठिकाणी कचरा कोंडाळा बांधून घेतला. सार्वजनिक वाचनालय मलकापूर या इमारतीला यांनी कंपाऊंड बांधण्यासाठी नगरपालिकेची परवानगी मिळवून दिली. पालिकेच्या स्मशानभूमीचे नुतनीकरण केले. त्याला लागूनच दुसरे शेड उभारली आणि माणसांना बसण्यासाठी वेटिंग शेड बांधण्यात आली. तसेच पालिकेतील छत्रपती शिवाजी सभागृहात बसण्यासाठी दोन डझन खुर्च्या आणि अध्यक्ष व उपाध्यक्ष यांना बसवण्यासाठी दोन खुर्च्या खरेदी करण्यात आल्या.[५२]

सन १९८६ साली नगराध्यक्ष यांनी मलकापूरातील ज्या नागरिकांनी कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया कार्यक्रमातून शस्त्रक्रिया करून घेतली आहे. अशा प्रत्येक नागरिकांना नगरपालिकेकडून शंभर रूपयाचे अनुदान मिळवून दिले. सुभाष चौकात दोन सोडियम व्हेपर्स कोटेशन (मुलद्रव्य बाष्पीभवन कनेक्शन) मागवून बसविण्यात आली. यांनी मटन मार्केटमधील जुनी शटर्स काढून त्याठिकाणी नवीन शटर्स बसविण्यात आणि जाळी मारून घेण्यास नगरपालिकेकडून ३६५० रूपयांच्या खर्चास मंजुरी दिली. पाण्याच्या टाकीकरता लोखंडी शिडी पुरविण्यात आली. स्मशान भूमीकरीता जळावू लाकूड खरेदी करण्यास मंजुरी दिली. त्यांनी विठ्ठल मंदिर ते नरहर मंदिर मार्गावरील सर्व रस्त्याचे डांबरीकरण करून घेतले. आणि रस्त्याच्या दोन्ही बाजूला गटाराचे बांधकाम पूर्ण केले. नगराध्यक्षांनी सार्वजनिक वाचनालयासाठी अनुदान प्राप्त करून दिले. शहरातील सुभाष चौक ते डॉ.पवार घरापर्यंतचा रस्ता आणि

रत्नागिरी महामार्ग ते सबनीस मार्ग रस्त्याचे यांनी डांबरीकरण करून घेतले. या कामास येणाऱ्या खर्चास नगरपालिकेची मंजुरी मिळवून दिली. परिषदेच्या स्मशान भूमीची जागा दरवर्षी कडवी नदीच्या पुराच्या पाण्यामुळे तुटून जात होती. आणि या स्मशानभूमी लगत असणाऱ्या जॅकवेलला दरवर्षी पुराच्या पाण्यामुळे होणारा धोका लक्षात घेवून नगराध्यक्ष यांनी मातीचा भरावा पूल बांधून घेतला.[५३] सुभाष चौक ते शिवाजी तरूण मंडळापर्यतचा रस्ता पॅचवर्क करून घेतला. तसेच सुभाष रोड ते भिडे बोळ सार्वजनिक नळापर्यत आणि भस्मे घर ते घुमुरदरे याच्या घरादरम्यानच्या रस्त्यावर ठिकठिकाणी मोठे खड्डे पडले होते. सदर खडयाचे पॅचवर्क करणे आवश्यक असल्याने त्याकामी नगरपालिकेचे आर्किटेक्चर श्री. मालदीकर कोल्हापूर यांनी तयार केलेल्या ८७१८ रूपयाच्या एस्टीमेटला अध्यक्षांनी प्रशासकीय मंजुरी मिळवून दिली. तसेच सुभाषरोड पार्वती मेडिकल ते सबनीस गल्ली रस्ता बेडके बोळामधील रस्त्यावर ठिकठिकाणी मोठे खड्डे पडले होते. त्यावेळी नगराध्यक्षांनी या रस्त्याचे डांबरीकरण करून घेण्यास परवानगी दिली होती. पालिकेच्या ऑफिसकामासाठी लागणारे फॉर्म्स रजिस्टर आणि स्टेशनरी साहित्य खरेदीसाठी मा.मुख्याधिकारी यांनी अहवाल तयार केला होता. या ऑफिस कामासाठी लागणाऱ्या साहित्याच्या खरेदीसाठी येणाऱ्या खर्चास यांनी मंजुरी दिली. मंगळवार पेठेतील सार्वजनिक शौचालयाजवळील कट्टा पडलेला होता. तो पुन्हा नव्याने बांधून घेतला आणि येणाऱ्या खर्चास मंजुरी दिली. सबनीस गल्ली ते वारंगे यांच्या घरापर्यतच्या रस्त्याच्या कडेने गटारांचे बांधकाम केले. तसेच सबनीस गल्लीपासून लोखंडे विहिरीकडे जाणारी दोन्ही बाजूंची गटारे नवीन बांधली. बुरूड गल्लीतून लोखंडे विहिरीकडे जाणारी दोन्ही बाजूची गटारे दोन ठिकाणी नव्याने घालण्यात आली. सणगर गल्ल्ली सार्वजनिक नळाजवळील गटारे बांधण्याचे काम पूर्ण केले. शंकर लगारे घर ते पाटील घरापर्यतच्या रस्त्याच्याकडेने गटारे बांधली.[५४] नगरपरिषदेच्या हर्षे विहिरीजवळील सहा बोअरवरील ४ एच.पी.सबमर्शिबल मोटर पंपाचे नटबोल्ट तुटून पडली होती. ती पुन्हा नव्याने बसवली आणि त्याच्या खर्चास मंजुरी दिली. शहरात अनेक ठिकाणी कचरा कोंडाळे बांधली. उदा. ब्रम्हपूरी भंगी पॅसेजमध्ये साखरे गल्लीत, महाजन यांच्या घराजवळ, तेली गल्लीत, डॉ.पवार दवाखाना कंपाऊडलगत नरवणे घराजवळ, हर्षे विहिरीजवळ, बुरूडगल्लीत, हायस्कूल कोपऱ्याजवळ, वांगीकर घराजवळ प्रभावळकर गुरूजी घराजवळ नाना आरडेकर घराजवळ आणि मोहिते गुरूजी घराजवळ अशा अनेक ठिकाणी शहर

व परिसर स्वच्छतेच्या दृष्टिकोनातून कचरा कोंडाळे बांधली. तसेच डॉ.पवार दवाखान्यालगत रस्त्याच्या कडेला नवीन सिमेंटची मुतारी बांधली. हरिजन वस्तीमध्ये पाच टक्के दुर्बल घटकासाठी खर्च करावयाच्या रक्कमेतून समाजमंदिर बांधण्यास अध्यक्षांनी परवानगी दिली.

सन १९८६-८७ मध्ये राज्य शासनाने नगरपालिकेस पाच हजार रोपांचे वृक्षारोपन करण्याचे उद्दिष्टे ठरवून दिले होते. त्यासाठी महादेव खडीवर जागेच्या उपलब्धतेनुसार २००० ते ३००० रोपांचे वृक्षारोपन करावे त्याकामी रोपे खरेदी करण्यास व झाडांचे खड्डे पाडणे इत्यादी कामासाठी येणाऱ्या खर्चास नगराध्यक्षांनी मंजुरी दिली. तसेच शहरात बेघर वसाहत महात्मा फुलेनगर वसाहत, सार्वजनिक वाचनालयाजवळ भटगल्ली सोमवार पेठ, कुंभार गल्ली आणि आंबेडकरनगर इत्यादी भागात सार्वजनिक शौचालये बांधली.[५५]

नगरपालिक हद्दीत ठिकठिकाणी रस्त्यावर पडलेले खड्डे मुजवणेकामी स्थायी समिती ठराव नं. ८९/२६ जून १९८६ रोजी मंजुरी दिलेनुसार १०० ब्रास कठीण मुरूम खरेदी करून पसरण्याच्याकामी मागविण्यात आलेल्या कोटेशनमध्ये श्री.मारूती श्रीपती म्हावके राहणार येलूर यांचा दर प्रत्येक ब्रासला ६९ रूपये हे सर्वात कमी असल्याने नगराध्यक्ष यांनी मंजुरी दिली. मेसर्स हरूण एंटरप्रायजेस कोल्हापूर यांचेकडून पाण्यात वापरण्यासाठी लागणारी ब्लिचिंग पावडर १०० किलो खरेदी करण्यासाठी ६५०० रूपयाच्या बिलास मंजुरी दिली. पालिकेच्या झाडू सफाई कामगारांना घोंगडी पुरविली. त्याचे १२२५ रूपये बील झाले. ते बील श्री विठ्ठल कृष्णा सनगर यांना अदा करण्यास अध्यक्षांनी परवानगी दिली. तसेच डॉ.बाबासाहेब आंबेडकर बालवाडीतील मुलांमुलींना मोफत गणवेश वाटप करण्यासाठी स्थायी समिती ठराव नं.४२ दि.२४ सप्टेंबर १९८६ रोजी मंजुरी दिल्यानुसार गणवेश वाटप करण्यात आले. त्यासाठी १०५० रूपयाचे बिल गंगा क्लॉथ स्टोअर्स मलकापूर यांना आदा करण्यास मंजुरी दिली. तसेच मांगवाडा वसाहत ही उंचावर होती. त्याठिकाणी राहणाऱ्या नागरिकांना ये-जा करण्यासाठी रस्ता नसल्याने व महादेव खडीचा उताराचा भाग असल्याने येजा करणे नेहमी अडचणीचे व त्रासाचे होते. विशेषतः स्त्रियांना पाणीवर नेहणे अत्यंत त्रासाचे होते. त्याची रस्त्याची अडचण दूर करण्याच्या दृष्टिकोनातून अध्यक्षांनी जुन्या पाण्याच्या टाकीपासून ते वरच्या मांगवाडयापर्यत अंदाजे १० ते १२ फूट रूंदीचा आणि ६० ते ७० फूट लांबीचा रस्ता बुलडोझरने तयार करून घेतला.[५६] मोकाशी घर ते विभूते यांच्या घरामागील बोळाने आणि सणगर यांच्या घरामागील व्ही

टाईप गटाराचे बांधकाम करण्यास ६६७० रूपये खर्चास मंजुरी दिली. नगरपरिषदेच्या क्रीडांगणाच्या जागेचे सपाटीकरण करून घेतले. साखरे गल्ली पूर्वबाजू कोपरा ते कुंभार खाणीपर्यंतच्या रस्त्याची उंची बुलडोझरने वाढवून घेतली. सन १९८७–८८ या सालाकरिता वृक्षारोपन करणेबाबत आलेला ऑफिस रिर्पोट पाहिला त्याप्रमाणे महादेव टेकडीवर ५०० झाडे लावण्यात आली आणि लोकांना १०० रोपे नारळाची मोफत वाटण्यात आली. त्यासाठी येणाऱ्या खर्चास अध्यक्षांनी मंजुरी दिली. डॉ.बाबासाहेब आंबेडकर बालवाडीमध्ये शहाबादी फरशी बसविणे, फळा आणि शाळेच्या नावाचा बोर्ड तयार करणे इत्यादी कामासाठी येणाऱ्या खर्चास परवानगी दिली आणि या बालवाडी इमारतीला रंग देण्याचे काम पूर्ण केले नगराध्यक्ष सक्रे यांनी शहर विकासाच्या दृष्टिकोनातून सामाजिक आरोग्य बांधकाम आणि स्वच्छतेविषयक कामात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

**१३) नामदेव लक्ष्मण तांदळे (१९८७ ते १९८९) : –**

सन १९८७–१९८९ या कालावधीत नामदेव लक्ष्मण तांदळे यांनी मलकापूर नगरपालिकेचे नगराध्यक्ष म्हणून काम केले. त्याच्या काळात मलकापूरमध्ये सहा ठिकाणी रस्त्याकडील मुताऱ्या बांधण्याचे काम पूर्ण केले. पालिका हद्दीतील गावात रस्त्याकडील ठिकठिकाणी नवीन व्ही टाईप आकाराच्या गटाराची कामे पूर्ण केली उदा.नरहर मंदिर ते कन्या मंदिर पश्चिम कोपऱ्यापर्यंत शहरातील मासळी मार्केट समोरील पाच झाडांचा लिलाव केला. यांच्या कारकिर्दीत डॉ.बाबासाहेब आंबेडकर नियोजीत समाजमंदिराचा प्लॅन एस्टीमेट श्री.भिर्डी असोसिएशन कोल्हापूर यांच्याकडून तयार करून घेतला होता. मलकापूर स्ट्रीट लाईटसाठी टयुब २५, टयुबव्होलडर २४, स्टॅाटर २४, चिकट टेप बंडल १, वायर बंडल ३, २०० वॅटचे बल २४ इत्यादी साहित्य खरेदी करण्यास मंजुरी दिली. नगराध्यक्ष यांनी जनरल क्र.३ नं ६९ व ७० दि.११ डिसेंबर १९८७ रोजी ठरले नुसार कुंभार कामाकरिता कुंभार गल्लीतील पाण्याची टाकी बांधून पाण्याची समस्या सोडविली. महाराष्ट्र शासनाच्या १०० टक्के आर्थिक सहाय्यता अनुदानातून भाजी मार्केट जवळ शिवसदन पद्धतीची सार्वजनिक स्वच्छतागृहे त्यांनी बांधली.[५७] त्यांच्या कार्यकाळात शहरात एकदा पाण्याची टंचाई निर्माण झाली होती. त्यावेळी त्यांनी पाणी टंचाई असल्याने त्या दिवशी ज्या भागात पाणी सुटणार नव्हते. अशा भागात नगरपालिकेच्या टॅंकरने ८ दिवस मोफत पाणी पुरवठा केला होता. नागरिकांनी पाणी व्यवस्थित घेतले नसले

तरी टँकरने त्याच्या भागातील टँकवेलमध्ये पाणी ओतण्याची सोय केली होती. पाणी टँकर २० रूपये, बिगर घरगुती ४० रूपये आणि परगावी नगरपालिका हद्दीबाहेर प्रति टँकर ७५ रूपये इतका दर आकारला होता. मलकापूर नगरपरिषदेच्या जॅकवेल मधील पाणी संपल्याने लगतच्या पेरिड गावच्या जॅकवेल मधून नगरपालिकेस पाणी मिळावे, यासाठी नगराध्यक्ष यांनी पेरिड ग्रामपंचायत सरपंचाकडून पाणी समस्या सोडविण्याचा प्रयत्न केला. पालिकेच्या आठ सार्वजनिक विहिरीतील गाळ झाडे झुडपे काढण्यास येणाऱ्या खर्चास मंजूरी दिली. उदा.सोमवार पेठ वाडया जवळील विहीर, मंगळवार पेठ विहीर इत्यादी त्यानी आरोग्य विभागाद्वारे शहरातील रस्त्याची झाडलोट करण्यासाठी शंभर झाडू खरेदी करण्यास परवानगी दिली.[५८] नगराध्यक्ष यांनी सन १९८८–८९ मध्ये शासनाच्या धोरणानुसार मलकापूर शहरात वृक्षारोपणाचा कार्यक्रम राबविण्यास परवानगी दिली. या कार्यक्रमातून नगरपालिका क्वॉर्टर मध्ये २५ आंब्याची झाडे लावली. तसेच मंगळवार पेठेतील रस्त्याच्या कडेने २०० झाडे आणि महादेव टेकडीवर पाचशे निलगिरी व अशोकाची झाडे लावली.[५९] अशाप्रकारे अध्यक्षांनी शहर विकासात व सुशोभीकरणात महत्त्वाची भूमिका बजावली.

**१४) नारायण ज्ञानोबा गांधी (१९८९ ते १९९०) : –**

महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम १९६५ चे कलम ५१ अनुसार मलकापूर नगरपरिषदेच्या अध्यक्ष पदाची निवडणूक घेण्यासाठी मा.जिल्हाधिकारीसाहेब कोल्हापूर यांनी कार्यासन ११/न.पा.आर.आर./४६८/८९ दि. ७ एप्रिल १९८९ च्या सुचनेनुसार नगरपालिकेची विशेष सभा बोलावण्यात आली. २० एप्रिल १९८९ रोजी ही सभा मलकापूर नगरपरिषदेच्या श्री.छत्रपती शिवाजी सभागृहात उपजिल्हाधिकारी कोल्हापूर यांच्या अध्यक्षतेखाली भरली. सदर सभेत नामदेव लक्ष्मण तांदळे आणि नारायण ज्ञानोबा गांधी उपस्थित राहिले. यांनी विशेष सभेची सूचना सभागृहात वाचून दाखविली. त्यानंतर अध्यासी प्राधिकारी यांनी मुदतीत दाखल झालेल्या सर्व नामनिर्देशन पत्राची छाननी केली आणि महाराष्ट्र नगरपालिका (अध्यक्ष निवडणूक) नियम १९८१ मधील नियम क्र.४ अन्वये वैधरित्या नामनिर्दिष्ट झालेल्या उमेदवारांची नावे त्याच्या सूचकासह सभागृहासमोर वाचून दाखविली. अध्यक्ष पदाच्या निवडणूकीसाठी किरण दत्तात्रय कडवेकर, नारायण ज्ञानोबा गांधी, मोहन कृष्णा लगारे, प्रमोद वसंत वारंगे आणि वामन त्रिंबक जोशी यांच्यामध्ये लढत होणार होती. परंतु किरण कडवेकर,

मोहन लगारे, प्रमोद वारंगे आणि वामन जोशी यांनी अध्यक्षपदाच्या निवडणूकीतून अर्ज मागे घेतले त्यांनी उमेदवारी अर्ज लेखी सुचनेने मागे घेतल्याने अध्यक्षपदासाठी नारायण ज्ञानोबा गांधी यांचा एकच उमेदवारी अर्ज (नामनिर्देशन पत्र) शिल्लक राहिल्याने महाराष्ट्र नगरपालिका (अध्यक्ष निवडणूक) नियम १९८१ मधील नियम ६(१) अनुसार नारायण ज्ञानोबा गांधी यांची मलकापूर नगरपालिकेच्या अध्यक्षपदी सन १९८९–१९९० या कालावधी करीता निवड झाली.[६०] नगराध्यक्ष यांनी मंगळवार पेठेचा पिण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी उचत गावच्या पाणी पुरवठा योजनेतून पाणी मिळावे यासाठी उचत गावच्या सरपंच कार्यालयाशी पत्रव्यवहार केला. नगरपालिकेने बांधलेल्या एकूण नऊ ठिकाणच्या सार्वजनिक शौचालयांना पाण्याची व्यवस्था उपलब्ध करून दिली. पालिकेच्या स्मशानभूमीकडील लाकूड व शेणी साहित्य ठेवण्यासाठी असलेल्या खोलीची भिंत पडली होती. त्या खोलीची भिंत बांधण्यास व खर्चास मंजूरी दिली. मटण मार्केटमधील पोखर जुना नादुरूस्त असल्याने पावसाचे पाणी साठत होते. त्याठिकाणी नवीन पोखर बांधण्यात आला. परिषदेच्या ऑफिसकडील कर वसुली, पाणी पट्टी वसुली आणि इतर अनुषांगिक कामाकरिता रिक्त असलेल्या जागेवर तात्पुरत्या स्वरूपात प्रकाश तानोबा पाटील यांची निवड करण्यात आली.[६१]

नगरपालिकेच्या विकास योजनेतील आरक्षण क्र. ३ नुसार सांस्कृतिक केंद्राचे बांधकाम नगररचना खात्यामार्फत करण्यात येणार होते. सदर बांधकाम जुन्या एस.टी.स्टँड वरील तीन गाळे व धर्मशाळा इमारत पाडून त्या जागी बांधण्यात येणार होते. त्यास अध्यक्षांनी परवानगी मिळवून दिली. शाहूवाडी तालुक्यातील शेतीसाठी व पिण्याच्या पाण्यासाठी अत्यंत महत्त्वाच्या अशा पालेश्वर धरण बांधकामासाठी पन्नास हजार रूपयाची तरतूद करून दिली. त्याबद्दल मा.नगराध्यक्ष गांधी यांच्या अध्यक्षतेखाली नगरपालिकेची सभा घेण्यात आली. त्या सभेमध्ये महाराष्ट्र शासनाचे, सार्वजनिक बांधकाम विभाग, पाटबंधारे विभाग आणि या कामासाठी प्रयत्नशील असलेले तत्कालीन आमदार संजयसिंह गायकवाड यांचे हार्दिक अभिनंदन केले.[६२]

मलकापूर नगरपरिषदेकडील डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाज मंदिराचे बांधकाम यांनी पूर्ण केले. मलकापूर नगरपालिका विकास योजनेतील आरक्षण क्र.१९ नुसार मा.उपसंचालक नगररचना पुणे यांनी ८ डिसेंबर १९८९ मलकापूर येथील माध्यमिक शाळेच्या जागेची समक्ष पाहणी केली. त्यावेळी त्याच्या असे लक्षात आले की, मलकापूर गावातील प्राथमिक शाळा

भाडयाच्या जागेत असल्याचे व शाळांना वर्ग खोल्यांची आणि क्रीडांगणाची सुविधा नसल्याचे दिसून आले. त्यावेळी त्यांनी असे सांगितले की, सदर आरक्षणाचे नाव बदलून प्राथमिक व माध्यमिक शाळा मलकापूर असे केल्यास या गावाला प्राथमिक शाळेबाबतची जी अपूरी सुविधा होती ती दूर होईल. या शाळेच्या कागदपत्राच्या फेरफारीमध्ये नगराध्यक्ष यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. मलकापूरातील भाजी मार्केटजवळ शिवसदन गृहनिर्माण सहकारी संस्था सांगली पद्धतीचे शौचालय या ठिकाणी बांधले. शहरातील दारिद्र्य रेषेखालील कुटुंबातील व्यक्तींना लघु व कुटीरोद्योग उभा करण्यासाठी राष्ट्रीयीकृत बँकातून कर्ज उपलब्ध करून देण्यात अध्यक्षांनी महत्त्वपूर्ण कार्य केले. नगरपालिकेच्या ऑफिसमधील स्त्री–पुरूष सफाई कामगार नाका शिपाई आणि भंगी कामगारांना नगरपरिषदेमार्फत गणवेश व साडया अध्यक्षांनी वाटप केल्या. परंतु अध्यक्षांनी त्याच्यावर कामाच्या डयुटीवर असताना या कपडयाचा वापर करण्याची सक्ती केली.[६३]

नेहरू रोजगार योजनेतून नगरपालिकेला पन्नास हजार तीनशे रूपयाचे अनुदान प्राप्त झाले. या योजनेतून शहरातील रस्ते व गटाराचे बांधकाम करावयाचे होते. यातून दारिद्र्य रेषेखालील लोकांना रोजगाराची संधी मिळणार होती ती अध्यक्षांनी मिळवून दिली.[६४] यांनी मलकापूरातील सार्वजनिक वाचनालयासाठी मासिके व पुस्तके खरेदी करण्यासाठी नगरपालिकेकडून तीन हजार रूपयाचे अनुदान मिळवून दिले. नगरपरिषदेकडील खेळाच्या मैदानामध्ये (क्रीडांगण) पूर्वी जनरल क.ठ.नं.७, दि.६ जून १९८९ रोजी बोअरवेल पाडण्यासाठी मंजूरी दिल्यानुसार अध्यक्षांनी याठिकाणी ६ इंची बोअरवेल पाडण्यास व खर्चास परवानगी दिली. बालोद्यान शिक्षण संस्था मलकापूर यांनी नगरपालिकेकडून अनुदान अध्यक्षांनी मिळवून दिले. मलकापूर नगरपरिषदेकडील नगरपरिषद कर्मचाऱ्यांना निवासस्थाने बांधण्यासाठी पालिकेची सर्व्हे नं.१७० ही जागा राखून ठेवली.[६५] पालिकेची पाणीपुरवठा करणारा टँकर दुरूस्त करून घेतला. तसेच शहरातील सार्वजनिक विहिरीतील रहाट दुरूस्त करून घेतले आणि विहिरीतील गाळ पाला–पाचोळा, झाडे–झुडपे काढून टाकण्यात आली. शहर विकासाच्या दृष्टिकोनातून त्यांनी अशी अनेक कार्ये पार पाडली.

**१५) मोहन कृष्णा लगारे(१९९० ते १९९१):–**

मोहन कृष्णा लगारे यांनी १९९०–१९९१ या कालावधीकरिता नगराध्यक्ष पदी निवड झाली. त्यांनी केलेल्या कार्याचा आढावा खाली घेतला आहे. मलकापूर शहरातील सुभाषरोड, विठ्ठल मंदिर ते राजवाडापर्यंतचा चौक परिसरातील रस्त्याचे प्लॅन व एस्टीमेंट तयार करून घेतले आणि त्या रस्त्याचे डांबरीकरण करून घेतले होते. तसेच साखरे गल्ली येथील भोपळे यांचे घर ते देशपांडे यांच्या घरापर्यंतच्या रस्त्याचे डांबरीकरण केले. त्यांनी नगराध्यक्ष पदाच्या कार्यकाळात मलकापूर नगरपालिकेच्या विकास योजनेतून नगररचना खात्यामार्फत बांधण्यात आलेल्या क्रीडांगण, भाजी मार्केट, दुकान गाळे, प्राथमिक व माध्यमिक शाळा इमारत बांधकामाचे भूमिपूजन व पायाभरणी त्यांच्या हस्ते करण्यात आली. नगरपालिकेच्यावतीने नगराध्यक्ष यांच्या हस्ते २६ जानेवारी १९९१ रोजी ४१ वा भारतीय प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमासाठी लाऊड स्पीकर विद्यार्थी विद्यार्थिनींना खाऊ वाटप आणि चहापाणी याकरिता बाराशे रूपयाच्या खर्चास मंजुरी दिली. त्यास महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम १९६५ चे कलम ४९(३) (डब्ल्यू) अन्वये मा.जिल्हाधिकारीसाहेब कोल्हापूर यांची मंजुरी घेतली होती.[६६]

महाराष्ट्र शासनाने नगरविकास व सार्वजनिक आरोग्य विभागाकडील ठराव क्र.टी.पी. एस.२१७७–५९९३ युडी दि.२४ जानेवारी १९७८ अन्वये मलकापूर शहराची विकास योजना योजना मंजुर केली. ती दिनांक १ मार्च १९७८ रोजी अंमलात आली. मलकापूर शहराच्या विकास योजनेत मटण मार्केट असे आरक्षण नसल्याने व सध्याच्या इमारती नादुरूस्त अपुऱ्या आणि गैरसोयीच्या असल्यामुळे नागरिकांची व दुकानदारांची कुंचबना व्हायची. यावर मात करण्यासाठी यांनी या इमारतीचा विस्तार करण्यात महत्त्वाची भूमिका पार पडली.[६७]

अध्यक्ष सार्वजनिक वाचनालय मलकापूर यांनी पुस्तके खरेदीसाठी अनुदान मिळणेबाबत नगरपालिकेकडे २९ जानेवारी १९९१ रोजी कार्यालयीन अर्ज केला. यानुसार नगरपालिकेने महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम १९६५ चे कलम ४९ (३) अन्वये कागदपत्राची पहाणी केली आणि शहरातील सार्वजनिक वाचनालय मलकापूर यांना पुस्तके मासिके खरेदी करण्यासाठी तीन हजार रूपयाच्या अनुदानास नगराध्यक्ष यांनी मंजुरी दिली.[६८]

कोल्हापूर रत्नागिरी ब्रॉडगेज रेल्वे चळवळ कृती समिती मलकापूर यांनी कोकण रेल्वे मलकापूर मार्गे होण्याबाबतचा प्रस्ताव मान्यतेसाठी नगरपालिकेकडे पाठविला होता. या प्रस्तावाला नगराध्यक्ष यांनी नगरपालिकेची मान्यता मिळवून दिली. नगरपालिकेच्या जॅकवेल–मधील पाण्याचा पुरवठा कमी होत असल्याचे दिसून आले. त्यावेळी नगराध्यक्ष यांनी शहरातील नागरिकांना पाणी पुरवठा व्यवस्थित करून दिला. तसेच पालिकेकडील अत्यावश्यक सेवेतील कर्मचाऱ्यांना दहा दिवसाचा सुट्टीचा पगार देण्यास अनुमती दिली. विठ्ठल मंदिराजवळील खोके धारकाकडून थकलेली थकबाकी शंभर टक्के वसूली केली. उदा. बबन गणपती साळुंखे या खोके मालकाकडून थकबाकी वसूल केली आणि त्याच्या खोक्यास दरमहा ३० रूपये भाडे आकारले.[६९]

मलकापूर येथील सार्वजनिक लोखंडी विहिरीजवळ नवीन गटाराचे बांधकाम पूर्ण केले. मांगवाडा बेघर वसाहतीत नागरिकांसाठी सार्वजनिक शौचालय बांधण्यासाठी नगराध्यक्ष यांनी जागा उपलब्ध करून दिली. यांनी १५ ऑगस्ट १९९१ रोजी ४४ वा भारतीय स्वातंत्र्य दिन नगरपालिकेत मोठया उत्साहात साजरा केला. मलकापूर नगरपालिकेच्या हद्दीतील सिटी सर्व्हे कामात महत्त्वाची भूमिका बजावली. त्याच्या कारकिर्दीत १९९१ मध्ये यांनी ३ ऑक्टोबर १९९१ रोजी नगरपालिकेचा वाढदिवस साजरा केला. या दिन प्रसंगी मलकापूरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर बालवाडीतील विद्यार्थ्यांना मोफत गणवेश वाटप करण्यात आले. याबरोबर मलकापूर येथील कोर्ट शाहूवाडी येथे जाणार होते. मलकापूर येथील लोकांची फारच अडचण होणार होती. शाहूवाडी तालुक्यातील सर्व सोयी व सुविधांच्या दृष्टीने मलकापूर हे गाव चांगले आहे. त्याकरिता मलकापूर येथील कोर्ट ऑफिस मलकापूर येथेच कायम राहावे यासाठी नगराध्यक्ष यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.[७०]

### १६) विष्णू पांडुरंग भिंगार्डे (१९९१ ते १९९१):–

महाराष्ट्र नगरपालिका (अध्यक्ष निवडणूक) नियम १९८१ मधील नियम क्र.४ अन्वये वैधरित्या नामनिर्दिष्ट झालेल्या उमेदवाराची नावे त्यांच्या सूचकाच्या नावासह सभागृहासमोर वाचून दाखविण्यात येतात. अध्यक्ष पदाच्या निवडणूकीसाठी वैधरित्या नामनिर्दिष्ट झालेल्या उमेदवारामध्ये विष्णू भिंगार्डे आणि अनंत शंकर देशमाने या दोघांमध्ये नगराध्यक्ष पदासाठी निवडणूक झाली या निवडणूकीत विष्णू पांडुरंग भिंगार्डे याची मलकापूर नगराध्यक्षपदी निवड

झाली. ते थोडे दिवसच या पदावर कार्यरत राहिले. त्यांनीही मलकापूर विकासास हातभार लावला आहे.[७१]

**१७) सौ.गीता प्रभाकर वारंगे(१९९१ ते १९९३):-**

मलकापूर शहराला पिण्याच्या पाण्याची समस्या २० वर्षापासून भेडसावत होती. ती समस्या नगराध्यक्षा गीता वारंगे यांनी नदीवर सुधारित पाणी पुरवठा योजना राबवून सोडवण्याचा प्रयत्न केला. कारण मलकापूर शहराला एप्रिल ते जून अखरेपर्यंत पाण्याची टंचाई भासत होती. त्यावेळी त्यांनी शहरातील प्रत्येक नागरिकाला ९० लिटर पाणी प्रती दिवशी देण्यासाठी १२ लाख रूपये खचून पाण्याची समस्या सोडविली होती.[७२]

मलकापूर नगरपरिषद अध्यक्ष म्हणून गीता वारंगे यांनी शहर विकासासाठी अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले. नगरपालिकेमध्ये शहराच्या विकासाकरिता विविध विषयासंदर्भात चर्चा बैठका घेवून समस्या सोडविण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या कामकाज आणि चर्चा या पद्धतीचे एक पुढे उदाहरण प्रस्तुत संशोधकाने देण्याचा प्रयत्न केला आहे. उदा. त्यांनी २० फेब्रुवारी १९९२ रोजी मलकापूर याठिकाणी कायमस्वरूपी कोर्ट रहावे. या संदर्भात पालिकेत विशेष सभा आयोजित केली. ही सभा गीता वारंगे यांच्या अध्यक्षतेखाली भरली. या सभेसाठी नगरपालिकेचे सर्व नगरसेवक त्यामध्ये दिनकर सोनावले(उपाध्यक्ष), शेवंता कांबळे, लक्ष्मी पालसांडे, मनोहर कारवेकर प्रभाकर प्रभावळकर, शामराव कारंडे, राजू पवार, अनंत मिरजकर, वासुदेव गांधी, रमेश शेंडे, बाबूराव पाटील, कृष्णा सपाटे, अजमल मुजावर दिनकर कामरेकर, अनिता शेंडे, भारती भिंगार्डे, राजू भोपळे, ज्ञानू सौदंडे व मोहन लगारे असे एकूण २४ नगरसेवक कोर्ट स्थापनेच्या कामासंदर्भात चर्चा करण्यासाठी हजर होते. त्यांच्यात झालेली चर्चा याविषयीची माहिती देण्याचा प्रयत्न केला. याविषयी संदर्भात प्रथम मिरजकर नगरसेवक म्हणाले कोर्टाला तीन एकर जागा पाहिजे. तथापि प्रभावळकर नगरसेवक म्हणाले कोर्टाला किती जागा पाहिजे, हे महत्त्वाचे नसून मलकापूर येथे कायमस्वरूपी कोर्ट राहिल, हे पहायला पाहिजे. त्यादृष्टीने प्रयत्न करायला पाहिजे.

गांधी नगरसेवक म्हणाले, ङ्कसदर बाबत खंबीर धोरण आखून प्रयत्न करायला पाहिजे. खासदार यांचेमार्फत ही प्रयत्न करणे महत्त्वाचे आहे.ङ्ख पवार नगरसेवक म्हणाले की, ङ्कआपल्या भागावर अन्याय झालेला आहे. याबाबत आक्रमक पवित्रा घ्यावा वेळप्रसंगी आंदोलन

उभारण्यात यावे.ङ्ख प्रभावळकर म्हणाले की, ङ्ककोर्ट कायमस्वरूपी मलकापूरात राहायला पाहिजे. यासाठी मलकापूरच्या प्रतिष्ठेचा प्रश्न आहे व नगरसेवकांच्या प्रतिष्ठेचा प्रश्न आहे. मिळेल त्याचे सहकार्य घेऊन आणि न मिळेल त्यांचे सहकार्य सोडून यासाठी प्रयत्न करण्यात यावे.ङ्ख सौ.शेंडे म्हणाल्या की, ङ्ककोर्टसाठी आम्ही महिला आंदोलन करण्यास तयार आहोत.ङ्ख प्रभावळकर म्हणाले की, ङ्कआपण टप्प्याटप्प्यांनी प्रयत्न करूया नागरिक यासाठी किती साथ देतील हेही पाहणे जरूरीचे आहे. यास्तव प्रथम लाक्षणिक उपोषण करणे गरजेचे आहे.ङ्ख सौदंडे नगरसेवक म्हणाले की, ङ्कनागरिकांच्या सहकार्याने आंदोलन उभे करावे लागेल.ङ्ख प्रभावळकर म्हणाले की, ङ्कशासनाकडे जाऊन धरणे धरावे लागेल. लोकप्रतिनिधी खासदार आमदार यांना वेळप्रसंगी घेरावा घालावा लागणार आहे. तसेच नगरपालिकेला घेराव घालण्यात यावा.ङ्ख यावर मुख्याधिकारी म्हणाले की, ङ्कसदर प्रश्न राज्य पातळीवरील असून सरकारच्या कक्षेतील आहे. याबाबत आम्ही कोणतीही नोटीस देणार नाही.ङ्ख तसेच मुख्याधिकारी म्हणाले की, ङ्कबेकायदेशीर जमाव होऊ नये. याबाबत जरूर ती लेखी पूर्व सूचना देण्यात यावी.ङ्ख यावर प्रभावळकर म्हणाले की, ङ्कआम्ही अशी नोटीस देणार नाही.ङ्ख तसेच सौदंडे आणि लगारे नगरसेवक म्हणाले, ङ्कआमच्यावर कार्यवाही झाली तर चालेल.ङ्ख

याबाबत प्रभावळकर यांनी मा.जिल्हाधिकारीसाहेब, कोल्हापूर यांना फोन लावला व निवासी उपजिल्हाधिकारी यांना सदरबाबत फोनवर माहिती दिली. मिटींगचे कामकाज संपल्याचे मा.अध्यक्षसाहेब यांनी जाहीर केले.[७३] यावरून आपणाला नगरसेवकांचा आक्रमकपणा आणि अध्यक्षांची कार्यशैली आपणास दिसून येते.

वारंगे यांनी सन १९९२–९३ सालाकरिता मटण मार्केट व मासळीमधील गाळयाचा लिलाव करण्यास परवानगी दिली आणि या मार्केटची किरकोळ दुरूस्तीची कामे पूर्ण केली. नगरपालिकेकडील अत्यावश्यक सेवेतील कर्मचाऱ्यांना सन १९९१–९२ सालात १० दिवसाचा सुट्टीचा पगार देण्यात अनुमती दिली. पालिका क्षेत्रातील नागरिकांच्या सोयीकरिता गावात चार ठिकाणी सिमेंट कॉंक्रिटच्या मुताऱ्या बांधण्यात आल्या. डॉ.बाबासाहेब आंबेडकर बालवाडी नजीक डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाज मंदिर आहे. त्याठिकाणी सार्वजनिक वाचनालयासाठी इमारत बांधण्यास परवानगी दिली.[७४]

नगरपालिका हद्दीतील मंगळवार पेठेतील सार्वजनिक विहिरीतील गाळ व पाणी उपसणे अत्यंत गरजेचे होते. कारण या विहिरीत एक इसमाने आत्महत्या केली होती. त्यामुळे अध्यक्ष यांनी या संदर्भात पालिकेची बैठक घेतली आणि त्यास मंजुरी दिली. पालिकेच्या अत्यावश्यक व इतर कर्मचाऱ्यांना छत्री ड्रेस आणि घोंगडी प्रत्येक एक प्रमाणे देण्यात आली. त्यावर होणाऱ्या खर्चास मंजुरी दिली. शहरातील बेघर वसाहतीतील भोगटे यांच्या घराजवळील रस्त्यावर मोरी व संरक्षक भिंत बांधण्याचे काम पूर्ण केले. मंगळवार पेठेतील विहिरीच्या पायऱ्या दुरूस्त करून घेतल्या आणि विजय भिंगार्डे याच्या घराजवळील गटार दुरूस्तीचे काम केले.[७५]

रोजगाराच्या दृष्टिकोनातून अध्यक्ष यांनी पालिकेच्या भाजी मार्केटमधील गाळा भाडयाने दादू दौलू चावरे यांना रोजगारासाठी उपलब्ध करून दिला. तसेच पालिकेच्या ऑफिस व जकात विभागात रिक्त जागा होत्या. त्या जागेचे काम करण्यासाठी त्या जागेवर हंगामी क्लार्कची निवड करण्यात आली. सुभाष चौक ते विठ्ठल मंदिर रस्त्यावरील हातगाडया व खोके रहदारीला अडथळा होत असे. त्यावेळी या धंदेवाईकांना शिस्त लावण्याचे काम अध्यक्षांनी केले. सुभाष चौक ते डॉ.पवार दवाखाना परिसरात तीन इंची पाण्याची पाईपलाईन होती. सदर पाईपलाईनवर जास्त कनेक्शन असल्याने त्या भागातील नागरिकांना फारच कमी पाणी मिळत होते. त्यासाठी नवीन पाईप टाकून घेण्यास व खर्चास मंजुरी देण्यात आली होती.[७६] आण्णाभाऊ साठे मार्गावरील शिवसदन शौचालयाची नादुरूस्ती होती ती दुरूस्त करून घेतली. मलकापूर नगरपालिकेकडील रिक्त असलेल्या वर्ग ३ च्या पदावर चार जागा तात्पुरत्या स्वरूपात भरण्यास परवानगी देण्यात आली. राज्य शासनाच्या नगररचना खात्यामार्फत विविध विकास कामे करण्यात आली. त्यापैकी माध्यमिक शाळेची सात खोल्यांची प्रशस्त इमारत १३ लाख रूपये खर्चून बांधण्यात आली. शिवाय ३ लाखांचे अद्ययावत अशा स्मशानभूमीचे काम पूर्ण केले. मलकापूर नगरपालिकेने रोजगार हमी योजनेद्वारा लघु उद्योजकांना १ लाख १२ हजार रूपये कर्जवाटप केले. क्रीडाप्रेमींची गैरसोय लक्षात घेऊन १० लाख रूपयांचे भव्य क्रीडांगण बांधण्यात आले. तसेच त्यावर पॅव्हेलियन बांधण्याकरिता ९ लाख रूपये खर्च केले. अशाप्रकारे मलकापूर नगरपालिकेच्या विकासाच्या घोडदौडीमध्ये खंबीर व कर्तव्यदक्ष मुख्याधिकारी हरिहर राजोपाध्ये, माजी आमदार संजयसिंह गायकवाड व खासदार उदयसिंहराव गायकवाड यांचा सिंहाचा वाटा असल्याचे तत्कालिन नगराध्यक्षा सौ.गीता वारंगे यांनी दैनिक

पुढारीशी बोलताना सांगितले होते.[७७] अशा अनेक कार्यात नगराध्यक्षा वारंगे यांनी महत्त्वपूर्ण कामगिरी केली.

**१८) अनिल भगवान येडगे (१९९३ ते १९९४):-**

अनिल भगवान येडगे यांनी नगराध्यक्ष पदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर महत्त्वाची कामगिरी केली. त्यामध्ये मलकापूर नगरपरिषदेकडील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची कागदपत्रे तपासून त्यांना चौथा वेतन आयोग लागू करण्यास मंजूरी दिली. नगरपालिकेकडील कचरा ट्रॉली नादुरूस्त व खराब असल्याने शहराची स्वच्छता विषयक समस्या निर्माण झाली. त्यावेळी त्यांनी कचरा ट्रॉलीसाठी लागणारा गॅल्वानाईन पत्रा खरेदी करून ट्रॉली दुरूस्त केली. तसेच नगरपरिषदेकडील मैला वाहतूक टँकरची दुरूस्ती करून घेतली. या कामासाठी येणाऱ्या खर्चास नगरपालिकेची मंजुरी मिळवून दिली. ऑफिस कामासाठी लागणारी स्टेशनरी व साहित्य खरेदीचा प्रस्ताव नगरपालिकेकडे आला. त्यावेळी नगराध्यक्षांनी सर्व कागदपत्रे पाहिल्यानंतर स्टेशनरी खरेदी करण्यास परवानगी दिली.[७८]

या नगराध्यक्षाच्या काळात मलकापूर नगरपरिषदेचे नगरसेवक अजमल इनिफसाो मुजावर यांची पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ(म्हाडाचा घटक) यावर सदस्य म्हणून निवड झाली. या कार्याबद्दल नगराध्यक्ष यांनी सभा घेतली. त्या सभेमध्ये त्यांनी असे सांगितले की, ही सभा त्यांचे हार्दिक अभिनंदन करीत आहे. आपले पुढील कार्यात सुयश व शुभेच्छा चिंतीत आहे. नगरपरिषदेच्या सन १९९४-९५ सालाकरिता मटण मार्केट आणि मासळी मार्केटमधील गाळयांचा लिलाव करण्याबाबतचा प्रस्ताव नगराध्यक्ष यांच्याकडे आला. त्यांनी तो अहवाल पाहून स्थायी समितीसमोर ठेवला आणि चर्चा करून त्यास मंजुरी दिली. मलकापूर नगरपरिषद आस्थापनेवर कनिष्ठ अभियंता (ज्युनियर इंजिनियर) पद नसलेले नगरपालिकेला बांधकाम विकास योजना आणि इतर बांधकाम प्लॅन व इस्टीमेंट करण्याच्या कामात बऱ्याच अडचणी निर्माण झाल्या होत्या. पालिकेला या कामाकरिता कनिष्ठ अभियंता पदाची आवश्यकता निर्माण झाली होती. त्यावेळी नगराध्यक्ष यांनी परिषदेच्या आस्थापनेवरील कनिष्ठ अभियंता पद निर्माण करण्यास परवानगी दिली होती. शासनाचे नगरविकास विभाग शासन आदेश क्रमांक एमएम क्र.१०९४/प्र.क्र. ३/९४/ नवि- ३२ दि. २८ फेब्रुवारी १९९४ रोजीच्या जीआर नुसार नगरपालिकेने ठेका पद्धतीने देण्यास सुरूवात केली. परंतु नगरपालिकेने हा जीआर किंवा पत्र

अवलोकनी घेतले आणि सदरचा विषय तहकुब ठेवला. २ मार्च १९९४ रोजी अध्यक्ष सार्वजनिक वाचनालय मलकापूर यांनी पुस्तके खरेदीसाठी अर्ज व अहवाल नगरपालिकेस सादर केला. महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम १९६५ चे कलम ९(३) (६) नुसार वाचनालयाची कागदपत्रे पाहिली आणि ही संस्था नोंदणीकृत आहे. या अधिनियमानुसार पालिकेने सार्वजनिक वाचनालयासाठी पुस्तके, मासिके खरेदी करण्याच्या खर्चास नगरध्यक्षांनी मंजूरी दिली. तसेच नगरपालिकेने महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम १९६५ चे कलम ३०१ नुसार वाहनावरील जकात वसूल करणे या संबंधित वाहन धारकावर कायदेशीर कार्यवाही करण्यास परवानगी दिली.[७९]

सामाजिकतेची जाणीव ठेवून नगराध्यक्ष यांनी मलकापूर शहरातील कुंभार समाजातील कुंभाराना वीटभट्टीसाठी १ ते ३० एप्रिल १९९४ अखेर एक महिन्यासाठी पाण्याची सोय उपलब्ध करून दिली. शहर स्वच्छतेसाठी उपयोगी असणारा ट्रॅक्टर नं.एम.एच.८९८४ हा दुरूस्त करण्यासाठी ३०४६ रूपये इतके बील प्रसाद ट्रॅक्टर गॅरेज कोल्हापूर यांना देण्यास मंजूरी दिली. आणि सदर ट्रॅक्टरसाठी एक नवीन बॅटरी मे.घाटगे पाटील ॲटोमोबाईल्स कोल्हापूर यांचेकडून खरेदी करण्यास परवानगी दिली. शहरातील सोमवार पेठ जुना गुरांचा बाजार आणि गोगटे विहीर परिसरात पिण्याच्या पाण्याची टंचाई भासत असल्यामुळे नगराध्यक्ष यांनी या भागातील सार्वजनिक विहिरीतील गाळ व घाण काढणे आणि साफसफाई करण्याची मोहिम हाती घेतली होती.[८०] तसेच त्यांनी शहरातील रस्त्यावर दिवाबत्तीची सोय करण्यासाठी स्ट्रीट लाईटसाठी साहित्याची खरेदी केली. याबरोबरच नगरपालिका हद्दीतील सार्वजनिक रस्त्यावरील खाच–खळगे मुजवण्यासाठी कठीण मुरूम टाकण्यास व खर्चास मंजूरी मिळवून दिली. शहरातील साखरे गल्ली कोपऱ्यावर बबन सणगर याच्या घराजवळील दगडी कट्टा (धक्का) दुरूस्त करून घेतला.[८१]

नगराध्यक्ष यांनी मलकापूर नगरपालिका विकास योजनेतून माध्यमिक शाळा इमारत बांधून घेतली. या इमारतीच्या खिडक्यांना जाळी मारून घेतली आणि किरकोळ दुरूस्तीची कामे पूर्ण केली. त्यांनी आपल्या पदाचा उपयोग शहर विकासासाठी केलेला दिसतो.

## १९) श्रीमती सुशिला वसंतराव नागवेकर(१९९५ ते १९९६):-

नगराध्यक्षापदी निवड झाल्यानंतर सुशिला नागवेकर यांनी प्रथम नगरपालिकेत १५ ऑगस्ट रोजी भारतीय स्वातंत्र्य दिन साजरा केला. या दिवशी प्रभात फेरी, खाऊ वाटप, लाऊड स्पिकर आणि चहापान इत्यादी कार्यासाठी बत्तीशे रूपये खर्चास त्यांनी परवानगी दिली. नगरपालिका हद्दीतील सार्वजनिक रस्त्यावर कठिण मुरूम टाकण्यात आला.[८२] नगरपालिकेच्या स्त्री-पुरूष कर्मचाऱ्यांना गणवेश वाटपासाठी खाकी टेरीकॉट कापड आणि साडया खरेदी करण्यात आल्या. या कपडयासाठी वीस हजार एकशे सोळा रूपये खर्च झाला. ही रक्कम मे.जे.के.खटावकर यांना देण्यास अनुमती टेलर्स यांना देण्यात आली. नगरपालिकेच्या ऑफिस आणि जकात विभागासाठी स्टेशनरी साहित्य खरेदी करण्यात आले. पालिकेचा कर्मचारी पांडुरंग बाबूराव सणगर यांना सेवानिवृत्तीनंतर नियमाप्रमाणे नोकरी कालावधीतील पेन्शन आणि गॅच्युईटी देण्यात नागवेकर यांनी मदत केली.[८३] त्यांनी २६ जानेवारी १९९६ रोजी प्रजासत्ताक दिन नगरपालिकेत मोठया उत्साहात साजरा केला. या कार्यक्रमादिवशी नगरपालिकेच्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर बालवाडीतील मुला-मुलींना रेडीमेड गणवेश वाटप करण्यात आले.. नगराध्यक्षांनी प्रशांत सदाशिव शिंदे यांच्याकडून नगरपालिकेच्या मालकीच्या आठ सार्वजनिक विहिरीवरील झाडे-झुडपे व पालापाचोळा काढून घेतला तसेच रहाटाची डागडुजी करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. शहरात दिवाबत्तीची सोय करण्यासाठी स्ट्रीट लाईटसाठी ४ फुटी फिलीप्स टयुब शंभर वन खरेदी करण्यात आल्या. नगरपालिकेच्या क्रीडांगणाची स्वच्छता व सुशोभीकरणाची कामे पूर्ण केली.[८४] अशा विविध क्षेत्रात नागवेकर यांनी महत्त्वपूर्ण कामगिरी केली.

## २०) वासुदेव दत्तात्रय गांधी (१९९६ ते १९९६):-

वासुदेव दत्तात्रय गांधी यांची सन १९९६ ते १९९६ या कालावधीत नगराध्यक्ष म्हणून निवड झाली. त्यांनी मलकापूर नगरपालिकेला अल्प काळात न्याय देण्याचा प्रयत्न केला. मलकापूर शहराला तात्काळ पाणी पुरवठा करण्यासाठी अविनाश लाड ते मंगळवार पेठ जॅकवेलपर्यत त्यांनी पीव्हीसी पाईप टाकून पाण्याची समस्या सोडवली. या कामासाठी ४५६ मीटर पाईपसाठी १२४२२ रूपये आणि पाईप लाईनची चारी काढण्यासाठी ३००० रूपये खर्चास मान्यता मिळवून दिली. महादेव खडी ते बेघर वसाहत कुंभार गल्ली ते मंगळवार पेठ

शिवाजी स्टेडियम इत्यादी ठिकाणी पावसाळयात पाणी साठपाचा या भागातील लोकांना त्रास व्हायचा. तत्कालीन नगराध्यक्ष यांनी पाण्याची विल्हेवाट लावण्यासाठी चर खुदाई खर्चास मंजुरी देवून काम पूर्ण केले. मलकापूर हायस्कूल ग्राऊंडजवळ दगडी धक्का बांधला. आणि गटार दुरूस्तीची कामे पूर्ण केली. श्री.सुधाकर अनंत गोडे यांनी टयुब दुरूस्तीसाठी १०४ रुपये खर्च येत असल्याचा अर्ज नगरपालिकेकडे केला होता. त्या अर्जाचा विचार करून नगराध्यक्ष यांनी मान्यता दिली. त्यांच्या कारकिर्दीत सन १९९६ मध्ये पावसाळयातील पालिकेच्या चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांना छत्री व घोंगडी इत्यादी साहित्याचे वाटप करण्यात आले. सदर योजनेचा लाभ दोन वर्षातून एकदा द्यावा आणि त्यासाठीच्या खर्चास मंजुरी मिळवून दिली. सांस्कृतिक केंद्र इमारतीच्या बांधकामासाठी तसेच विकास योजना कामासंबंधी चर्चा करण्यासाठी नगरपालिकेचे सदस्य शिष्टमंडळ मा.उपसंचालक नगररचना पुणे व मा.कार्यकारी अभियंता यांना भेटण्यासाठी जाणार होते. या मंडळाच्या जाण्या–येण्याच्या खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच नगरपालिका हद्दीतील सिटी सर्व्हे आणि इतर अनुषांगिक कामासंदर्भात मा.मंत्री महोदय मुंबई यांना भेटण्यासाठी हे शिष्टमंडळ जाणार होते. त्यांच्या जाण्याच्या व प्रवास भत्यासाठी येणाऱ्या खर्चास मंजुरी दिली. मलकापूर नगरपरिषद कार्यालयातील जकात विभाग आणि कर वसुली विभाग यांनी तीन लोखंडी कपाटाची नगराध्यक्षाकडे मागणी केली होती. कार्यालयातील रेकॉर्ड व्यवस्थित व सुरक्षित ठेवण्यासाठी नगराध्यक्ष यांनी तीन कपाटे मिळवून दिली. मलकापूरातील तरूण–तरूणींना रोजगाराची संधी मिळवून देण्याकामी विशेष प्रयत्न केले. उदा.सौ.मीना दिगंबर वारंगे यांना मलकापूर नगरपालिका हद्दीतील विठ्ठल मंदिराजवळ गोकुळ दूध विक्रीसाठी हातगाडी उभी करण्याची परवानगी दिली. नगरपालिकेने ही हातगाडी दरमहा पन्नास रूपये भाडयानी दिली.[८५] यातून पालिकेला चांगला कर मिळत आहे. याबरोबर तरूणांना रोजगारही मिळत आहे.

### २१) गणेश पांडुरंग कोलते (१९९६ ते १९९७) :–

नगराध्यक्ष गणेश पांडुरंग कोलते यांनी आपल्या कारकिर्दीत मलकापूर शहराच्या विकासात हातभार लावला. त्यांच्या कार्याविषयीची माहिती पुढीलप्रमाणे सांगता येईल. नगराध्यक्ष कोलते यांनी मलकापूर नगरपालिकेच्या मालकीचे असणारे मटन मार्केट, मच्छी मार्केट आणि भाजी मार्केटमधील दुकान गाळे लिलाव करून लोकांना व्यवसायासाठी भाडयाने

उपलब्ध करून दिले. यामुळे मलकापूरातील तरूणांना रोजगाराची संधी मिळाली आणि नगरपालिकेच्या उत्पन्नात वाढ होण्यास मदत झाली.

त्यांनी नगरपरिषद हद्दीतील कृष्णा गांधी घर ते रामचंद्र नरवणे यांच्या घरापर्यंतचा रस्ता डांबरीकरण केला. तसेच श्री.सुभाष बेंडके घर ते प्रविण बेर्डे घर मार्गावरील रस्त्याचे डांबरीकरण करून मलकापूर रहिवाशांना वाहतुकीच्या व दळणवळणाच्या दृष्टिकोनातून चांगल्या सुविधा उपलब्ध करून दिल्या.

नगरपालिकेच्या आर्किटेक्चर प्रदिप गुरव यांच्याकडून नगराध्यक्ष कोलते यांनी पालिकेचे मटण, मच्छी मार्केट आणि सार्वजनिक वाचनालये याचे नकाशे व अंदाजपत्रक तयार करून घेतले. त्यासाठी खर्चाच्या तरतूदीसही पालिकेची मान्यता मिळवून दिली.

महेश श्रीराम बेर्डे यांनी आपल्या विहिरीतील पाणी कुंभार समाजाला वीटा बनविण्यासाठी प्रति माहे पंचवीस रूपये दराने दिले होते. सामाजिक बांधिलकी म्हणून कुंभार समाजाला द्यावे लागणारे चार महिन्याचे दहा हजार रूपयाचे बील अदा केले. यामध्ये नगराध्यक्ष कोलते यांनी महत्त्वपूर्ण कार्य केले.[८६]

कोकरे देसाई कोंडळा पासून ते दगडी तटापर्यतच्या दगडी गटारे दुरूस्ती कामासाठी आठ हजार पाचशे रूपये खर्चास पालिकेची प्रशासकीय मान्यता त्यांनी मिळवून दिली. तसेच सुभाष चौकातील कठडा सुशोभित करण्याच्या कामास मंजुरी दिली.[८७]

## २२) रंगराव तुकाराम घेवदे (१९९७ ते १९९८) :–

मलकापूर पालिकेत जनतेचे अखेर अनेक पात्री सत्तांतराचा प्रयोग घडवून आणला. निवडणूकीच्या रणांगणात मलकापूर विकास मंचचे पानिपत झाले. भाजप–सेना युतीची पिछेहाट झाली. नगरविकास आघाडीने विजयश्री खेचून एक नवा अध्याय रचला. परंतु पालिकेची बेताची आर्थिक स्थिती आणि नगरवासीयांना उंचावलेल्या अपेक्षा याचे शिवधनुष्य पेलताना नवनिर्वाचीत नगराध्यक्ष आणि त्यांचे संवगडी यांची खरी सत्त्वपरिक्षाच ठरणार होती.

१९९६ ची पालिका निवडणूक शिवसेना भाजप युती, नगरविकास आघाडी व संजय मंच अशी तिरंगी झाली होती. चुरशीने झालेल्या त्या निवडणुकित युतीचे आठ उमेदवार, आघाडीचे सात आणि मंचचे दोन उमेदवार निवडून आले होते. स्पष्ट बहुमत कोणत्याही गटास न मिळाल्याने मंचच्या दोन उमेदवारांना मोठी मागणी गटाकडून राहिली. कोणाचा झेंडा

पालिकेवर फडकणार हे मंचचे दोन उमेदवार निश्चित करणार होते. दरम्यानच्या कालावधीत शाहूवाडीचे दिवंगत अपक्ष आमदार संजय सिंह गायकवाड यांनी राज्यात सेना–भाजप युतीला पाठिंबा दिल्याने पालिकेतही सेना–भाजपशी हात मिळवणी झाली आणि युतीची सत्ता, युतीचा भगवा आणि युतीचा नगराध्यक्ष पालिकेत विराजमान झाला. युतीतर्फे पहिला नगराध्यक्ष पदाचा मान बाबुराव कोलते यांना मिळाला. पण एवढयात युतीला खुर्चीच्या राजकारणाची कीड लागली. आणि युतीच्या पाच वर्षाच्या काळात चार नगराध्यक्ष झाले. यामध्ये श्री. कोलते, श्री. रंगराव घेवदे, श्री. रवींद्र पाथरे व श्री. शामराव कारंडे हे नगराध्यक्ष होऊन गेले.[८८]

यांनी आपल्या कारकिर्दीत मलकापूर शहर विकासात महत्त्वपूर्ण कार्य केले. शहराला दिवाबत्तीची सेवा –सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी विद्युत दिवे आणि इतर साहित्याच्या खरेदीवर ८०,१५५ रूपये खर्च करण्यात आले. नागरिकांना आवश्यक तो पाणी पुरवठा करण्यासाठी पाणी पुरवठा साहित्य खर्च ६७,६४५ रूपये आणि पाणी पुरवठा विद्युत बिलावरती ८६,३८९ रूपये इतके खर्च करण्यात आले. तसेच बोर मारणे व दुरूस्ती कामाकरिता १७४० रूपये खर्च केले. सामाजिक दृष्टिकोनातून कार्य करताना यांनी स्मशानभूमी दुरूस्ती कामाकरिता १५५० रूपये आणि शेणी व लाकूड साहित्य खरेदी करण्याकरिता १८,५५५ रूपये इतकी रक्कम खर्च करण्यात आली. शहरातील नागरिकांना भाजीपाला मिळावा यादृष्टीने भाजी मंडई दुरूस्ती कामावर १८६०० रूपये खर्च केले. पालिकेतर्फे आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांचा विकास करण्याकरिता ९७३० रूपये खर्च करण्यात आले. नगरपालिकेने पर्यावरणीय समतोल राखण्यासाठी झाडे लावली. त्यावर ६२७० रूपये खर्च केले. शहरातील कुंभार समाजाची पाणी समस्या सोडविण्यासाठी १५,००० रूपये खर्च केले आणि या बरोबर शहरातील जुन्या रस्त्यावर हार्ड मुरूम टाकून आणि खडीकरण करून रस्ते दुरूस्त करून घेतले.[८९]

## २३) रविंद्र महादेव पाथरे (१९९८ ते २००१) : –

रविंद्र पाथरे यांनी सन १९९८–२००१ या सालात मलकापूर नगरपालिकेचे नगराध्यक्ष म्हणून काम पाहिले. १९९६ साली मलकापूर नगरपालिकेची निवडणूक झाली. या निवडणुकीत शिवसेना–भाजपा युतीने वर्चस्व मिळवले. या युतीच्या कार्यकाळात चार नगराध्यक्ष होऊन गेले. त्यापैकी रविंद्र पाथरे हे एक होते. या चार नगराध्यक्षा पैकी रविंद्र पाथरे हे सर्वात जास्त काळ म्हणजे अडीच वर्षे या पदावर कार्यरत राहिले.[९०] शाहूवाडीचे दिवंगत अपक्ष आमदार संजयसिह

गायकवाड मंचचे रविंद्र पाथरे नगरसेवक होते. यांनी शहर विकासात रस्त्यावरील दिवाबत्तीची सोय करण्याकरिता १लाख ३७ हजार रूपये खर्चास मंजुरी दिली. जंगली जनावरे साप आणि उपद्रवी किटक यांचा नाश करण्यासाठीच्या कामाकरिता ५००० रूपयाची बक्षिसे पालिकेने दिली. मोकाट पिसाळलेल्या कुत्र्यांचा नाश करण्यासाठी पालिकेने तीन हजार रूपये खर्च केले. शहरातील नागरिकांना मुबलक पाणीपुरवठा व्हावा. याकरिता पाणी पुरवठा साहित्य खरेदी केले. पाणी टँकर दुरूस्ती करून घेतले पाण्याच्या टाक्या दुरूस्त व स्वच्छ करून घेतल्या. विहिरीवरील रहाट दुरूस्त करून घेतले. आणि पंप व बोअर मारून पाण्याची सोय उपलब्ध करून दिली. शहरातील घनकचऱ्याचे व्यवस्थापन केले आणि सार्वजनिक ठिकाणी शौचालये बांधली. पालिकेने डॉ.आंबेडकरांचा पुतळा उभा करण्यासाठी पाच हजार रूपये खर्च केले. आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय कुटुंबातील स्त्रियांना संसारोपयोगी साहित्य देण्यासाठी दोन हजार रूपये खर्चास मंजुरी दिली. यांनी कुंभार समाजाला पाण्याची सोय करून दिली.

**२४) शामराव दौलू कारंडे (२००१ ते २००१):–**

युतीच्या काळात सर्वात कमी कालावधीसाठी म्हणजे अडीच महिने मलकापूर नगराध्यक्ष पदाचा कार्यभार शामराव कारंडे यांनी सांभाळला.[९१] या कालावधीत यांनी शहराच्या स्वच्छतेसाठी विशेष दक्षता घेतली. सार्वजनिक शौचालय बांधकामास परवानगी दिली.

**२५) राजू गजानन भोपळे (२००१ ते २००६) : –**

राजू गजानन भोपळे यांचा जन्म ४ डिसेंबर १९६२ रोजी झाला. त्यांचे शिक्षण श्री.शिवशाहू महाविद्यालय, सरूड येथून अर्थशास्त्र विषयातून बी.ए.ची पदवी संपादन केली. त्यांनी महाराष्ट्र राज्य हिंदू खाटिक महासंघ मुंबई या संघटनेवर उपाध्यक्ष म्हणून काम केले. त्यांचा दिनक्रम सकाळी व्यायाम नामस्मरण. जनतेच्या समस्या जाणून घेणे, संध्याकाळी वाचन करणे हा होता. त्यांनी मलकापूर तरूणांना व्यसनापासून दूर रहा असा संदेश दिला. सन १९९० ते १९९५ या कालावधीसाठी त्यांची नगरपालिकेवर पहिल्यांदा नगरसेवक म्हणून निवड झाली. पुढे सन २००१ ते २००६ या कालावधीसाठी मलकापूर नगरपालिकेचे नगराध्यक्ष म्हणून निवड झाली. त्यांच्या नगराध्यक्ष पदाच्या कार्यकालातील घडामोडीवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे. मलकापूर शहरातील मंजुर असलेली पण शासनदरबारी पाठपुराव्या अभावी रेंगाळत पडलेली विकास कामे पूर्ण करण्यासाठी मी निवडणूक लढवत आहे. हा मुद्दा घेऊन राजू भोपळे

हे २००१ च्या नगराध्यक्षपदाच्या निवडणूकीत उतरले होते. त्यामध्ये त्यांनी विजय मिळवला.[९२] मलकापूर नगरविकास आघाडीचे उमेदवार राजू गजानन भोपळे यांनी भारत घोटणे यांचा ५२१ मतांनी पराभव करून नगरपालिकेचे नगराध्यक्ष पद पटकावले. यावेळी विजयी राजू भोपळे यांना ११९० तर भारत घोटणे यांना ५६९ मते मिळाली.[९३] तब्बल २७ वर्षानंतर घेण्यात आलेल्या थेट नगराध्यक्षपदाच्या निवडणुकीत विजय मिळविला. मलकापूर नगरीच्या नागरिकांना दिलेल्या संधीचे सोने करण्यासाठीच आगामी पाच वर्षे खर्ची करणार असे मलकापूर नगरपालिकेचे तत्कालीन नगराध्यक्ष राजू भोपळे यांनी सा.शाहूवाडी टाईम्स शी बोलताना सांगितले. ते पुढे म्हणाले की, ङ्गमलकापूर नगरीतील नागरिकांनी माझ्यावर जो विश्वास दाखविला त्या विश्वासास पात्र राहून स्वच्छ आणि पारदर्शक कारभार करून नगरीच्या विकास कामांना नि:स्वार्थ भावनेने गती देणार आहे. कोणत्याही प्रकाराचे गटातटाचे राजकारण न आणता बरीच वर्षे प्रलंबित असलेली कामे मार्गी लावून जनतेच्या मनातील सुंदर मलकापूर नगरीचे स्वप्न साकार करण्याचा पुरेपूर प्रयत्न करीन. आज या नगरवासीयांनी माझ्या मस्तकावर जो मानाचा शिरपेच बसविला आहे. त्यामुळे मी अगदी भारावून गेलो आहे. म्हणूनच प्रत्येक बुजूर्ग मंडळीचा शब्द प्रमाण मानून अधिकाऱ्यांचा मान ठेवून नगरीच्या अनेक विकासकामांना हात घालणार आहे. या नगरीतील प्रत्येक नागरिकांची समस्या ही माझी वैयक्तिक समस्या असेल त्यात कोणताही दुजाभाव आढळणार नाही. ही नगरपालिका कोणत्या पुढाऱ्यांची नसून ती नागरिकांची नगरपालिका आहे. याचा प्रथमतः सर्वांना विश्वास दाखवून देणार आहे.ङ्ग[९४]

### १) मालमत्तेच्या मूल्यांकनाचे अधिकार नगरपरिषदांना द्यावेत :–

जयसिंगपूर नगरपालिका सभागृहात झालेल्या जिल्हयातील नगरपरिषदेचे नगराध्यक्ष व मुख्याधिकारी यांच्या संयुक्त बैठकीत बोलताना पेठ वडगावचे नगराध्यक्ष शिवाजीराव सालपे, डावीकडे जयराम बापू पाटील(कुरूंदवाड) राजू भोपळे(मलकापूर) उजव्या बाजूस जयसिंगपूरच्या नगराध्यक्षा सौ.सावित्री कुंभार इचलकरंजीचे उपनगराध्यक्ष प्रकाश मोरे दिसत आहेत. या कार्यक्रम प्रसंगी मलकापूरचे नगराध्यक्ष राजू भोपळे म्हणाले, जनतेला न पेलणारी करवाढ शासनाने या परिपत्रकातून सुचविली आहे. परिपत्रकानुसार करवाढीचा निर्णय नगरपरिषदांनी घेतला तर जनतेच्या मोठया रोषाला लोकप्रतिनिधींना सामोरे जावे लागेल.[९५]

२) **वृक्षारोपन :-**

मलकापूर नगरपालिकेच्यावतीने ग्रामीण रूग्णालय मलकापूर परिसरात नगराध्यक्ष राजू भोसले यांच्या हस्ते वृक्षारोपन करण्यात आले. यावेळी नगरसेवक सुनिल भिंगार्डे, गिरीश वाष्टे, नगरसेविका सौ.सुचिता महाडिक, सौ.जयश्री घेवदे, वैद्यकीय अधिकारी कोणेकर, पालिकेचे व ग्रामीण रूग्णालयाचे कर्मचारी सहभागी झाले होते.[९६]

३) **स्वच्छता अभियानास प्रारंभ :-**

घंटागाडयांच्या उदबघाटनाने मलकापूरात संत गाडगे बाबा स्वच्छता अभियानाच्या कामास उत्साहात प्रारंभ झाला. नगराध्यक्ष राजू भोपळे यांनी राष्ट्रीय संत गाडगे बाबा व पंडित नेहरू यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून दीपप्रज्वलन केले. यावेळी नगरपालिकेच्या वतीने खरेदी केलेल्या दोन घंटागाडयांचे उदबघाटन उपनगराध्यक्ष बाबासाहेब पाटील यांनी केले. पूजनानंतर सुभाष चौकातून कचरा गोळा करण्यात आला. यावेळी व्यापारी व गृहिणींनी या उपक्रमास मोठा प्रतिसाद दिला. नगरसेवकांसह कर्मचारी व व्यापारीवर्ग मोठया संख्येने सहभागी झाले होते. राज्यस्तरावरील पहिल्या क्रमांकाचे बक्षिस मिळविण्यासाठी नागरिकांनी सहकार्य करण्याचे आवाहन मुख्याधिकारी शिरीष देवकर यांनी केले. अभियानाकरिता आवश्यक निधी संस्था व्यापारी देणगीदार व नागरिकांच्यातून गोळा करण्याचे आवाहन मुख्याधिकारी शिरीष देवकर यांनी केले. अभियानाकरिता आवश्यक निधी संस्था व्यापारी देणगीदार व नागरिकांच्यातून गोळा करण्याचे ठरले. अभियान अधिकाधिक कार्यक्षमतेने राबविण्याचा मानस नगराध्यक्ष राजू भोपळे यांनी व्यक्त केला.[९७]

४) **वाढीव पाणीपट्टीस स्थगिती :-**

मलकापूर नगरीतील विविध समस्या व वाढीव पाणीपट्टीस स्थगिती यासंदर्भात नगराध्यक्ष श्री राजू भोपळेसह अन्य नगरसेवकांचे शिष्टमंडळ मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांना त्याच्या वर्षा निवासस्थानी भेटले व या प्रश्नाबाबत सखोल चर्चा केली. मलकापूरच्या दिशेला असलेल्या कडवी व पालेश्वर धरणामुळे कडवी व शाळी नद्यांना खूप प्रमाणात पाणी आहे. परंतु नळपाणी योजना फिल्टर हाऊस अभावी नगरीला मुबलक व स्वच्छ पाणीपुरवठा दररोज करण्यासाठी तारेवरची कसरत करावी लागत आहे. दोन दिवसाआड नागरिकांना पाणी मिळत असल्याची अडचणही शिष्टमंडळाने कथन करून शासनाने केलेली वाढीव दरवाढ अन्यायकारक

असल्याने त्यास स्थगिती मिळावी असेही सांगितले. या चर्चेनंतर मुख्यमंत्री देशमुख यांनी याबाबत तात्काळ संबंधित खात्याच्या प्रमुखांना सूचना दिल्या व वाढीव पाणीपट्टीस स्थगिती दिल्याचे सांगितले.[९८]

**५) विष्णू भागवत भेट :-**

भारताचे माजी नौदल प्रमुख ॲडमिरल विष्णू भागवत यांनी मलकापूर येथील नगरपालिकेस भेट देऊन पालिका प्रशासनाच्या कामकाजाची प्रशंसा केली. याप्रसंगी नगराध्यक्ष राजू भोपळे यांच्या हस्ते त्यांचा शाल-श्रीफळ व पुष्पहार घालून सत्कार करण्यात आला.[९९]

**६) सिटी सर्व्हे :-**

तत्कालीन नगराध्यक्ष राजू भोपळे व उपनगराध्यक्ष बाबासाहेब पाटील यांनी मलकापूर सिटी सर्व्हे प्रश्नी त्यावेळचे मा.मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे हे कोल्हापूर दौऱ्यावर आले, त्यावेळी हे निवेदन दिले. निवेदनात म्हटले होते की, कोल्हापूर जिल्हयातील सिटी सर्व्हे न झालेली एकमेव मलकापूर नगरपालिका असून, याकामी संबंधित खात्याकडे प्रस्ताव समक्ष देऊनही शासनाकडून कार्यवाही झालेली नाही.

मलकापूर नगरीत प्रभावीपणे विकास योजना राबविण्यासाठी व नागरिकांच्या जागेबाबत उद्‌भवणाऱ्या तक्रारी, वाद कायमस्वरूपी मिटविण्यासाठी सिटी सर्व्हे प्रश्न मार्गी लागणे आवश्यक असून मलकापूर नगरपालिका 'क' वर्गीय आहे. तिचे क्षेत्रफळ १.९४ चौ.कि.मी. इतके आहे. अपुरे क्षेत्रफळ तुटपुंज्या उत्पन्नाच्या साधनामुळे सिटी सर्व्हेसाठी आवश्यक असणारा निधी पालिका भरू शकत नाही. तरी सिटी सर्व्हेचे काम शासनाने १०० टक्के अनुदानातून करून द्यावे यासाठी त्यांनी प्रयत्न केला.

**७) नगरपालिकेची विकास कामे :-**

सत्ताधारी नगरविकास आघाडीने दीड वर्षाच्या कालावधीत सुमारे साठ लाखांची विकास कामे केल्याची माहिती नगराध्यक्ष राजू भोपळे यांनी दिली. शहरातील लोकांना स्वच्छ व मुबलक पाणी मिळावे यासाठी साडेसहा लाखाची पाणी योजना राबविली. वाढीव पाणीपट्टीला मुख्यमंत्र्याकडून स्थगिती आणली. त्यांनी शहरातील तेरा रस्त्यांचे डांबरीकरण केले. सुभाष चौक व विठ्ठल मंदिर परिसरातील वाहतुकीचा होणारा अडथळा दूर करण्यासाठी खोकीधारक व हातगाडयाबाबत धोरणात्मक शिस्त लावली. विठ्ठल मंदिर व मंगलधामचे सुशोभिकरण करून

नागरिकांची सोय केली. शहरातील अनेक चौकात पाणीसाठा टाक्या बसवून पिण्याच्या पाण्याची सोय केली. तसेच पालिकेच्या सुसज्ज इमारतीसाठी विशेष प्रयत्न करून २५ लाखांचे विशेष अनुदान मंजूर करून आणले आहे.[१००]

१) मलकापूर नगरपरिषद कार्यालयातील सर्व खोल्यातील सर्व जुने व खराब इलेक्ट्रीक फिटींग काढून सुरक्षेतेच्या दृष्टिकोनातून नवीन इलेक्ट्रीक फिटींग करून घेतली.

२) नगरपालिकेच्या स्मशानभूमीसाठी लाकूड व शेणीची गरज असल्याने दहा टन जळाऊ लाकूडासाठी ९५०० रूपये आणि वीस हजार नग शेणीसाठी ७५०० रूपये इतका निधी मंजूर केला. तसेच स्मशानभूमीच्या दुरूस्तीची कामे केली.

३) मलकापूर नगरीतील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी नगरपालिकेच्या सार्वजनिक विहिरीवरील रहाट दुरूस्तीची कामे करून घेतली.

४) शहराच्या स्वच्छतेच्या दृष्टिकोनातून हातगाडी, खोकेधारक, हॉटेल खानावळ धारक, मटण आणि मासळी इत्यादी व्यावसायिकांना कचरा कुंडया पुरविल्या. परंतु ज्या व्यावसायिकांचा कचरा रस्त्यावर पडल्यास त्यांना शंभर रूपये दंड लावण्याची तरतूद केली.[१०१]

५) मलकापूर नगरपालिकेच्या वतीने सामाजिक बांधिलकी म्हणून गरीब व गरजू ११ विद्यार्थीनींना शैक्षणिक मदत या कामाखाली दत्तक घेण्यात आले आणि त्यासाठी पाच हजार रूपयांच्या खर्चास मंजुरी दिली.

६) नगरपरिषदेच्या मटण मार्केटमधील आवारात स्वच्छतेच्या व आरोग्याच्या दृष्टिकोनातून दगडी फरशी बसवण्यासाठी पस्तीस हजार रूपये खर्चास मान्यता दिली.

७) मलकापूर येथील महादेव टेकडीवरील पायऱ्या आणि कुंभार गल्लीतील रस्त्याकडील गटार बांधकामास सात हजार रूपये खर्च करण्यात आला.[१०२]

### २६) ज्योती प्रकाश शिरगांवकर (२००६ ते २००८) :–

ज्योती प्रकाश शिरगांवकर आणि मिलन इंद्रनिल बेर्डे हया दोघींमध्ये नगराध्यक्ष पदासाठी लढत होणार होती. परंतु मिलन बेर्डे हया नगराध्यक्ष पदाच्या निवडीवेळी त्या सभागृहात उपस्थितीत नसल्यामुळे ज्योती प्रकाश शिरगांवकर यांच्या गळयात नगराध्यक्ष पदाची माळ पडली. त्यांनी सन २००६ ते २००८ या काळात मलकापूरच्या नगराध्यक्षा म्हणून महत्त्वपूर्ण कामगिरी केली.

**१) प्रशासनावर वचक :–**

नगराध्यक्षा सौ. ज्योती शिरगांवकर आणि उपनगराध्यक्ष रमेश चांदणे यांनी पदभार स्विकारल्यानंतर त्यांनी प्रशासनाकडे पालिकेच्या विविध कामाची माहिती मागविली होती. त्यामध्ये पालिकेस उत्पन्न मिळवून देणाऱ्या इमारती, जागा साहित्य खरेदी, डेड स्टॉक व सभा प्रोसेंडिंग रेकॉर्ड आदी कागदपत्रे लोकप्रतिनिधींना अपुरी आढळून आली. पालिकेची महत्त्वाची रजिस्टर गायब व अपुर्ण होती. पालिका जंगम मालमत्तेची १९५५ पर्यतच्या नोंदी आढळून आल्या. त्यामध्ये पालिकेच्या मालकीच्या जागाची केवळ नावेच होती. मात्र त्याचा सर्व्हे नंबरच गायब होता. अनेक कामात नगरपालिका प्रशासनाचा निष्काळजीपणा लक्षात आल्यानंतर पालिका प्रशासनावर कडक कारवाई करण्यास सुरूवात केली. त्यावेळी त्यांनी प्रशासनावर दबदबा निर्माण केला.[१०३]

**२) स्वास्थ्य अभियान :–**

मलकापूर येथील न्यू इंग्लिश स्कूल फॉर गर्ल्स स्कूलमधील नववीच्या विद्यार्थीनी मार्फत स्वास्थ्य अभियानातंर्गत शहरात स्वच्छता करण्यात आली. सुरूवातीला बुरूड गल्लीतील सफाईस प्रारंभ करण्यात आला. त्यानंतर सबनीस गल्ली, महादेव मंदिर परिसरातील कचरा काढून प्रत्येकाच्या अंगणात सडा घालून मुलींनी रांगोळी काढली. त्याप्रसंगी नगराध्यक्षा सौ.ज्योती शिरगांवकर, उपनगराध्यक्ष रमेश चांदणे व नगरसेवक आदी मान्यवर या स्वास्थ्य अभियानात सहभागी झाले होते.[१०४]

**३) सुधारित नळपाणी पुरवठा योजना :–**

मलकापूर शहराच्या सुधारित नळ पाणीपुरवठा योजनेच्या कामाचा प्रारंभ नगराध्यक्षा सौ.ज्योती शिरगांवकर यांच्या हस्ते करण्यात आला. केंद्र शासनाच्या वर्धित वेग योजनेतून सुमारे १ कोटी १ लाख खर्चाची ही योजना होती. पहिल्या टप्प्यात या योजनेच्या माध्यमातून मलकापूरातील महादेव टेकडीवरील जुन्या नळपाणी जलसाठयाच्या टाक्याशेजारीच जलशुद्धीकरण केंद्र आणि जलकुंभ उभारण्यात आले. तसेच दुसऱ्या टप्प्यात कडवी नदीपात्रातील जॅकवेल ते जलशुद्धीकरण केंद्रापर्यत पाईपलाईन टाकण्यात आली. या योजनेकरिता दहा टक्के लोकवर्गणी भरावी लागणार होती. ही रक्कम बाराव्या वित्त आयोगातून भरण्यात येणार असल्याचे मुख्याधिकारी अनिता देशमुख यांनी सांगितले.[१०५] अशाप्रकारे

शिरगांवकर यांनी ही सुधारित योजना पूर्ण करून शहरातील नागरिकांना नियमित व शुद्ध मुबलक पाणी उपलब्ध करून दिले.

### ४) शौचालय स्वच्छता मोहिम :–

सार्वजनिक शौचालयाचा स्वच्छतेसाठी मलकापूर शहरातील नागरिकांनी पालिकेकडे वारंवार मागणी केली. याची दखल घेऊन नगराध्यक्षा ज्योती शिरगांवकर यांनी शौचालय स्वच्छतेची मोहिम शहरात राबविली. शहरात सुमारे १४ ठिकाणी नगरपालिकेची सार्वजनिक शौचालये आहेत. या शौचालय सफाईसाठी वडगाव पालिकेकडून मैला वाहतूक करण्याठीचा टँकर भाडेतत्त्वावर आणून मलकापूर नगरपालिकेने ही मोहीम राबविली.[१०६]

नागरिकांच्या आरोग्याच्यादृष्टीने शौचालयासाठी ही स्वच्छता मोहिम महत्त्वपूर्ण ठरली. कारण शौचालये स्वच्छ करण्यासाठी खास मोहिम राबविल्यामुळे शहरातील नागरिकांना समाधान व्यक्त केले. याचे श्रेय नगराध्यक्षा सौ.ज्योती शिरगांवकर यांना जाते.

### ५) नगरपालिका वर्धापन दिन :–

नगराध्यक्षा सौ.ज्योती शिरगांवकर यांनी मलकापूर नगरपालिकेचा १२३ वा वर्धापनदिन विविध कार्यक्रमांनी साजरा केला. या दिनानिमित्त सकाळी त्यांनी व शहरातील प्राथमिक व माध्यमिक शाळांतील विद्यार्थ्यानी प्रभातफेरी काढली. त्यानंतर नगरपालिकेसमोर त्यांच्या हस्ते ध्वजवंदन झाले. यावेळी नगरपालिकेत झालेल्या कार्यक्रमात एकेरी व दुहेरी कॅरम, बुद्धीबळ, रांगोळी व निबंध स्पर्धेतील विजेत्यांना बक्षीस वितरण आणि बालवाडीतील गरीब होतकरू अठरा विद्यार्थ्यांना शालेय गणवेश वाटप नगराध्यक्षा सौ.ज्योती शिरगांवकर, उपनगराध्यक्ष रमेश चांदणे यांच्या हस्ते वाटप करण्यात आले.[१०७]

## २७) शामराव दौलू कांरडे (२००९ ते २०११) :–

शामराव कारंडे यांनी सन २००९–२०११ या सालामध्ये मलकापूर नगरपरिषदेचे नगराध्यक्ष म्हणून दुसऱ्यांदा काम केले. यांच्या कामाच्या अनुभवाचा मलकापूर शहराच्या विकासासाठी फायदा झाला. शहर विकासाच्या दृष्टिकोनातून मलकापूरमध्ये अनेक कामे झाली. त्यामध्ये शहरात समाजमंदिर बांधण्यासाठी पंच्याहत्तर हजार रूपये खर्च केले. तसेच विविध भागातील समाजमंदिराची दुरूस्ती करून घेतली. डॉ.बाबासाहेब आंबेडकर बालवाडी चालविण्यासाठी मोठया प्रमाणात निधी खर्च केला. उदा. बालवाडीतील लहान मुलांची खेळणी

आणि गणवेश इत्यादी आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील कुटुंबांना निर्मलग्रामसाठी मदत केली. तसेच त्यांना वीज कनेक्शन जोडण्यास मदत केली. त्याबरोबर शहरातील बेघर वसाहतीचा विकास करण्याचा प्रयत्न केला.

## ४. समारोप

सामाजिक बांधिलकीने आणि राष्ट्रप्रेमाने भारावलेल्या मलकापूरातील अनेक तरूण कार्यकर्त्यांनी विविध राजकीय पक्षाचा स्वीकार केला. मराठेशाहीच्या राजवटीत मराठयांचा एकनिष्ठ सेवक म्हणून परशुराम त्रिंबक पंतप्रतिनिधी यांच्यावर विशाळगड जहागिरीची जबाबदारी सोपविली होती. ब्रिटिश राजवटीत या भागातील लोकांवर राष्ट्रीय काँग्रेसचा प्रभाव पडला. यातून भारतीय स्वातंत्र्य लढयासाठी येथील अनेक कार्यकर्ते सहभागी झाले. भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यात महत्त्वाचे कार्य केले. पुढे स्वातंत्र्योत्तर काळात शेतकरी कामगार पक्ष, समाजवादी पक्ष, शिवसेना, भाजप, राष्ट्रवादी आणि जनसुराज्य इत्यादी विविध पक्षाचा प्रभाव जाणवतो. याबरोबर स्थानिक विकास आघाडयाही अस्तित्वात आल्या आहेत. या राजकीय पक्षाच्या आणि स्थानिक विकास आघाडयाच्या माध्यमातून मलकापूर शहरातील व सभोवतालच्या परिसरातील सामाजिक, आर्थिक, धार्मिक, राजकीय आणि सांस्कृतिक समस्या सोडविण्यात महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. मलकापूर शहरातील विविध राजकीय पक्षाच्या कार्यालयाच्या अस्तित्वामुळे स्थानिक नेतृत्वात वाव मिळत आहे. उदा.राजू गजानन भोपळे यांनी महाराष्ट्र राज्य खाटीक समाज मंडळ मुंबई यांचे उपाध्यक्ष म्हणून काम केले. मलकापूर शहरातील नगरपालिका कार्यालयामुळे शहरी राजकीय नेतृत्त्वास वाव मिळाला आणि प्रशासकीय ज्ञान व नेतृत्वाची संधी मिळाली. मलकापूर नगरपरिषदेचे नगराध्यक्ष म्हणून अनेक लोकांनी पद भूषविले. यांनी मलकापूर शहराच्या विकासात महत्त्वाचे योगदान दिले. मलकापूरला प्रशासकीय सुविधा, सर्वजनिक पाणीपुरवठा, रस्ते व गटाराची सुविधा तरूणांना रोजगाराची संधी, आरोग्य सुविधा, वाचनालयाची सुविधा, शिक्षण आणि सार्वजनिक आरोग्य व स्वच्छता विषयक सुविधा इत्यादी सेवा सुविधा शहरातील नागरिकांना मिळवून देण्यात नगराध्यक्षांनी महत्त्वाची भूमिका बजावली आणि शहर विकासातही मोठे योगदान आहे.

## संदर्भ :–


१) मोरे राजेंद्र, आधुनिक महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास, खंड– १, के.सागर प्रकाशन, पुणे, २००७, पृ.२३

२) दैनिक पुढारी, कोल्हापूर, दि. ६ मे १९७५, पृ.६

३) दैनिक पुढारी, कोल्हापूर, दि. ८ ऑक्टोबर, १९८४, पृ.८

४) दैनिक सकाळ, कोल्हापूर, दि. ३१ जानेवारी २००५, पृ.२

५) मोरे राजेंद्र, उपरोक्त, पृ. २४

६) दैनिक पुढारी, कोल्हापूर, दि. २२ नोव्हेंबर २००४, पृ.४

७) मलकापूर नगरपरिषद प्रोसेडिंग, ७ ऑगस्ट १९७८, पृ. ६

८) दैनिक सकाळ, कोल्हापूर, दि. ७ फेब्रुवारी २००५, पृ.३

९) मलकापूर नगरपरिषद ऑडीट रिपोर्ट, सन १९८५–१९८६, पृ. १

१०) मलकापूर नगरपरिषद प्रोसेडिंग, २३ जून १९४६, पृ. २, ३

११) कित्ता, पृ.५

१२) मलकापूर नगरपरिषद प्रोसेडिंग, ३ जुलै १९४७, पृ.१०

१३) मलकापूर नगरपरिषद प्रोसेडिंग, ऑगस्ट १९४७, पृ.१, २, ४

१४) मलकापूर नगरपरिषद प्रोसेडिंग, २७ नोव्हेंबर १९४७, पृ.२

१५) मलकापूर नगरपरिषद प्रोसेडिंग, १५ एप्रिल १९४८, पृ.४,६, ७

१६) मलकापूर नगरपरिषद प्रोसेडिंग, ३१ जानेवारी १९४९, पृ.३, ४

१७) मलकापूर नगरपरिषद प्रोसेडिंग, २६ जुन १९५०, पृ.४, ५, ६

१८) मलकापूर नगरपरिषद प्रोसेडिंग, २२ जून १९५०, पृ.४, ५, ६, ७

१९) कित्ता, पृ.११

२०) कित्ता, पृ.१२, १३

२१) कित्ता, पृ. ४, ५

२२) मलकापूर नगरपरिषद प्रोसेडिंग, ९ जुलै १९५१, पृ.५, ६

२३) मलकापूर नगरपरिषद प्रोसेडिंग, २२ नोव्हेंबर १९५१, पृ.३

२४) मलकापूर नगरपरिषद प्रोसेडिंग, २२ नोव्हेंबर १९५१, पृ.१०

२५) मलकापूर नगरपरिषद प्रोसेडिंग, ४ ऑक्टोबर १९५२, पृ.२,३

२६) मलकापूर नगरपरिषद प्रोसेडिंग, जुलै १९५३, पृ. २, ३

२७) कित्ता, पृ. ६, ७

२८) मलकापूर नगरपरिषद प्रोसेडिंग, १७ एप्रिल १९५३, पृ.३, ४

२९) मलकापूर नगरपरिषद प्रोसेडिंग,७ जानेवारी १९५४, पृ.५, ७

३०) मलकापूर नगरपरिषद प्रोसेडिंग, २० मे १९५५, पृ.२

३१) मलकापूर नगरपरिषद प्रोसेडिंग, २८ ऑक्टोबर १९५८, पृ.८

३२) मलकापूर नगरपरिषद प्रोसेडिंग, २५ एप्रिल १९५९, पृ.८

३३) मलकापूर नगरपरिषद प्रोसेडिंग, २ जुलै १९६०, पृ.१

३४) मलकापूर नगरपरिषद प्रोसेडिंग, १० जानेवारी १९६१, पृ.६६

३५) मलकापूर नगरपरिषद प्रोसेडिंग, २४ जानेवारी १९६२, पृ.१

३६) मलकापूर नगरपरिषद प्रोसेडिंग, २३ जानेवारी १९६३, पृ.३, ४८

३७) मलकापूर नगरपरिषद प्रोसेडिंग, २ जुलै १९६७, पृ. २, ३

३८) मलकापूर नगरपरिषद प्रोसेडिंग, २० फेब्रुवारी १९६९, पृ.३

३९) दैनिक पुढारी, कोल्हापूर, दि.६ डिसेंबर १९७०, पृ.१

४०) मलकापूर नगरपरिषद प्रोसेडिंग, २२ जानेवारी १९७१, पृ. ३

४१) मलकापूर नगरपरिषद प्रोसेडिंग, ३० डिसेंबर १९७१, पृ.५

४२) मलकापूर नगरपरिषद प्रोसेडिंग, २८ फेब्रुवारी १९७२, पृ.३, ४, ५

४३) मलकापूर नगरपरिषद प्रोसेडिंग, १९ ऑगस्ट १९७२, पृ.७, ८

४४) मलकापूर नगरपरिषद प्रोसेडिंग, २२ जानेवारी १९७४, पृ. ३

४५) मलकापूर नगरपरिषद प्रोसेडिंग, ६ जून १९७४, पृ.३

४६) मलकापूर नगरपरिषद प्रोसेडिंग, ७ ऑगस्ट १९७४, पृ.७, ८

४७) मलकापूर नगरपरिषद प्रोसेडिंग, ११ जुलै १९७८, पृ.३, ९, १२

४८) मलकापूर नगरपरिषद प्रोसेडिंग, २५ जून १९७९, पृ. १०

४९) मलकापूर नगरपरिषद प्रोसेडिंग, २४ डिसेंबर १९८४, पृ. ९

५०) मलकापूर नगरपरिषद प्रोसेडिंग, २० फेब्रुवारी १९८५, पृ. ११

५१) मलकापूर नगरपरिषद प्रोसेडिंग, १९ ऑगस्ट १९८५, पृ.१०

५२) मलकापूर नगरपरिषद प्रोसेडिंग, १९ जून १९८५, पृ.२, ३, ४

५३) मलकापूर नगरपरिषद प्रोसेडिंग, ९ एप्रिल १९८६, पृ. ४

५४) मलकापूर नगरपरिषद प्रोसेडिंग, ५ मे १९८६, पृ. ३, ५

५५) मलकापूर नगरपरिषद प्रोसेडिंग, जून १९८६, पृ. २, ४, ९, १०

५६) मलकापूर नगरपरिषद प्रोसेडिंग, ऑगस्ट १९८६, पृ.२, ४, ६, ८

५७) मलकापूर नगरपरिषद प्रोसेडिंग, २० जानेवारी १९८८, पृ. ३

५८) मलकापूर नगरपरिषद प्रोसेडिंग, ९ मे १९८८, पृ. २, ३, ४, ७

५९) मलकापूर नगरपरिषद प्रोसेडिंग, १६ जुलै १९८८, पृ. ४, ६, ८

६०) मलकापूर नगरपरिषद प्रोसेडिंग, १० एप्रिल १९८९, पृ. १०, १२

६१) मलकापूर नगरपरिषद प्रोसेडिंग, २ मे १९८९, पृ. ११

६२) मलकापूर नगरपरिषद प्रोसेडिंग, २२ २२ मे १९८९, पृ. ११

६३) मलकापूर नगरपरिषद प्रोसेडिंग, २९ नोव्हेंबर १९८९, पृ.६, ८,९

६४) मलकापूर नगरपरिषद प्रोसेडिंग, २५ जानेवारी १९९०, पृ.३

६५) मलकापूर नगरपरिषद प्रोसेडिंग, १७ मार्च १९९०, पृ.३

६६) मलकापूर नगरपरिषद प्रोसेडिंग, १९ मे १९९०, पृ.१२

६७) कित्ता, पृ. १३

६८) मलकापूर नगरपरिषद प्रोसेडिंग, २२ मार्च १९९१, पृ.३

६९) मलकापूर नगरपरिषद प्रोसेडिंग, ६ मार्च १९९१, पृ.३

७०) मलकापूर नगरपरिषद प्रोसेडिंग, ऑगस्ट १९९१, पृ. ७, ८, ९

७१) मलकापूर नगरपरिषद प्रोसेडिंग, २९ मार्च १९९१, पृ.१४

७२) मलकापूर नगरपरिषद प्रोसेडिंग, २० जानेवारी १९९२, पृ. ३

७३) मलकापूर नगरपरिषद प्रोसेडिंग, २९ फेब्रुवारी १९९२, पृ.३, ४

७४) मलकापूर नगरपरिषद प्रोसेडिंग, ३० मार्च १९९२, पृ. ५, ६

७५) मलकापूर नगरपरिषद प्रोसेडिंग, २ जुलै १९९२, पृ. ४, ५

७६) मलकापूर नगरपरिषद प्रोसेडिंग, १९ डिसेंबर १९९२, पृ. २, ३, ४

७७) दैनिक पुढारी, कोल्हापूर, दि. १४ सप्टेंबर १९९२, पृ.९

७८) मलकापूर नगरपरिषद प्रोसेडिंग, २५ ऑक्टोबर १९९३, पृ.२, ३

७९) मलकापूर नगरपरिषद प्रोसेडिंग, १६ एप्रिल १९९४, पृ.१, २, ३

८०) मलकापूर नगरपरिषद प्रोसेडिंग, १६ एप्रिल १९९४, पृ.१, २, ३

८१) मलकापूर नगरपरिषद प्रोसेडिंग, ८ ऑगस्ट १९९४, पृ.२

८२) मलकापूर नगरपरिषद प्रोसेडिंग, ८ ऑगस्ट १९९५, पृ.२, ३

८३) मलकापूर नगरपरिषद प्रोसेडिंग, १६ ऑक्टोबर १९९५, पृ.१, २, ३

८४) मलकापूर नगरपरिषद प्रोसेडिंग, १६ जानेवारी १९९६, पृ. १, २, ४

८५) मलकापूर नगरपरिषद प्रोसेडिंग, २० जून १९९६, पृ.१, २, ३

८६) मलकापूर नगरपरिषद प्रोसेडिंग, ३१ मार्च १९९७, पृ.१, २, ३, ४

८७) मलकापूर नगरपरिषद प्रोसेडिंग, १० मार्च १९९७, पृ. १

८८) दैनिक लोकसत्ता, कोल्हापूर, दि. १४ डिसेंबर २००१,पृ.४

८९) मलकापूर नगरपरिषद अंदाजपत्रक, सन २०००–२००१, पृ.२, ३, ४

९०) दैनिक लोकसत्ता, कोल्हापूर, दि. १४ डिसेंबर २००१, पृ. ३

९१) दैनिक लोकसत्ता, कोल्हापूर, दि. १४ डिसेंबर २००१, पृ.३

९२) दैनिक सकाळ, कोल्हापूर, दि. ४ नोव्हेंबर २००१, पृ.५

९३) दैनिक तरूण भारत, कोल्हापूर, दि. १४ डिसेंबर २००१, पृ.१

९४) सा. शाहूवाडी टाइम्स,शाहूवाडी, दि.५ डिसेंबर २००१, पृ.१

९५) दैनिक पुढारी, कोल्हापूर, दि. ३० एप्रिल २००२, पृ.३

९६) दैनिक पुढारी, कोल्हापूर, दि.  ३ सप्टेंबर २००२, पृ. ३

९७) दैनिक तरूण भारत, कोल्हापूर, दि. १७ नोव्हेंबर २००२, पृ.५

९८) दैनिक तरूण भारत, कोल्हापूर, दि. १८ नोव्हेंबर २००२, पृ.२

९९) दैनिक पुढारी, कोल्हापूर, दि. ७ मार्च २००२, पृ.१

१००) दैनिक सकाळ, कोल्हापूर, दि. ५ नोव्हेंबर २००१, पृ.४

१०१) मलकापूर नगरपरिषद, स्थायी समिती सभा, २००२, ठराव क्रमांक – ५, १२, १३

१०२) मलकापूर नगरपरिषद, स्थायी समिती सभा, २००२, ठराव क्रमांक – २२, २३

१०३) दैनिक पुढारी, कोल्हापूर, दि. १८ जानेवारी २००७,पृ.२

१०४) दैनिक पुढारी, कोल्हापूर, दि. २४ जानेवारी २००७,पृ.१

१०५) दैनिक पुढारी, आपलं कोल्हापूर, कोल्हापूर, दि.  ३० जानेवारी २००७, पृ. ५

१०६) दैनिक सकाळ, कोल्हापूर, दि. २३ जुलै २००७,पृ.२

१०७) दैनिक सकाळ, कोल्हापूर, दि. ३ ऑक्टोबर २००७,पृ.३

# प्रकरण चौथे

# नगरपालिकेचे सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य विषयक आणि इतर कार्य

## १. प्रस्तावना :–

मलकापूर नगरपालिकेने नागरी सेवा संबंधित विविध योजना आखल्या त्यात प्रामुख्याने सामाजिक, आरोग्यविषयक व शिक्षण विषयक आणि बांधकामविषयक कार्याचा आढावा घेणे उचित ठरते. कारण या योजना जनहिताचा विचार करता त्या ज्या पातळीवर राबविल्या गेल्या त्याचा उचित परिणाम म्हणजे या मलकापूर नगरपालिकेच्या माध्यमातून झालेला समाजाचा विकास होय. कारण या सेवांच्या माध्यमातून लोकांचे जीवनमान सुधारते परिणामी व्यक्ती व समाज प्रगतीच्या दिशेने वाटचाल करतो. त्यासाठी पायाभूत सुविधा राबविणे गरजेचे असते. त्या सुविधा नगरपालिकेने राबवून मलकापूरच्या विकासात आपले योगदान दिलेले आहे.

मलकापूरच्या वाढत्या लोकसंख्येच्या जीवनाविषयक महत्त्वपूर्ण गरजा ओळखून सामाजिक आरोग्याच्या दृष्टीने नगरपालिकेने व्यापक सुविधा पुरविल्या. त्यामुळे शहर स्वच्छता होण्यास मदत झाली. विविध योजनांच्या माध्यमातून मलकापूर शहराचा कायापालट झाला. म्हणूनच मलकापूर नगरपालिकेने ज्या योजना आखल्या त्या योजना प्रभावी कितपत ठरल्या आणि त्याद्वारे समाजाची स्थिती उंचावण्यास मदत झाली. त्यांचा चिकित्सक अभ्यास प्रस्तुत प्रकरणामध्ये करण्याचा प्रयत्न केला आहे.

## २. सामाजिक कार्य

### १) दिवाबत्तीची सोय :–

स्वातंत्र्यपूर्व कालखंडात ब्रिटीश आमदानीत रॉकेलवर चालणाऱ्या कंदील मार्फत प्रकाशाची सोय करण्यासाठी नगरपालिका आपल्या परीने अग्रेसर होती. त्यासाठी विविध कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून दिवाबत्तीची सोय होण्यासाठी नगरपालिकेने कर्मचारी नेमले. असे उल्लेख सापडतात. शिवाय मलकापूर शहरात रॉकेल विक्रीदार पण होते. त्यांच्याकडून पुरेसा रॉकेल साठा उपलब्ध होत असे. उदा. ज्ञानोबा शेटे यांचे मलकापूरमध्ये असलेले दुकान[१] अशाप्रकारे रॉकेलच्या माध्यमातून दिवाबत्तीची सोय उपलब्ध करून जनतेला दिली जात होती. त्यासाठी कंदील वापरले जात होते. त्याचा वापर अंधाऱ्या रात्री करत आणि या कामानिमित्त

पगारी कर्मचारी म्हणून दत्तात्रय कोठावळे हे आपले काम उत्तम प्रकारे पार पाडत असल्याचे दिसते.[२] एकंदरित शहरांमध्ये नगरपालिकेतर्फे दिवाबत्तीची सोय उपलब्ध झाल्याने अंधाराचे साम्राज्य नष्ट होऊन शहर विकासाच्या प्रकाशाकडे झेपावण्यात सज्ञा असल्याचे दिसते. याचे श्रेय या योजना प्रभावीपणे राबविण्याऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना दिले पाहिजे. नंतरच्या कालखंडात कोयना वीजप्रकल्पाची निर्मिती झाल्यामुळे त्याच्या माध्यमातून मलकापूर शहरात विद्युत दिव्याची सोय होण्यास मदत झाली. सन १९८५–८६ साली मलकापूर नगरपरिषदेने शहरातील दिवाबत्तीच्या सोयीकरिता शहरात ११६ टयुब लाईट, ४७ बल्ब, ३ मर्क्युरी लँप, तीन सोडीअम व्हेपर बसवून दिवाबत्तीची सोय उपलब्ध करून दिली होती.[3] हया बरोबर सन २००९ पासून पवनचक्कीच्या माध्यमातूनही मलकापूर शहरास वीजेचा पुरवठा होतोय ही खूप आनंदाची गोष्ट आहे. कारण वीजेचे हे एक पारंपरिक स्त्रोत आहे. आणि त्याचा खर्च अल्प असतो. परिणामी वापरण्यास सोयीस्कर ठरते.

अशाप्रकारे सुरूवातीच्या काळातील कंदीलाच्या दिव्यापासून ते आताचे विज्ञान युगातील विद्युत दिवे याचा कालमानाप्रमाणे वापर करून मलकापूर शहराला पायाभूत सुविधा दिव्याबत्तीच्या माध्यमातून नगरपालिकेने देण्याचा प्रयत्न केला. तर उपलब्ध माहितीच्या आधारे नगरपालिकेने दिवाबत्तीची सोय करण्यासाठी सन २००६–०७ मध्ये रक्कम २०६४१९ रूपये तर २००७–०८ मध्ये १३६१४९ रूपये खर्च केला. तर २००९–१० मध्ये १२६००० खर्च केल्याचे दिसते.[४] अशारितीने मलकापूर नगरपरिषदेने शहरात पूर्वी दिवाबत्तीच्या सोयीकरिता रॉकेलवर चालणाऱ्या कंदीलाचे दिवे उपलब्ध करून दिले. कालांतराने विज्ञान व तंत्रज्ञानाच्या प्रगतीतून विद्युत दिव्याचा शोध लागला. शहरी जीवन अंधारातून प्रकाशाकडे घेऊन जाण्यात परिषदेने महत्त्वाची भूमिका बजावली. शहरातील मुख्य चौक, शाळा, समाज मंदिरे, बालवाडी, देवाची मंदिरे आणि रस्ते इत्यादी ठिकाणी लाईटवर चालणारे बल्ब, टयुब, सैरपॅनेल दिवे, पवन उर्जेवर चालणारे पथदिवे बसवून नगरपरिषदेने सर्व मलकापूर शहर प्रकाशमय केले आहे.

**२) उद्यान :–**

लहान मुलांच्या आरोग्याची जबाबदारी घेणे हे एक नगरपालिकेचे कर्तव्य आहे. मुलांच्या पूर्ण वाढीकरिता संतुलित आहार, शुद्ध हवा, योग्य व्यायामाचे साहित्य इत्यादी सुविधा उपलब्ध करून देणे. गरीब पालकांना शक्य नसल्याने या बाबत मलकापूर नगरपालिकेने महत्त्वाची

भूमिका पार पाडली आहे. लहान बालकांकरिता उघडी खेळाची मैदाने, झोपाळे, घसरगुंडी आणि झोके इत्यादी सेवा सुविधा शहरातील नगरपालिकेच्या शेजारी, कन्या विद्यामंदिराजवळ आणि मराठी प्राथमिक शाळेच्या लगत असलेल्या जिजामाता उद्यान येथे उपलब्ध करून दिल्या आहेत. नगरपालिकेने या उद्यानाच्या विकासाकरिता सन २०१२–१३ या वर्षात एक लाख रूपयांचा निधी खर्च केला.[५]

शहरातील लोकांकरिता आरोग्य मनोरंजन आणि विरंगुळा याकरिता हे उद्यान नगरपरिषदेने बांधले आहे. शाळेतील लहान बालके व मोठी मुले, दिवसभर कष्टाची कामे करणारे कर्मचारी नोकरदार वर्ग आणि वयोवृद्ध इत्यादी लोकांना या उद्यानाचा लाभ झाला आहे. या उद्यानात विविध प्रकारची फुलझाडे व इतर वृक्षे लावलेली आहेत. हे उद्यान फुलझाडे, वृक्ष संरक्षण कुंपण, फूटपाथ गवताचे लोन आणि दिवाबत्ती इत्यादीने सुशोभित आहे. सकाळी ६ ते सायंकाळी ८ वाजेपर्यत हे उद्यान नागरिकांना खुले ठेवतात. या उद्यानामुळे शहराच्या सौंदर्यात भर पडत आहे.

**३) भाजी मार्केट :–**

मलकापूर शहरातील लोकांच्या सोयीकरिता नगरपरिषदेने एक भाजी मार्केट स्थापन केले. हे भाजी मार्केट सुभाष चौक परिसरात साखरे गल्ली या ठिकाणी आहे. शहराच्या मध्यभागी ५८४ लांबी व रूंदी एवढया आकाराचे ओटे बांधून व्यापारी विक्रेत्यांना उपलब्ध करून दिले आहे. नगरपरिषदेने शासनाकडून भाजी मार्केट विकासकामासाठी एक लाख रूपयाचे कर्ज घेतले होते. सन २०१२–१३ मधे या कर्जाची परतफेड करण्याकरिता पन्नास हजर रूपयांची तरतूद करण्यात आली.[६] नगरपालिकेने लोकसंख्येची वाढती गरज लक्षात घेवून या भाजी मंडई व्यतिरिक्त या मंडईला लागून असलेल्या रस्त्यालगत बसण्यासाठी भाजी विक्रेत्यांना जागा उपलब्ध करून दिली. या भाजी मंडईचे बांधकाम सिमेंट कॉंक्रिटमध्ये केलेले दिसून येते. नगरपालिका मालकीच्या जागेत बसून भाजी विक्री करणाऱ्या लोकांकडून मासिक भाडे घेतले जाते आणि रस्त्यालगत बसून माळवे विकणाऱ्याकडून नाममात्र भाडे घेतात.

या मंडईमधून जीवनावश्यक सर्व वस्तू उपलब्ध करून दिल्या आहेत. त्यामध्ये बटाटे, कांदे, मिरची, लसून, टोमॅटो, कोबी, कोथिंबीर, काकडी, गाजर, कार्ले, दोडके, भोपळा आणि केळी फणस, सिताफळे, करवंद, आंबा, मोसंबी, कलिंगड, डाळिंब, बोरे आणि सफरचंद

इत्यादी भाजीपाला व फळभाज्या आणि फळे उपलब्ध करून दिली आहेत. तसेच कडधान्य व तृणधान्य आणि या धान्यापासून तयार होणाऱ्या वस्तू या मंडईमधून उपलब्ध करून दिल्या आहेत. ही मंडई सकाळी सात वाजल्यापासून ते संध्याकाळी आठ वाजेपर्यंत चालू असते. या मंडईमधून मोठया प्रमाणात आर्थिक उलाढाल होते. या मंडईत शहरातील लोकांची नेहमीच वर्दळ असते. तसेच शुक्रवारच्या आठवडी बाजारादिवशी या शहराच्या सभोवतालच्या परिसरातील लोक मोठया संख्येने या दिवशी खरेदी विक्रीसाठी या ठिकाणी येतात. या मंडई मधून शहरातील तरूणांना रोजगाराची संधी मिळाली. त्याचबरोबर शेतकऱ्यांच्या शेती मालाला बाजारपेठ उपलब्ध झाली. या मंडईच्या साफसफाईकरिता पालिकेने कर्मचारी नेमले आहेत. आणि पालिकेने मंडईला दिवाबत्तीची व पाण्याची सोय उपलब्ध करून दिली. या भाजी मंडईमुळे मलकापूर शहराच्या वैभवात भर पडत आहे.

**४) मटण मार्केट :–**

नगरपालिकेने शहरातील सार्वजनिक आरोग्य धोक्यात येवू नये आरोग्य सुव्यवस्थित आणि सुनियंत्रित रहावे याकरिता महत्त्वपूर्ण कार्य केले. नगरपालिकेच्या मालकीचे एक मटण मार्केट आहे. या मार्केटमध्ये आठ दुकानगाळे आहेत.[७] रोगी प्राण्यांच्या मांसाची विक्री केल्यामुळे शहरी लोकांचे आरोग्य धोक्यात येईल हे लक्षात घेऊनच पालिकेने मटण मार्केट बांधले आहे. आरोग्य अधिकाऱ्यामार्फत या मार्केटची नेहमी तपासणी केली जाते. जर एखाद्या प्राण्याचे मांस खाण्यास अयोग्य आहे, असे आढळल्यास त्या प्राण्याच्या कत्तलीवर बंदी घातली जाते. या मार्केटमध्ये फक्त निरोगी प्राणी कापण्यास परवानगी दिली जाते. हे मटण मार्केट साखरे गल्लीत आहे. या मार्केटमधील दुकान गाळे दरवर्षी लिलावाने दिले जातात. या ठिकाणी लोकांना व्यवसाय करण्याची संधी मिळाली. आर्थिक उलाढाल मोठया प्रमाणात होते.

**५) मासळी मार्केट :–**

मलकापूर शहर कोल्हापूर महामार्गावर असल्याने याठिकाणी कोकणच्या मासळीला चांगली बाजारपेठ उपलब्ध झाली. हे मासळी मार्केट साखरे गल्ली येथे असून माशांची खरेदी–विक्री मोठया जोमात होते. व्यावसायिकांना व्यवसाय करण्याकरिता एक मासळी मार्केट बांधून त्यामध्ये ३७ गाळे उपलब्ध करून दिले.[८] उघडयावरती विकल्या जाणाऱ्या माशांमुळे वेगवेगळे रोग होतात. म्हणून मटण मार्केट शेजारी मासे विक्रीसाठी स्वतंत्र मच्छी मार्केट बांधून घेतले. या

मार्केटमधून फतुला, मिशाळी, वांबट, मरळ, बांगडा, पापलेट, सुरमई, झिंगे, बोंबील इत्यादी माशांची विक्री केली जाते. नगरपरिषदेने शहरातील वाढत्या लोकसंख्यची गरज लक्षात घेवून भाजी मंडई, मटण मार्केट, मासळी मार्केट उपलब्ध करून दिले. नगरपरिषदेला या मार्केटमधून चांगला कर मिळतो. या कराच्या उत्पन्नातून अनेक सुविधा पुरविल्या जातात. त्यामध्ये दिवाबत्तीची सोय, पाणीपुरवठा, स्वच्छता, इत्यादी नगरपरिषदेकडून पुरविण्यात येतात. या मार्केटमध्ये नासक्या वस्तूच्या विक्रीवर आणि रोगी प्राण्याच्या हत्येवर बंदी घालण्यात आली आहे.

**६) सार्वजनिक शौचालय व मुताऱ्या :–**

मलकापूर शहराच्या लोकसंख्येत व नागरिकरणात झालेली वाढ विचारात घेता नगरपरिषदेने शहर स्वच्छतेच्या दृष्टिकोनातून सार्वजनिक शौचालये व मुताऱ्या बांधल्या आहेत. सन १९८३ साली शहरात पाच ठिकाणी ४ सीटसची सार्वजनिक शौचालये परिषदेने बांधली होती. टोपलीच्या शौचालयाचे जलौघात शौचालयात रूपांतर करिता पीट पाईप योजना लागू करण्यात आली. यानुसार सन १९८४ मध्ये शहरात ११७ खाजगी टोपलीची शौचालये होती. फक्त चार शौचालयाचे जलौघातमध्ये रूपांतर केले.[९] सन १९८६ साली नगरपालिकेच्या हद्दीत ११३ खाजगी टोपलीची शौचालये होती. यावर्षी एकाही शौचालयाचे जलौघातमध्ये रूपांतर झाले नाही. शहरातील शौचालये साफ करण्यासाठी दोन भंगी कामगार होते.[१०] अशाप्रकारे नगरपालिकेने शहरातील सर्व खाजगी व सार्वजनिक शौचालये ही सेप्टीक टँक शौचालयात रूपांतर केली आहेत. तसेच शहरात नागरिकांच्या सोयीकरिता जागोजागी दोन सीटच्या आणि चार सीटच्या सार्वजनिक मुताऱ्यांची बांधकामे करून घेतली आहेत. महाराष्ट्रात निर्मलग्राम योजनेची प्रभावीपणे अमंलबजवणी सुरू असताना मात्र पालिकेने शौचालयाची डागडूजी, दरवाजे, भांडे आणि खराब टाकी दुरूस्ती या कारणास्तव २००७ साली खाटीक आणि साखरे गल्लीतील शौचालये बंद केली होती. या शौचलयात खाटीक गल्ली, मुख्य बाजारपेठ, साखरे गल्लीतील महिला, पुरूष अबालवृद्ध मुले शौचालयास येत असत. पण याचा विचार पालिका प्रशासनाने न करता शौचालय बंद केली. म्हणून स्थानिक नागरिकांनी पालिकेला घेराव मोर्चा यासारखी आंदोलने छडली जातील असा इशारा देण्यात आला. त्यावेळी सार्वजनिक शौचालयाच्या स्वच्छतेसाठी खास मोहिम नगरपालिकेने शहरात राबविली. शहरात सुमारे १४

ठिकाणी नगरपालिकेची सार्वजनिक शौचालये आहेत. त्यासाठी वडगाव पालिकेकडून मैला वाहतूक करण्यासाठीचा टँकर भाडे तत्त्वावर आणून शहरातील दुरावस्था आणि दुर्गंधीमुळे बंद ठेवलेली शौचालये पुन्हा साफ करून घेतली. ही मोहीम राबविण्यासाठी नगराध्यक्षा ज्योती शिरगांवकर उपनगराध्यक्ष रमेश चांदणे यांनी विशेष परिश्रम घेतले.[११] अशी मोहीम राबवून मलकापूरातील सार्वजनिक शौचालयाची साफसफई केल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले. नगरपालिकेने शहराच्या आरोग्याच्या व स्वच्छतेच्या दृष्टिकोनातून अशी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

## ३. शैक्षणिक कार्य :–

समाजातील व्यक्तींचा सर्वांगिण विकास म्हणजे शिक्षण होय. व्यक्तीच्या सुप्तगुणांचा विकास ज्ञान प्राप्ती म्हणजे शिक्षण होय. विद्यार्थी दशेत गुरूकडून जे ज्ञान अवगत केले जाते. त्यास शिक्षण म्हणतात. शिक्षणाचा विचार केला असता माणूस आयुष्यभर शिक्षण घेत असतो. व्यक्तींना घडणाऱ्या घटनांच्या शिक्षणातून व ग्रंथ वृत्तपत्रे वाचनाने मानवाच्या ज्ञानाच्या कक्षा सतत रूंदावत असतात. शिक्षणामुळे माणूस जीवनात यशस्वी वाटचाल करू शकतो. एक व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीपेक्षा कशी श्रेष्ठ आहे हे त्याच्या जादा असणाऱ्या अवयवावरून ठरवता येत नाही. तर त्याच्या मन व बुद्धीचा झालेला विकास पाहता व्यक्ती श्रेष्ठ ठरविली जाते. थोडक्यात शिक्षणाने मन व बुद्धीचा विकास घडून येतो.

प्राचीन कालखंडापासून शिक्षणाला अतिशय महत्त्व असून शिक्षण म्हणजे तृतीय नेत्र मानले. दोन डोळयांनी दिसणाऱ्या ज्ञानापेक्षा त्यापलिकडचे ज्ञान शिक्षणामुळे अवगत होते. शिक्षणामुळे पुनर्जन्म म्हणून शिक्षण घेतलेल्या व्यक्तीला 'द्विज' असे म्हणतात.[१२] प्राचीन काळात गुरूकूल व आश्रमात शिक्षण दिल जात होते. पुढे आवश्यकतेनुसार बदल होवून मध्ययुगीन कालखंडातील शिक्षणाचा विचार करता शिक्षण हे मठ किंवा मंदिरामधून दिले जात होते. विशेषतः प्राथमिक शिक्षण गावातील सोयीनुसार बागेत किंवा झाडाखाली मुलांना बसवून दिले जात असे. या प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना शिक्षणक्रमात लेखन, वाचन, गणित इत्यादी विषयाचे ज्ञान देत असत. या विषयाचे ज्ञान अवगत झाल्यानंतर तर्कशास्त्र व्याकरण काव्य, इतिहास तत्त्वज्ञान, गणित, ज्योतिषशास्त्र, खगोलशास्त्र, वैद्यकशास्त्र इत्यादी विषय

शिकवले जात होते. याबरोबर थर्मिक शिक्षणात वेद, उपनिषदे, पुराणे आणि महाकाव्ये इत्यादी विषयाचे ज्ञान दिले जात होते.[१३]

भारतामध्ये सन १७६४ मध्ये बक्सारच्या लढाईने ब्रिटिशांनी भारतात पाया रोवला गेला आणि सन १७६५ च्या अलाहाबादच्या तहाने तो भक्कम केला. पण भारतातील ब्रिटीश ईस्ट इंडिया कंपनीने शिक्षणात उत्साह दाखविला नाही. मात्र सन १७९१ मध्ये ब्रिटीश गव्हर्नर रेसिडेंट डंकन यांनी हिंदूच्या धर्म, साहित्य आणि कायद्याचा अभ्यास करण्यासाठी बनारस येथे संस्कृत महाविद्यालय स्थापन केले. पण पुढे काही कारणास्तव बंद पडले. पुढे लॉर्ड वेलस्लीने सन १८०० मध्ये कंपनीच्या प्रशासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्याकरीता कलकत्ता येथे फोर्ट विल्यम कॉलेजची स्थापना केली.[१४] सन १८१३ च्या सनदी कायद्यामध्ये भारतात शिक्षणासाठी कंपनीने दरवर्षी एक लाख रूपये खर्च करावेत अशी तरतूद होती. पुढे ७ मार्च १८३५ रोजी भारतीयांना इंग्रजी शिक्षण देण्यासंबंधीचा कायदा लॉर्ड विल्यम बेंटिगने संमत केला. कारण लॉर्ड मेकॉलेच्या दृष्टिकोनानुसार भारतीयांना कंपनीसाठी कमी दर्जाच्या जागेवर काम करण्यासाठी करडया रंगाचे इंग्रज बनवायचे होते. याबरोबर कंपनी सरकारने युरोपियन साहित्याच्या उन्नतीकरीता प्रयत्न केला. याकरीता इंग्रजी माध्यमाचा वापर करण्यात आला. इंग्रजी शिक्षणाचा अधिक प्रसार झाला यात शंका नाही. परंतु भारतात सन १८३५ पर्यंत इंगजी शिक्षणाची सर्वंकष योजना तयार करण्यात आली नव्हती. पण १८४३ ते १८५३ या काळात वायव्य प्रांताचा गव्हर्नर जेम्स थॉम्सन याने मातृभाषेतून शिक्षण देण्यास पुढाकार घेतला. यावरील योजनेने शिक्षणाचा सर्वांगिण विकास केला. इंग्रज काळात प्राथमिक, माध्यमिक, उच्चमाध्यमिक, महाविद्यालय व विद्यापीठे अशा चढत्या क्रमाने शिक्षण संस्था अस्तित्वात आल्या. स्वातंत्र्यानंतर मात्र या शिक्षण संस्थात मोठया प्रमाणात विकास घडून आला.

**१) मलकापूरची शैक्षणिक स्थिती :–**

कोल्हापूर जिल्हयात सन १८४४ नंतर ब्रिटिश अमदानीत राबविलेल्या उदारमतवादी धोरणामुळे सर्वसामान्य लोकाचा शिक्षणाकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलू लागला. परंतु ब्रिटिशांचे शैक्षणिक धोरण प्रामुख्याने त्यांचा राज्यकारभार व प्रशासन चालविण्याकरिता उपयुक्त ठरेल असेच होते. प्रारंभीच्या या काळात फक्त उच्च वर्णीय विद्यार्थी असत. कोल्हापूर शहरात फक्त त्यावेळी एक मराठी व एक इंग्रजी शाळा होती. याशिवाय जिल्हयात पन्हाळा, आळते, शिरोळ,

कागल, बावडा, मलकापूर, गडहिंग्लज आणि भुदरगड या गावी सरकारी शाळा स्थापन करण्यात आल्या होत्या. त्यावेळी मराठी माध्यमाच्या शाळेमधून मासिक फी सहा पैसे आणि इंग्रजी शाळेमधून पन्नास पैसे ते एक रूपयांपर्यत फी होती.[१५] अशाप्रकारे मलकापूर याठिकाणी सन १८४४ साली शासकीय शाळा स्थापन झाली. या अगोदर मलकापूर गावातील विद्यार्थ्यांना गावाबाहेर जावून शिक्षण घ्यावे लागत होते. या गावातील मुलांना या शासकीय शाळेमुळे शिक्षणाची चांगली सोय झाली. कालांतराने मलकापूर शहराच्या शैक्षणिक विकासाकरीता रयत शिक्षण संस्थेने आपली एक शाखा येथे स्थापन केली. मलकापूरच्या शैक्षणिक विकासात रयत शिक्षण संस्थेचा मोठा वाटा आहे. परंतु मलकापूर नगरपरिषद प्राथमिक व माध्यमिक शाळा चालवित नाही. त्यामुळे माहिती निरंक आहे. पण नगरपालिका हद्दीतील प्राथमिक शिक्षण व्यवस्थापन कोल्हापूर जिल्हा परिषदेमार्फत चालविले जाते. मलकापूर नगरपरिषदेला प्राथमिक शिक्षणापोटी कर योग्य मूल्यांच्या एकूण पाच टक्के रक्कम जिल्हा परिषदेला द्यावी लागते. महाराष्ट्र शासनाच्या जीआरनुसर मुंबई प्राथमिक शिक्षण कायदा १९४९ नियम(१४३) (अ) प्रमाणे प्राथमिक शिक्षण वर्गणीवर अर्धा टक्का व्याज आकारणी जिल्हा परिषद करते. असे व्याज सन १९८१-८२ पासून भरावे असे दिनांक ७ जानेवारी १९८५ ला मलकापूर नगरपालिकेस पत्र आले. याकामी मा.जिल्हाधिकारी व जिल्हा परिषदेचे मुख्याधिकारी व प्रशासक याची विशेष सभा घेण्यात आली. त्यावेळी आर्थिक परिस्थितीनुसार हप्ता ठरवून देण्यात आला. यानुसार उदा. मलकापूर नगरपरिषदेने सन १९९१-९२ साली कर योग्य मूल्य ८,८२२३० रूपये वर्गणीच्या पाच टक्के करयोग्य मूल्यानुसार ४४१११ रूपये एवढी रक्कम कोल्हापूर जिल्हा परिषदेला देण्यात आली.[१६] अशाप्रकारे मलकापूर नगरपरिषदेमार्फत शहरात प्राथमिक शाळा चालविल्या जातात. या शिक्षणाच्या सेवा सुविधाकरिता नगरपालिका एकूण कराच्या रक्कमेपैकी पाच टक्के रक्कम ही जिल्हा परिषदेकडे जमा करते. या माध्यमातूनच मलकापूर शहरात प्राथमिक शाळा चालविल्या जात आहेत. पण या शाळावर नियंत्रण ठेवण्याकरिता नगरपालिकेत शिक्षण समिती स्थापून त्यावर तीन सदस्यांची नियुक्ती केली आहे. या यंत्रणेमार्फत मलकापूर शहरात प्राथमिक शाळेची सोय उपलब्ध करून दिली आहे. यामुळे शहराचा शैक्षणिक विकास होण्यास मदत झाली. याबरोबर इतर शैक्षणिक संस्थाचे कार्य देखील तेवढेच महत्त्वाचे आहे. मलकापूर

शहरातील विविध शिक्षण संस्थांचाही या घटकात आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांची माहिती खालीलप्रमाणे सविस्तरपणे देण्यात आली.

**२) मलकापूर माध्यमिक शाळा व श्रीमान जी.आर.वारंगे ज्युनिअर कॉलेज, मलकापूर :–**

मलकापूर शहरात ब्रिटिशांना सन १८४४ साली सरकारी शाळा सुरू केली. ब्रिटीश आमदानीत त्यावेळी मराठी माध्यमांच्या शाळेकरिता विद्यार्थ्यांना सहा पैसे मासिक फी पन्नास पैसे ते एक रुपयापर्यंत भरावी लागत होती. परंतु ही शाळेची फी गरीब गरजू विद्यार्थ्यांना भरणे शक्य नव्हते पण उच्चवर्गीय समाजातील विद्यार्थी ही फी भरत असे. या शाळेमध्ये फक्त उच्चवर्गीय लोकांच्या मुलांचा भरणाच या शाळेत होता. ब्रिटिश काळात शाळा हया उच्चवर्गीय पुरत्याच मर्यादित राहिलेल्या दिसून येतात. भारत देश स्वंतत्र झाल्यानंतर खऱ्या अर्थाने शिक्षणाची दारे सर्वसामान्य माणसांना खुली करण्यात आली. भारतीय स्वातंत्र्योत्तर काळात शिक्षण क्षेत्रात आणि धोरणात स्थित्यंतरे बदल होऊन शिक्षणाची गंगा वाहू लागली. यातून रयत शिक्षण संस्थेने सन १९५६ साली मलकापूरातील शिक्षणाची सर्व सूत्रे हाती घेतली. रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक कर्मवीर भाऊराव पाटील यांनी मलकापूर शहरास भेट दिली. त्यावेळी मराठी विद्या मंदिर समिती मलकापूरचे अध्यक्ष श्री.सदाशिव कोळवणकर यांच्याशी त्यांची भेट झाली. या दोघांमध्ये शिक्षणासंदर्भात सर्वांगिण चर्चा झाली. मराठी विद्यामंदिर या शाळेच्या इमारतीच्या बांधकामाकरीता श्री. सदाशिव कोळवणकर यांनी साडेतीन एकर जमीन शाळेस दान केली. याबरोबर केशव कुंभार यांनीही शाळेच्या इमारतीकरिता ०.१९ गुंठे एवढी जमीन शाळेसाठी दान केली.[१७] मलकापूर शहराच्या शैक्षणिक प्रगतीचा आढावा घेता. या शैक्षणिक दानशूर व्यक्तिचा नामोल्लेख होणे गरजेचे आहे. शहराच्या शैक्षणिक विकासात यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

मराठी विद्या मंदिर माध्यमिक शाळेच्या इमारतीमध्ये सन १९७६ पासून उच्च माध्यमिक (ज्युनिअर कॉलेज) शाळेचे वर्ग सुरू करण्यात आले. आज या माध्यमिक व उच्चमाध्यमिक शाळा व कॉलेजमध्ये शिक्षणासाठी मोठया संख्येने विद्यार्थी प्रवेश घेत आहेत. या शाळेतून शिक्षण घेतलेले बरेच विद्यार्थी सरकारी नोकरी वर्ग एकच्या पदावर विराजमान आहेत. उदा. डॉ.हरिश जगताप, (डींल एुशलींळींश`षषळलशी, घेश्रहर्रीी) श्री सुरेश पाटील(ऋब्षापशीरश्र चरपरसशीक्ष ीवळपर्रीपलश षरलींी, ढीळलहरपररिश्रळ), श्री हरिश्चंद्र पाटील(चरपरसशी छरलरीव) इ. या बरोबर या शाळेतील अनेक विद्यार्थी शासकीय आणि निमशासकीय सेवेत काम करतात. यामध्ये बरेच

विद्यार्थी डॉक्टर, पोलिस, पोलिस सबइन्स्पेक्टर, आर्मी, शिक्षक, प्राध्यापक आणि वकील इ. विविध पदाचा कार्यभार सांभाळत आहेत आणि खाजगी क्षेत्रातील कंपन्यातही चांगल्या पदावर आहेत. या शाळेने मलकापूर शहराचा शैक्षणिक सर्वांगिण विकास केला आहे.

**३) कन्या विद्या मंदिर मलकापूर :–**

मलकापूर शहरात ही एक ऐतिहासिक वास्तू आहे. या कन्या विद्या मंदिराच्या माध्यमातून अनेक विद्यार्थिनींच्या जीवनात ज्ञानाचा प्रकाश पाडला ती मलकापूरची कन्या शाळा होय. ही कन्या शाळा १२५ वर्षाचा इतिहास घेऊन अभिमानाने आजही उभी आहे. ब्रिटिशांच्या राजवटीत विशाळगडचे जहागिरदार आबासाहेब पंतप्रतिनिधी यांनी सन १८८४ मध्ये शाहूवाडी तालुक्यात मलकापूर याठिकाणी पहिली मुलींची शाळा सुरू केली. यावरून आबासाहेब पंतप्रतिनिधींच्या मलकापूरच्या कन्यांना मिळालेले वरदान होय आणि त्याचे चीज झाल्याचे अनेक विद्यार्थीनींनी दैनिक केसरीशी बोलताना व्यक्त केले होते.

५ सप्टेंबर म्हटलं की शिक्षण दिन नजरेसमोर येतो. पण त्याचबरोबर जिच्या पायऱ्या चढून आपण आपल्या वडिलांचे बोट धरून शाळेत गेलो. त्या जुन्या चार भिंतीच्या आत ज्ञानाने धडे घेतले. त्याच शाळेत आपण आज ज्ञानाचे धडे देत आहोत. हाच केवढा मोठा लाख मोलाचा किताब आहे. कोल्हापूर जिल्हयात एक आदर्श शाळा म्हणून या शाळेला पुरस्कार प्राप्त झाला आहे. महाराष्ट्र शासनाचा आदर्श शिक्षक पुरस्कार याच शाळेतील कै.व.दा.तांदळे आणि कै.वि.ग.भिडे या गुरूजींना मिळाला. तसेच जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कार श्रीमती सि.ना.रायकर, श्रीमती पु.ह.बांगीकर, श्री.ग.तु.पाटील यांना मिळाला. या शाळेची पट नोंदीची असणारी भरारी आजअखेर सुद्धा कायम राखत तत्कालीन शिक्षक विनायक हिरवे यांनी उत्कृष्ट पट नोंदणीचा पुरस्कार मिळवून दिला. अशा इतिहासाची साक्षीदार इमारत आजही दिमाखात उभी राहून आपल्या ज्ञानाच्या भिंतीतून ज्ञान घेवून आकाशी भरारी घेणाऱ्या पाखरांना आशिर्वाद आणि बळ देत आहे. आजही या शाळेने आपली यशस्वी परंपरा जपली असून प्राथमिक मुलीची शाळा असल्याचा सार्थ अभिमान मलकापूरवासीयांना वाटतो. आज या शाळेत आपल्या मुलींना पाठवताना आई वडिलांचा ऊर भरून येतो. कारण अनेकजणी आज कोणत्या ना कोणत्या क्षेत्रात सुखी, समाधानी जीवन जगत आहेत. ते जगत असताना आपल्या शाळेविषयीची सतत आदराची आणि जिव्हाळयाची भावना व्यक्त करत आहेत.[१८]

अशाप्रकारे या शाळेला १ जानेवारी २००९ रोजी १२५ वर्षे पूर्ण झाली. म्हणून या शाळेचा रौप्य महोत्सव साजरा केला. या महोत्सव कार्यक्रमावेळी शाळेत विविध स्पर्धा घेण्यात आल्या. त्यामध्ये रांगोळी, निबंध, भाषण आणि शिकवणे इ. स्पर्धा घेतल्या. या स्पर्धेतील विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आली. या शाळेने मलकापूर शहरातील स्त्रियांची शैक्षणिक स्थिती सुधारण्यास हातभार लावला आहे. या कन्यामंदिर शाळेमुळे मलकापूरचा शैक्षणिक कायापालट होण्यास मदत झाली आहे.

**४) न्यू इंग्लिश स्कूल फॉर गर्ल्स मलकापूर :-**

कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या रयत शिक्षण संस्थेच्या कृतीतून सन १९६७ मध्ये मलकापूर याठिकाणी स्वतंत्र मराठी माध्यमाची न्यू इंग्लिश स्कूल फॉर गर्ल्स शाळा स्थापन केली. त्यासाठी मराठी शाळेची समिती नेमण्यात आली. सन १९८८ मध्ये या शाळा इमारत बांधकामाकरीता ८१ आर जमीन दान मिळाली. मलकापूर ग्रामस्थांच्या मदतीने या शाळा इमारतीचे बांधकाम पूर्ण करण्यात आले. या शाळेचा नेहमी चांगला निकाल लागत आहे. तसेच या शाळेतील विद्यार्थींनी सामाजिक उपक्रमामध्येही भाग घेत आहेत. उदा. तात्कालीन मलकापूर नगरपरिषदेचे नगराध्यक्ष सौ.ज्योती शिरगांवकर यांच्या अध्यक्षतेखाली सन २००७ मध्ये न्यू इंग्लिश स्कूल फॉर गर्ल्स स्कूल मधील नववीच्या विद्यार्थीनींमार्फत ‘स्वास्थ्य अभियान’ राबवले होते. त्यावेळी मलकापूर शहराची स्वच्छता करण्यात आली.[१९] या शाळेचाही मलकापूरच्या शैक्षणिक विकासात आणि शहर स्वच्छतेच्या दृष्टिकोनातून मोलाचा वाटा आहे.

**५) प्रा.डॉ.एन.डी.पाटील महाविद्यालय, मलकापूर :-**

महाराष्ट्र शासनाने दिनांक ४ जून १९९२ रोजी पत्र क्रमांक एन.जी.सी.३५९१/ ४६३८/विशि-२ नुसार मलकापूर येथे रयत शिक्षण संस्थेच्या कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयास मान्यता दिली.[२०] महाविद्यालय प्रा. डॉ.एन. डी.पाटील यांच्या प्रेरणेतून आणि श्री. राऊ धोंडी पाटील यांच्या सहकार्यातून मलकापूर याठिकाणी प्रथम ‘आर्टस, कॉमर्स व सायन्स कॉलेज’ स्थापन झाले. सुरूवातीला या नावाने हे कॉलेज प्रचलित होते. मलकापूरातील लोकांनी या कॉलेजच्या कामकाजाकरिता जागा उपलब्ध करून दिली. नंतर महाविद्यालयात होवून गेलेल्या विश्वासू प्राचार्यांनी सर्वोत्कृष्ट असे इमारतीचे बांधकामपूर्ण केले. मलकापूर येथील स्थानिक कॉलेज व्यवस्थापन समितीतील लोकांनी एकमताने या

महाविद्यालयाला प्रा.डॉ.एन.डी. पाटील यांचे नाव देण्याचे ठरवले. पुढे आर्टस, कॉमर्स व सायन्स कॉलेजचे नामाभिधान प्रा.डॉ.एन.डी.पाटील असे करण्यात आले. या कार्यक्रमप्रसंगी अध्यक्ष निळू फुले आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठ, औरंगाबादचे कुलगुरू डॉ.नागनाथ कोत्तापल्ले इ.प्रमुख पाहुणे हजर होते.[२१]

या महाविद्यालयाच्या तीनही विभागात म्हणजे आर्टस, कॉमर्स आणि सायन्स इत्यादी विभागाच्या माध्यमातून मोठया प्रमाणात मलकापूर आणि सभोवतालच्या परिसरातील विद्यार्थी शिक्षणासाठी या महाविद्यालयात. प्रवेश घेत आहेत. याठिकाणी शिक्षण घेतलेले बरेच विद्यार्थी शासकीय व निमशासकीय क्षेत्रात काम करत आहेत. मलकापूरातील तरूण तरूणींना उच्च शिक्षण देण्यात महत्वपूर्ण कार्य केले आहे. या शिक्षण संस्थामुळे मलकापूर परिसरात साक्षरतेच्या प्रमाणात वाढ झाली आहे. या झालेल्या शैक्षणिक विकासामुळे लोकांचा सर्वांगिण विकास आणि सामाजिक आर्थिक व सांस्कृतिक स्थिती सुधारण्याकरिता मदत झाली.

## ४. आरोग्यविषयक कार्य :-

प्राचीन काळात आयुर्वेदाच्य आधारे वैद्यकशास्त्र हे रोगचिकित्सा आणि रोगोपचार करत असत. भारद्वाज यांचे शिष्य धन्वंतरी आणि आत्रेय यांना आयुर्वेदाचे आद्य प्रवर्तक समजतात. धन्वंतरीने शल्यचिकित्सा तंत्राचा प्रसार केला आणि आत्रेय यांनी भिषग्विदयेचा प्रसार केला. धन्वंतर यांचा शिष्य सुश्रुत यांनी सुश्रुतसंहिता लिहिली. तसेच आत्रेय याचा शिष्य अग्निवेश व त्यांचा शिष्य चरक यानी वैदिक कालखंडामध्ये वैद्यकशास्त्राला महत्त्व प्राप्त झाले. या काळात आश्विनीकुमार वैद्य नावारूपास आले होते. कारण त्यावेळी ते दुर्धर आजारही बरे करीत होते. पूर्वी नाडीपरीक्षणावरून रोगाचे निदान करत असत. आजारावर औषधोपचार करण्याकरीता नैसर्गिक हर प्रकारच्या वनस्पतीची मुळे, साली आणि खनिज द्रव्याचा रस व भस्म म्हणून वापर करत. उदा.सुवर्ण भस्म, मौखिक भस्म, प्रवाळ भस्म, लोह भस्म इ.मध्ययुगीन काळात मोगल साम्राज्याचा उदय झाल्यानंतर 'युनानी' औषधोपचार पद्धतीचा प्रसार झाला. औषधोपचार करणाऱ्यांना मध्ययुगीन काळात 'हकीम' असे म्हणत. पुढे ब्रिटिशांची राजवट भारतात प्रस्थापित झाल्यानंतर पाश्चिमात्य वैद्यकशास्त्राचा प्रसार होवू लागला. याच वैद्यकशास्त्राचा मोठया प्रमाणात भारतात वापर होत असल्याचे दिसून येते. या धरतीवर आधारित कोल्हापूरात सन १८४७ साली पहिला दवाखाना स्थापन झाला. सन १८८३ मध्ये या दवाखान्याची नवीन

इमारत बांधून त्यास 'अलबर्ट' असे नाव देण्यात आले. सध्या हा दवाखाना 'छत्रपती प्रमिलाराजे हॉस्पिटल'(सीपीआर) या नावाने ओळखला जातो.[२२]

अशाप्रकारे मलकापूर शहराच्या आरोग्याच्या दृष्टिकोनातून आढावा घेतला असता असे दिसून येते की, पूर्वी मलकापूरातील आजारी रोगी लोकांना वैद्यामार्फत औषधोपचार केला जात होता. जर रूग्ण गंभीर आजाराचा असेल तर हे वैद्य निसर्गातील निरनिराळ्या व विशिष्ट आजारावर गुणकारक असलेल्या झाडाच्या मुळ्या व सालीपासून तयार केलेला 'काढा' रूग्णांना देत असत. त्यास ङ्कमंत्राङ्क असे म्हणत. पूर्वी पश्चिम घाट हा जडीबुटी औषधी वनस्पतीसाठी प्रसिद्ध होता. याठिकाणी नैसर्गिक वनस्पती भरपूर प्रमाणात तर काही दुर्मिळ वनस्पती औषधोपचाराकरिता उपलब्ध होत असत. पूर्वी साथीचे रोग मोठया प्रमाणात हिवताप, प्लेग, देवी इत्यादी येत होते. मात्र त्यावर कमी प्रमाणात औषधोपचार उपलब्ध व्हायचा. या साथीच्या रोगामुळे लोक मोठया प्रमाणावर मृत्यूमुखी पडत असत. पूर्वी या रोगाने गावेच्या गावे नष्ट झाली. आरोग्याच्या दृष्टिकोनातून मलकापूर नगरपरिषदेचा विचार केला असता. मलकापूर शहरात नगरपालिकेच्या मालकीचा एकही दवाखाना नाही. नगरपालिका हद्दीत जिल्हा परिषदेचे प्राथमिक आरोग्य केंद्र आहे. या आरोग्य केंद्राच्या माध्यमातून शहरातील वाढत्या लोकसंख्येला मूलभूत सेवा सुविधा उपलब्ध करून देण्याबरोबर जिल्हा परिषद आरोग्याच्या दृष्टीने योग्य त्या सुविधा पुरवित आहे. साथीच्या रोगाचे नियंत्रण, कुटुंब नियोजन, बाल आरोग्य, कुष्ठरोग, अंधत्व निवारण इत्यादी बाबतीत जिल्हा परिषदेने महत्त्वाची भूमिका बजावली आहे. मलकापूर शहरात उद्‌भवलेल्या साथीच्या रोगाचे नियंत्रण करण्यासाठी आणि ग्रामीण लोकांचे आरोग्य चांगले ठेवण्यासाठी कोल्हापूर जिल्हा परिषदेने महत्त्वपूर्ण कार्य केले आहे.

**१) संसर्गजन्य साथीचे रोग :-**

पूर्वी गावा-गावामध्ये साथीचे रोग येत असत. या रोगाने अनेक लोकांचा बळी जात होता. कारण अस्वच्छता, अपुरा औषधांचा पुरवठा आणि मर्यादित आरोग्य विषयक सेवा सुविधा होत्या. त्यामुळे पूर्वी या रोगाचा प्रादुर्भाव जास्त प्रमाणात होता. सन १९३२ साली मलकापूर परिसरात विषमज्वराची साथ आली होती. या साथीच्या रोगाने येथील लोक ताप, सर्दी, खोकला, हागवण लागणे(डिसेंट्री), हिवताप, मलेरिया, टाईफॉईड इत्यादी आजाराने त्रस्त झाले होते. तत्कालीन परिस्थितीचा विचार करता, सन १९३२ या वर्षी मलकापूर नगरपालिकेने

या साथीच्या रोगाचा फैलाव प्रतिबंध करण्यासाठी कोल्हापूर जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्याकडे पाठपुरावा केला होता.[२३] तसेच सन १९४९ मध्ये विशाळगड जहागिरी परिसरात 'टॉयफाईड' ची साथ आली होती. त्यावेळी येथील लोकांना मोठया प्रमाणात त्वचा रोग झाला. उदा. गजकर्ण आणि त्वचेची खाज इत्यादी याबरोबर लोकांना खोकला, सर्दी, गॅस्ट्रो, ताप आणि डोकेदुखी इत्यादी आजाराशी, सामना करावा लागला. या आजाराने बरेच लोक मृत्यूमुखी पडले होते. साथीचे रोग निर्मूलन योजना सन १९७२ पासून सुरू आहे. कोल्हापूर जिल्हा परिषदेने १९७२ ते २०१० या कालावधीत वेगवेगळया साथीच्या रोगाच्या निर्मूलनाचा मलकापूर शहरातील एकूण १७४० लोकांना याचा लाभ दिला आहे.[२४]

पूर्वी साथीचे अनेक रोग येत. त्यामध्ये कॉलरा, अतिसार, गॅस्ट्रो,हगवण, हिवताप, विषमज्वर, डेंग्यू, प्लेग, देवी, गोवर, धनुर्वात, पोलिओ, डांग्या खोकला आणि घटसर्प इ.रोगांचा समावेश होता. या रोगामुळे अनेक लोक मृत्यूमुखी पडत असल्याने आरोग्य विभागामार्फत नियंत्रण केले जाते. जिल्हा स्तरावरून वैद्यकीय अधिकारी विस्तार अधिकारी, गटविकास अधिकारी आणि आरोग्य सहाय्यक यांच्या मासिक सभेत वेळोवेळी आढावा घेतला जातो. यादृष्टीने जिल्हा परिषदेतील आरोग्य विभाग हा ग्रामीण लोकांच्या आरोग्यासाठी वरदान ठरला आहे.

**२) जन्म, मृत्यू नोंदणी कार्यक्रम : –**

जन्म आणि मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ नुसार  आपल्या देशात जन्म आणि मृत्यू नोंदणी पद्धत समान, व्यापक आणि वैधानिक तरतूदीच्या  आधारावर कार्यान्वित आहे. या अधिनियमानुसार जन्म, मृत्यू, मृत जन्माची (उपजत मृत्यू) नोंद करणे बंधनकारक आहे. विशेषतः मलकापूर नगरपालिकेने जन्म मृत्यू आणि उपजत मृत्यू या तीनही बाबीकरीता एकच रजिस्टर ठेवले आहे. प्रत्येक बाबीकरीता एक वेगळे रजिस्टर ठेवणे आवश्यक आहे. मोठया नगरपरिषदेकडून नमुना मागवून तरतूद केली आहे.[२५]

नाव नोंदणी करणे आपले प्रथम कर्तव्य आहे. शाळेत प्रवेश घेणे. नोकरी मिळविणे, विमा उतरविणे, विवाहाचे वय, मतदानाचा हक्क, जन्मस्थानाचा पुरावा, वयाचा दाखला आणि रेशन कार्डसाठी जन्म नोंदणी महत्त्वाची आहे. तसेच निवृत्ती किंवा विम्याची रक्कम मिळविणे, वारसा हक्क प्रस्थापित करणे आणि मृत्यूच्या कारणांचे विश्लेषणात्मक संशोधन करणेसाठी मृत्यू

नोंदणी महत्त्वाची असते लिंग गुणोत्तर संनियंत्रणासाठी लागणारी जन्म–मृत्यू नोंदणी ही शहरात नगरपालिका व महानगरपालिका कार्यालयात करून ठेवली जाते.

### ३) राष्ट्रीय कुटुंब कल्याण कार्यक्रम :–

सन १९६३ पासून ही योजना सुरू करण्यात आली. या योजनेचे कार्य शहरी व ग्रामीण भागामध्ये चालत होते. कोल्हापूर जिल्हा परिषदेने या योजनेचा लाभ लाखो लोकांना उपलब्ध करून दिला आहे. कोल्हापूर जिल्हा परिषद या योजनेत अग्रेसर आहेच. पण मलकापूर नगरपरिषदेचे कार्य देखील वाखण्याजोगे आहे. 'कुटुंब लहान तर सुख महान' हा मंत्र आता सर्वसामान्य नागरिकांना पटला असून शहरी विभागाप्रमाणे ग्रामीण भागात ही कुटुंब नियोजनाला वाढता पाठिंबा मिळत आहे. सदर योजना जिल्हयातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रे व उपकेंद्राच्या स्तरावरून राबविली जाते.

कुटुंब नियोजनाच्या कायम आणि तात्पुरत्या अशा दोन प्रचलित पद्धती आहेत. कायम पद्धतीमध्ये स्त्री टाका नसबंदी शस्त्रक्रिया, बिनटाका स्त्री नसबंदी शस्त्रक्रिया आणि पुरूष नसबंदी (एन.एस.व्ही.) शस्त्रक्रिया हया तीन पद्धतीचा अवलंब केला जातो. शस्त्रक्रिया करून घेणाऱ्या दारिद्रय रेषेखालील लाभार्थीस रु.६०० व इतर स्त्री लाभार्थीस रु.२५० मोबदला दिला जातो. तसेच या पद्धतीमध्ये कुटुंब नियोजनास पात्र पुरूषावर बिनटाका पुरूष नसबंदी शस्त्रक्रिया करण्यात येते. पुरूष नसबंदी शस्त्रक्रिया करणाऱ्यास राज्य शासनातर्फे रू. ३५१ व केंद्र शासनातर्फे रू.११०० असा एकूण रू. १४५१ मोबदला दिला जातो. तात्पुरत्या पद्धतीत दोन मुलांमध्ये पाळणा लांबविण्यासाठी तांबी बसविणे आणि ओरल पिल्स निरोध वापरणे हया पद्धतीचा समावेश होतो. विवाहीत जोडप्यांना लग्नानंतर उशीरा मूल हवे असल्यास किंवा दोन मुलामध्ये अंतर ठेवावयाचे असल्यास या पद्धतीचा वापर करतात. तांबी हे इंग्रजी टी आकाराचे छोटे साधन असून स्त्रीच्या गर्भाशयात बसविले जाते. तांबी गर्भाशयात २ ते ३ वर्षे ठेवली जाते. याबरोबर मात्र स्त्रीस गोळया देऊन तीन वर्षे पाळणा लांबविता येतो.

अशाप्रकारे मलकापूर शहरात जिल्हा परिषदेच्या प्राथमिक आरोग्य केंद्रातून विविध उपक्रम राबविले जातात. परिषदेमार्फत कुटुंब कल्याण कार्यक्रम राबविला जातो. पण नगरपरिषदेलाही कुटुंब नियोजनासंदर्भात काही उद्दिष्टे ठरवून दिली होती. सन १९८३ मध्ये शस्त्रक्रियेसाठी ५४ चे उद्दिष्ट दिले आणि साध्य केलेली शस्त्रक्रिया ३८७ एवढी होती. तांबी

बसविण्याचे उद्दिष्ट ५५ होते. ते साध्य ३६४ एवढे केले. सन १९८४ मध्ये शस्त्रक्रिया करण्याचे उद्दिष्ट ५० होते. ते साध्य २७ एवढे झाले आणि तांबी बसविण्याचे उद्दिष्ट ७० होते. ते साध्य ३९ एवढे झाले. सन १९८५ साली शस्त्रक्रिया उद्दिष्ट ५५ हाते. ते साध्य १०७ झाले आणि तांबी बसविण्याचे उद्दिष्ट ६० होते. ते साध्य ६० एवढे झाले. राष्ट्रीय कुटुंब कल्याण कार्यक्रमाची ठरवून दिलेली उद्दिष्टे मलकापूर नगरपालिकेने वेळोवेळी पूर्ण केली होती. सन १९८१-८२ मध्ये मलकापूर नगरपालिकेने चांगल्या केलेल्या कार्याबद्दल फिरती ढाल व रोख रक्कम २०,००० चे बक्षीस मिळाले होते.[२६] वरील माहिती पाहता नगरपालिकेने उद्दिष्टापेक्षा जादा काम करून राष्ट्रीय कार्यास हातभार लावला आहे. तसेच वरील सर्व सेवा शासकीय दवाखान्यात मोफत मिळते. जन्माचे दरहजारी प्रमाण कमी करून लोकसंख्या वाढीवर नियंत्रण ठेवणे हा या योजनेचा प्रमुख उद्देश आहे. ही योजना जन व देशहितकारक असल्याने या योजनेची माहिती नगरपालिका कार्यालयाकडून जनतेला वेळोवेळी दिली जाते.

**४) राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रम :-**

या कार्यक्रमातंर्गत प्रत्येक जिल्हयामध्ये जिल्हा क्षयरोग नियंत्रण केंद्र स्थापन करण्यात आले. या केंद्रामार्फत 'क्ष' किरण परीक्षा, थुंकी तपासणी इत्यादी चाचण्यांची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. समाजातील क्षयरोगाचे प्रमाण कमी करणे हे या कार्यक्रमाचे मुख्य उद्दिष्ट आहे. जिल्हयातील प्राथमिक आरोग्य केंद्रातून ग्रामीण रूग्णालयामार्फत रूग्णांचा शोध घेवून त्यांच्यावर मोफत औषधोपचाराची व्यवस्था केली जाते. हा कार्यक्रम देशभरात राबविण्यास केंद्र व राज्य शासनामार्फत सर्वतोपरी प्रयत्न केले जातात. या कार्यक्रमाकरिता शासनाकडून भरीव अशी निधीची तरतूद असल्याने या रोगाचा देशभरातून उच्चाटन होण्यास मदत झाली आहे.

**५) सावित्रीबाई फुले कन्या कल्याण योजना कार्यक्रम :-**

ही योजना सन २००२-०३ पासून राज्यात सुरू आहे. ही योजना प्राथमिक आरोग्य केंद्रातून राज्यभरात सर्व ठिकाणी राबविली जाते. सावित्रीबाई फुले कन्या कल्याण पारितोषिक योजनेअंतर्गत दारिद्र्य रेषेखालील जोडप्यांनी मुलगा नसताना केवळ एक किंवा दोन मुलींच्या जन्मानंतर कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करून घेतल्यास त्यांच्या मुलींकरिता विशेष प्रोत्साहन दिले जाते. या योजनेअंतर्गत महाराष्ट्र शासनाकडून एका किंवा दोन मुलीनंतर शस्त्रक्रिया

केलेल्या व्यक्तीस रू.२००० चे एका मुलीच्या नावे रू.८००० चे आणि दोन मुलींच्या प्रत्येकी रू. ४००० चे राष्ट्रीय बचत प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येते. समाजातील सामाजिक समतोलपणा राहण्याकरीता ही योजना अतिशय चांगली आहे.

**६) राष्ट्रीय हिवताप निर्मूलन कार्यक्रम :–**

सन १९५८ पासून राष्ट्रीय हिवताप निर्मूलन कार्यक्रम सुरू करण्यात आला. केंद्र व राज्य सरकारतर्फे ५०:५० या प्रमाणात जिल्हा हिवताप अधिकारी यांच्यामार्फत केला जातो. हिवतापाचा प्रादुर्भाव हा प्लासमोडियम नामक परोपजीवी जंतूमुळे होतो. या रोगाचा प्रादुर्भाव ॲनाफेलिस जातीच्या मादी डासापासून होतो. शहरी भागात इतर अन्य रोगांपेक्षा मलेरियाचा प्रादुर्भाव सर्वाधिक आढळून येतो. हिवताप प्रसारक्षम डासाचे नियंत्रण करण्यासाठी परिषदेच्या आरोग्य विभागामार्फत आणि मलकापूर नगरपालिकेमार्फत शहरात डीडीटी व मॅलेथिऑन या जंतूनाशकांची फवारणी मोफत केली जाते.

**७) राष्ट्रीय हत्तीरोग नियंत्रण कार्यक्रम ः–**

सन १९६३ पासून राष्ट्रीय हत्तीरोग नियंत्रण कार्यक्रम राबविला जातो. क्युलेक्स जातीच्या डासांमुळे हत्तीरोगांचा फैलाव होतो. या आजारपणात प्रथम ताप येतो. नंतर सूज येते. अशी सूज मुख्यतः हात, पाय व जननेद्रिंयावर होते. या रोगाचा प्रतिबंध करण्यासाठी सदर योजनेवर राज्यशासनाकडून खर्च केला जातो. मलकापूर शहरातील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक आरोग्य केंद्रामार्फत हत्तीरोगाच्या रूग्णांना 'डीईसी' च्या गोळयामार्फत दिल्या जातात. डबक्यामध्ये साचलेल्या पाण्यामधून डासांची उत्पत्ती मोठया प्रमाणात होते. म्हणून आरोग्य विभागामार्फत डासांच्या अळया, कोष नष्ट करण्याकरिता फवारणीची मोहीम राबविली जाते. अशा प्रकारे या प्राथमिक आरोग्य केंद्राच्या माध्यमातून प्रजनन व बाल आरोग्य कार्यक्रम, राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रम, राष्ट्रीय अंधत्व निवारण कार्यक्रम आणि इतर कार्यक्रम आरोग्याच्या दृष्टिकोनातून राबविले जातात. या आरोग्य विभागामुळे मलकापूर शहरातील लोकांचे जीवनमान सुधारण्यास मदत झाली आहे.

**८) प्राथमिक आरोग्य केंद्र मलकापूर ः–**

कोल्हापूर जिल्हा परिषदेच्या माध्यमातून ग्रामीण भागातील लोकांच्या आरोग्याच्या दृष्टिकोनातून अनेक ठिकाणी ग्रामीण रूग्णालये जिल्हयात सर्वत्र स्थापन केली आहेत. शासन निर्णय क्रमांक शा.नि.क्र.आर.एच.एल. १०८५१२९७ सी.आर.४९ आरोग्य दि.२५ मार्च १९८६ च्या जीआर नुसार जिल्हा परिषदेने मलकापूर याठिकाणी १ एप्रिल १९८६ रोजी 'ग्रामीण रूग्णालय' प्रत्यक्ष कार्यान्वित केले. हे रूग्णालय ३० खाटांचे असून, मलकापूर नगरपरिषद आणि शेजारी ८ प्राथमिक आरोग्य केंद्र यांना आरोग्यसेवा पुरवित आहे. या दवाखान्यात एक वैद्यकीय अधिकारी आणि इतर २० नोकरवर्ग या ठिकाणी आरोग्य सेवेसाठी कार्यरत आहे. सन २०११ च्या जनगणनेचा विचार करता मलकापूर शहराची लोकसंख्या ५७७२ एवढी असून पैकी ३५५६ पुरूष आणि २२१६ स्त्रिया आहेत. या लोकांना आरोग्याच्यादृष्टीने येथील ग्रामीण प्राथमिक आरोग्य केंद्राचा फायदा होताना दिसत आहे.[२७] हा दवाखाना निसर्ग संपन्न वातावरणात बांधला आहे. हा दवाखाना इमारतीचे बांधकाम दगडामध्ये आहे. या आरोग्य केंद्रामध्ये सेवा–सुविधाकरिता तीन विभाग रूग्णांसाठी कार्यरत आहेत.

या आरोग्य केंद्रातून रूग्णांसाठी विशिष्ट अशा सेवा–सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. त्यामध्ये केस पेपर विभाग, औषध, गोळया पुरवठा विभाग, रक्त, लघवी चेक विभाग, क्षय किरण कक्ष, डिलीवारी (बाळंतपण) कक्ष, कुत्र्यांचे व सापाचे इंजेक्शन कक्ष डोक्याची तपासणी कक्ष, ऑपरेशन विभाग आणि रूग्णवाहिका कक्ष इत्यादी विभागाच्या माध्यमातून रूग्णांना आरोग्य विषयक सेवा सुविधा पुरविल्या जातात. या दवाखान्यातून एच.आय.व्ही. ची तपासणी करण्याची सुविधा उपलब्ध आहे. या रूग्णालयामार्फत ग्रामीण भागात केंद्र व राज्यशासनाच्या आरोग्यविषयक विविध योजना राबविण्याबरोबर नवीन उपक्रमही राबविले जातात. शाळेतील विद्यार्थ्यांची आरोग्य विषयक तपासणी केली जाते. मातेच्या सुरक्षिततेसाठी नियोजन करत असत. सार्वजनिक कार्यक्रमातून रक्तदान शिबीराचेही आयोजन करतात. मलकापूर शहरातील लोकांच्या आरोग्याच्या दृष्टिकोनातून असे वेगवेगळे कार्यक्रम घेवून आरोग्य केंद्रामार्फत आरोग्यविषयक लोकांना उदबबोधन केले जाते. प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये किरकोळ आजारापासून ते कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेपर्यत इत्यादी अनेक आजारावर मोफत औषधोपचाराची सोय झाल्याने ही केंद्रे ग्रामीण भागातील लोकांसाठी फारच उपयुक्त आहेत. अशाप्रकारे शासनाने वेळोवेळी जाहीर केलेल्या आरोग्यविषयक धोरणामध्ये कुटुंब नियोजन

आणि लसीकरण इत्यादी उद्दिष्टे या सरकारी आरोग्य संस्थामार्फत पूर्ण केली जात आहेत. यासाठी जिल्हा परिषदेने अनेक योजना चालू करून मलकापूरच्या आरोग्य विकासात भर घातली आहे.

### ९) मलकापूरातील खाजगी दवाखाने :-

मलकापूर संदर्भातील ऐतिहासिक कागदपत्राची पहाणी केली असता. पूर्वी होमीओपॅथिक खाजगी दवाखान्याची सोय नव्हती, पण आयुर्वेदिक दवाखान्याची सोय असल्याचे दिसून येते. परंतु ब्रिटिश राजवटीत भारतावर पडलेला पाश्चिमात्य ज्ञानाचा प्रभाव त्यातूनच पाश्चिमात्य वैद्यकशास्त्राचा प्रसार झाला. या वैद्यकशास्त्राच्या विकासातून अनेक डॉक्टर, दवाखाने यांचा उदय झाला. आरोग्याच्या दृष्टीने या विभागाने देशभरातील लोकांना खाजगी व शासकीय सेवा सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. अशाच पद्धतीने शासकीय दवाखान्याव्यतिरिक्त मलकापूरातील लोकांच्या आरोग्याकरिता १६ खाजगी दवाखाने कार्यरत आहेत. या खाजगी दवाखान्यात बी.ए.एम.एस. चे शिक्षण पदवी घेतलेल्या डॉक्टरामध्ये डॉ. भारत पाटील, डॉ.मनोहर पाटील, डॉ.बसरे, डॉ.सुशांत यादव, डॉ.ठाणेकर, डॉ.संजय गांधी डॉ.आंबिके, डॉ.कुलकर्णी आणि डॉ.मांगळेकर इत्यादीचा समावेश होता. एम.बी.बी.एस. ची पदवी घेतलेल्या डॉक्टरामध्ये दोन डॉक्टरांचा समावेश आहे. सर्दी, ताप, खोकला, थंडी इत्यादी साथीचे आजार, संसर्गजन्य आजार, लसीकरण आणि कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया इत्यादी आजारावर उपचार घेण्याकरीता मलकापूरातील लोक या खाजगी दवाखान्यामध्ये जातात.[२८]

### १०) आयुर्वेदीक औषधालय :-

मलकापूर येथे होमीओपॅथिक दवाखाना व मेडीसीन व्यतिरिक्त शहरात आयुर्वेदीक औषधालय आहे. या ठिकाणी फार पूर्वीपासून हे औषधालय परंपरेनुसार सुरू आहे. मलकापूर शहरात आयुर्वेदिक औषधाकरिता ‘मोटाळा’ प्रसिद्ध आहे. या भागात जंगल व डोंगरमाथ्यावर आयुर्वेदिक औषधी वनस्पती विपुल प्रमाणात आहेत. या जंगल व डोंगर माथ्यावरील वनस्पतीच्या मुळी व झाडपाल्यापासून धनगरी लोक विविध शारीरिक आजारावर आयुर्वेदीक औषधे देतात. त्यास ‘मोटाळा’ असे म्हणत. धनगरी लोक हे औषध परंपरेनुसार देत असत. कारण या भागात धनगर समाज मोठया संख्येने आहे. या समाजाचा मुख्य व्यवसाय मेंढीपालन आहे. या व्यवसायावर आधारित कुटुंबांचा उदरनिर्वाह चालतो. हे धनगर लोक मेंढयांना

चरण्यासाठी दिवसभर सर्वत्र घेवून फिरत असतात. या मेंढी राखणाऱ्यांचा जाईल तेथे मुक्काम असतो. त्यामुळे त्यांना रानोमाळातील सर्व वनस्पतीची विविध आजारावरील गुणकारी आयुर्वेदिक औषधाची माहिती ज्ञात आहे. तसेच त्यांना वाडवडिलांकडून याविषयी माहिती मिळाली आहे. मेंढपाळ करणारा मेंढकरी विविध वनस्पतीच्या मुळाची, झाड, पाले इत्यादी जमवून वाळवून ठेवतो आणि हे तयार केलेले आयुर्वेदीक औषध विविध आजारावर देत असतात. सांधेदुखी कंबरदुखी, गुडघेदुखी, आयुर्वेदीक आणि मोडलेले हाड दुरूस्तीकरिता, मुतखडा, मुळव्याध आणि त्वचारोग इत्यादी अनेक आजारावर धनगर वाडयात आयुर्वेदिक औषध उपलब्ध करून देतात. त्यास ङ्कमोटाळाङ्क असे म्हणतात. या औषधांची कमीतकमी किमंत वीस रूपये आहे. हे औषध मलकापूरातील कोणत्याही दुकानात उपलब्ध होते. एका दुकानातून दिवसाकाठी या औषधाची दहा पाकिटे विकली जातात. शहरातील सर्व दुकानातून सरासरी २०० पाकिटे विकली जातात.[२९]

अशाप्रकारे प्रत्येक औषधाचे पाकिट २०० ग्रॅम वजनाचे आहे. मलकापूर हे आयुर्वेदिक औषधासाठी प्रसिद्ध आहे. याठिकाणी पित्तावर जालिम उपाय म्हणून ङ्ककांदाङ्क हे औषध दिले जाते. पित्तावरील ङ्ककांदाङ्क या औषधाला 'अंबरकंद' या नावानेही ओळखले जाते. प्रत्येक एक कांदा(अंबरकंद) २० रूपये प्रमाणे वैद्य लोक विकतात. हे पित्तावरील औषध प्रत्येक आठवडी बाजारातून विकले जात होते. पित्ताने त्रासलेल्या व्यक्ती येथून औषध घेवून जात असल्याचे दिसून येते. तसेच कावीळ, मुतखडा आणि मुळव्याध इत्यादी आजारावरही याठिकाणी आयुर्वेदिक औषधे दिली जातात.

मलकापूर भागात काही अंधश्रद्धा रूढ होत्या. या शहरात भटजीच्या आचार विचारनुसार चालणारा एक वर्ग होता. परिणामी शहरामध्ये समाजात काही व्यक्तींना एखाद्या आजाराची बाधा झाली. तर प्रथम मांत्रिक, भटजी(ब्राह्मण वर्ग) याच्या सान्निध्यात जावून त्यावर प्रभावी उपाय करण्याचा प्रयत्न करत होते. त्यात अपयश आल्यास नंतर पुढील उपचारासाठी दवाखान्यामध्ये जात असत. कारण हे सर्व श्रद्धेपोटी होत असे. त्यामुळे मांत्रिक, भटजी यांचा प्रभाव समाजावर होता आणि समाज नकळत या अंधश्रद्धेकडे ओढला जात होता. त्यामुळे कोणताही आजार जडल्यास आपणास कोणतीतरी अदबभूत बाधा झाली. असा समज अंधश्रद्धेशी वाहत जाणाऱ्या लोकांवर होता. परिणामी तेथे (भटजीकडे) गेल्याशिवाय तरणोपाय

नाही. अशी श्रद्धा श्रद्धाळू समाजावर होती. त्यामुळे रूढी–परंपरा जपणाऱ्या वर्गाचा या प्रथावर विश्वास होता.

आजही विज्ञान युगामध्ये अद्ययावत हॉस्पिटलची सुविधा असूनही शिवाय समाजप्रबोधन होऊनही समाज अनिष्ठ प्रथा पाळतो हे फार मोठे दुर्भाग्य आहे. कारण कोणताही आजार चेटू चेटूकच्या माध्यमातून बरा होत नसतो. ती घोर फसवणूक असते. कितीही प्रबोधन झाले असले तरी आज आपल्याला शहरी आणि ग्रामीण भागामध्ये लोक कोणत्याही वैयक्तिक अडचणीसंदर्भात भटजी, मांत्रिक यांच्याकडे गेलेला दिसतो. ही आज हास्याची बाब आहे.

त्यामुळे आज सद्यस्थितीत त्यांच्या दृष्टिकोनातून बदल करणे गरजेचे आहे. तरच त्या प्रभावातून मुक्त होऊन ते कोणत्याही आजारावर प्रभावी उपचार करण्यासाठी तज्ज्ञ डॉक्टरकडे तपासणी करतील.

## ५) पाणी पुरवठाविषयक कार्य :–

मलकापूर शहराला स्वच्छ पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणे ही नगरपरिषदेची प्राथमिक जबाबदारी आहे. परंतु सन १८८४ मध्ये नगरपरिषदेची स्थापना झाली. त्यावेळी शहरात पाणी पुरवठयाची कोणतीही योजना अस्तित्वात नव्हती. या शहरातील लोकांना पूर्वी कडवी आणि शाळी नद्यांचे पाणी वाहून आणावे लागत होते. या नद्यांना पावसाळयात पूर येत. परंतु उन्हाळयात या नद्यांना पाणी नसत. नद्यामध्ये वाळूत झरे पाडून त्यामध्ये आलेल्या पाणी वापरण्याकरिता आणत असत. शहरातील लोकांची पाण्यासाठीची होणारी गैरसोय लक्षात घेवून नगरपालिकेने पाणीपुरवठा या महत्त्वाच्या प्रश्नाकडे लक्ष वळविले. परिषदेने शहराला पाणी पुरवठा करण्यासाठी पूर्वी विहिरी खोदल्या आणि कालांतराने या विहिरीतील पाणी अपुरे पडू लागले. त्यावेळी कडवी नदीवर जॅकवेल बांधून पाण्याची सोय उपलब्ध करून दिली. याचा सविस्तर आढावा या घटकात घेण्याचा प्रयत्न केला आहे.

### १) विहिरी :–

पूर्वी नगरपालिकेमार्फत विहिरीतून शहराला पाणीपुरवठयाची सोय उपलब्ध करून दिली. शहराच्या विविध भागात विहिरी खोदल्या होत्या. विहिरीत पडलेला पालापाचोळा, पुडया आणि झाडेझुडपे इत्यादीमुळे पाणी घाण होत असे. शहराच्या आरोग्याच्यादृष्टीने विहिरीची स्वच्छता आणि देखरेख करण्याकरिता मासिक २ रूपये पगार देवून भीमा गोविंद पवार यांना कामावर

ठेवले होते. तसेच सन १९४७ मध्ये मलकापूर शहरात दर शुक्रवारी आठवडी बाजार भरत. या बाजाराकरिता येणाऱ्या लोकांना पाणीपुरवठा करण्यासाठी नगरपालिकेमार्फत कृष्णा गोपाळ बागट यास नेमून प्रति बाजारादिवशी सव्वा रूपये पगार दिला जात होता.[३०] या नगरपालिकेच्या सार्वजनिक विहिरीवर देखरेख ठेवणे व रहाटात तेल घालणे या कामाकरिता पालिकेने देवजी बजाप्पा भोसले यांची माहे दोन रूपये पगार देऊन कामावर ठेवले. विहिरीतील पाणी काढण्यासाठी नगरपरिषदेने सर्व विहीरीवर रहाट बसवून घेतले होते. या रहाटाच्या सहाय्याने शहरातील लोक पाणी काढत असत. सन १९४७ साली शहराची पाणी समस्या सोडविण्याकरिता आणि शहराला नळाने पाणी पुरवठा करण्यासाठी महादेव विठोबा गांधी यांनी कोल्हापूर कबायनिंग इंजिनियर्समधील मि.लेले यांना मलकापूर येथे आणले व तत्कालीन चेअरमन डी. एन.हावळ यांना घेवून मलकापूरातील सार्वजनिक विहिरीची आणि शाळी नदीच्या उगमाची पाहणी करून पाणी समस्या सोडविण्याचा प्रयत्न केला.[३१] सन १९५१ मध्ये नगरपालिकेने मनोहर शंकर साखरे यांच्याकडून जनावरांच्या बाजारातील विहिरीतील पाण्याचा उपसा करून गाळ काढून घेतला. त्यास पाच रूपये पगार दिला होता.[३२] नगरपालिकेने या विहीरीची स्वच्छता राखून बाजारासाठी येणाऱ्या लोकांना पिण्याच्या पाण्याची मुबलक सोय उपलब्ध करून दिली. तसेच जनावरांच्याही पिण्याच्या पाण्याची समस्या सोडविली होती. सन १९८८ मध्ये मलकापूर शहरात पाण्याची टंचाई निर्माण झाली होती. त्यावेळचे तत्कालीन अध्यक्ष नामदेव लक्ष्मण तांदळे यांनी शहरातील ज्या भागात पाणी नाही. त्या भागात आठ दिवस मोफत टँकरने पाणी पुरवठा केला होता. यांनी नगरपालिकेच्या आठ सार्वजनिक विहिरीतील गाळ, झाडेझुडपे काढून पाण्याची सोय केली होती.[३३] सोमवार पेठ, मंगळवार पेठ महादेव खडी, भटगल्ली व जनावरांच्या बाजारातील विहिर अशा एकूण आठ विहिरी मलकापूर नगरपालिका हद्दीत आहेत. या विहिरी नगरपालिकेच्या मालकीच्या आहेत. नगरपरिषदेने या विहिरीच्या सहाय्याने पूर्वीपासून या शहराला पाण्याची सोय उपलब्ध करून दिली होती. हे एक नगरपरिषदेचे मोठे योगदान मानावे लागेल. मलकापूरात या ऐतिहासिक वास्तूचे अवशेष आजही अस्तित्वात आहेत.

**२) नळ पाणीपुरवठा :-**

मलकापूर शहरास कडवी नदीवरील बांधण्यात आलेल्या जॅकवेलमधून पाणीपुरवठा केला जातो. सदरची योजना १० नोव्हेंबर १९७९ रोजी पूर्ण झाली. शहराला पाणी पुरवठा करण्यासाठी पाण्याच्या मोठया टाक्या नगरपरिषदेने बांधून घेतल्या. टाकीतील पाणी शुद्ध करण्याकरिता पाण्याच्या टाकीत ब्लिचिंग पावडर व तुरटी ही पाण्याच्या साठयाच्या प्रमाणात टाकली जात होती. आणि हे शुद्ध केलेले पाणी नळाने गावात पुरविले जात होते. तथापि सदरच्या पाणीपुरवठा योजनेद्वारे पुरविले जाणारे पाणी उन्हाळयांच्या हंगामामध्ये अपुरे पडत असे. म्हणून जॅकवेलच्या खालच्या बाजूस ३०० फूट अंतरावर कोल्हापूर पद्धतीचा बंधारा सरकारने बांधला आहे. चालू वर्षापासून बंधाऱ्यात यंदापासून पाण्याचा मुबलक साठा उपलब्ध झाल्यामुळे चालू उन्हाळयापासून पुरेसा पाणीपुरवठा होण्यास मदत झाली.

सन १९८३ सालाचा विचार करता शहरात दररोज पाऊण तास पाणीपुरवठा केला जात होता. त्यावेळी नगरपालिका हद्दीत ३८ सार्वजनिक नळांची संख्या होती.नवीन झालेल्या दुर्बल घटकांच्या वसाहतीत आणि कुंभार वस्तीत एक पाण्याची टाकी बांधण्यात आली. शहरात जेथे पाणी चढत नाही तेथे त्यासाठी काय करता येईल याविषयी अभियांत्रिकी विभागाचे कार्यकारी अभियंता यांनी कार्यवाही केली.[३४]

नगरपालिकेच्या सन १९८६ सालाचा विचार करता शहरातील पाणी पुरवठयावर देखरेख व लक्ष ठेवण्याकरता परिषदेने तीन सदस्याची पाणी पुरवठा समिती स्थापन केली. या समितीच्या माध्यमातून शहरातील विविध भागातील पाणीपुरवठा सुरळीत होतो की नाही याची शहानिशा केली जाते. सर्व ठिकाणी समप्रमाणात पाणी उपलब्ध करून दिले जाते. नगरपरिषदेने पाणीपुरवठयाच्या सोयीकरिता सन १९७९ मध्ये एक कामगार नेमला होता. त्याला दरदिवशी १० रूपये पगार दिला जात होता. यावर्षी नगरपालिका हद्दीत १३ सार्वजनिक नळ कनेक्शन होते. सन १९८६ साली पाणीपट्टी मागणी ५६८४० रूपये एवढी होती आणि वसूली ५१६४० रूपये एवढी झाली होती. कर्मचारी वर्गाचे पगार दुरूस्ती आदी एकूण ४९३१३ रूपये खर्च झाले. यावरून लक्षात येते की, सदरची योजना तोटयात चालत नाही असे दिसते. शहराच्या आरोग्याच्यादृष्टीने परिषदेने पिण्याच्या पाण्याचे नमुने तपासणीसाठी दरमहा चारवेळा जिल्हा आरोग्य प्रयोगशाळेकडे पाठवत असत. तशा तपासणीची नोंद रजिस्टरमध्ये करावी लागत होती.[३५]

सन १९९२ मध्ये नगरपालिका दरमहा १० पानी नमुने प्रयोगशाळेत पाठवून तपासून घेत होती. आणि पालिकेने वार्षिक उद्दिष्ट १२० एवढे ठेवले होते. नगरपालिकेने सुधारित पाणीपुरवठा योजनेचे काम २९ नोव्हेंबर १९९१ रोजी शाळी नदीवर जॅकवेल पंप हाऊस व पाईपलाईनचे काम पूर्ण करून घेतले. यावर्षी नगरपालिकेने उन्हाळ्यातील चार महिन्याकरिता प्रति मागणी प्रतिदिनी तीस ते चाळीस लिटर पाणी देण्याची व्यवस्था केली होती. आणि इतर आठ महिन्याकरिता प्रति मागणी ६० ते ६५ लिटर पाणी देण्याची सोय केली.[३६]

महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम १९६५ चे कलम ५० (५) नुसार पाणीपुरवठा योजनेचे अन्वेषण करणे, नकाशे तयार करणे व ही योजना अंमलात आणण्याच्या दृष्टीने निधी उभारण्याची तरतूद आहे. यानुसार नगरपालिकेमार्फत जो पाणीपुरवठा केला जातो. त्या नळाचा आकार १/२(अर्धा) इंची नळास घरगुती वापरासाठी १२० रूपये आणि व्यावसायिक वापराकरिता २४० रूपये आकारले जातात. तसेच ३/४ (पाऊण) इंची नळाचा आकार घरगुती वापरास १८० रूपये आणि व्यावसायिक वापराकरिता ३६० रूपये आकारले जातात. अशा नळ पाणी पुरवठयाच्या माध्यमातून शहराला मुबलक पाणी पुरवठा केला जातो.[३७]

सदर पाणीपट्टी सुधारित दरवाढ संदर्भात मा.आयुक्त व प्रादेशिक संचालक नगरपालिका प्रशासन विभाग यांचेकडील क्र.नपा/२/आरआर १३०-अ/२००१/दि.१३ डिसेंबर २००१ नुसार सुधारित पाणीपट्टी दर कलम ३२३ (३) (४) नुसार सन २००३-२००४ नुसार या वित्तीय वर्षापासून अंमलात आणण्याचे आदेश निर्गमीत केलेले आहेत. यास अनुसरून नगरपालिकेने दि. १ एप्रिल २००८ पासून पाणीपट्टीचे दर ६०० रू. वरून ७०० रूपयेपर्यंत वाढविले आहेत. तथापि मलकापूर नगरपालिकेची पाणीपुरवठा योजना स्वयंपूर्ण होण्याच्या दृष्टीने दर अर्धा, पाऊण व एक इंची कनेक्शनला अनुक्रमे ८०६ रूपये, १५५५ रूपये आणि ३६६३ रूपये असे निश्चित केले होते.[३८] परंतु २०१०-११ सालासाठी प्रस्तावित दरवाढ मलकापूर नगरपालिका स्थायी समिती सभा दि. २८ फेब्रुवारी २०१० ने शिफारस सुचवलेली दरवाढ खाली देण्यात आली आहे.[३९]

| अ.क्र. | तपशील | विद्यमान दर रूपये |
|---|---|---|
| १ | पाणीपट्टी | १.१/२ इंची घरगुती- रू.७०० |

| | | |
|---|---|---|
| | | २. १/२ इंची वाणिज्य – रू.१४०० |
| | | ३. ३/४ इंची घरगुती रू.९५० |
| | | ४. ३/४ इंची वाणिज्य रू.१९०० |

अशाप्रकारे मलकापूर नगरपालिकेने पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध करून दिली. येथील नागरिकांना पाण्यासाठी करावी लागणारी वणवण बंद झाली आहे. स्वच्छ व मुबलक पाणी मिळण्यास मदत झाली आहे.

## ६) बांधकामविषयक कार्य :–

मलकापूर नगरपालिकेच्या विविध विभागापैकी बांधकाम विभाग महत्त्वाचा मानला जातो. शहरी भागात होणाऱ्या विकासकामात बांधकाम विभागाचा मोलाचा वाटा आहे. नगरपरिषदेच्या बांधकाम विभागामार्फत केंद्र व राज्य शासनाच्या योजना प्रभावीपणे राबवून नागरिकांना सेवासुविधा उपलब्ध करून दिल्या जातात. नगरपालिका स्वतःला मिळालेल्या उत्पन्नातून सार्वजनिक बांधकाम करत असते. तसेच सामुदायिक विकास योजनेतील जुनी अपूर्ण कामे व ज्या कामावर शासन १०० टक्के अनुदान देते ती बांधकामे या विभागामार्फत केली जातात. बांधकाम विभागाचा प्रमुख म्हणून कार्यकारी अभियंता काम पाहतो. प्रशासन व पत्रव्यवहार लेखा विभाग, प्रकल्प विभाग आणि भांडार विभाग आणि रेखाचित्र विभाग असे एकूण पाच विभाग बांधकाम विभागातंर्गत कार्यरत आहेत. आस्थापन व पत्रव्यवहार विभाग प्रशासकीय शाखेशी संबंधीत असल्याने ही कामे प्रशासन विभागामार्फत पाहिली जातात. पैशाचे व्यवहार लेखापरिक्षण आणि वेगवेगळे अर्थसंकल्प हे लेखाविभागांतर्गत येतात. प्रकल्पाची अंदाजपत्रके तयार करणे, तपासणे आणि शासनाची मंजुरी मिळविणे ही कामे प्रकल्प विभागाशी संबंधित येतात. प्रकल्पासाठी लागणारे सिमेंट, सळई, डांबर व इतर अनुषांगिक वस्तूंची खरेदी करणे व त्यांचा हिशोब ठेवणे याची जबाबदारी भांडार विभागावर सोपविण्यात आली आहे. तसेच रस्त्याच्या लांबीची संपूर्ण माहिती व बांधकाम विभागाच्या मालकीच्या इमारतीची नोंद रेखाचित्र विभागाकडून ठेवली जाते. या बांधकाम विभागामार्फत पुढील कार्ये पार पाडली जातात.

### १. रस्ता बांधकाम :–

मलकापूर शहरातील लोकांना वाहतूकीची मुलभूत सुविधा प्रत्येकास मिळावी, यासाठी रस्ता, पूल, मोऱ्या बांधणे रस्त्याचे खडीकरण करणे, रस्त्याचे डांबरीकरण करणे आणि रस्त्याचा दर्जा सुधारणे इ. कामांना अग्रक्रम दिला जातो. एक हजारापेक्षा जास्त लोकवस्तीच्या गावांना बारमाही रस्त्याची सुविधा उपलब्ध होण्याच्यादृष्टीने लहान मोऱ्या बांधणे अभिप्रेत असते. म्हणून या योजनेसाठी प्रत्येक वर्षी बांधकाम विभागाला शासनाकडून निधी दिला जातो. या बांधकाम विभागामुळे शहरी भाग मुख्य रस्त्याला जोडला जावून दळणवळणात व वाहतूक व्यवस्थेत मोठा बदल झाला आहे. शहर आणि खेडे यातील अंतर कमी झाले आहे. वेळ वाचला आणि शहरी भागात लघु व कुटीर उद्योग व्यापारात वाढ होण्यास मदत झाली आहे.

परिक्षण व दुरूस्ती कार्यक्रम हा सन १९८६ पासून राबविण्यात येतो. खराब रस्त्याची दुरूस्ती करून रस्ते वाहतुकीस योग्य ठेवणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. खडीच्या रस्त्याची परत खडीकरणाने दुरूस्ती करण्यासाठी तीन वर्षे व डांबरी रस्त्याचे फेर डांबरीकरण करण्यासाठी पाच वर्षे सर्वसाधारण आयुष्यमान गृहीत धरलेले आहे. वाहतूकीच्या मुलभूत सेवा सुविधा शहरात उपलब्ध व्हाव्यात आणि जवळच्या बारमाही रस्त्यास कमीतकमी खडीच्या रस्त्याने जोडले जावे. हा शासनाचा मुख्य उद्देश यामागे आहे. या योजनेअंतर्गत शहरातील रस्त्यांच्या पृष्ठभागांचे नूतनीकरण हेही हाती घेण्यात येते. खडीच्या रस्त्याचे नूतनीकरण खडीने तर मुरूमी रस्त्याचे नूतनीकरण मुरमाने आणि डांबरी रस्त्याची दुरूस्ती डांबरीकरणाने केली जाते. रस्ता बांधणीसाठी लोकप्रतिनिधींची मागणी विचारात घेतली जाते आणि शासनाच्या मार्गदर्शक तत्त्वात काम बसत असेल तरच कामास मंजुरी मा. मुख्य अभियंता देत असतात.

रस्त्याचे बांधकाम सिमेंट काँक्रिट, डांबरी, खडीचे आणि मुरमाचे अशा चार प्रकारात केले जाते. मलकापूर नगरपालिकेचा सन १९८४ सालाचा विचार करता शहरात एकूण ७.५० कि.मी. अंतराचे रस्ते होते. त्यामध्ये नगरपरिषदेने ४ किमी अंतराचा रस्ता डांबरी करून घेतला होता. आणि ३.५० क़िमी अंतराचा रस्ता हा कच्च्या स्वरूपात होता. सन १९८२ मध्ये रस्ता दुरूस्ती कामाकरिता अनुदान व खर्चासाठी २५०९० रूपये नगरपालिकेला मिळाले होते. सन १९८३ मध्ये अनुदान व खर्चाकरिता १९६७१ रूपये आणि सन १९८४ मध्ये रस्ता अनुदान व खर्चासाठी २५३७७ रूपये मिळाले होते.[४०]

वरील आकडेवारीवरून असे दिसून येते की नगरपालिकेने रस्ता दुरूस्ती नुतनीकरण कामासाठी सन १९७१ –७२ पासून काहीही खर्च केलेला नव्हता. सन१९८३ –८४ अखेर अनुशेष पोटी नगरपालिकेकडे जवळजवळ १,१०,००० रूपये इतकी रक्कम शिल्लक होती. त्यापैकी नगरपालिकने २५३७७ रूपये एवढा निधी रस्ता दुरूस्ती कामावर खर्च केल्याचा दिसतो. तत्कालीन वेळी शहरातील रस्ता साफ सफाईसाठी एकूण १३ कामगार होते. यांच्या मार्फत शहरातील रस्ते रोजच्या रोज साफ केले जात होते.[४१] वरील सर्व कामावर देखरेख व नियंत्रण ठेवण्यासाठी नगरपालिका अतंर्गत ३ सदस्यी बांधकाम समिती स्थापन करण्यात आली. या समितीच्या माध्यमातून शहरातील सर्व सार्वजनिक बांधकामाची पाहणी व त्यावर नियंत्रण ठेवले जात आहे.

सन १९९५ मध्ये मलकापूर नगरपालिका हद्दीत १.२० किमी लांबीचे डाबंरी आणि ६.३० कि.मी.लांबीचे इतर रस्ते होते. गेल्या अनेक वर्षाचा विचार करता पालिका हद्दीत रस्त्यांच्या लांबीत वाढ झालेली दिसत नाही. कच्चे रस्ते, डांबरीकरण किंवा पक्के रस्ते करण्यावर खर्च झालेला दिसून येत नाही. परंतु या सालात रस्ता दुरूस्ती कामावर १०५६० रूपये इतका निधी खर्च झालेला होता. तसेच शासनाकडून प्राप्त झालेले अनुदान पूर्णपणे रस्ता कामावर खर्च केलेले दिसत नाही. [४२] अशाप्रकारे रस्त्याची दुरूस्ती आणि परिरक्षण मलकापूर नगरपरिषदेच्या बांधकाम विभागामार्फत केले जाते आणि त्यावर लाखो रूपयाचा निधी खर्च केला जातो.

**२. गटारी बांधकाम : –**

नगरपरिषदेमार्फत शहराअंतर्गत रस्ते व गटारे बांधली जातात. सार्वजनिक बांधकाम विभागाकडून शहरातील गटार व रस्ता बांधणी, दुरूस्ती व देखभालीसाठी अनुदान उपलब्ध करून दिले जाते. नगरपालिकेने शहरात रस्त्यालगत व्ही टाईप आणि भुयारी गटराचे बांधकाम केल्यामुळे शहराच्या सुशोभिकरणात वाढ झाली आहे. भुयारी गटार योजना हा सुधारणेचा एक सर्वात महत्त्वाचा टप्पा मानला जातो. शहरातील बहुतेक सार्वजनिक व खाजगी शौचालये, मोऱ्या, भुयारी गटार योजनेस जोडण्यात आल्या. त्यामुळे शहरातील स्वच्छता व आरोग्य यामध्ये क्रांतीकारक बदल झालेला आहे. तसेच गटार योजनेमुळे शहरातील सांडपाण्याची विल्हेवाट लावण्यास मदत झाली.

शहरातील सांडपाण्याची व पावसाच्या पाण्याची विल्हेवाट लावण्यासाठी सन १९७८ मध्ये नगरपरिषदेचे नगराध्यक्ष प्रभाकर रामकृष्ण प्रभावळकर यांनी शहरात व्ही.टाईप आकाराची गटारे बांधून घेतली. विशेषतः शहरातील मांगवाडा आणि हरिजन वसाहतीत आरोग्याच्या दृष्टिकोनातून रस्ते व रस्त्यालगत कडेला व्ही टाईपची गटारे बांधली.[४३] तसेच १९८६ साली नगरपालिकेचे नगराध्यक्ष दिनानाथ शाम सक्रे यांनी याकामी महत्त्वाची भूमिका बजावली यांनी सबनीस गल्ली ते वारंगे गल्ली सबनीस गल्ली, ते लोखंडी विहीर आणि बुरूड गल्ली ते लोखंडी विहीर इ. मार्गावरील रस्त्याच्या दोन्ही बाजूनी गटाराची बांधकामे करून घेतली आणि दोन ठिकाणी क्रॉस पाईप बसविण्यात आली. सणगर गल्लीतील सार्वजनिक नळाच्या सांडपाण्याच्या व्यवस्थापनाकरिता गटार बांधून घेतले. तसेच शंकर लगारे घर ते पाटील घरापर्यंतच्या रस्त्याच्या कडेने गटारे बांधली. सक्रे यांनी शहरातील गटार बांधकाम कार्यात महत्त्वपूर्ण योगदान दिले.[४४]

सन १९८६ सालच्या नगरपरिषद वार्षिक तपासणी अहवालानुसार मलकापूर शहरात पक्की गटारे १० कि.मी. लांबीची होती आणि कच्ची गटारे १ कि.मी.लांबीची होती. शहरातील गटारांची एकूण ११ कि.मी. इतकी लांबी होती. सफाईच्या कामाकरीता १३ कामगार होते. सकाळी रस्ता सफाईचे काम करतात आणि हे कामगार दुपारनंतर गटार सफाईचे काम करत होते. शहरातील गटारे नियमीतपणे साफ करणे आरोग्याच्यादृष्टिने महत्त्वाचे होते. नगरपरिषदेने आठवडयातून दोनवेळा गटारी साफ करण्याची दक्षता घेतली होती. नगरपालिका आठवडयातून एकदा गटारावर जंतूनाशक औषधाची फवारणी करत असत. शासनाचे नगरविकास विभागाकडील परिपत्रक क्र.जीएसटी– १९८४ढ९३ढ सी.आर–६५–११८४–युडी–१० दिनांक १८ जून १९८४ मध्ये दिलेल्या सूचना प्रमाणे नगरपालिकेने शहरात स्वच्छता मोहिम चालू ठेवली आहे. तसेच शहराचे आरोग्य चांगले राहील याकडे मुख्याधिकारी साहेबही लक्ष देत आहेत.[४५]

सन १९९५ मध्ये मलकापूर नगरपरिषद हद्दीत उघडी गटारे ४६३२ मीटर लांबीची होती.आणि बंद गटारे (भूयारी गटारे)३०० मीटर लांबीची होती. या आर्थिक वर्षात ५७५५ रूपये इतका खर्च गटारांवरील दुरूस्ती कामावर करण्यात आला. मलकापूर शहरात पाऊस मोठया प्रमाणात पडतो. त्यामुळे पाणी वाहून जाण्यासाठी असलेल्या गटारांच्या ऐवजी मोठया

आकाराची गटारे असणे गरजेचे होते. परंतु गटार बांधणी कामावर नगरपालिका खर्चही फारच कमी प्रमाणात करत असल्याचे दिसते.[४६]

अशाप्रकारे नगपालिकेने शहरात ‘व्ही टाईप’ व ‘भूयारी गटारां’चे बाधंकाम करून शहरातील सांडपाण्याची उत्तमरित्या व्यवस्थापन केले आहे. अशा या सुसज्ञ गटार बांधकामामुळे शहरात कसलेही पाणी साठत नाही आणि घाण पाण्याचा शहरातील लोकांना कसलाही त्रास होय नाही. हे एक शहर विकासातील व सुशोभिकरणातील नगरपालिकेचे योगदान आहे.

**३) इमारती बांधकाम :–**

नगरपालिकेच्या बांधकाम विभागाने शहरात बालवाडी इमारत बांधून लहान बालकांचा शैक्षणिक आणि सांस्कृतिक विकास करण्यात महत्त्वाचे कार्य केले. आर्थिक दुर्बल घटकातील लोकांच्या उन्नतीकरिता हरिजन समाजातील लोकांना सांस्कृतिक कार्यक्रम करण्याकरिता धार्मिक विधी कार्यासाठी आणि शाहू–फुले–आंबेडकरांची विचारधारा रूजविण्यासाठी समाज मंदिराचे बांधकाम केलेले दिसते. समाजातील अस्पृश्यता जातीभेद यास छेद देण्याकरिता आणि स्वातंत्र्य, समता व बंधुता प्रस्तापित करण्यात या समाज मंदिराचा मोठा वाटा आहे. या विभागामार्फत बांधलेल्या नगरपरिषद इमारतीतून शहरातील लोकांना प्रशासकीय कारभाराचे ज्ञान, राज्यकारभार आणि नेतृत्व करण्याची संधी मिळाली आहे. पालिकेने निवासस्थाने बांधून नगरपालिका कार्मचाऱ्यांना राहण्याची सुविधा उपलब्ध करून दिली. शहरातील वेगवेगळया जाती धर्मातीललोकांच्या प्रेताची विल्हेवाट लावण्यासाठी पालिकेच्या बांधकाम विभागाने स्मशानभूमी आणि दफनभूमीचे बांधकाम केले. येथील लोकांच्या व प्रवाशांच्या सोईकरिता शहरात सार्वजनिक ठिकठिकाणी शौचालये आणि मुताऱ्यांच्या इमारतीचे बांधकाम केले. शहरातील तरूणांना व्यवसायाकरिता विविध ठिकाणी शॉपिंग गाळे बांधून उपलब्ध करून दिले आहेत. तसेच अनेक ठिकाणी मार्केटच्या इमारती बांधून लोकांना सार्वजनिक सेवा सुविधा उपलब्ध करून दिली. या इमारतीच्या बांधकामामुळे शहरातील सुशोभिकरणात व वैभवात भर पडत आहे. या सर्वामध्ये बांधकाम विभागाचा मोठा वाटा आहे.

## ७. महिला व बालकल्याण विषयक कार्य :–

महिलांसाठी नेहरू रोजगार योजनेअंतर्गत महिलाकरिता रोजगार कार्यक्रम राबविणे, सामाजिक, आर्थिक आणि राजकीय क्षेत्रात स्त्री–पुरूष समानता प्रस्थापित करून महिलांना

विकासाची संधी उपलब्ध करून देणे. सामाजिक प्रतिष्ठा मिळवून देणे यासाठी महाराष्ट्र शासनाने १९९३ पासून महिला व बालकल्याण विभाग स्थापन केला. शासनाच्या या योजना व उपक्रम यशस्वीपणे राबविण्यात मलकापूर नगरपालिकेने अतिशय महत्त्वाचे काम केले. अशाप्रकारे महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग शासन निर्णय दि. १४ जुलै १९९३, नुसार महिला व बालकल्याण कार्यक्रम राबविणेसाठी नगरपालिकेने पाच टक्के निधी राखून ठेवून त्यानुसार खर्च करणेबाबतच्या सूचना दिलेल्या होत्या. त्यानुसार पाच टक्के रक्कम ५८५००० रूपये पैकी अपंगाच्या कल्याणाकरीता २५,००० रूपये एवढी तरतूद सन २०१०–११ च्या अंदाज पत्रकामध्ये केली. ही तरतूद गरिबांना मुलभूत सेवा देण्याकरिता करण्यात आली.[४७]

या विभागामार्फत महिलांच्या सर्वांगिण विकासासाठी विशेषतः निराधार, विधवा आणि परित्यक्ता महिलांच्या सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक विकासासाठी त्याचप्रमाणे त्यांच्या सुप्त गुणांना अधिक वाव देवून समाजाच्या मुख्य प्रवाहात सामावून घेण्यासाठी शासनाने महिला कल्याणाच्या विविध योजना सुरू केल्या आहेत. या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी नगरपालिकेत महिला व बालकल्याण विभाग सुरू करण्यात आला आहे. महिलांनी लघु–कुटीर उद्योग व्यवसाय करावा आणि त्यातून आर्थिक विकास साधावा यासाठी त्यांना प्रोत्साहन दिले जाते. महिला सबलीकरणासाठी या विभागाद्वारे विशेष प्रयत्न केले जातात. यामध्ये महिलांना पिठाची गिरण, मिरची कांडप, सौर कंदील, शेवया बनविणे, शिलाई व पिको फॉल इत्यादीसाठी लागणाऱ्या साधनाचे वाटप करून त्यांचा आर्थिक विकास साधला जात आहे. तसेच सहा वर्षापर्यंतच्या लहान मुलांसाठी व अंगणवाडयातील बालकांसाठी पूरक पोषण आहार, घरी नेण्यासाठी आहार, लसीकरण आरोग्य तपासणी आणि महिलांना आहार लेक वाचवा अभियान, दत्तक पालक योजना, क्रीडा स्पर्धा महिला बालकेसाठी विविध योजना आणि हळदी–कुंकू कार्यक्रम व्याख्याने, मेळावे आणि आरोग्य विषयक शिक्षण अशा अनेक योजना राबविल्या जातात.

**१) लेक वाचवा अभियान :–**

हे अभियान राबविण्याकरीता नगरपरिषदेने सन २०१०–११ मध्ये पन्नास हजार रूपये खर्च केले. स्त्री जागृती करीता पालिकतर्फे पथनाटय, व्याख्याने, मेळावे इत्यादी कार्यक्रमाच्या आयोजनाकरिता ५०,००० रूपयांची तरतूद करण्यात आली.[४८]

पथनाटय माध्यमातून लेक वाचवा अभियान याची प्रात्यक्षिके दाखविली जातात. स्त्री जन्माचे महत्त्व, सामाजिक धार्मिक आर्थिक आणि राजकीय क्षेत्रातील स्त्रियांचे महत्त्व यांची प्रात्यक्षिके दाखविण्यात येतात. नगरपालिका व्याख्याने, मेळावे घेवून समाजाला स्त्री जागृती विषयी माहिती करून देत आहे. मुलींचे प्रमाण वाढावे स्त्री जन्माचा आदर करण्याकरिता या अभियानाच्या माध्यमातून शहरात अनेक कार्यक्रम घेतले जातात. तसेच शासनानेही मुलींच्या लिंग गुणोत्तर प्रमाणात वाढ करण्याकरिता गर्भलिंग निदान चाचणीस कायद्याने बंदी घातली आहे. अशाप्रकारे या अभियानाकरिता नगरपालिका आणि शासन यांनी महत्त्वपूर्ण कामगिरी केली.

**२) हळदी कुंकू कार्यक्रम :–**

नगरपालिकेने या कार्यक्रमासाठी सन २०१०–११ मध्ये ८५००० रूपये खर्च केले.[४९] स्त्रियांमध्ये सामाजिक एकोपा राहावा. यासाठी पालिकेतर्फे हळदी कुंकू कार्यक्रमाचे आयोजन करून या संदर्भात व्याख्याने दिली जातात. या कार्यक्रमातून सांस्कृतिक परंपरा जपली जाते. स्त्रियांच्या विविध समस्याविषयी अडचणी जाणून घेण्यासाठी आणि त्या समस्या सोडविण्यासाठी स्थानिक प्रशासनाच्या माध्यमातून प्रयत्न करण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. तसेच स्त्रियांचा सामाजिक दर्जा उंचावण्याकरिता मलकापूर नगरपालिकेकडून सर्वतोपरी प्रयत्न केला जात आहे. स्त्री उद्धारासाठी या कार्यक्रमातून मेळाव्याचे आयोजन केले जाते. या मेळाव्यातून स्त्री संघटना, स्त्री नेतृत्व उदयास येत आहे. यातूनच स्त्रियांच्या सामाजिक आणि वैयक्तिक अडचणी, समस्या सोडविण्यासाठी प्रभावी स्त्री नेतृत्व उदयास येत आहे. परिणामी स्त्रियांच्या सुप्त गुणांच्या विकासाला चालना मिळून स्त्री कर्तृत्वाचा विकास होण्यास मदत होत आहे.

**३) क्रीडा स्पर्धा :–**

स्त्रीयांच्या सुप्तगुणाला वाव देण्यासाठी पालिकेने क्रीडा स्पर्धेचे आयोजन केले. यासाठी एक लाख रूपये खर्च करण्याची तरतूद केली.[५०] शहरी विभागातील मुलांच्या क्रीडावृत्तीस प्रोत्साहन देण्यासाठी कबड्डी, खो–खो, लांब उडी, उंच उडी, धावणे, दोरीवरच्या उडया, भाषणे, रांगोळी  स्पर्धा आणि संगित खुर्ची अशा अनेकविध खेळांच्या स्पर्धा आयोजित केल्या जातात.

### ४) महिला व बालकल्याण रोग निदान शिबीराचे आयोजन :–

मलकापूर नगरपालिकेने ही योजना ० ते ६ वर्षे वयोगटातील बालकांच्या आरोग्याची तपासणी तज्ज्ञ डॉक्टराकडून करून आवश्यक औषधोपचार केले जातात. ज्या ठिकाणी सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत अशी सोय उपलब्ध नाही किंवा योजना राबविण्यास पैशाची कमतरता असते. त्याठिकाणी नगरपरिषदेमार्फत राबविली जाते. खर्च किती करावा, याचा निर्णय नगरपालिका घेत असते. या शिबीर कार्यक्रमातून महिलांना आरोग्याचे महत्त्व सांगितले जाते. त्यामुळे महिलांचे आरोग्य सुधारण्यास मदत होत आहे.

### ५) महिलांचा अभ्यास सहल दौरा :–

ही योजना १९९४–९५ पासून राबविली जाते. नगरपरिषदेमार्फत वर्षातून एखादी महिला प्रतिनिधी व व्यावसायिक महिला यांचा सहल दौरा आयोजित केला जातो. नगरपालिकेने १९९५ ते २०१० या कालावधित एकूण १५० महिलांना या योजनेचा लाभ दिला आहे. या दौऱ्यामध्ये महिलांच्या आदर्श प्रकल्पाना भेटी देवून तेथील कामकाजाचा अभ्यास करण्यासाठी व प्रकल्पाची कार्यपद्धती समजून घेण्यासाठी ही सहल फायदेशीर ठरत आहे. यामुळे महिलांमध्ये स्वयंरोजगाराची भावना वाढीस लागण्यास मदत झाली आहे.

### ६) ज्युदो व कराटे प्रशिक्षण योजना :–

ही योजना २००१ पासून राबविण्यात येत आहे. काही वेळा महिलांना संकटाशी सामना करावा लागतो. अशा संकटाच्या यावेळी महिलांनी सक्षम होवून संकटाशी मुकाबला करण्यासाठी त्यांच्यात आत्मविश्वास वाढीस लागणे ही काळाची गरज आहे. यासाठी शहरी भागातील इ.पाचवी ते दहावी मध्ये शिकणाऱ्या मुलींसाठी ज्यदो व कराटे प्रशिक्षणाचे आयोजन केले जाते.

### ७) सावित्रीबाई फुले पुरस्कार योजना :–

सन २००१ पासून ही योजना सुरू आहे. शहरी भागातील महिलांच्या प्रगतीसाठी शासकीय यंत्रणेसह काही महिला कार्यकर्त्या व महिला संस्था महिलांच्या सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक प्रगतीसाठी स्वयंस्फुर्तीने काम करत असतात. अशा महिलांना व संस्थाना प्रोत्साहन देवून त्यांच्या कार्याचा उचित गौरव करण्यासाठी महिला व बालकल्याण विभागाच्यावतीने हा पुरस्कार प्रदान केला जातो.

अशाप्रकारे नगरपालिकेने महिला व बालकल्याण विभागाच्या माध्यमातून विविध योजना राबवून शहरातील महिलांचा सर्वोतोपरी सर्वांगिण, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक विकास घडवून आणण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

## ८) स्वच्छताविषयक कार्य :–

मलकापूर शहरातील सार्वजनिक व वैयक्तिक स्वच्छता विषयक स्तर उंचावणे आणि शहरी लोकांचे आरोग्य निरोगी राहण्यासाठी मलकापूर नगरपालिकेने महत्त्वाचे कार्य केले. नगरपरिषदेने सार्वजनिक ठिकाणी स्वच्छतागृहांची बांधकामे केली आणि स्वच्छताविषयक जनजागृती केली. यामुळे शहरी लोकांना स्वच्छतेचे आणि स्वच्छतेतून आरोग्याचे व समृद्धीचे महत्त्व पटल्याने प्रत्येकाची घरी शौचालय बांधण्याच्या कामास गती मिळाली आहे. पालिकेमार्फत शहरात स्वच्छता, साफसफाई मोहीम, आरोग्य विषयक प्रदर्शने व प्रात्यक्षिके, पाणी व सांडपाणी व्यवस्थापन असे कार्यक्रम आयोजित केले जातात.

### १) घनकचरा व्यवस्थापन :–

मलकापूर नगरपालिकेने शहरात कोणत्याही प्रकाराचे साथीचे रोग उदबभवू नयेत. यासाठी शहराच्या स्वच्छतेला प्राधान्य दिले आहे. हे आपणाला नगरपालिका ऐतिहासिक कागदपत्रावरून समजते. शहरामधील घनकचरा व घाण गोळा करण्याची व्यवस्था केली. शहर स्वच्छ व सुंदर निरोगी राहण्याकरिता शहरात ठिकठिकाणी घनकचरा टाकण्यासाठी कचरा कोंडाळे ठेवण्यात आले. शहरातील सार्वजनिक ठिकाणाचा आणि रस्त्यावरील कचरा गोळा करण्याकरिता मलकापूर नगरपालिकेने सन १९८४ मध्ये २ भंगी कामगार आणि १ झाडू कामगार या तिघांची नेमणूक केली होती. यांना नगरपालिकेकडून मासिक १० रूपये पगार दिला जात होता.[५१] सध्या नगरपालिकेकडे शहर सफाईच्या कामासाठी १३ कामगार आहेत. हे कर्मचारी सकाळी रस्ता साफसफाईची कामे करतात. व दुपार नंतर गटारे साफसफाईची कामे करतात.[५२] याकामी आरोग्य विभागाकडील सॅनिटरी मुकादममार्फत शहरातील सर्व साफसफाईची कामे करून घेतली जातात. शहरातील या कामावर देखरेख ठेवण्यासाठी एक मुकादम नेमला आहे. या मुकादमामार्फत साफसफाई कामासंबंधी माहिती वरिष्ठांना दररोज सांगितली जाते. तसेच वरिष्ठांच्या सांगण्यानुसार मुकादम शहरातील स्वच्छतेची कामे

कामगाराकडून करून घेतात. अशा पद्धतीने मलकापूर नगरपालिकेने शहर स्वच्छ व सुंदर ठेवण्याचा यशस्वी प्रयत्न केला.

मलकापूर नगरपालिकेने कचरा स्थलांतराची उत्तम सोय केली. शहरातील निघालेल्या कचरा टाकण्यासाठी विविध उपाययोजना केली होती. सन १९५१ मध्ये पालिकेने शहरातील कचरा व्यवस्थापनाकरीता मनू गणू कांबळे यांना कचरा वाहतूकीचा मक्ता दिला होता. परिषदेने त्या कामासाठी त्यांना २२५ रूपये दिल्याचा उल्लेख आढळतो.[५३] कचरा व्यवस्थापनामध्ये कालांतराने सुधारणा झालेली दिसते. मलकापूर नगरपालिकेने शहरातील नागरिकांना सुविधा उपलब्ध करून देण्याकरिता १९९४ मध्ये दोन ट्रॅक्टर खरेदी केले. ट्रॅक्टर नंबर एक एम टी.एम ५५८० आणि ट्रॅक्टर नंबर दोन एमएचके ८९८४ असे दोन ट्रॅक्टर नगरपालिकेच्या मालकीचे आहेत. ते कचरा व पाणीपुरवठयासाठी वापरले जातात.[५४]

अशाप्रकारे शहराची वाढती लोकसंख्या व शहर विकास यामुळे आरोग्य सेवेची अधिकच मागणी वाढत आहे. शहरातील कचरा गाळ व मैला वाहून नेणे अधिक सुलभ व्हावे यासाठी मलकापूर नगरपालिकेने तीन चाकी ॲपे रिक्षा खरेदी केली आहे. त्यामुळे घाण वाहून नेण्याचे काम अधिक व्यवस्थित व जलद गतीने होत आहे. तर शहरातील खाजगी कचरा उचलनेसाठी ॲपेरिक्षा प्रतिखेप ५० रूपये भाडयाने ठेवली आहे.[५५]

### २) कंपोस्ट खत :–

मलकापूर नगरपालिका शहरातील शौचालय आणि कचरा कोंडाळयातील निघालेल्या कचरा व मैला यापासून कंपोस्ट खत तयार करते. मलकापूर नगरपालिकेने १९७२ मध्ये शहरातील जमा झालेल्या कचऱ्यांची विल्हेवाट लावण्यासाठी व टाकाऊ कचऱ्यापासून कंपोस्ट खत तयार करण्यास सुरुवात केली. या घनकचऱ्याचे व्यवस्थापन मलकापूर नगरपालिकेने हद्दीबाहेर केले आहे. नगरपालिकेने गोळा केलेल्या कचऱ्यापासून कंपोस्ट खत करण्याकरिता पालिका हद्दीबाहेरील मोजे उचत गावातील रहिवाशी तानोबा दाजी पाटील यांची जमीन दरसाल पाचशे रूपये भाडयाने घेतली होती.[५६] या खत निर्मितीकरिता पालिकेने ९० खड्डे पाडून घेतले होते. या खड्डयाच्या माध्यमातून दरवर्षी चारशे टनांच्या आसपास कंपोस्ट खत तयार केला जातो. या कंपोस्ट खताचा उपयोग मलकापूर परिसरातील शेतकरी करीत आहेत. यातून

नगरपालिकेलाही चांगले उत्पन्न मिळत आहे. त्याचा उपयोग शहराच्या स्वच्छतेसाठी केला जात आहे.

### ३) ड्रेनेज व्यवस्था :–

शहारात सुरूवातीच्या काळी गटारे उघडी कच्च्या स्वरूपात असल्यामुळे ती कितीही स्वच्छ ठेवण्याचा प्रयत्न केला तरी सांडपाण्याचा निचरा होण्यास अडथळा येत होता. ही वस्तुस्थिती मलकापूर नगरपालिकेच्या लक्षात आल्यानंतर शहरात ‛व्ही टाईप’ आणि ‛भूयारी गटारां’ची बांधकामे करून घेतली. याबरोबर मलकापूर शहराला एक नैसर्गिक देणगी लाभली, की मलकापूर हे शहर उंच सपाट भागावर असल्याने आणि नगरपालिकेने बांधलेल्या गटारीमुळे शहरात कसलेही पावसाचे आणि सांडपाणी साचत नाही. गटार बांधणी बरोबर गटार साफसफाईलाही तेवढेच महत्त्वाचे स्थान आहे. कारण आरोग्याच्यादृष्टीने अतिशय महत्त्वाची बाब आहे. गटारामध्ये रोग जंतूची वाढ होवू नये. याकरिता गटारी सफाई व निर्जतुंक करणेसाठी मलकापूर नगरपालिकेने मोलाची कामगिरी बजावली आहे.

याचबरोबर सार्वजनिक आरोग्यावर परिणाम करणारा दुसरा घटक म्हणजे मैला व्यवस्थापन होय. शौचालयामध्ये साठलेल्या मैल्याची वेळीच विल्हेवाट लावली नाही, तर अधिक वेगाने रोगराई पसरते. म्हणून मलकापूर नगरपालिकेने या बाबीकडे जातीने लक्ष घालून त्याची विल्हेवाट लावण्याकरिता प्रयत्न केले आहेत. मलकापूर नगरपालिकेने १९८४ मध्ये शहर स्वच्छतेच्या दृष्टिकोनातून २ मुकादम, १३ गटार झाडू कामगार आणि ६ मेहतर कामगार यांची नेमणूक केली. या कर्मचाऱ्यामार्फत शहराची स्वच्छता केली जात होती. पूर्वीची डोक्यावरून मैला वाहून नेण्याची पद्धत बंद केली.[५४] शहरातील खाजगी व सार्वजनिक शौचालयाची संख्या वाढत गेल्याने मलकापूर नगरपालिकेने शहरातील सर्व शौचालये ही सेप्टीक पद्धतीने जोडून घेवून मैल्याची विल्हेवाट लावली. मलकापूर नगरपालिकेने मैला वाहतूकीच्या सुविधेकरिता एक ट्रॅक्टर घेतला आहे. खाजगी शौचालय सफाई कामासाठी नगरपालिका मैला टँकर भाडे प्रति खेप १० प्रति किमी अंतरापर्यंत ५० रूपये भाडे आकारले. तसेच ८०० रूपये मलकापूर शहर आणि १००० रूपये शहराबाहेर व २२ रूपये प्रतिकिमी अंतरावर भाडे आकारले जाते.[५७] अशाप्रकारे लोकसंख्येची वाढ जसजशी होत गेली तसतशी शौचालयाची अधिक गरज भासू लागली. ही गरज भागविण्यासाठी नगरपालिकेने भरीव अशी कामगिरी केली.

## ९. अन्न भेसळ प्रतिबंधक कायदा :–

या कायद्याची अमंलबजावणी करण्यासाठी मलकापूर नगरपालिकेकडून स्वतंत्र स्टाफ नेमला जात नाही. परंतु या कायद्याची अंमलबजावणी अन्न भेसळ प्रतिबंधक निरीक्षक कोल्हापूर यांचे मार्फत केली जाते.[५८] भेसळ प्रतिबंधक कायदा व त्यातील अधिनियमानुसार सदर कायद्याची शहरात तंतोतंत व कार्यक्षमतेने अंमलबजावणी केली जाते. गुन्हेगारांना उजेडात आणून त्यांच्यावर मुदतीत खटले भरले जातात. भेसळ प्रतिबंधक खाद्यपेय जिन्नस यात होणारी भेसळ शोधून काढणे व अशा प्रवृत्तीस आळा घातला जातो. हॉटेल लायसेन्स, हातगाडी लायसेन्स बाबत योग्य ती अंमलबजावणी केली जाते. भाजी मार्केट, मच्छी मार्केट व मटण मार्केट याचीही तपासणी केली जाते. या प्रशासकीय कायद्यामुळे शहरी भागात अन्न भेसळ करून विकणाऱ्या बाबूगिरीला चाफ बसला आहे. शहरी भागातील लोकांच्या आरोग्याच्या दृष्टिकोनातून हा कायदा अतिशय चांगला आहे. कारण लोकांचे आयुर्मान वाढण्यास मदत झाली आहे. उत्पादीत केलेल्या वस्तूचा दर्जा वाढण्यास मदत होत आहे. तसेच वस्तू खरेदी करणाऱ्या ग्राहकांच्या फसवणूकीस आळा बसला आहे.

## १०. अग्निशामक दल :–

मलकापूर नगरपालिकेकडे स्वतंत्र अग्निशामक दल नाही तथापि आकस्मिक आग लागलीच तर नगरपालिकेच्या ट्रॅक्टरचा उपयोग केला जातो. पालिका हद्दीतील आकस्मिक आग विझविण्याकरिता नगरपालिका अग्निशामक वाहन भाडे प्रति खेप १० प्रति कि.मी.अंतरापर्यंत ५० रूपये भाडे आकारले जाते. तर प्रतिखेपेस १५०० रूपये एवढे भाडे आकारले जाते. तसेच प्रति तास ५० रूपये भाडे आकारले जाते.[५९] अशाप्रकारे आकस्मिक आग विझविण्याच्या कामात नगरपालिकेकडून मोलाची कामगिरी केली जाते.

## ११. समारोप :–

मलकापूर नगरपालिकेच्या माध्यमातून शहरातील नागरिकांचे आणि मागासवर्गीय लोकांचे सामाजिक, शैक्षणिक आणि आरोग्यविषयक जीवनमान उंचावण्यास मदत झाली आहे. दिवाबत्तीची सोय करून शहरी जीवन अंधारातून प्रकाशमय केले आहे. लहान बालकांच्या आरोग्याच्या दृष्टीने खेळाची उघडी मैदाने उपलब्ध करून दिली. मलकापूर नगरपालिकेच्या मार्केट बांधकाम योजनेमुळे शहरातील लोकांना एका ठिकाणी जीवनावश्यक वस्तू मिळू लागल्या

शेतकऱ्यांच्या मालाला बाजारपेठ उपलब्ध झाली. आणि येथील तरूणांना रोजगाराची संधी मिळाली. शहराच्या आरोग्याच्या व स्वच्छतेच्या दृष्टीने शौचालये व मुताऱ्या बांधून महत्त्वाचे कार्य केले. मलकापूर नगरपालिकेच्या शाळा  नाहीत. परंतु जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळा आणि खाजगी माध्यमिक शाळा व कॉलेजमधून शहराचा शैक्षणिक विकास व साक्षरतेच्या प्रमाणात वाढ होण्यास मदत झाली. या शाळा संस्थामधून अनेकांना शासकीय व निमशासकीय नोकऱ्या मिळाल्या आहेत. विशेषतः मलकापूरच्या शैक्षणिक विकासात रयत शिक्षण संस्थेचा मोलाचा वाटा आहे.

याशिवाय जन्म–मृत्यू नोंदणी, कुटुंब कल्याण, बालक कल्याण, कुष्ठरोग निर्मूलन हिवताप निर्मूलन, हत्तीरोग नियंत्रण आणि क्षयरोग नियंत्रण तसेच मलकापूरातील खाजगी दवाखाने, आयुर्वेदीक औषधालय इ.वरील निर्मूलन व नियंत्रण कार्यक्रम कोल्हापूर जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागातंर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र मलकापूर मार्फत आरोग्य विषयक कार्यक्रम राबविल्यामुळे शहरात निरोगी बलवान व सक्षम तरूण पिढी निर्माण होण्यास मदत झाली आणि मृत्यू प्रमाणात ही घट झाली आहे.

शहरातील विहिरी, कडवी नदीवरील जॅकवेल बंधारा, टँकर आणि नळ पाणी पुरवठयाच्या सहाय्याने शहराला स्वच्छ पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यात पालिकेने महत्त्वाची भूमिका बजावली. पाालिकेच्या रस्ता, गटार व इमारतीच्या बांधकामामुळे शहराच्या वाहतूक दळणवळणाचा व स्वच्छतेचा विकास आणि सुशोभिकरणात वाढ होण्यास मदत झाली. महिला व बालकल्याण विभागामुळे महिला आत्मनिर्भर व बालकांचा विकास होण्यास मदत झाली. शहरातील घनकचरा व व्यवस्थापनात नगरपालिकेने मोलाचे योगदान दिले आहे.

## संदर्भ :–


१) मलकापूर नगरपरिषद प्रोसिडींग, २२ जून १९५०, पृ. ६

२) मलकापूर नगरपरिषद प्रोसिडींग, २२ जून १९५०, पृ. ७

३) मलकापूर नगरपरिषद वार्षिक तपासणी अहवाल, सन १९८५–८६, पृ. १०

४) मलकापूर नगरपरिषद अर्थसंकल्प व अंदाजपत्रक सन २०१०–११, पृ.१२

५) मलकापूर नगरपरिषद अर्थसंकल्प व अंदाजपत्रक सन २०१३–१४, पृ.२२

६) मलकापूर नगरपरिषद अर्थसंकल्प व अंदाजपत्रक सन २०१३–१४, पृ.६

७) मलकापूर नगरपरिषद वार्षिक तपासणी अहवाल, सन १९८३–८४, पृ.२३

८) मलकापूर नगरपरिषद वार्षिक तपासणी अहवाल, सन १९८५–८६, पृ.१७

९) मलकापूर नगरपरिषद वार्षिक तपासणी अहवाल, सन १९८३, पृ. १४, २६

१०) मलकापूर नगरपरिषद वार्षिक तपासणी अहवाल, सन १९८६, पृ. १४, १८

११) दैनिक सकाळ, कोल्हापूर, दि.२७ जुलै २००७, पृ. ७

१२) भिडे गजानन, मध्ययुगीन भारताचा इतिहास, फडके प्रकाशन कोल्हापूर, प्रथमावृत्ती, जुलै २०००, पृ.७६

१३) कित्ता, पृ.७७

१४) ग्रोवर बी.एल., आधुनिक भारताचा इतिहास, एस.चंद आणि कंपनी लि. नवी दिल्ली, २००३, पृ. ३०४

१५) चौधरी कि.का., कोल्हापूर जिल्हयाचे गॅझेटियर, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९८९, पृ. ५७६

१६) मलकापूर नगरपरिषद वार्षिक तपासणी अहवाल, सन १९८३–८४, पृ. १४

१७) ङ्घीळ ङरवरीहर्ळीं घेर्श्रीरपझरीङ्की, थळश्रश्र झरशिी वरींश १३/०८/१९७१(झ.छ.क/ १०९६–१–३१४, १९७१)

१८) दैनिक सकाळ, कोल्हापूर, दि. २ जानेवारी २००९, पृ.२

१९) दैनिक पुढारी, कोल्हापूर, दि.१४ जानेवारी २००७, पृ.३

२०) दैनिक पुढारी, कोल्हापूर, दि.१० जून १९९२, पृ.९

२१) झीष ऊी. छ.ऊझरींळश्र उेश्रश्रशसश, अपर्पीरश्र ठर्शिीि २००६–०७, २००७–०८

२२) चौधरी कि.का., उपरोक्त, पृ. ५९२

२३) मलकापूर नगरपालिका, आरोग्य विभाग, मोडी लिपी पत्र– २२ फेब्रुवारी १९३२, पृ. २
२४) कोल्हापूर जिल्हा परिषद वार्षिक प्रशासन अहवाल– सन १९७२ ते २०१०
२५) मलकापूर नगरपरिषद वार्षिक तपासणी अहवाल, सन १९८३, पृ. १९
२६) मलकापूर नगरपरिषद वार्षिक तपासणी अहवाल, सन १९८३, पृ.२८
२७) ग्रामीण रूग्णालय, मलकापूर माहिती पुस्तिका, सन २०११–१२, पृ.१
२८) मुलाखत– डॉ.भारत पाटील (बी.ए.एम.एस.) शुक्रवार, दि.१२ ऑक्टोबर २०१२
२९) मुलाखत – उमेश शामराव गांधी, गुरूवार, दि. १६ ऑगस्ट २०१२
३०) मलकापूर नगरपरिषद प्रोसिडींग– ३ जुलै १९४७, पृ. १०
३१) मलकापूर नगरपरिषद प्रोसिडींग– १५ एप्रिल १९४८, पृ.७
३२) मलकापूर नगरपरिषद प्रोसिडींग– २२ नोव्हेंबर १९५१, पृ.१०
३३ ) मलकापूर नगरपरिषद प्रोसिडींग– ९ मे १९८८, पृ.७
३४) मलकापूर नगरपरिषद वार्षिक तपासणी अहवाल, सन १९८३, पृ. ७
३५) मलकापूर नगरपरिषद वार्षिक तपासणी अहवाल, सन १९८६, पृ. ११
३६) मलकापूर नगरपरिषद वार्षिक तपासणी अहवाल, सन १९९२, पृ. १
३७) मलकापूर नगरपरिषद वार्षिक तपासणी अहवाल, सन १९९६, पृ. ९, १६
३८) मलकापूर नगरपरिषद अर्थसंकल्प व अंदाजपत्रक, सन २०१३–१४, पृ. ५
३९) मलकापूर नगरपरिषद अर्थसंकल्प व अंदाजपत्रक, सन २०१०, पृ.४
४०) मलकापूर नगरपरिषद वार्षिक तपासणी अहवाल, सन १९८४, पृ.१२
४१) कित्ता, पृ.१३
४२) मलकापूर नगरपरिषद वार्षिक तपासणी अहवाल, सन १९९५, पृ.१४
४३) मलकापूर नगरपरिषद प्रोसिडींग– ११ जुलै १९७८, पृ.१२
४४) मलकापूर नगरपरिषद प्रोसिडींग– ५ मे १९८६, पृ.५
४५) मलकापूर नगरपरिषद वार्षिक तपासणी अहवाल, सन १९८६, पृ.९
४६) मलकापूर नगरपरिषद वार्षिक तपासणी अहवाल, सन १९९५, पृ.१७
४७) मलकापूर नगरपरिषद अर्थसंकल्प व अंदाजपत्रक, सन २०१०–११, पृ.५
४८) मलकापूर नगरपरिषद अर्थसंकल्प व अंदाजपत्रक, सन २०१०–११, पृ.२५

४९) कित्ता, पृ. २५

५०) कित्ता, पृ. २५

५१) मलकापूर नगरपरिषद वार्षिक तपासणी अहवाल, सन १९८४, पृ.१४

५२) मलकापूर नगरपरिषद वार्षिक तपासणी अहवाल, सन २००९, पृ.९

५३) मलकापूर नगरपरिषद प्रोसिडींग– ९ जुलै १९५१, पृ.६

५४) मलकापूर नगरपरिषद वार्षिक तपासणी अहवाल, सन १९९६, पृ.१९

५५) मलकापूर नगरपरिषद अर्थसंकल्प व अंदाजपत्रक, सन २००९, पृ.१०

५६) मलकापूर नगरपरिषद प्रोसिडींग– १९ ऑगस्ट १९७२, पृ.८

५७) मलकापूर नगरपरिषद वार्षिक तपासणी अहवाल, सन १९८४, पृ.२०

५८) मलकापूर नगरपरिषद वार्षिक तपासणी अहवाल, सन १९८६, पृ.१०

५९) मलकापूर नगरपरिषद अर्थसंकल्प व अंदाजपत्रक, सन २०१०–११, पृ.४

## प्रकरण पाचवे

# मलकापूर नगरपालिकेचे शहराच्या विकासातील योगदान

१. प्रस्तावना

१. प्रशासकीय इमारत

२. आस्थापना

३. सार्वजनिक वाचनालय

४. महिला बचत गट

५. शॉपिंग सेंटर

६. नेहरू रोजगार योजना

७. कल्याणकारी योजना

८. क्रीडांगण

९. समाज मंदिरे

१०. बालवाडी इमारत

१२. घरकूल योजना

१३. रस्ते

१४. गटारे

१५. वृक्षारोपण

१६. सार्वजनिक नळ पाणी पुरवठा

१७. स्मशानभूमी

१८. मागासलेल्या जमातीसाठी पालिकेने केलेल्या सुधारणा

१९. शहर विकासात नगरपालिकेच्या विविध विभागाचे योगदान

२०. समारोप

# प्रकरण पाचवे

# मलकापूर नगरपालिकेचे शहराच्या विकासातील योगदान

## १. प्रस्तावना :–

कोल्हापूर संस्थानातील विशाळगड जहागिरीची राजधानी म्हणून मलकापूर नगरीस ऐतिहासिक महत्त्व आहे. कोल्हापूर–रत्नागिरी राष्ट्रीय महामार्गावरील कोल्हापूर पासून ४५ कि.मी.अंतरावरील शाहूवाडी तालुक्यातील प्रमुख व्यापारी व महत्त्वाचे केंद्र म्हणून परिचित आहे. मलकापूर शहर विकासात नगरपरिषदेने महत्त्वाची भूमिका बजावली आहे. केंद्र व राज्य शासनाच्या माध्यमातून शहर विकासाकरिता अनेक योजना नगरपालिकेमार्फत राबविल्या जातात. शासनाकडून मोठया प्रमाणात उपलब्ध होणाऱ्या निधीमुळे व विविध योजनामुळे शहरातील सार्वजनिक सुविधामध्ये वाढ होण्यास व त्याद्वारे शहराचा विकास विविध अंगाने होण्यास मदत झाली आहे. परंतु मलकापूर शहराच्या वाढत्या नागरिकरणामुळे शहरामध्ये सामाजिक, शैक्षणिक, आरोग्यसेवा, पाणीपुरवठा, गटारव्यवस्था अशा अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. यामध्ये नगरपालिकेने महत्त्वाची भूमिका बजावली आहे. तसेच या वाढत्या नागरीकरणामुळे शहराच्या विस्तारात व्यवसायात आणि उद्योगधंदे यामध्ये मोठया प्रमाणात वाढ झाली आहे.

मलकापूर शहरातील नागरी गरज लक्षात घेऊन नगरपालिकेने शहराचे सुशोभिकरण करण्यासाठी महत्त्वपूर्ण कार्य केले. मलकापूर शहर विकासासाठी नगरपालिकेने केलेल्या कार्याचा आढावा खालीलप्रमाणे घेतला. त्यामध्ये प्रशासकीय कार्यालय, आस्थापना, सार्वजनिक वाचनालय, महिला बचत गट, शॉपिंग सेटंर, नेहरू रोजगार योजना, कल्याणकारी योजना, क्रीडांगण, विहिरी, समाजमंदिरे बालवाडी इमारत, घरकूल योजना, रस्ते व गटारी आणि वृक्षारोपन अशा विविध क्षेत्रातून नगरपालिकेने मलकापूर शहराच्या विकासात हातभार लावला आहे. आणि शहरातील नागरिकांना अशा अनेक सेवा–सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. अशाप्रकारे प्रस्तुत संशोधकानी सदर प्रकरणात मलकापूर शहर विकासातील योगदानाचा आढावा घेतला आहे.

## २. प्रशासकीय इमारत :–

मलकापूर नगरपरिषदेची स्थापना विशाळगड जहागिरीच्या काळात सन ३ ऑक्टोबर १८८४ रोजी झाली. मलकापूर नगरपरिषदेचे एकूण क्षेत्रफळ १.९४ चौ.कि.मी.एवढे आहे.[१] नगरपालिकेची स्थापना मलकापूर शहरात विशाळगड जहागिरदार यांच्या सरकारी वाडयात झाली. त्यावेळी जहागिरदार यांनी नियुक्त केलेल्या प्रतिनिधी मार्फत नगरपरिषदेचा कारभार सुरू होता. सन १९२८ मध्ये नगरपरिषद इमारत बांधण्यात आली आणि सन १९४० च्या दरम्यान नगरपरिषदेचे कामकाज स्वतंत्र जागेत सुरू करण्यात आले.[२] मलकापूर नगरपरिषद ही 'क' वर्गामध्ये येते. अशा या नगरपालिकेची लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत आहे. सन १९७१ च्या लोकसंख्या जनगणनेनुसार मलकापूर शहराची लोकसंख्या ४५३३ एवढी होती. सन १९८१ मध्ये ४२४८ व सन १९९१ मध्ये ५२३८ आणि सन २००१ च्या जनगणनेनुसार ५५०४ एवढी लोकसंख्या शहराची होती.[३] या लोकसंख्येचा विचार करता, सन १९८१ मध्ये झालेल्या लोकसंख्या जनगणनेनुसार इतर झालेल्या जनगणनेच्या तुलनेत १९८१ साली झालेल्या जनगणनेत शहराची लोकसंख्या घटलेली दिसते. या शहराची लोकसंख्या कमी असुनही या ठिकाणी नगरपालिका अस्तित्वात आहे. कारण कोल्हापूर संस्थांना अंतर्गत विशाळगड जहागिरीतील राष्ट्रपती विशेष अधिकारातील मलकापूर नगरपरिषद ही देशातील एकमेव नगरपालिका आहे. अशा या ऐतिहासिक नगरपालिकेचा कारभार नगरपरिषद महानगरपालिका अधिनियम १९६५ अन्वये चालविला जातो. यामध्ये नगरपरिषदेवर जनतेने निवडून दिलेले नगरसेवक आणि नगरसेवकातून नगराध्यक्ष व उपनगराध्यक्ष या पदाधिकाऱ्याची निवड केली जाते आणि राज्यशासनाकडून नियुक्त असलेल्या मुख्याधिकारी यांच्याकडून पालिकेचे प्रशासन चालविले जाते. अशा या नगरपरिषदेची सभासदांची एकूण संख्या २७ एवढी आहे. यामध्ये प्रत्यक्ष जनतेकडून निवडून आलेले २५ नगरसेवक आणि पालिकेने स्वीकृत केलेले दोन असे मिळून २७ इतकी सदस्य संख्या आहे.[४] हे नगरसेवक, पदाधिकारी आणि मुख्याधिकारी या प्रशासकीय कार्यालयातून मलकापूर शहराच्या विकासासाठी प्रशासन चालवितात. यांच्या माध्यमातून शहरातील नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी महत्त्वाचे कार्य केले जाते. यामध्ये शहरातील जन्म–मृत्यूच्या नोंदी, विवाह नोंदी, पाणी पुरवठा, दिवाबत्ती, शिक्षण, आरोग्य, महिला व बालकल्याण विकास, जकात वसूल, शहर स्वच्छता सांडपाण्याची व्यवस्था अशा

अनेक कामाचे नियोजन या इमारतीमधून केले जाते. तसेच शहरातील नागरिकांना मुलभूत सेवा सुविधा पुरविण्यात या इमारतीचे महत्त्वाचे योगदान आहे. शहरातील नागरिकांना या प्रशासकीय इमारतीतून सामाजिक, आर्थिक, प्रशासन आणि राज्यकारभाराचे धडे मिळण्यास मदत झाली. या ज्ञानाचा उपयोग लोकविकासाकरिता होण्यास मदत झाली.

## ३. आस्थापना : –

नगरपरिषदेची वाढ आणि विकासाकरिता नगरपरिषद प्रशासन ही एक महत्त्वाची बाब मानली जाते. पूर्वी मलकापूर नगरीच्या समस्या सोडविण्यासाठी लोकांना रोजंदारीवर नेमून त्यांच्याकडून पालिकेची कामे करून घेतली जात होती. नंतर शहराची वाढती गरज लक्षात घेऊन राज्यशासनाने कायमस्वरूपी कर्मचाऱ्यांची निवड केली. सध्या मलकापूर परिषदेत आस्थापना विभागात वर्ग ३ आणि वर्ग ४ श्रेणीतील कर्मचाऱ्यांची एकूण ५२ पदे आहेत. या ५२ कर्मचारी वर्गाकडून नगरपालिकेची कामे केली जात आहेत.[५] अशाप्रकारे कोणत्याही संस्थेचा विकास हा तिच्या सुलभ कार्यक्षम व पारदर्शी निर्दोष प्रशासन यंत्रणामुळेच होत असतो. प्रशासन यंत्रणा सुनियंत्रित, कार्यक्षम  योग्य असेल तरच लोकोपयोगी अशी अनेक कार्ये पार पाडली जातात. नगरपरिषद प्रशासन यंत्रणेचा थेट संबंध शहरातील नागरिकांच्या लोकोपयोगी कामाशी असतो. कारण शहरातील सार्वजनिक शहर स्वच्छ, आरोग्य, रस्ते, दिवाबत्ती, बांधकाम, पाणीपुरवठा आणि सांडपाण्याची व्यवस्था इत्यादी मुलभूत कार्ये नगरपालिकेकडून पार पाडली जातात. तसेच लोक प्रतिनिधींच्या कार्यक्षमतेवर पालिकेची दुय्यम दर्जाची कामे प्रामुख्याने अवलंबून असतात.एकंदरीत नागरी भागातील लोकांच्या सामाजिक सांस्कृतिक शारिरीक आणि मानसिक विकासाची गुरूकिल्ली म्हण्जेच नागरी स्थानिक संस्था होय.[६]

प्रशासन यंत्रणा सुनियंत्रित कार्यक्षम आणि सुरळीत चालविण्याकरिता वेगवेगळया विभागाची निर्मिती करण्यात आली. परिषदेच्या या विविध विभागामार्फत अनेक लोकोपयोगी कामे पार पाडली जातात. आरोग्य विभागाकडून सार्वजनिक आरोग्यावर परिणाम करणाऱ्या घटकांचा शोध घेऊन लोकांना चांगल्या सेवासुविधा उपलब्ध करून दिल्या जातात. साथीच्या रोगाच्या प्रसाराला आळा घातला जातो. साथीचे रोग पसरू नयेत. म्हणून प्रतिबंधात्मक उपाययोजना केली जाते. शहरातील घनकचऱ्याचे व्यवस्थापन करून शहर स्वच्छता विषयक दक्षता घेतली जाते. बांधकाम विभागामार्फत शहरातील नवीन रस्ते बांधणे आणि जुन्या

रस्त्याची दुरूस्ती करून घेतली जाते. तसेच या विभागामार्फत शहरात अनेक सार्वजनिक इमारतीचे बांधकाम केले जाते. याशिवाय शहरातील रस्त्यावरील दिवाबत्तीची सोय नियमित व मुबलक स्वच्छ पिण्याच्या पाण्याचा पुरवठा आपत्तीच्या वेळी लोकांची सुटका, शहराअंतर्गत वाहतूक योजना आणि शहरातील लोकांना स्वस्त धान्य दुकानातून अन्न धान्याचा पुरवठा करणे इत्यादी भौतिक सुधारणा कामे त्या त्या विभागामार्फत पार पाडली जातात. तसेच सांस्कृतिक विकासाकरिता शहर रचना, लोकांच्या मनोरंजना साठी बाग बगीचा किंवा उद्याने प्राणी संग्रहालय, वस्तू संग्रहालय, ग्रंथालय आणि पोहण्यासाठी तलाव इ. कामेही केली जातात.

नगरपरिषदांची सेवा आणि कार्यक्रमाची परिणाम कारकता ही तिने राबविलेल्या कार्यावर अवलंबून असते. नगरपरिषदेवरील लोकनियुक्त प्रतिनिधींनी एखादा कायदा पास केला किंवा एखादे धोरण ठरविले नंतर त्या कायदयाची किंवा धोरणांची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी नगरपालिका प्रशासनावर येऊन पडते. या प्रशासनाच्या संदर्भात टेड ऑर्ड वे म्हणतात की, 'प्रशासन नैतिक कायदा आहे. आणि प्रशासक म्हणजे नैतिकतेचा प्रतिनिधी आहे.[७]

## ४. सार्वजनिक वाचनालय : –

'ग्रंथ हेच गुरू' या उक्ती प्रमाणे अखंड ज्ञानदानाचे कार्य करणाऱ्या मलकापूर सार्वजनिक वाचनालयाची स्थापना १८८१ मध्ये झाली. वाचन संस्कृती जोपासण्याची मोलाची कामगिरी कालौघात बहरत गेली. ती या सार्वजनिक वाचनालयामुळेच वाचकांची अभिरूची वाढवून वाचन संस्कृतीचे जतन करून व्यक्तिमत्त्वावर अलोकाभिरूची नानाविध संस्कार या वाचनालयामार्फत झाले. वाचनामुळे आपल्यातील अंर्तबाहय बदल होतात. आपली भाषा, आचार विचारात बदल होतो. ग्रंथ वाचनातून दूरदृष्टीचा विकास होऊ शकतो. म्हणूनच वाचनालय हे खऱ्या अर्थाने गावाचे वैभव ठरते. ग्रंथाच्या सानिध्यात जीवन फुलून जाते. जीवनास नवा अर्थ प्राप्त होतो. कारण सार्वजनिक वाचनालय हे ज्ञानगंगाच असते. म्हणूनच राजर्षी शाहू महाराजांच्या नावाने ओळखल्या जाणाऱ्या सार्वजनिक वाचनालय मलकापूर या ज्ञानमंदिराच्या स्थापनेपासूनचा इतिहास अभ्यासने गरजेचे वाटते.

एकंदरीत सार्वजनिक वाचनालयाचा मूळ इतिहास पार्श्वभूमी आणि विविध कालखंडात झालेले बदल, प्रगती, उपलब्ध अद्यावत सामुग्री यावरून व त्यातील ग्रंथ भांडाराने सजलेले

विविध विभाग, विविध मासिके, आर्थिक व्यवहार दैनंदिन कामकाज शिवाय मलकापूरच्या विकासात वाचनालयाचे योगदान किती महत्त्वाचे आहे. त्याची चिकित्सा पद्धतीने अभ्यास करण्याचा प्रयत्न सदर प्रकरणात केला आहे.

**सार्वजनिक वाचनालयाची पार्श्वभूमी : –**

मलकापूर सार्वजनिक वाचनालयासाठी विशाळगड हा जहागिरीचे जहागिरदार कै.आबासाहेब पंत प्रतिनिधी यांनी १८८१ साली सार्वजनिक वाचनालय मलकापूरची स्थापना केली.[८] सुरूवातीच्या काळात ग्रंथ संपत्ती फारच कमी प्रमाणात होती. धार्मिक व चरित्रात्मक वाङ्मय वाचकांना उपलब्ध होते. कथा, कादंबरी व नाटके या विषयी कमी प्रमाणात ग्रंथ होते. वाचनालयासाठी स्वतंत्र अशी इमारत नव्हती. पूर्वी नरहर मंदिरातील एका खोलीत वाचनालयाचा कारभार चालत होता. वाचनालय चालविण्याची स्वतंत्र असा ग्रंथपाल नव्हता. सरकारी दरबारी लेखनाचे काम करणाऱ्या व्यक्तीकडे वाचनालय चालविण्यासाठी जबाबदारी दिलेली होती. आठवडयातून एक दोन दिवसच पुस्तकांची देव घेव होत. याच काळात नेटिव्ह जनरल लायब्ररीऐवजी सरकारी मोफत वाचनालय असे नाव आले.

प्रगतीचा आलेख उंचावत चालल्याचा सार्वजनिक वाचनालयाच्या विविध कालखंडातील घडामोडीचा आढावा घेता प्रगतीचा आलेख हा चढत्या क्रमाने वाढत गेल्याचा दिसतो. त्यासाठी योग्य व्यवस्थापन प्रभावी अंमलबजावणी मुद्देसुद ग्रंथाची मांडणी आणि ग्रंथाची तितक्याच तत्परतेने तेथील कर्मचाऱ्यांनी घेतलेली काळजी ही तितकीच महत्त्वाची आहे. म्हणूनच आज २१ वे शतक हे विज्ञान तंत्रज्ञानाचे शतक असून इंटरनेटचे मायाजाळ जगात पसरलेले असूनही घर बसल्या हवी ती माहिती इंटरनेट मोबाईलवर शोधू शकतो. तरी खऱ्या ज्ञानाच्या कक्षा प्रचंड विस्तारल्या वाचक प्रेमीमुळेच. कारण ग्रंथ हे संस्कार आणि ज्ञानाची कोठारे आहेत. स्पर्धेच्या युगात वाचन हे एक प्रभावी शस्त्र आहे. वाचनामुळे आपल्यात अंर्तबाहय कलागुणांना वाव मिळतो. आपली प्रतिभाशक्ती, कल्पनाशक्ती वाढते म्हणूनच वाचन हे एक संस्कार आहे.

एकंदरीत मलकापूरचे भाग्यविधाते कै. आबासाहेब पंतप्रतिनिधी यांनी १८८१ मध्ये स्थापन केलेल्या वाचनालयातील प्रगतीचे टप्पे आज अभ्यासणे खूप मोलाचे आहे. कारण कोल्हापूर जिल्हयातील मोजकी वाचनालये आहेत त्यात या वाचनालयाचा समावेश होतो.

१९२८ साली नगरपालिकेच्या इमारतीत वाचनालयास थोडी जागा मिळाली. विशाळगड जहागिरीची राजधानी व कोकणची बाजारपेठ म्हणून प्रसिद्ध असलेल्या मलकापूर सारख्या छोटयाशा नगरीत सार्वजनिक वाचनालय भव्य इमारतीच्या प्रतिक्षेत तग धरून होती. याच वर्षी सरकारी मोफत वाचनालया ऐवजी सार्वजनिक वाचनालय मलकापूर असे नाव देण्यात आले. या वाचनालयात दैनिक केसरी मधील लेख वाचण्यासाठी मोठी गर्दी होत असे. १९५३ साली हे वाचनालय पब्लिक ट्रस्ट ॲक्ट खाली रजिस्टर झाले. या वाचनालयाचा रजिस्टर नंबर के.ई.६१ को असा नोंद केला आहे. सन १९५३ ते १९७३ या काळात नगरपालिकेचे अनुदान व सरकारी अनुदान मिळू लागले. तसेच पुढे पंचायत समिती शाहुवाडी व नगरपालिका यांच्या सहकार्यातून १९६२ साली वाचनालयासाठी नगरपालिकेने स्वतंत्र इमारत बांधून दिली. या इमारतीत दोन खोल्या, दोन मोठे हॉल आहेत. सभासद संख्या वाढल्यामुळे वर्गणी वाढली. ग्रंथ संख्या ५००० वर जाऊन पोहचली सन १९७१–१९८१ या कालखंडात संस्थेला ‘ब’ वर्ग तालुका वाचनालय म्हणून मान्यता मिळाली. शिवाय १०० वर्षे पूर्ण झाल्या बद्दल शताब्दी महोत्सव साजरा करण्यात आला.[९]

शताब्दी महोत्सव १९८१ च्या वेळी नियोजनाची जबाबदारी त्यावेळचे अध्यक्ष कै.गणपती शंकर लाड, चिटणीस श्री.सुरेश पोतदार व त्याच्या सहकाऱ्यावर होती.[१०] त्यांनी ती जबाबदारी योग्यरित्या पार पाडली. त्यावेळी त्यांनी केलेले उल्लेखनीय कार्यकार कौतुकास्पद आहे. संस्थेचा शताब्दी महोत्सव २६ डिसेंबर १९८१ ते २९ डिसेंबर १९८१ या दिवशी साजरा करण्यात आला. या समारंभाची सुरूवात शानदार सरस्वती पूजन व ध्वजारोहणाने झाली.[११] व सबंध आसमंतात प्रसन्न वातावरण निर्माण झाले. ही वाचनालयाची १०० वर्षाच्या कारकिर्दीत केलेली भरीव कामगीरी होती.

वाचनालयास शताब्दी महोत्सवानंतर शासनाने वेळोवळी भरीव अनुदान दिले. कर्मचारी संख्या वाढली तसेच ग्रंथसंपदा ही वाढू लागले. ग्रंथसंख्या वाढल्याने सभासद झपाटयाने वाढली. ग्रंथालयात पुस्तकाबरोबर सर्व वृत्तपत्रेही ठेवण्यात आली परिणामी ग्रंथालयाचा वाचक वर्ग वाढला. दररोज सहा तास पुस्तकांची देवघेव होऊ लागली.[१२] वर्गणी अत्यल्प होती. वृत्तपत्रे वाचण्यासाठी वेगळी व्यवस्था करण्यात आली. वाचनालयाचे अध्यक्ष रमेश पडवळ व त्यांच्या सहकाऱ्यानीच अद्ययावत अशी दोन्ही बाजूस काचेची कपाटे खरेदी केली. ग्रंथाचे तालिकीकरण

करण्यात आले.[१३] वाचनालयासमोर बाग तयार करण्यात आली. बागेत अनेक सुंदर झाडे व फूलझाडे लावण्यात आली. वाचनालय इमारतीची शोभा वाढण्यास मदत झाली. याच काळात सभासद वाढीसाठी अनेक योजना हाती घेण्यात आल्या व सभासद संख्येत वाढ झाली.

१० मे २००६ साली शासनाने ग्रंथालयास १०० वर्षे पूर्ण केल्याबद्दल ५ लाख रूपये देऊन गौरविले.[१४] या निधीतून ग्रंथालयाने वाचकांकरिता बसण्यासाठी अद्ययावत खुर्च्या, देवघेव काउंटर जनरेटर इनव्हर्टर व्हॅल्यूम क्लिनर आदी खरेदी केले. तसेच ग्रंथालयात संगणक खरेदी करून ग्रंथालयाचे संगणकीकरण केले. एकंदरीत या सर्व घटनांचा आढावा घेता 'इवलेसे रोप लाविलीया दारी । तयाचा वेलू गेला गगनावरी।।' या उक्तीची समर्पकता ग्रंथालयाच्या नेत्रदिपक प्रगतीतून दिसून येते. कारण १२५ वर्षे ओलांडून वाचनालय चळवळीस हातभार लावणाऱ्या या वाचनालयाची प्रगती पाहून मन उल्हासित होते.

**मलकापूर विकासात वाचनालयाचे योगदान :–**

सार्वजनिक वाचनालय मलकापूर हे एक शाहूवाडी तालुका 'ब' वर्गातील शताब्दी महोत्सव साजरा करणारे व आदर्श ग्रंथालयाचा पुरस्कार मिळविणारे ज्ञानगंगोत्रीच्या रूपाने अद्यावत असे ग्रंथालय आहे. ग्रंथालयातील वाचक सभासद संख्या थोडी कमी प्रमाणात असली तरी ग्रंथालयाच्या माध्यमातून प्रबोधनात्मक कार्यक्रम राबवून परिसंवाद, चर्चासत्रे, व्याख्याने आदीच्या माध्यमातून समाज जीवनामध्ये ज्ञानरूपी अमृत पेरले जाते. कारण ग्रंथ वाचन व व्याख्यानाच्या माध्यमातून संस्कारित समाज, ज्ञानाने परिपक्व असा समाज वाचनालयाच्या माध्यमातून मलकापूरने दिला आहे. जसा मलकापूरला ऐतिहासिक वारसा आहे. तसाच सार्वजनिक वाचनालयाच्या माध्यमातून सुसंस्कृत असा वैचारिक वारसा जोपासण्याचे काम मलकापूर नगरपालिकेतील आर्थिक निधी उपलब्ध झाल्याने सार्वजनिक वाचनालयाने जपला आहे.

निराशेकडून प्रकाशाकडे पाहण्याचे सुंदर स्वप्न या ग्रंथरूपी वाचनालयाच्या माध्यमातून परिपूर्ण होते. ग्रंथ वाचनाने मानवाच्या सुप्त शक्तीचा विकास होतो. निराश माणसाला आधार देण्याचे काम हे ग्रंथ करतात. एकूण वाचकांना जगण्याची दिशा दाखविण्याचे काम वाचनालयाने केले आहे. कारण सार्वजनिक वाचनालये ही आपल्या सर्वांनाच ज्ञानदान देणारी शाळा आहे. 'शहाणे करून सोडावे सकळजन' हे जणू ब्रीद वाक्य उराशी ठेवून ग्रंथालये

कार्यरत असतात. ज्ञानलालसा वैचारिक जडणघडण, मनाला चालना व ज्ञानदानाचे कार्य ग्रंथालयामार्फत होते. वाचनालय हे गावाचे वैभव असते. अनौपचारिक स्वरूपात लोकशिक्षण देणाऱ्या पाठशाळा या वाचनालये आहेत.

ग्रंथ वाचनातून दूरदृष्टीचा विकास होवू शकतो. ज्ञानात भर पडते. सुसंकृत व पारदर्शक अशा मनाची जडणघडणही होते. त्यामुळे सद्य:स्थितीचा विचार करता ग्रंथालये ही लोकमानस घडविण्याची भूमिका पार पाडतात. चांगल्या वाचनातून सुसंस्कृत व्यक्तिमत्व आकारास येते. कारण ग्रंथ हे निराशेच्या गर्दीत सापडलेल्या व्यक्तीला प्रेरणा देऊ शकतात आणि जीवनात पथदर्शकाचीही भूमिका पार पाडतात.

म्हणूनच ग्रंथाची भूमिका विचारात घेता असे दिसून येते की, वाचनालयात आधुनिक दृष्टया सुसज्ञ माणूस तर घडविलाच शिवाय आपल्या अमृततुल्य ज्ञानरूपी ग्रंथाने मलकापूरच्या जनतेमध्ये शहाणपण निर्माण केले. चांगले–वाईट सत्य–असत्य याचा मानव विचार करू लागला, वाईट गोष्टी पासून परावृत्त होण्याचा प्रयत्न करू लागला याचे श्रेय या ज्ञानरूपी सार्वजनिक वाचनालयास द्यावे लागेल. कारण १८८२ पासून असंख्य अडचणीवर मात करून शताब्दी महोत्सव साजरा केला गेला. त्याचे श्रेय वाचनप्रेमी जनता, तज्ज्ञ कुशल प्रशासक वर्ग व अनुभवी कर्मचारी वर्ग यांनाच द्यावे लागेल. म्हणूनच सभासद वर्गणी व नगरपालिकेकडून मिळणारा निधी व दानशूर व्यक्तीकडून मिळणारा निधी यावरच या वस्तूंचा पाया भक्कम झाला व ग्रंथालयाच्या माध्यमातून मलकापूर शहराचा विकास झाला. मानवास शहाणपण निर्माण झाले आणि वाचनालयाच्या माध्यमातून गाव समृद्ध झाले. याचे श्रेय या वाचनालयालाच द्यावे लागेल.

## ५. महिला बचत गट :–

मलकापूर नगरपरिषद ही शाहूवाडी तालुक्यातील एकमेव 'क' वर्ग नगरपरिषद असून सदर नगरपरिषद ही डोंगराळ भागातील शतक महोत्सवी नगरपरिषद आहे. नगरपरिषदेची स्थापना सन १८८४ मधील आहे. तसेच मलकापूर ही विशाळगड संस्थानाची पूर्वीची राजधानी असलेने येथील गुळाची मोठी व्यापारी बाजारपेठ प्रसिद्ध होती.[१५] तालुक्यातील मुख्य बाजारपेठ असलेने मलकापूरमध्ये आजूबाजूच्या परिसरातील सुमारे ६५ खेडयातील व्यापारी ग्राहक यांचा कायमचा संपर्क येतो. त्या अनुषंगाने तालुक्यातील सामाजिक तसेच आर्थिक बाबींचे केंद्र म्हणून मलकापूरची जुनी ओळख आहे.

सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेअंतर्गत मलकापूर नगरपरिषदेने दारिद्र्य रेषेखालील महिलांचा आर्थिक विकास साधण्यासाठी व त्याचे जीवनमान उंचावण्यासाठी विशेष प्रयत्न म्हणून प्रियदर्शनी समाज विकास संस्था स्थापन करून २५ महिला बचत गट स्थापन केले.[१६] उदा. महिला बचत गटाची यादी पुढीलप्रमाणे

| अ.क्र. | बचत गटाचे नाव | अध्यक्षाचे नाव |
|---|---|---|
| १. | प्रियदर्शनी समाज विकास संस्था | श्रीमती कुसुम उदय पाटील |
| २. | इंदिरा महिला बचत गट | सौ.सुनिता राजू भोपळे |
| ३. | शाळी नाका महिला बचत गट | सौ.दिपमाला राजेंद्र सुर्यवंशी |
| ४. | जिजामाता महिला बचत गट | सौ.प्रविता पांडुरंग केसरकर |
| ५. | एकता महिला बचत गट | सौ.जयश्री नंदकुमार घेवदे |
| ६. | वैभव महिला बचत गट | सौ.कांचन मधुकर जाधव |
| ७. | आदर्श महिला बचत गट | सौ.जयश्री रविंद्र घेवदे |
| ८. | रचना महिला बचत गट | सौ.विजया दिपक सनगर |
| ९. | प्रेरणा महिला बचत गट | सौ.उज्वला दिपक सोनावले |
| १०. | स्नेहा महिला बचत गट | सौ.चंद्रप्रभा निलेश पाडळकर |
| ११. | रमाबाई महिला बचत गट | सौ.आश्विनी महेंद्र कांबळे |
| १२. | प्रगती महिला बचत गट | सौ.इंदूमती राजाराम ठाणेकर |
| १३. | समता महिला बचत गट | सौ.हेमांगी हरिहर देशपांडे |
| १४. | स्वामी समर्थ महिला बचत गट | सौ.माधुरी दत्तात्रय पवार |
| १५. | श्रद्धा महिला बचत गट | सौ.पल्लवी सुरेश पवार |
| १६. | क्रांती महिला बचत गट | सौ.संगिता कुमार मेदार |
| १७. | धनश्री महिला बचत गट | सौ.विमल प्रल्हाद पळसे |
| १८. | भाग्यश्री महिला बचत गट | सौ.ज्योती संतोष सपाटे |
| १९. | मरीमाई महिला बचत गट | सौ.नंदिनी सर्जेराव भोसले. |
| २०. | दिशा महिला बचत गट | सौ.जयश्री जनार्दन सनगर |
| २१. | प्रसिद्धी महिला बचत गट | सौ.माधवी किशोर चव्हाण |
| २२. | विजयी महिला बचत गट | सौ.शालन सखाराम वैराटे |

मलकापूर लोकसंख्येच्या तुलनेत सदर महिला बचत गटाची संख्या विशेष लक्षणीय आहे. या सर्व महिला बचत गटाच्या माध्यमातून दरमहा २५०००/–इतक्या भरीव रक्कमेची बचत बँक ऑफ महाराष्ट्र मलकापूर येथे आहे. ही बाब मलकापूरच्या महिला बचत गटांसाठी निश्चितच अभिमानाची व कौतुकास्पद बाब आहे असे म्हणावे लागेल. या बचत गटांच्या स्थापनेसाठी तत्कालीन मुख्याधिकारी श्री शिरीषकुमार देवकर यांचे विशेष सहकार्य व प्रयत्न आहेत. त्यामुळे त्याचा येथे उल्लेख करणे आवश्यक वाटते. तसेच सदर बचत गटांच्या

स्थापनेसाठी विशेष सहकार्य करणाऱ्या माजी नगरसेविका सौ.हेमांगी हरिहर देशपांडे व सौ.जयश्री नंदकुमार घेवदे, सौ.दिपमाला रा.सूर्यवंशी, सौ. इंदूमती रा.ठाणेकर, सौ.सुनिता राजू भोपळे, श्रीमती कुसूम उदय पाटील, सौ.पल्लवी सुरेश पवार, सौ.सुरेखा विनायक देशमाने, सौ.माधवी महेंद्र कोठावळे तसेच नगराध्यक्षा, उपनगराध्यक्ष व सर्व नगरसेवक नगरसेविका यांचे मोलाचे सहकार्य लाभले आहे.

महिला बचत गटांसाठी व्यवसाय प्रशिक्षणाचा प्रत्यक्ष अनुभव घेणेसाठी महिला बचत गट सदस्यांना पुणे महानगरपालिकेचे उपायुक्त मा.श्री.कळमकर साहेब यांनी पुणे येथील महिला बचत गटांनी केलेल्या व्यवसायाकरिता प्रत्यक्ष मुलाखती घेऊन नगरपरिषदेच्या महिलांना माहिती दिली. त्यांचा अनुभव लक्षात घेवून येथील महिलांनी व्यवसायात पडणेचे निश्चित केले आहे. त्याचाच एक भाग म्हणून नरहर मंडळ महिला बचत गटाने कॅटरींग व्यवसाय सुरू करण्याचे ध्येय ठरवून प्रोजक्ट रिपोर्ट बँक ऑफ महाराष्ट्र मलकापूर मध्ये नगरपरिषदेच्या सहकार्याने रूपये २,५०,०००/–चा सादर केला. व बँकेने त्यांना सदर प्रोजेक्टसाठी रुपये २,४०,०००/–मंजूर केले आहेत. या बचत गटाला शासन निर्णयानुसार कर्जाच्या ५० टक्के रक्कम अनुदान म्हणून देण्यात येणार आहे. तसेच बचत गटांना दारिद्र्य रेषेखालील सदस्यांच्या संख्येनुसार प्रति सदस्य रू.१०००/–प्रमाणे फिरता निधी देणेत आला.[१७] उदा.बचत गटांना धनादेश वाटप करण्यात आले ते पुढीलप्रमाणे

| अ.क्र. | बचतगटाचे नाव | नाव |
|---|---|---|
| १. | नरहर महिला बचत गट | मा.श्री. त्रिंबक ढोंगळे पाटीलसाो जि.प्र.अ. |
| २. | प्रियदर्शनी समाज विकास संस्था | मा.श्री.जीवन पाटील, मुख्याधिकारी |
| ३. | इंदिरा महिला बचत गट | सौ. शारदा पाटील, प्रकल्प अधिकारी |
| ४. | जिजामाता महिला बचत गट | मा. सौ.दिपा बापट, मुख्याधिकारी |
| ५. | एकता महिला बचत गट | मा. सौ.ज्योती प्रकाश शिरगांवकर नगराध्यक्षा |
| ६. | आदर्श महिला बचत गट | मा.श्रीम.अनिता श.देशमुख मुख्याधिकारी |
| ७. | वैभव महिला बचत गट | मा.श्री.शामराव दौ.कारंडे, नगरसेवक |
| ८. | रचना महिला बचत गट | मा.श्री.रमेश बाबू चांदणे, उपनगराध्यक्ष |
| ९. | स्नेहा महिला बचत गट | मा.श्री.प्रविण प्रभाकर प्रभावळकर, सदस्य |
| १०. | स्वामी समर्थ महिला बचत गट | मा.श्री.सुधाकर भि. पाटील, सदस्य |
| ११. | हरीओम महिला बचत गट | मा.श्री.विकास ल.तांदळे, सदस्य |
| १२. | प्रगती महिला बचत गट | मा.श्री.विनायक के.कुंभार, सदस्य |

तसेच बचत गटांना विशेष प्रोत्साहन देणेसाठी म्हणून नवीन पाच प्रोजेक्ट आम्ही तयार करण्याचे ठरविले आहे. त्याप्रमाणे पुण्याच्या स्माईल सेंटरच्या धर्तीवर मलकापूर येथेही महिला बचत गटाच्या माध्यमातून छोटे स्माईल सेंटर उभे करण्याचा नगरपरिषदेचा मानस आहे. लिज्जत पापडच्या धर्तीवर मलकापूर मध्ये महिला उद्योगामार्फत तयार होणारा विशेष ओळख असणारा पापड हरी ओम महिला बचत गटाच्या माध्यमातून तयार करण्याचा नगरपरिषदेचा मानस आहे. मलकापूरच्या महिला बचत गटांनी मलकापूरचे नाव बचत गटाच्या माध्यमातून संपूर्ण महाराष्ट्रामध्ये प्रसिद्ध करावे व त्यांच्या कार्यामुळे मलकापूरचा नावलौकिक व्हावा, असा आमचा मानस आहे.[१८]

तरी सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना या केंद्र शासनाच्या योजनेच्या माध्यमातून महिलांचे आर्थिक जीवनामान उंचावण्याचा नगरपरिषदेचा आटोकाट प्रयत्न राहिल व या बचत गटांना आवश्यक ते सर्व सहकार्य नगरपरिषद करेल, असे आश्वासन नगरपरिषदेच्यावतीने बचतगटांना देण्यात आले.

## ६. शॉपिंग सेंटर :–

मलकापूर शहरामध्ये औद्योगिक वसाहत विकसीत झालेली नाही. परंतु अनेक छोटे–मोठे लघु व कुटीर उद्योग विकसित आहेत. या उद्योगामध्ये उपहारगृहे (हॉटेल्स) भोजनगृहे (खानावळ), मेवा मिठाईची दुकाने, ऊसाचे चरके, लाकूड व्यापारी, चूना व वीट भट्टया, गिरण्या व ऑईल मिल्स इत्यादी विविध उद्योग विकसित झालेले आहेत. अशा उद्योगांना मलकापूरच्या बाजारपेठ केंद्रामुळे आणि आठवडी शुक्रवारी बाजारामुळे चालना मिळाली आहे. तसेच मलकापूर शहरातील तरूणांना रोजगार उपलब्ध व्हावा आणि व्यापाराला उत्तेजन देण्यासाठी नगरपरिषदेने मालकीच्या मोकळया जागेत शॉपिंग सेंटरची बांधकामे केली आहेत. तसेच नागरिकरणांच्या वाढत्या गरजा भागविण्यासाठी आणि लघु व कुटीर उद्योगातून तयार झालेल्या मालांना बाजारपेठ उपलब्ध व्हावी. म्हणूनच नगरपरिषदेने शॉपिंग सेंटर गाळे बांधून घेतले आहेत. अशाप्रकारे परिषदेने व्यापार वाढीसाठी आणि सर्वसामान्य लोकांना व्यवसाय करण्याकरिता दुकान गाळे उपलब्ध करून देण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

नगरपरिषदेने शहराच्या विविध भागात शॉपिंग गाळे बांधले आहेत. सुभाष रोड, मंगळवार पेठ, जनावरांचा बाजार आणि विठ्ठल मंदिर इत्यादी ठिकाणी परिषदेचे दुकान गाळे

आहेत. मलकापूर नगरपरिषदेच्या मालकीच्या विठ्ठल मंदिराजवळ चार खोल्या आहेत आणि इतर खुल्या पाच जागा पालिकेने भाडयाने दिल्या आहेत. त्या प्रत्येकी दहा रूपये प्रमाणे सन १९८६ साली दिल्या होत्या. त्या प्रत्येकी दहा रूपये प्रमाणे सन १९८६ साली दिल्या होत्या. आता त्या भाडयामध्ये वाढ केली आहे. तसेच एस.टी.स्टँड जवळची जागा पालिकेच्या माजी सेवकास दरमहा पाच रूपये भाडयाने दिली जाते.[१९] पालिकेने दुकान गाळे बांधताना विशेष दक्षता घेतली. त्यामुळे मलकापूर शहराच्या सौंदर्यात भर पडली आहे. या शॉपिंग सेंटरचे बांधकाम रस्त्याला लागून एका सरळ रेषेत केले आहे. तसेच शॉपिंग सेंटरमधील व्यावसायिकांना नगरपरिषदेने वीजपुरवठा, पाणीपुरवठा इत्यादी मूलभूत सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. मलकापूर नगरपरिषदेने शहरात शॉपिंग सेंटर(मंगलधाम) क्षेत्र ०.०९ आणि शॉपिंग सेंटर क्षेत्र ०.०४ इत्यादी क्षेत्रावर दुकानगाळे १० द १० आकाराची बांधली आहेत.[२०] या शॉपिंग सेंटरच्या आवारामध्येही दिवाबत्तीची सोय करून दिली आहे. शासनाकडून मिळालेल्या पन्नास लाखांच्या प्रोत्साहन निधीतून शॉपिंग सेंटरसह शहरातील विविध विकास कामे करण्यास नगरपालिकेच्या विशेष सभेत मंजूरी देण्यात आली. त्यावेळी अध्यक्षस्थानी नगरपालिकेचे नगराध्यक्ष राजू भोपळे हे होते.[२१]

अशा या शॉपिंग सेंटरमधून कपडयांची दुकाने, लहान मुलांच्या खेळण्याची दुकाने, गिफ्ट हाऊस, फोटो स्टुडिओ, शिलाई टेलर दुकान, किराणा दुकाने, इलेक्ट्रिक वस्तूंची दुकाने, सायबर कॅफे आणि रसवंती गृहे असे अनेक व्यवसाय चालत असल्याचे दिसून येते. नगरपालिकेच्या या प्रयत्नामुळे शहरातील अनेक गरीब कुटुंबातील लोकांना व्यवसाय करण्याची संधी मिळाली आहे. याबरोबर शॉपिंग सेंटरच्या माध्यमातून नगरपालिकेलाही मोठया प्रमाणात उत्पन्न मिळत आहे. या उत्पन्नाचा उपयोग नगरपालिका शहरातील विकासाच्या योजना राबविण्यावर खर्च करत आहेत. अशाप्रकारे या शॉपिंग सेंटरच्या माध्यमातून तरूणांना चांगला रोजगार, नगरपालिकेची आर्थिक स्थिती चांगली होण्यास आणि शहराच्या सुशोभिकरणात वाढ होण्यास मदत झाली. हे एक पालिकेचे योगदन मानावे लागेल.

### ७. नेहरू रोजगार योजना :–

नगरपरिषदेच्या माध्यमातून नेहरू रोजगार योजनेअंतर्गत शहराच्या संपूर्ण विकासाकरिता सर्वकष धोरण राबविले जाते. शहरी भागातील दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाची आर्थिक उन्नती

होण्याकरिता या योजनेअंतर्गत विविध उपक्रम राबविले जातात. मलकापूर शहरात नेहरू रोजगार योजनेअंतर्गत स्वयंरोजगार, प्रशिक्षण आणि नागरी रोजगार इत्यादी उपक्रम राबवण्यात येतात. या उपक्रमाच्या अंमलबजावणीसाठी नगरपालिकेस सन १९८९–९० ते १९९४–९५ सालाअखेर योजनानिहाय खाली दर्शविल्याप्रमाणे शासकीय अनुदान प्राप्त झाले होते. या योजनांचा विनियोग आणि योजना निहाय ३१ मार्च १९९६ अखेरचे शिल्लक अनुदान खालीलप्रमाणे दाखविले आहे.[२२]

| अ.क्र. | योजनेचे नाव | प्राप्त अनुदान | झालेला खर्च | शिल्लक अनुदान |
|---|---|---|---|---|
| १. | स्वयंरोजगार | ५९२६१ | ५३६२५ | ५६३६ |
| २. | प्रशिक्षण | १७९५० | १७१५० | ८०० |
| ३. | नागरी रोजगार | ४८६०३० | २४२०२३ | २४४००७ |

**स्वयंरोजगार :–**

नगरपालिकेने स्वयंरोजगार योजनेअंतर्गत ४० लोकांना अनुदान मंजूर केले होते. कारण शहरातील गरीब कुटुंबातील तरूणांना व्यवसाय सुरू करण्यासाठी आणि त्यांची व्यावसायिक आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी इत्यादी कामाकरिता पालिकामार्फत अनुदान दिले जाते. थोडक्यात शहरातील आर्थिकदृष्टया गरीब तरूणांना आत्मनिर्भार होण्याकरिता मदत केली आहे.

**प्रशिक्षण :–**

नगरपरिषदेने आर्थिकदृष्टया मागास १० लाभार्थींना याचा लाभ दिला आहे. या लाभार्थींना स्वयंरोजगारासाठी शिलाई आणि टायपिंग इत्यादी व्यावसायिक प्रशिक्षण दिले. शिलाई प्रशिक्षण योजनेतून स्त्रियांना घर बसल्या स्वयंरोजगार उपलब्ध होत आहे. स्त्रिया अबला न राहता त्यांचे सबलीकरण होण्यास मदत होत आहे. टायपिंग प्रशिक्षणामुळे काहींनी स्वयंरोजगार उभा केला तर काहींनी सरकारी नोकऱ्या मिळविल्या आहेत.

**नागरी रोजगार योजना :–**

नागरी रोजगार योजना अंतर्गत रस्त्याची खडीकरणाची कामे केली जातात. तसेच शहरातील बागबगीच्या, उद्याने आणि गटारे बांधकाम व दुरूस्तीची कामे या योजनेच्या माध्यमातून केली जातात.

अशाप्रकारे या योजनेतून शहरी भागातील तळागाळातील लोकांचे जीवनमान उंचावण्यास मदत होते. तसेच या योजनेअंतर्गत शहरी भागातील दारिद्रय रेषेखालील कुटुंबाना व्यावसायिक प्रशिक्षण देणे कर्ज उपलब्ध करून देणे, उत्पादित मालाच्या विक्रीसाठी मार्गदर्शन करणे इत्यादीच्या माध्यमातून त्यांना आर्थिकदृष्टया स्वावलंबी होण्यासाठी प्रयत्न केले जातात. शहरी भागातील दारिद्रयाचे उच्चाटन करण्यास ही योजना अत्यंत उपयोगी असल्याचे दिसते.

## ८. कल्याणकारी योजना :–

नगरपालिका एकूण उत्पन्नाच्या ५ टक्के इतकी (बांधील खर्च वजा जाता) रक्कम मागासवर्गीयाच्या कल्याणकारी योजनावर खर्च करण्यात यावी. असे नगरविकास विभाग निर्णय क्र.बीसीटी १९७६/५०५ एमपू एन–२ दिनांक १७.२.१९७६ नुसार आदेश देण्यात आला होता.[२३] तसेच शासन नगरविकास विभाग परिपत्रक क्र.बीसीसी. १०८५ सीआर ८/८५ नवि–१०, ता.२ फेब्रुवारी १९८८ रोजीच्या आदेशान्वये नगरपालिकेने महसूली उत्पन्नातील बांधील खर्च वजा जाता राहिलेल्या महसूलाच्या पाच टक्के भाग हा राखीव निधी म्हणून काढून तो दुर्बल घटकाच्या कल्याणकारी योजनेवर खर्च करण्याची तरतूद करण्यात आली.[२४] सदर योजनेतील निधी आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील लोकांचा विकास करण्याकरिता सतरा बाबीवर खर्च करण्यात येतो. उदा. डॉ.बाबासाहेब आंबेडकर बालवाडी चालवणे, बालवाडी बांधणे, समाज मंदिर बांधणे व सुधारणा करणे, बेघर वसाहत विकास करणे, शौचालय, नळकनेक्शन, वीज कनेक्शन मदत करणे इत्यादी त्यामध्ये आर्थिक दुर्बल घटकांना कायमस्वरूपी आणि दीर्घ मुदतीचे फायदे कसे होतील या दृष्टिकोनातून बघितले जाते. नगरपालिकांना पाच टक्के निधीची तरतूद करावी लागते. अन्यथा नगरपालिकेस देय असणारे महागाई भत्यामधून पाच टक्के निधीची रक्कम रोखून धरणेबाबत जिल्हाधिकारी यांना कळविणेत यावे असे आदेश आहेत. उदा. सन १९९४–९५ सालातील पाच टक्के निधीची तरतूद २३५०० रूपये इतकी होती. पैकी नगरपालिकेने फक्त २११४४ रूपये खर्च केले आणि अनुशेष रक्कम २३५६ शिल्लक होती. तरी सदरील खर्च १०० टक्के का केला नाही. याचा खुलासा नगरपालिकेने सादर करावा अन्यथा अनुशेष रक्कम रूपये २३५६/– इतके महागाई भत्ता अनुदान रोखणेबाबत जिल्हाधिकारी यांना कळविणेत येईल असे वार्षिक तपासणी अहवालात म्हटले होते. याबाबत भविष्यात अशी पुनर्रावृत्ती घडणार नाही यांची तंबी नगरपालिकेला दिली होती.

यावरून आपणाला असे दिसून येते की, शासन आर्थिकदृष्टया मागास लोकांकरिता किती दक्ष आहे. दारिद्र्य रेषेखालील लोकांची सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक आणि व्यावसायिक प्रगती व्हावी याकरिता योजनेच्या माध्यमातून प्रयत्न केला जातो. शहरी भागातील मागासवर्गीय कुटुंबातील महिलांना संसारोपयोगी भांडी पुरविली जातात. तसेच मागासवर्गीय महिलांना शिलाई मशिनचे वाटप करून स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध करून दिली जाते. अशा प्रकारे शहरी भागातील मागासवर्गीय कुटुंबाचा दर्जा व राहणीमान उंचविण्यासाठी ही योजना लाभदायक ठरत आहे.

## ९. क्रीडांगण :–

मलकापूर शहरातील लोकांच्या आरोग्याच्या दृष्टिकोनातून आणि प्राथमिक, माध्यमिक, उच्चमाध्यमिक आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना व तरूणांना सर्व प्रकारच्या खेळाची एकत्रित सोय व्हावी म्हणून नगरपालिकेने स्वतःच्या मालकीच्या जागेत एक क्रीडांगण किंवा क्रीडा संकुल उभे केले आहे.[२५] या क्रीडा संकुलामध्ये कॉमेंट्री बॉक्स, स्वच्छतागृहे, धावण्याचा ट्रॅक, पुलप्स बार आणि जिम्नॅशियम साहित्य इत्यादी सेवा सुविधा या संकुलातून उपलब्ध करून दिली आहे.

शहरी भागातील मुलांच्या क्रीडावृत्तीस प्रोत्साहन देण्यासाठी हे क्रीडा संकुल उभा केले आहे. या खेळाच्या मैदानावर केंद्र शाळा, तालुका आणि जिल्हा स्तरावरच्या विविध स्पर्धाचे आयोजन केले जाते. तसेच शहरातील बडया नेत्याच्या वाढदिवशी याठिकाणी स्पर्धा होतात. यामध्ये कबड्डी, खो–खो, लांब उडी, उंच उडी, धावणे स्पर्धा, दोरीवरच्या उडया, कुस्ती फूटबॉल, हॉलीबॉल आणि क्रिकेट स्पर्धा अशा अनेक खेळाच्या स्पर्धा आयोजित केल्या जातात.

अशा या खेळाच्या मैदानावर शहरातील वयोवृद्ध लोकही या ठिकाणी सकाळी आणि संध्याकाळी फिरावयास येतात. तसेच या मैदानाचा उपयोग शहरातील तरूण–तरूणींना होताना दिसत आहे. पोलिस भरती आणि आर्मीचा सराव करण्यासाठी मोठया संख्येने युवक वर्ग याठिकाणी येतात. या मैदानामुळे शहरातील युवकांना पोलिस आणि आर्मीची नोकरी करण्याची संधी मिळाली आहे. आरोग्याच्या दृष्टिकोनातून शहरातील लोकांना या मैदानाचा चांगला उपयोग होत आहे. तसेच येथील तरूणांमध्ये क्रीडावृत्ती रूजविण्यास मदत झाली आहे. मलकापूरसाठी क्रीडांगण हे एक वरदानच ठरले आहे.

## १०. समाज मंदिरे :–

मलकापूर शहरात अनेक प्रभागात नगरपरिषदेने समाज मंदिरे उभारून या नगरीतील सर्व जाती धर्माच्या लोकांना एका छताखाली आणण्याचा प्रयत्न केला. पूर्वी मलकापूर नगरीत दोन धर्मशाळा होत्या. मलकापूर हे ठिकाण कोल्हापूर–रत्नागिरी महामार्गावर असल्याने आणि विशाळगड जहागिरीचा ऐतिहासिक वारसा लाभल्याने व तसेच व्यापारी बाजारपेठेच केंद्र असल्याने याठिकाणी मोठया प्रमाणात यात्रेकरू पर्यटक आणि व्यापारी नेहमी ये–जा करत होते. हे लोक या धर्मशाळांचा आश्रयासाठी उपयोग करत असत. पूर्वी धर्मशाळांना याठिकाणी महत्व होते. पुढे आधुनिक समाजाची गरज लक्षात घेवून मागासवर्गीय लोकांच्या वस्तीत समाज मंदिरे बांधण्याचे धोरण राबविले.

मलकापूर नगरपरिषदेअंतर्गत आर्थिक दुर्बल घटक कल्याणकारी योजनेतून शहरास समाज मंदिरे बांधण्यासाठी आणि सुधारणा करण्यासाठी २,७५,००० रूपये खर्च करण्यात आले.[२६] तसेच या कल्याणकारी योजनेतून डॉ.बाबासाहेब आंबेडकर बालवाडी बांधणे आणि सुव्यवस्थित व सुनियंत्रित चालवणे, समाज मंदिरांचे बांधकाम करणे आणि त्यामध्ये सुधारणा घडवून आणणे, बेघर वसाहतीतील लोकांचा विकास करणे आणि त्यांना शौचालये, वीज कनेक्शन, नळ कनेक्शन इत्यादी सेवा सुविधा उपलब्ध करून दिल्या जात आहेत. सन १९८९–१९९० या साली नगराध्यक्ष नारायण ज्ञानोबा गांधी यांच्या कार्यकाळात मलकापूर नगरपरिषदेच्या माध्यमातून डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाज मंदीराचे बांधकाम पूर्ण केले.[२७]

अशाप्रकारे हरिजन वस्तीमध्ये सार्वजनिक कार्यक्रमासाठी व इतर कार्यासाठी स्वतंत्र सोय व्हावी या उद्देशाने समाज मंदिर बांधण्याची योजना सुरू करण्यात आली. ही समाज मंदिरे दलित वस्तीतील लोकसंख्येच्या प्रमाणावर आधारित एकापेक्षा अधिक बांधली जात आहेत. हरिजन वाडयातील लोक या समाज मंदिराचा उपयोग डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती व बुद्धजयंती साजरी करण्यासाठी, बालवाडया चालविण्याकरिता, धार्मिक विधी पार पाडण्यासाठी आणि सण व उत्सव इ.साजरे करण्याच्या कामाकरिता या वास्तूचा उपयोग करत असतात. याशिवाय मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या अभ्यासिकेकरिता या समाज मंदिराचा उपयोग होत आहे. या मंदिरातून मागासवर्गीयांना प्रौढ शिक्षण आणि लोकशिक्षणचे धडे मिळण्यास मदत होत आहे. तरूण पिढीमध्ये दलित वस्तीचा विकास व सुधारणा करण्याची जागृती निर्माण होण्यास मदत

झाली. शहरी भागात फुले–शाहू–आंबेडकर यांची विचारधारा रूजण्यास या समाज मंदिराची मदत झाली. समाजातील अस्पृश्यता जातीभेद यास छेद देऊन स्वातंत्र्य, समता व बंधुता प्रस्थापित करण्यात या मंदिराचा सिंहाचा वाटा आहे. आधुनिक काळातील समाजमंदिरे मागासवर्गीय लोकांच्या वैचारिक उन्नतीमध्ये महत्त्वपूर्ण ठरली आहे.

## ११. बालवाडी इमारत :–

मलकापूर नगरपरिषदेने १९७९ साली पहिल्यांदा एक बालवाडी बांधली. एक सेवक नेमून त्यांना १७५ रूपये फिक्स पगार दिला जात होता.[२८] केंद्र सरकारच्या बहुगुणी २० कलमी कार्यक्रमातंर्गत महाराष्ट्र शासनाने अनेक नवनवीन योजना सुरू करून प्रत्यक्षात अंमलबजावणीसाठी शहरी भागात नगरपरिषदेकडे सुपूर्त केल्या आहेत. स्वतंत्र भारताची भावी पिढी सुदृढ निरोगी व बुद्धीमान होण्यासाठी या बालवाडी केंद्राची स्थापना करण्यात आली. ३ ऑक्टोबर १९७९ रोजी मलकापूर नगरपरिषदेचा ९५ वा वाढदिवस साजरा करण्यात आला. या वाढदिवसी हरिजन वस्तीत बालवाडी सुरू करण्यासंदर्भात मलकापूर नगरपरिषदेचे नगराध्यक्ष प्रभाकर प्रभावळकर यांच्या अध्यक्षतेखाली मिटींग घेण्यात आली. मिटींगमध्ये बालवाडीला डॉ.बाबासाहेब आंबेडकर असे नाव द्यावे. बालवाडीतील बालकांना वर्षातून दोन गणवेश देण्यात यावेत. दुपारच्या वेळी मुलांना एक कप दूध व यावरती जास्तीत जास्त २४ पैसे खर्च करावेत. मुलांना खेळण्यासाठी लागणाऱ्या साहित्याच्या खरेदीसाठी एक हजार रूपये खर्च करावेत. बालवाडी चालविण्याकरिता प्रशिक्षित बाईची नेमणूक करण्यात यावी. बालवाडीवर पालिकेच्या शिक्षण समितीच्या सदस्यांनी नियंत्रण ठेवावे. इत्यादी बाबीवर चर्चा करण्यात आली.[२९] बालवाडी इमारत बांधण्याची परवानगी मिळाली. डॉ.बाबासाहेब आंबेडकर या बालवाडीमध्ये शहाबादी फरशी बसविणे आणि फळा(बोर्ड) तयार करणे इत्यादी कामासाठी येणाऱ्या खर्चास नगराध्यक्ष दिनानाथ सक्रे यांनी मंजुरी दिली.[३०]

एकात्मिक बालविकास प्रकल्प १९८१–८२ सालापासून महाराष्ट्रात राबविण्यात येतो. या योजनेच्या माध्यमातून पूर्वी बालवाडयामधून पौष्टिक आहार दिला जात होता. उदा. शेंगदाणे, मूग, मटकी, गुळ, रवा इत्यादी. परंतु शासनाच्या नवीन धोरणानुसार सर्व अंगणवाडी केंद्रांना गव्हावर आधारित तयार केलेला पौष्टीक आहार दिला जात आहे. सदरचा आहार महाराष्ट्र स्टेट को–ऑप मार्केटिंग फेडरेशन मुंबई यांच्यामार्फत पोहोच केला जातो. प्रत्येक लाभार्थीला

प्रतिदिनी ७५ ग्रॅम आहार दिला जातो. तसेच कुपोषित मुले, अतिकुपोषित मुले, गरोदर माता, लेकुरवाळ्या माता याना प्रतिदिनी १५० ग्रॅम आहार देण्यात येतो.

० ते ६ वर्षे वयोगटातील बालकांची शैक्षणिक व आरोग्यविषयक प्रगती साधण्याकरिता मलकापूर नगरपालिकेने शहरातील प्रत्येक वॉर्ड प्रभागात बालवाडी इमारत उभी केली आहे. कारण बालकांना प्राथमिक शिक्षण व आरोग्याचे सुसंस्कार मिळवण्यासाठी ही योजना महत्त्वाची आहे. तसेच एकात्मिक बालविकास योजनेतून मुलांना खाऊचे पदार्थ, क्रीडा आणि खेळण्यासाठीचे साहित्य वाटप केले जाते. शासनाच्या महिला व बालकल्याण विभागाच्या योजना शहरी भागात राबविण्यामध्ये अंगणवाडी सेविकांचा सहभाग महत्त्वपूर्ण आहे. अशाप्रकारे अंगणवाडयांच्या माध्यमातून बालकांना शासनाकडून शैक्षणिक सुविधा मिळाल्याने मुलांचा सर्वांगिण विकास होण्यास मदत झाली आहे.

## १२. घरकुल योजना :–

शहरी भागातील दारिद्र्य रेषेखालील बेघर कुटुंबाना व अनुसूचित जाती जमातीतील कुटुंबांना पक्की घरे बांधून देण्यासाठी सातव्या पंचवार्षिक योजनेत (१९८५–८६) इंदिरा आवास योजनेची तरतूद करण्यात आली. पूर्वी या कुटुंबांना नवीन घर बांधण्यासाठी एका घरास २८५०० रूपयेप्रमाणे अनुदान दिले जात होते. मलकापूर नगरपरिषदेच्या आर्थिक दुर्बल घटक बेघर पाच टक्के योजनेतून बेघरांना घर बांधण्यास पाच हजार रूपये दिले जात होते.[३१] तसेच परिषदेमार्फत नगरपालिकेच्या माजी कर्मचारी नोकरांना घर बांधकामासाठी दहा हजार रूपये दिले जात होते.[३२] या योजनेमुळे अनेक गरिब कुटुंबांना राहण्यासाठी घर मिळाले पंधरा रूपयामध्ये लाईट कनेक्शन जोडून मिळाले. घरे बांधण्यासाठी लागणारी सामग्री बाजारात महाग झाल्याने या योजनेतील अनुदानात बदल झाला आहे. सध्या या विभागाच्या वतीने ज्या दारिद्र्य रेषेखालील लाभार्थींच्या प्रस्तावाना मंजुरी दिली आहे. त्या प्रत्येक लाभार्थीला ६८५०० इतकी रक्कम अनुदान स्वरूपात दिली जाते.[३३] स्थानिक साधन सामग्रीचा वापर करून स्थानिक पर्यावरणाला अनुकूल व पोषक घरांचे बांधकाम करण्यासाठी दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाना हे अनुदान देण्यात येते. या योजनेअंतर्गत लाभार्थ्यांची निवड करण्याचे अधिकार नगरपरिषदेच्या स्थायी समितीला देण्यात आले आहेत. नगरपालिकेमार्फत आर्थिक दुर्बल घटकातूल कुटुंबाबरोबर पालिकेत काम करणारे चतुर्थ श्रेणीतील कामगारानांही घरे बांधण्यासाठी आर्थिक

मदत पुरविली जाते. तसेच निर्मल भारत अभियान कार्यक्रमातंर्गत शहरी भागातील मागासवर्गीय समाजातील व्यक्तींना वैयक्तिक शौचालय बांधण्यासाठी अनुदान दिले जाते. दारिद्रय रेषेखालील कुटुंबाना ४६०० आणि दुर्गम पर्वतीय भागातील कुटुंबांना रू.५१०० इतके अनुदान शौचालय बांधकामासाठी (१०० टक्के अनुदान) दिले जाते.[३४]

या योजनेचा लाभ ग्रामीण व शहरी भागातील दारिद्रय रेषेखालील कुटुंबांना होत आहे. सरकारच्या या योजनामुळे गरीब लोकांना राहण्यासाठी चांगले निवासस्थान मिळत आहे. ग्रामीण भागात तर या योजनेमुळे पूर्णता बदल झाला आहे. कारण पूर्वी मातीची छपराची घरे दिसत होती. ती आता नाहीशी झाली आहेत. त्या ठिकाणी सिमेंट काँक्रिटची घरे दिसत आहेत. ग्रामीण व शहरी भागाचा विचार केला असता शहरात पूर्वी झोपडया मोठया प्रमाणात दिसत होत्या. ती आता या योजनेमुळे झोपडपट्टी मुक्त शहरे दिसत आहेत. या योजना राबविण्यात स्थानिक स्वराज्य संस्थांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे. आर्थिक दुर्बल घटकातील कुटुंबांना याचा फायदा होताना दिसत आहे. विशेष म्हणजे या योजनेमुळे शहरी आणि ग्रामीण भाग 'झोपडी व हागणदारी मुक्त' होण्यास मदत होत आहे.

## १३. रस्ते :–

मलकापूर नगरपालिकेचे एकूण क्षेत्र ८६.६ हेक्टर एवढे आहे.[३५] नगरपालिकेच्या या हद्दीत सुभाष रोड, विठ्ठल मंदिर रस्ता, नगर पालिका रस्ता,महादेव टेकडी रस्ता, बेघर वसाहत रस्ता, मंगळवार पेठ रस्ता, जनावरांचा बाजार रस्ता आणि स्मशानभूमी रस्ता असे अनेक मलकापूर शहरात लहान–मोठे रस्ते आहेत. शहरातील सर्व रस्ते मिळून त्याची लांबी ७.५० कि.मी. इतकी आहे. हे रस्ते डांबरी, सिमेंट काँक्रींट, पक्के, कच्चे रस्ते मिळून साडेसात कि.मी.अंतराचे रस्ते आहेत.[३६] सन १९८४–८५ आणि १९८५–८६ साली मलकापूर शहरात डांबरीकरण केलेले चार कि.मी.अंतराचे रस्ते होते. आणि कच्चे रस्ते ३.५० कि.मी.लांबीचे रस्ते होते. तसेच या सालामध्ये रस्त्यावर अनुक्रमे १४४४ आणि ३५० रूपये इतके अनुदान रस्त्यावर खर्च केले होते.

सन १९९४–९५ सालाचा विचार करता नगरपालिका हद्दीत १.२० कि.मी.लांबीचे डांबरी आणि ६.३० कि.मी.लांबीचे कच्चे रस्ते होते. पूर्वीच्या रस्त्याच्या लांबीत आणि सध्याच्या रस्त्याच्या लांबीत वाढ झालेली दिसत नाही. सन १९९४–९५ सालात पालिकेने रस्त्यावर

१०५६० इतका खर्च करण्यात आला. हा खर्च रस्ता दुरूस्तीवर केलेला होता. तसेच शासनाकडून प्राप्त झालेले अनुदानही रस्त्यावर खर्च केले.[३७]

नगरपालिकेने शहरी भागांतील लोकांची मूलभूत गरज लक्षात घेवून रस्ता बांधणीवर भर दिला आहे. कारण शहरातील नागरिकांना वाहतूक व दळणवळणाच्या दृष्टिकोनातून सोयीचे व्हावे आणि मलकापूर या ठिकाणी बाजारपेठ असल्याने येथे मोठया प्रमाणात व्यापारी व शुक्रवारी आठवडी बाजारासाठी मलकापूर नगरीच्या आसपासच्या खेडयातील लोक बाजार करण्यासाठी मोठया संख्येने येत असतात. म्हणून नगरपरिषदेने त्यांना वाहतूक दळणवळणाच्या दृष्टीने रस्त्याच्या माध्यमातून सेवा व सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. यामुळे शहरातील नागरिकांना रहदारीस सोयीचे झाले आहे.

## १४. गटारे :–

नगरपालिकेने शहरातील लोकांना रहदारीकरिता रस्ते उपलब्ध करून दिले. त्याचप्रमाणे मलकापूर हे ठिकाण कोकण किनारपट्टीलगत असल्याने येथे भरपूर पाऊस पडतो. या पावसाच्या पाण्याचे व्यवस्थापन करण्यासाठी आणि शहारातील सांडपाण्याची विल्हेवाट लावण्यासाठी पालिकेने शहरात गटाराचे बांधकाम केले आणि साफसफाईकरिता कामगाराची नियुक्ती केली.

अशाप्रकारे मलकापूर शहरात पक्की गटाराची लांबी १० कि.मी. आणि कच्च्या गटाराची लांबी १ कि.मी. इतकी आहे. अशी एकूण गटाराची लांबी ११ अकरा कि.मी. आहे. सफाईच्या कामासाठी १३ कामगार असून ते सकाळी रस्ता सफाईचे काम करतात. दुपारनंतर गटार सफाईचे काम करतात. शहरातील गटारे नियमितपणे साफ करणे आरोग्याच्या दृष्टीने महत्वाचे आहे. तरी आठवडयातून किमान दोनवेळा तरी साफ करून घेणेची दक्षता घ्यावी. आठवडयातून एकदा तरी गटारावर जंतूनाशक औषध फवारणी करणे जरूरीचे आहे. त्याचप्रमाणे ती केली जात नसेल तर ती करावी व याबाबत रेकॉर्ड ठेवावे व शासनाचे नगरविकास विभागाकडील परिपत्रक क्र. जीएटी. १९८४ (९३) सी.आर. ६५ – ११८४ यूडी– १० दि.१८.६.१९८४ मध्ये दिलेल्या सुचना प्रमाणे स्वच्छता मोहिम चालू ठेवून शहराचे आरोग्य चांगले राहिल याकडे मा.अध्यक्ष मुख्याधिकारी यांनी द्यावे.[३८]

नगरपालिकेकडून आरोग्याच्या दृष्टीने शहरातील गटारे नियमितपणे साफ केली जातात. आठवडयातून दोन वेळा साफ करण्याचे काम करतात. मलकापूर या शहरात पाऊस मोठया प्रमाणात पडतो. त्यामुळे पावसाचे पाणी आणि घाण पाणी वाहून जाण्यासाठी पालिकेने शहरात गटारे बांधून महत्वाची भूमिका बजावली आहे. शहर विकासाच्या दृष्टिकोनातून हे एक योगदानच मानावे लागेल.

## १५. वृक्षारोपन :-

मलकापूरच्या पश्चिमेला महादेव डोंगर आहे. सहयाद्रीच्या पूर्व बाजूच्या उतारास हा छोटासा डोंगर आहे. पूर्वीपासून मंगलपूर (मलकापूर) गावची धार्मिक, सांस्कृतिक परंपरा आहे. फार वर्षापूर्वी या डोंगरावर ध्यान धारणेसाठी शंभू महादेवाची प्रतिष्ठापना केली होती. यावरून या डोंगराला महादेव खडी हे नाव प्रचलित झाले. संस्थानिक काळात या डोंगरावरील रम्य परिसरात नाना महाराज पुराणिक व पुरोहित गुरूजी अशी ज्ञानयोगी व धर्मयोगी या ठिकाणी ध्यान धारणा करित होती.

स्वातंत्र्यानंतर सन १९७० च्या दशकामध्ये वनखात्याने या ठिकाणी वृक्षारोपण करून राखीव जंगल ठेवून निसर्गात समतोल व सौंदर्य राखण्याचा प्रयत्न केला. या ठिकाणी श्रावण महिन्यात महादेवाची यात्रा मोठया उत्साहात व मंत्रघोषात धार्मिक परंपरेने भरते. यावेळी आसपासच्या खेडयातून लोक मोठया संख्येने येतात. या स्थळाला धार्मिक, सांस्कृतिक आणि ऐतिहासिक महत्त्व आहे. [३९]

महाराष्ट्र शासनाने पर्यावरणाचा ऱ्हास टाळण्यासाठी सन १९५८ पासून वनमहोत्सवास सुरूवात केली. लोकांमध्ये जागृती करून वनसंपत्तीचे संरक्षण करणे, वनांचे महत्त्व पटवून देणे आणि पर्यावरणाचे संतुलन राखणे हा याचा उद्देश आहे. तसेच सरकारने पर्यावरणाच्या संरक्षणासाठी १९७२ पासून सामाजिक वनीकरण कार्यक्रम सुरू केला आहे. सदरचा अधिनियम नगरपालिकेने १ एप्रिल १९७६ पासून लागू केला. त्यातील तरतुदीनुसार १ एप्रिल १९८१ पासून शेकडा १/२ टक्के(अर्धा) दराने वृक्षकर बसविण्यात आला असून प्राधिकरण निधी उभारण्यात आला.[४०] या योजनेअंतर्गत नगरपरिषदेने शहरी भागात झाडे लावण्याचा व त्यांचे संरक्षण करण्याचा उपक्रम हाती घेऊन शहर विकासात महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

मलकापूर नगरपरिषदेनेही पर्यावरणाचे महत्त्व लक्षात घेवून वृक्षारोपणाकरिता सन १९८१ साली एक सेवक नेमला आणि त्यास मासिक २१० रूपये पगार देण्याची व्यवस्था केली. सन १९८२–८३ साली नगरपरिषदेने शहरात १२०० झाडाची रोपे लावली. परंतु त्यापैकी ६०० रोपे जगली.[४१] शासनाने नगरपरिषदेला शहरात ५०० झाडे लावण्याचे उद्दिष्ट ठरवून दिले आहे. शहरामध्ये नगरपालिकेने झाडे लावण्याचा उपक्रम हाती घेतला आहे. यावर होणारा खर्च हा शहरातील नागरीकांवर आकारलेला दिसतो. सन १९८५–८६ साली १५९२ रूपये आणि सन १९८६–८७ साली २४१९ रूपये वृक्षकर नगरपालिकेने शहरातून वसूल केला.[४२] या वृक्षकरापासून नगरपरिषदेला चांगले उत्पन्न मिळते. या कराच्या माध्यमातून जमा झालेला पैसा हा झाडे लावण्यासाठी लागणारी रोपे, कुंपन, पाणी, कामगार वर्ग यावर नगरपालिका खर्च करून झाडे जगविण्याचा प्रयत्न करत आहे. तसेच महाराष्ट्र शासनाकडून झाडे लावण्यासाठी नगरपालिकेला वर्षाला अनुदान मिळते. या अनुदान व कराच्या माध्यमातून मिळालेले उत्पन्न झाडे लावण्यावर खर्च केला जात आहे.

अशाप्रकारे मलकापूर नगरपरिषदेने शहरात झाडे लावून त्याचे संवर्धन करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले. महाराष्ट्र सरकारने झाडे लावण्याची मोहिम सुरू केली. त्यामध्ये मलकापूर नगरपरिषद सहभागी झाली आहे. पूर्वीपासून पालिकेने शहरात रस्त्यालगत बरीच झाडे लावली आहेत. विद्युत तारांना या झाडाची अडचण झाल्यास काही झाडे तोडली आहेत. तरीही नवीन झाडे लावण्याचा उपक्रम चालू ठेवून शहर विकासात नगरपालिकेने योगदान दिले आहे.

## १६. सार्वजनिक नळ पाणी पुरवठा :–

मलकापूर शहरात कोणत्याही प्रकारचा भेदभाव न करता जेथे पाण्याची टंचाई तेथे नगरपरिषदेमार्फत पाणी उपलब्ध करून दिले जात आहे. महाराष्ट्र शासनाच्या जल निस्सारण विभागाकडून विंधन विहिरीची आणि भूजल सर्वेक्षण विकास मंडळाकडून नळ व विहिरीची योजना राबविली जाते. शहरी भागातील नागरिकांना स्वच्छ व शुद्ध पाणी पुरवठा करणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. पूर्वी मलकापूर शहराला पाण्याचा पुरवठा हा पालिकेच्या विहिरीच्या माध्यमातून केला जात होता. शहरात मंगळवार पेठ, भट गल्ली, जनावरांचा बाजार इत्यादी ठिकाणी नगरपालिकेच्या मालकीच्या विहिरी होत्या. या विहिरीवर रहाट बसविले होते. याच्या सहाय्याने शहराला पाणी पुरवठा नगरपरिषद करत होती.या विहिरीच्या स्वच्छतेसाठी

नगरपालिकेचे चेअरमन डी.एन.हावळ यांच्या कार्यकाळात सदाशिव तुकाराम कुंभार मलकापूर यांच्या कडून पालिकेच्या चार विहिरीचा उपसा करून गाळ काढून घेतला त्यास तेतीस रूपये मजूरी अदा करण्यात आली.[४३] तसेच शहराला पाणी पुरवठा करण्यासाठी कडवी नदीच्या पाण्याचाही उपयोग केला जात होता. या नदीच्या पात्रामध्ये झरा पाडत आणि उपलब्ध पाण्याचा वापर पिण्यासाठी केला जात होता. उदा. सन १९५१ साली तानु ज्ञानू पाटील यांनी मरीमाई यात्रेच्या वेळी येणाऱ्या भाविक भक्त लोकांकरिता नगरपालिकेच्या वतीने कडवी नदी पात्रात झरा पाडून पिण्याच्या पाण्याची सोय उपलब्ध करून दिली होती. त्यावेळी त्या कामासाठी त्यांना नगरपालिके तर्फे कामाची मजूरी पाच रूपये दिले होते.[४४]

कालांतराने या पाणी पुरवठयाच्या सुविधामध्ये बदल होत गेला, पुढे मलकापूर शहराला पाणी पुरवठा करण्यासाठी कडवी नदीवर जॅकवेल बांधला. ही पाणी पुरवठा योजना १० नोव्हेंबर १९७९ पासून सुरू झाली. पाण्याच्या टाकीत ब्लिचींग पावडर आणि तुरटी ही पाण्याच्या साठयाच्या प्रमाणात टाकली जात असत. ते शुद्ध केलेले पाणी नळाने गावात पुरविले जाते. सदरच्या पाणी पुरवठा योजनेद्वारे मिळणारे पाणी उन्हाळयात अपुरे पडत होते. म्हणून जॅकवेलच्या खालच्या बाजूस ३०० फूटावर कोल्हापूर पद्धतीचा बंधारा सरकारने बांधला आहे. बंधाऱ्यात पाण्याचा साठा चांगला होत असल्याने शहराला उन्हाळयात पुरेसा पाणी पुरवठा होत आहे. दररोज पाऊण तास पाण्याचा पुरवठा केला जात आहे. नगरपालिका हद्दीत एकूण ३८ सार्वजनिक नळ आहेत. शहरात दुर्बल घटकांसाठी आणि कुंभार वस्तीत एक पाण्याची टाकी बांधण्यात आली.[४५]

शहरी भागात पाणी पुरवठा योजनेची कामे पारदर्शक पद्धतीने होण्याच्या दृष्टीने व कामाचा दर्जा सुधारण्याच्या दृष्टीने नगरपरिषदेने पाणी पुरवठा व स्वच्छता समिती स्थापन केली. शहरी भागातील लोकांना विहिरीतील पाणी नळाद्वारे आणि हातपंपाद्वारे उपलब्ध करून दिल्याने जनतेची पाण्यासाठीची वणवण बंद होण्यास मदत झाली. ही योजना मलकापूर शहर विकासात जीवनदायी ठरली आहे.

### १७. स्मशानभूमी :–

मलकापूर शहरातील सर्व जाती धर्मातील लोकांच्या अंत्यविधीच्या सोयीकरिता नदीकाठी स्मशानभूमी बांधण्यात आली. मलकापूर नगरपरिषदेने अंत्यविधीच्या सोयीकरिता

पालिका हद्दीत १ स्मशानभूमी आणि २ दफनभूमी बांधल्या आहेत. या भागात भरपूर पाऊस असल्याने पालिकेने स्मशानभूमी येथे लोकांना थांबण्यासाठी १ वेटींग शेड बांधले आहे.[४६] परिषदेने शहरी भागातील वेगवेगळया जातीधर्मातील लोकांच्या प्रेतांची विल्हेवाट लावण्यासठी स्मशानभूमी आणि दफनभूमीची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. स्मशानभूमीमध्ये जात गोत लक्षात न घेता सर्व हिंदूची प्रेते दहन केली जातात. मुस्लिम, ख्रिश्चन, संन्याशी लोकांसाठी दफनभूमीची सोय केली आहे. या स्मशानभूमी व दफनभूमीसाठी परिषदेच्या राखीव जागेवरती बांधकामे पूर्ण केली आहेत. अशी दहन व दफन भूमीची बांधकामे केल्याने व आवश्यक इतर सुविधा उपलब्ध करून दिल्याने शहरी भागातील लोकांची सोय झाली आहे.

## १८. मागासलेल्या जमातीसाठी पालिकेने केलेल्या सुधारणा :–

मलकापूर नगरपालिकेने या जमातीच्या लोकांसाठी सर्वसाधारण स्वरूपाची कामे हाती घेवून अनेक सवलती त्यांना उपलब्ध करून दिल्या आहेत. नगरपरिषदेने शासन नगरविकास विभाग परिपत्रक क्र.बीसीसी–१०८५–सीआर–८/८५ नवि १०, २ फेब्रुवारी १९८८ कडील आदेशान्वये नगरपालिकेने एकूण महसूली उत्पन्नापैकी पाच टक्के निधी हा आर्थिक दुर्बल घटकातील लोकांसाठी खर्च करण्याचे ठरविले आहे.[४७] परिषदेने मागासवर्गीय व विशेष कल्याण समितीच्या माध्यमातून दुर्बल घटकांसाठी अनेक कार्यक्रम राबविले. या मागासलेल्या लोकांत भंगी लोकांचा समावेश होता. पूर्वी या लोकांमार्फत शहरातील मैला उचलला जात होता. अशी अनेक घाणीची कामे करावी लागत होती. त्यामुळे नगरपालिकेमार्फत या लोकांना अनेक सेवा सुविधा पुरविल्या जातात. या सर्व भंगी व झाडूवाले लोकांना रजेबाबत वगैरे सर्व सवलती इतर नोकराप्रमाणे देण्यात येत आहेत. मागासवर्गीय सार्वजनिक हॉल व समाजमंदिराची सोय केली. तसेच या वसाहतीत शाळा, प्रौढ शिक्षण वर्ग, बालोद्यान, क्रीडांगण आणि वैद्यकीय सोयी उपलब्ध करून दिल्या आहेत. मागासवर्गीय मुलांना शिष्यवृत्ती, मोफत पाठयपुस्तके, लेखनसाहित्य आणि मोफत गणवेश वाटप केले जातात. सफाई कर्मचाऱ्यांना घरे बांधून त्यांना नाममात्र भाडयाने उपलब्ध करून दिली आहेत. पूर्वीची डोक्यावरून मैला वाहून नेहण्याची पद्धत बंद करून पालिकेने शहरात सेप्टीक ड्रेनेज शौचालयाची बांधकामे केली आहेत. मागासवर्गीय वसाहतीतील लोकांना रस्ते, पाणी पुरवठा, गटारे आणि सार्वजनिक शौचालयाच्या

मुलभूत सेवासुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. विविध विभागामार्फत शहरातील नागकिंना मुलभूत सेवासुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत.

## १९. शहर विकासातील नगरपालिकेच्या विविध विभागाचे योगदान :–

मलकापूर नगरपालिकेच्या प्रशासकीय कारभार करण्याकरिता नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष हे पदाधिकारी आणि विषय समित्या आणि त्यांचे सभापती व लोकप्रतिनिधी यांची निवड केली जाते. तसेच प्रशासकीय दृष्टया नगरपरिषदेचा प्रशासकीय प्रमुख मुख्याधिकारी आणि इतर कर्मचाऱ्यांची निवड केली जाते. या लोकप्रतिनिधींच्या आणि प्रशासकीय कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून नगरपालिकेच्या आस्थापना विभागातून लोकांना सरकारी कामाचे ज्ञान मिळण्यास मदत होते. सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत शहर विकासाकरिता रस्ते, गटारे, सार्वजनिक इमारती बांधून शहराच्या वैभवात भर टाकली आहे. आरोग्य विभागातून शहरी लोकांच्या आरोग्यविषयक समस्या सोडविण्यास मदत होत आहे. जलनिस्सारणाच्या माध्यमातून शहरातील सांडपाण्याची व्यवस्था केली. जकात विभागाने नगरपालिकेची आर्थिक स्थिती चांगली केली. विद्युत विभागाने शहरातील दिवाबत्तीची सोय करून दिली. अन्न भेसळ प्रतिबंधक विभागामार्फत शहरातील अन्न भेसळीस चाफ बसला. वृक्ष व संवर्धन विभागाने पर्यावरणाचा समतोल राखला. तसेच आगप्रतिबंध विभाग, शिक्षणविभाग, दुकान व भांडार विभाग आणि महिला व बालकल्याण इ. विभागाच्या माध्यमातून मलकापूर शहराचा विकास होण्यास मदत झाली.

## २०. समारोप :–

मलकापूर शहरी भागातील जनतेच्या विकासासाठी शासनाने सुरू केलेल्या विविध योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात मलकापूर नगरपालिकेने महत्त्वाची भूमिका बजावली. या नगरपरिषदेने शहरात अनेक मूलभूत सेवा सुविधा उपलब्ध करून दिल्याने शहर विकासात भर पडली आहे. एकात्मिक शहरी विकास घडवून आणण्याकरिता नगरपरिषदेने वैशिष्टयपूर्ण कार्य केले. नगरपरिषद या संस्थेमुळे शहरी राजकीय नेतृत्वालाही वाव मिळाला. नगरपरिषद कार्यालयातून शहरी भागातील जनतेला प्रशासकीय ज्ञान आणि नेतृत्वाची संधी मिळाली. बालवाडी आणि शाळा इमारतीमधून शहरी लोकांचा मूलभूत शैक्षणिक विकास झाला. मलकापूरातील तरूणांना वाचनालय हे एक वरदान लाभले. मागासवर्गीय हरिजन वस्तीमधील

समाजमंदीरे सार्वजनिक कार्यक्रमासाठी आणि बालवाडी इमारत बालकांची शैक्षणिक व आरोग्यविषयक प्रगती साधण्यासाठी उपयोगी ठरली. शहरातील रस्ते व गटारे दिवाबत्ती, घरकूल योजना आणि वृक्षारोपण इ.मुळे शहराच्या सुशोभिकरणात वाढ झाली. अत्याधुनिक पाणी पुरवठयाच्या सुविधामुळे शहरातील नागरिकांची पाणीटंचाईची वणवण दूर झाली आहे. नगरपरिषदेने शॉपिंग सेंटरच्या माध्यमातून लोकांना रोजगाराची संधी उपलब्ध करून दिली. आर्थिक दुर्बल घटकातील मागासवर्गीयांच्या उन्नतीकरिता पालिकेने महत्त्वाची कामे केली. क्रीडांगणामुळे मलकापूरातील तरूणांमध्ये खिलाडू वृत्ती रूजण्यास मदत झाली. एकंदरित मलकापूर नगरपरिषदेने शहराचा सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक विकास घडवून आणण्यात महत्त्वपूर्ण योगदान दिले.

## संदर्भ :–


१) मलकापूर नगरपरिषद मलकापूर, अर्थसंकल्प व अंदाजपत्रक, सन २०१३– २०१४, पृ.२

२) कित्ता, पृ. २

३) मलकापूर नगरपरिषद मलकापूर, अर्थसंकल्प व अंदाजपत्रक, सन २०१३– २०१४, पृ.१

४) मलकापूर नगरपरिषद वार्षिक तपासणी अहवाल, सन १९९५–१९९६, पृ.२

५) कित्ता, पृ.२३

६) ट्रेड ऑर्ड वे, अॅडमिनिस्ट्रेशन इटस प्रपोजल अॅड परफेक्टस.पृ. ६७

७) हेरमन किनेट, द ब्रिटिश सिव्हील सर्व्हिस पे, पृ. ५

८) लाड मनोहर, सार्वजनिक वाचनालय मलकापूर, जि.कोल्हापूर शताब्दी महोत्सव स्मरणिका, १९८१, पृ. ३

९) दैनिक पुढारी, कोल्हापूर, दि.८ सप्टेंबर १९९२, पृ.६

१०) दैनिक केसरी, कोल्हापूर, दि.२७ डिसेंबर १९८१ पृ. ७

११) लाड मनोहर, उपरोक्त, पृ.१५

१२) दैनिक सत्यवादी, कोल्हापूर, दि.५ ऑक्टोबर १९९५, पृ. ८

१३) लाड मनोहर, उपरोक्त, पृ.४

१४) दैनिक सत्यवादी, कोल्हापूर, दि.१९ मे २००६, पृ.६

१५) मलकापूर नगरपरिषद महिला बचत गट यादी, २००९, पृ. १

१६) कित्ता, पृ.२

१७) कित्ता, पृ.४

१८) कित्ता, पृ.३

१९) मलकापूर नगरपरिषद वार्षिक तपासणी अहवाल, सन १९८५–८६, पृ. १७

२०) मलकापूर नगरपरिषद वार्षिक तपासणी अहवाल,सन १९९५–९६, पृ.३३

२१) दैनिक सकाळ, कोल्हापूर, दि. ७ फेब्रुवारी २००७, पृ.३

२२) मलकापूर नगरपरिषद वार्षिक तपासणी अहवाल, सन १९९५–९६, पृ.१२

२३) मलकापूर नगरपरिषद वार्षिक तपासणी अहवाल, सन १९८३–८४, पृ.२६

२४) कित्ता, पृ.२

२५) कित्ता, पृ.१८

२६) मलकापूर नगरपरिषद मलकापूर, अर्थसंकल्प व अंदाजपत्रक, सन २०१३– २०१४, पृ.२५

२७) मलकापूर नगरपरिषद प्रोसेडींग, २९ नोव्हेंबर, १९८९, पृ.६

२८) मलकापूर नगरपरिषद वार्षिक तपासणी अहवाल, सन १९८५–८६, पृ.१४

२९) मलकापूर नगरपरिषद प्रोसेडींग, २५जून १९७९, पृ.१०

३०) मलकापूर नगरपरिषद प्रोसेडींग, ३० ऑगस्ट १९८६, पृ.६

३१) मलकापूर नगरपरिषद वार्षिक तपासणी अहवाल, १९९४–९५, पृ.१७

३२) मलकापूर नगरपरिषद वार्षिक तपासणी अहवाल, सन १९८९–९०, पृ.७

३३) चांदगुडे विनायक, गाव ते झेडपी, सकाळ प्रकाशन, कोल्हापूर, प्रथमावृत्ती, नोव्हेंबर २०१३, पृ. ८२

३४) जिल्हा परिषद कोल्हापूर, समाजकल्याण विभाग प्रशिक्षण पुस्तिका, २००८, पृ.११

३५) मलकापूर नगरपरिषद वार्षिक तपासणी अहवाल, सन १९८५–१९८६, पृ.१

३६) कित्ता, पृ. ८

३७) मलकापूर नगरपरिषद वार्षिक तपासणी अहवाल, सन १९९५–९६, पृ.१४

३८) मलकापूर नगरपरिषद वार्षिक तपासणी अहवाल, सन १९८५–८६, पृ.९

३९) मलकापूर नगरपरिषद वार्षिक तपासणी अहवाल, सन २०१३–१४, पृ.२९

४०) मलकापूर नगरपरिषद वार्षिक तपासणी अहवाल, सन १९८२, पृ.१०

४१) मलकापूर नगरपरिषद वार्षिक तपासणी अहवाल, सन १९८३–८४, पृ.५, १७

४२) मलकापूर नगरपरिषद वार्षिक तपासणी अहवाल, सन १९८९–९०, पृ.२

४३) मलकापूर नगरपरिषद प्रोसेंडिंग, सन जुलै १९५३, पृ.२

४४) मलकापूर नगरपरिषद प्रोसेंडिंग, सन २२ नोव्हेंबर १९५१, पृ.१०

४५) मलकापूर नगरपरिषद वार्षिक तपासणी अहवाल, सन १९८३–८४, पृ.११

४६) मलकापूर नगरपरिषद वार्षिक तपासणी अहवाल, सन १९८३–८४, पृ.१५

४७) मलकापूर नगरपरिषद वार्षिक तपासणी अहवाल, सन १९९५–९६, पृ.१०

# प्रकरण सहावे
# उपसंहार

विशाळगड जहागिरीला ऐतिहासिक महत्त्व आहे. सन ११८७ मध्ये शिलाहार राजा भोज दुसरा यांनी आपल्या घराण्याची राजधानी कोल्हापूर येथे स्थापन केली. यांनी सन ११९१ मध्ये पन्हाळयावर आपले राजसिंहासन प्रस्थापित केले. या तत्कालिन काळात यांनी १५ किल्ले बांधले त्यापैकी विशाळगड हा एक होय. या घराण्याच्या ऱ्हासानंतर पन्हाळा व विशाळगड परिसर हा देवगिरीच्या यादव राज्याचा एक भाग बनला. यादवाकडून हा किल्ला सन १४७० मध्ये बहामनी सुलतानाचा वजीर महमूद गवान यांनी हस्तगत केला. बहामनीच्या ऱ्हासानंतर सन १४८९ रोजी विशाळगड किल्ला विजापूरच्या आदिलशाहीच्या ताब्यात गेला. छ.शिवाजी महाराजांनी १६५९ मध्ये प्रतापगड किल्ल्यावर विजय मिळविला. या विजयानंतर प्रथम पन्हाळा जिंकला. याशिवाय महाराजांनी खेळणा, रांगणा, पावनगड आणि वसंतगड किल्ले लढाई करून ताब्यात घेतले. महाराजांनी खेळणा किल्ल्यालाच ‍‍ॅविशाळगड‍‍ॅ हे नाव दिले. महाराजांच्या कालवशानंतर २६ सप्टेंबर १६८९ रोजी छत्रपती राजाराम महाराज पन्हाळयावरून सुटून २ नोव्हेबर १६८९ रोजी राणी येसूबाईनी बिकट प्रसंगी मुघलांच्या हवाली केला. पण अशाच प्रसंगी छ.राजाराम महाराज जिंजी मोहिमेतून सुखरूपपणे २२ फेब्रुवारी १६९८ रोजी विशाळगडावर येवून पोहचले. मुघल सुभेदार झुल्फिकारखान यांनी ज्या पद्धतीने रायगड जिंकून घेतला. त्याच पद्धतीने राजाराम महाराजांच्याकडून विशाळगड किल्ला जिंकून घेतला.  पण हा किल्ला मुघलांकडे फारच थोडे दिवस राहिला. राजारामाच्या निधनानंतर १७०० मध्ये महाराणी ताराबाईंनी मुलगा शिवाजी यास विशाळगडावर राज्याभिषेक करून गादीवर बसविले. यांचे नावे ताराबाई स्वतःच कारभार चालवित होती.

छत्रपती शिवाजी महाराजांनी विशाळगड किल्ल्याचे महत्त्व ओळखून परशुराम त्रिंबक प्रतिनिधी यास हा किल्ला इनामादाखल दिलेला होता. औरंगजेब बादशहांनी २८ मे १७०१ रोजी पन्हाळागड किल्ला जिंकून घेवून विशाळगडाकडे मोर्चा वळविला. १६ जानेवारी १७०२ रोजी औरंगजेब बादशहा विशाळगडाच्या पायथ्याशी जाऊन पोहोचला. मोगलांच्या सैन्याने विशाळगडावर तोफांचा भडीमार केला.त्याप्रसंगी परशुराम त्रिबंक प्रतिनिधी यानी अप्रतिम शौर्य आणि विलक्षण कौशल्य दाखविले. परशुराम त्रिंबकने सतत पाच महिने किल्ला मोठया निकराने

लढविला. मोगलांना यश मिळण्याची चिन्हे दिसेनात. बादशहाने हा प्रतिष्ठेचा प्रश्न बनविला. गडावरील धान्य व दारूगोळयाचा अपुरा पुरवठा यामुळे परशुरामपंतांची ही कसोटीची वेळ होती. या दोघांमध्ये झालेल्या सामोपचारातून २७ मे १७०२ रोजी औरंगजेब बादशहाला हा किल्ला मिळाला आणि बादशहाने विशाळगडाचे नाव 'सकरूल्लाना' असे ठेवले.

मराठयांनी विशाळगड मोगलांकडून परत मिळविला. तेव्हापासून या किल्ल्याचे अतिशय महत्त्व वाढले. विशाळगडाच्या इतिहासाशी परशुराम त्रिंबक प्रतिनिधी यांचे नाव निगडीत आहे. परशुराम त्रिंबकची ताराबाईंनी ङ्कप्रतिनिधीङ्क पदावर नेमणूक केली. विशाळगडाच्या प्रतिनिधी घराण्याचा हाच पहिला पुरूष होय. ताराबाईचा प्रमुख सल्लागार म्हणून प्रतिनिधी परशुराम त्रिंबक हा काम पहात होता. परशुराम त्रिंबक यांनी मात्र शेवटपर्यंत ताराबाईच्या पक्षाशी आपली निष्ठा कायम राखली. तसेच ते लेखणीप्रमाणे तलवार चालविण्यातही तरबेज होते. परशुरामपंतांनी 'समशेरबहाद्दर शहाजंग' असे पद मिळविले.

ताराबाईंनी शाहू महाराजांच्या बंदोबस्ताची जबाबदारी परशुराम त्रिंबक प्रतिनिधी आणि धनाजी जाधव यांच्यावर सोपविली. यांच्यात खेडची लढाई झाली. यावेळी धनाजी तटस्थ राहिल्याने परशुराम पंताचा पराभव झाला. त्यांनी पुण्याला प्रयाण केले. तेथून ते सातारला जाऊन राजधानीचा किल्ला ताब्यात घेतला. साताऱ्याचा अजिंक्यतारा किल्ला स्वाधीन करण्यास शाहू महाराजांनी प्रतिनिधींना विनंती करूनही प्रतिनिधीनी किल्ला लढविण्याचे ठरविले. शेवटी या किल्ल्याचा किल्लेदार शेख मिऱ्याला शाहू महाराजांनी हाताशी धरून किल्ला हस्तगत केला आणि प्रतिनिधीना कैद केले. तरीही त्यांनी शाहूंचा पक्ष स्विकारला नाही. एाहू महाराजांनी प्रतिनिधीची स्वामीनिष्ठा पाहून २० ऑगस्ट १७०८ रोजी 'अमात्यपद' दिले. पुढे १७१० मध्ये त्यांना ङ्कप्रधानपदङ्क मिळाले. पुन्हा त्यात बदल होऊन त्यांच्याकडे ङ्कप्रतिनिधीङ्क पदच राहिले. शाहू महाराजांवर १७११ रोजी चंदसेन जाधवांनी हल्ला केला. याचा ठपका महाराजांनी प्रतिनिधीवर ठेवून २० नोव्हेंबर १७११ रोजी अनामत जप्त करून त्यांना कैद केले. यासंबंधी खंडो बल्लाळ व बाळाजी विश्वनाथ यांच्या शिफारशीवरून शाहूंनी प्रतिनिधींची सुटका करून त्यांना ८ मार्च १७१४ रोजी पुन्हा ङ्कप्रतिनिधीपदङ्क बहाल केले.

परशुरामपंतांना कृष्णाजी, त्रिंबकराव, श्रीपद ऊर्फ श्रीनिवास, सदाशिव आणि जगजीवन ऊर्फ दादोबा अशी पाच मुले होती. हा जमीन महसुल व हिशेबाच्या कामात तरबेज होता. २७

मे १७१८ रोजी परशुरामपंत त्रिंबक प्रतिनिधीचे निधन झाले. परशुराम त्रिंबाक यांचे चिंरजीव कृष्णराव हे कोल्हापूर राज्याच्या विशाळागड जहागिरीचे पिढिजाद प्रतिनिधी वारसदार होते आणि दुसरे पुत्र श्रीनिवासराव ऊर्फ श्रीपतराव व त्यांचे वंशज सातारा राज्याचे शेवटपर्यंत प्रतिनिधी होते.

दादोबा ऊर्फ जगजीवन आणि त्यांचे मुतालिक यमाजी शिवदेव हे दोघेही महाराणी ताराबाईच्याच बाजूचे होते. त्यांच्याकडे सांगोला आणि मंगळवेढे ही दोन ठाणी होती. पेशव्यांनी त्याची मागणी केली. त्यावरून पेशवे व प्रतिनीधी यांच्यात सप्टेंबर १७५० मध्ये सांगोल्याची लढाई झाली.पेशव्यांच्या बाजूने सदाशिवरावभाऊ व रामराजे आणि प्रतिनिधींच्या बाजूने मुतालिक यमाजी शिवदेव यांच्यात लढाई झाली. २५ सप्टेंबर १७५० रोजी मुतालिक शरण आला आणि रामराजे यांनी दादोबा प्रतिनिधी आणि त्याचा मुतालिक यांना पदावरून दूर केले. रामराजे ४ जानेवारी १७५० रोजी मोठया समारंभपूर्वक शाहूनगरात राजसिंहसनावर आरूढ झाले. त्यावेळी रामराजे यानी विशाळगडच्या कृष्णाजी प्रतिनिधीचे चिरंजीव भगवानराव यांची ङ्कप्रतिनिधीङ्क पदावर निवड केली.

शिवाजीराजे यांच्या कारकिर्दीत सिंधुदुर्गचा किल्ला इंग्रजांच्या ताब्यात गेला. छत्रपतींनी ठरल्याप्रमाणे किल्ल्यातील सर्व तोफा सामान बाहेर काढून किल्ला इंग्रजांना मोकळा करून दिला. या किल्ल्याच्या परिसरात बरीच वर्षे तोफा पडून होत्या. बुवासाहेबांनी त्या सर्व तोफा जमा करून परत भेट म्हणून कोल्हापूरला आणण्याचे ठरविले होते. पण इतर इंग्रज अधिकाऱ्यांच्या पचनी न पडल्याने हा बेत रद्द केला. तसेच बुवासाहेब २० ऑगस्ट १८२५ रोजी विशाळगड पाहण्यासाठी आले. त्यावेळी चौकीदारांनी त्यांच्यावर गोळया झाडल्या. परंतु त्यातून ते निसटले आणि गजापूर येथे जावून हुजुरांना विशाळगडावर पाठविले. त्यांच्यावर तत्कालीन प्रतिनिधी माधवराव पंडित यांनी गोळीबार केला. बुवासाहेबांनी या सर्व घटनेची माहिती रत्नागिरीच्या इंग्रज अधिकाऱ्याला कळविली. हे प्रकरण एवढयावरच न थांबता बुवासाहेबांनी प्रतिनिधीचे गाव मलकापूर येथे जावून प्रतिनिधींचा वाडा जाळला. तेंव्हा प्रतिनिधीनी या कृत्याबद्दल इंग्रजांकडे तक्रार केली. तेव्हा धारवाडचा सरकलेक्टर वेबरने बुवासाहेबांना पत्र पाठवून इंग्रज व छत्रपती यांच्या दरम्यान झालेल्या तहाची आठवण करून दिली. यातून हे प्रकरण आपापसात मिटले. पूर्वीचे अधिकार व मानमरातब प्रतिनिधींकडे

कायम राहिले, पण वारणेच्या तहाने कोल्हापूरच्या संभाजी राजाने जनार्दनपंत प्रतिनिधी यांच्या नावे नवीन सनद देऊन किल्ल्याचे इनाम चालू ठेवला. सन १८४४ पर्यत या घराण्याचे विशाळगडावर मुख्यालय होते. विशाळगड किल्ला १८४४ मध्ये बंडखोरांनी ताब्यात घेताच इंग्रज फौजानी प्रचंड भडीमार करून किल्ला  परत मिळविला. हा किल्ला पुन्हा बंडखोरांच्या ताब्यात पुन्हा कधीच जावू नये म्हणून ब्रिटिशांनी या किल्ल्याची तटबंदी व गडाची नासधूस केली. तेव्हापासून प्रतिनिधींचे मुख्यालय मलकापूर येथील शाळी व कडवी नदीच्या जुन्या संगमावर 'सरकारी वाडा' बांधून येथे स्थलांतरित करण्यात आले. आणि याच सरकारी वाडयात कै.आबासाहेब पंतप्रतिनिधी यांच्या प्रेरणेतून ३ ऑक्टोबर १८८४ रोजी मलकापूर नगरपालिकेची स्थापना केली.

मलकापूर गावच्या समाजव्यवस्थेचा आढावा घेतला असता व्यावसायिकदृष्टया विविध जाती आहेत. मलकापूर या गावी हिंदू, मुस्लिम आणि बौद्ध धर्मिय लोकांचा समावेश आहे. ब्राह्मणामध्ये देशपांडे, कुलकर्णी आणि आजरेकर यांना धार्मिकदृष्टया महत्त्व आहे. मराठा समाजही मोठया संख्येने वास्तव्यास आहे. वाणी समाज हा व्यापारी मालाच्या खरेदी विक्री कामात अग्रेसर दिसतो. मलकापूर येथे सर्वात जास्त शिंपी समाज आहे. धनगर समाज मुख्यतः डोंगरावर राहतात. बरेचशे धनगर मुळ रहिवाशी आहेत. चांभार शेतकऱ्यांच्या शेती व्यवसायाला उपयुक्त असणाऱ्या कातडी वस्तू तयार करीत. परीट गुऱ्हाळाच्या दिवसात गूळ भरण्याकरिता परीट पासोडया देत. याबरोबर न्हावी, महार, मांग इत्यादी बलुतेदारांनाही येथील समाजरचनेत मानाचे स्थान होते. तसेच याठिकाणी मुस्लिम धर्मिय लोकांचे वास्तव्य आहे. वेशभूषा अलंकारात कोल्हापूरी साजला येथे प्राधान्य होते. आहारामध्ये तांदळाचा जास्त वापर करतात. मोहरम उत्सवामध्ये हिंदू आणि मुस्लिम मोठया संख्येने सहभागी होतात. या नगरीत घरे विटा, दगडी भिंतीची व कौलारू दिसतात.

मलकापूरचा आर्थिक दृष्टिकोनातून विचार करता नारायण केरबा पाटील यांच्या मुलाखतीच्या माहितीवरून नदीवरील धरणे, बंधारे आणि तलावाच्या पाणी साठयाचा शेती बागायतीखाली येण्यास मदत झाली. बहुतांशी लोकांचा शेती हा मुख्य व्यवसाय आहे. मलकापूर गुळाच्या बाजारपेठेसाठी प्रसिद्ध आहे. येथील लोकांचा उदरनिर्वाह हा शेतीवर अवलंबून आहे. या भागात काळी, तांबडी आणि खारी जमीन आढळते. शेती उत्पादनात

कडधान्य व तृणधान्य पिकांचे उत्पादन घेतले जाते. या भागातील शेतकरी बटाटयाचे पीक मोठया प्रमाणात घेतात. मलकापूर कुंभार व बुरूड उद्योगासाठी पसिद्ध आहे. तसेच धार्मिकदृष्टया विठ्ठलेश्वर मंदिर, हनुमान मंदिर, भीमाशंकर मंदिर आणि भवानी मंदिर इ.साठी प्रसिद्ध आहे.

प्राचीन काळातही स्थानिक स्वराज्य संस्था ही संकल्पना अस्तित्वात होती. उदा. मौर्यांच्या काळात नगरांचा कारभार पाहण्यासाठी स्वतंत्र नियामक मंडळे होती. पण मध्ययुगीन काळ हा या संस्थाना पोषक नव्हता कारण राज्याचा कारभार सुनियंत्रित चालावा म्हणून नेमणूक केलेले अधिकारी मात्र राजसत्ता मोठी व्हावी म्हणून आपले सर्वस्व पणाला लावत होते. परंतु ब्रिटिश राजवटीत भारतातील पारंपारिक स्थानिक शासन व्यवस्थेचा ऱ्हास झाला. ब्रिटिशांनी अनुकूल अशा व्यवस्थेचा स्वीकार केला. आधुनिक काळामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थेचा विकास अधिक झला. ब्रिटिशांची सत्ता भारतात प्रस्थापित झाल्यानंतर येथील कारभार सुव्यवस्थित व कार्यक्षम चालावा म्हणून स्थानिक संस्था स्थापन केल्या. या संस्थेचा कारभार पहाण्यासाठी 'जस्टीस ऑफ पीस' यांची निवड करण्यात आली. यांच्या निवडीचे अधिकार गव्हर्नर जनरलला देण्यात आले.या कायद्याने स्थानिक स्वराज्य संस्थेवर शहरातील शांतता, सुव्यवस्था, सार्वजनिक आरोग्य व स्वच्छता, पोलीस यंत्रणा, पाणीपुरवठा आणि दिवाबत्ती इत्यादी सुखसोयीच्या सुविधा पुरविण्याची जबाबदारी टाकण्यात आली. सन १८४२ मध्ये 'बंगाल कायदा' अन्वये नगरपालिका प्रशासन जिल्हा पातळीवर पोहचले. शहरी भागात 'शहर समिती' स्थापन केली. तसेच स्थानिक स्वराज्य संस्थेच्या विकासासाठी सन १८५० चा कायदा महत्वाचा आहे. हा कायदा पास होवून देशातंर्गत 'म्युनिसिपल बोर्डाची' स्थापन झाली. शहरे किंवा मध्यम प्रतीच्या गावातील नागरिकांनी सरकारकडे मागणी केल्यास नगरपालिका स्थापन केल्या जात. १८५० ते १८५५ या कालावधीत देशात अनेक लहान मोठया नगरपालिका अस्तित्वात आल्या. लोकांना लोकशाही मार्गाने एकत्र येऊन कार्य करण्याची व अनुभव घेण्याची संधी नागरिकांना मिळाली. नगरपालिकेच्या स्थापनेनंतर कामगारांच्या व नागरिकांच्या सोईसाठी काही समित्या स्थापन केल्या. १८५५ ते १८५८ या तीन वर्षातील समित्यांचे पंच नागरिकामधून निवडले गेले. त्यांना सर्व बाबतीत कलेक्टरची मंजूरी घ्यावी लागत होती. १८५८ पासून ‟संयुक्त बोर्ड" अस्तित्वात आले. १८६२ सालचा ॲक्ट न.९

प्रमाणे नगरपालिकेच्या मंडळात कलेक्टर, मामलेदार इत्यादी सरकारी अधिकाऱ्यांचा ङ्कएक्स ऑफिशिओ कमिशनर्सङ्ख म्हणुन समावेश केला गेला. तसेच नगरपालिकेच्या कारभारात नागरिकांचे सहकार्य वाढावे म्हणून १/३ सदस्य नागरिकांमधून निवडले गेले. सन १८६९ ते १८७२ या दरम्यानच्या भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेच्या विकासात लॉर्ड मेयोच्या आर्थिक विकेंद्रीकरणाच्या ठरावाने भर पडली. सन १८७३ च्या कायद्यातील कलम नं.६ नुसार नगरपालिकांना ङ्ककार्पोरेट बॉडीङ्ख म्हणून कायदेशीर अस्तित्व प्राप्त झाले. लॉर्ड रिपनच्या १८८२ च्या कायद्याने भारतीय लोकांना राजकारणात सहभागी होता आले. १८८४ च्या कायद्याने निम्मे सभासद निवडून देण्याचा अधिकार नागरिकांना प्रथमच मिळाला. ङ्कएक्स ऑफिशिओङ्ख सभासदाचा प्रकार रद्द झाला. नॉमिनेटेड सभासदापैकी निम्म्याहून अधिक सरकारी नोकर नसावेत. 'टाऊन व सिटी' हा भेद नाहीसा केला. ३ ऑक्टोबर १८८४ रोजी मलकापूर नगरपालिकेची स्थापना झाली. १८८५ मध्ये नगरपालिकेच्या पहिल्यांदा गुप्त पद्धतीने निवडणुका घेण्यात आल्या. १९०१ च्या 'मुंबई जिल्हा नगरपालिका कायद्यानुसार छोटया शहरातही नगरपालिका स्थापन करण्यात आल्या. सन १९२४ पर्यत स्त्रियांना नगरपालिकेचे सभासद होण्यास बंदी होती. १९२५ च्या 'बॉम्बे म्युनिसिपल बरोज ॲक्ट' नुसार नगरपालिकेला व्यवस्थापनाबाबत अधिक अधिकार प्राप्त झाला. १९३८ साली स्त्री मतदानावरील बंदी उठवून स्त्रियांना मतदान करण्याचा अधिकार मिळाला. १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला. १९४९ च्या ङ्कलोकल फायनान्स इन्कवायरी समितीङ्खच्या अहवालाने स्थनिक स्वराज्य संस्थेची आर्थिक स्थिती मजबूत झाली.

महाराष्ट्रात १९६५ च्या कायद्यान्वये अध्यक्ष व उपाध्यक्षाची निवड प्रतिनिधीकडून होत. परंतु १९७३ च्या कायद्यानुसार अध्यक्ष हा लोकाकडून प्रत्यक्ष निवडला जावू लागला. व उपाध्यक्ष हा अध्यक्षाकडून नेमला जात होता. काही कालावधीनंतर अध्यक्ष व उपाध्यक्ष हा बहुमतप्राप्त नवनिर्वाचित सदस्यामधून निवडले जात होते. सध्या अध्यक्ष हा जनतेतून निवडला जातो आणि उपाध्यक्ष हा बहुमत प्राप्त सदस्यामधून निवडला जातो.

मलकापूर नगरपालिकेची स्थापना ही एक महत्त्वपूर्ण घटना आहे. नगरपालिकेच्या स्थापनेमुळे मलकापूर शहराचा सर्वांगिण विकास होण्यास मदत झाली. हा विकास होण्यास

परिषदेवर निवडून आलेल्या पदाधिकाऱ्यांचा मोलाचा वाटा आहे. तसेच नगरपालिकेतील प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी यांनी केलेल्या कार्यामुळे नगरपालिकेचा विकास होण्यास मदत झाली. शहर विकासातही प्रशासनाने महत्त्वाची भूमिका बजावली आहे. ही नगपरीषद केवळ प्रशासकीय अधिकारी कर्मचाऱ्यांमुळे नावलौकीक झाली. नगरपरिषद प्रशासकीयदृष्टया कार्य कशा पद्धतीने करते हे तिच्या विकासावर अवलंबून असते. नगरपालिकेतील निवडलेल्या लोकप्रतिनिधींनी एखादा कायदा पास केला, नवीन एखादे धोरण निश्चित केले तर त्या कायद्याची व धोरणाची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी ही त्या नगरपालिका प्रशासनावर अवलंबून असते. अशाप्रकारे मलकापूर शहराचा विकास हा नगरपालिकेच्या सुनियंत्रित व कार्यक्षम प्रशासन यंत्रणेमुळे झाला आहे. दैनंदिन कामकाज सुव्यवस्थित चालावे व प्रशासनावर योग्य नियंत्रण राहावे यासाठी नगरपालिकांमध्ये स्थायी समिती व विषय समित्या निर्माण केल्या आहेत. पालिकेतील 'वार्डस समितीङ्कमुळे लोकप्रतिनिधींचा आणि लोकांचा संपर्क वृद्धिंगत होण्यास मदत झाली. स्थायी समिती ही नगरपालिकेची सर्वात महत्त्वाची समिती असून या समितीत एकूण ९ सदस्य असतात. पण मलकापूर नगरपालिकेत एकूण ७ सदस्य आहेत. १९६५ च्या नगरपालिका कायद्यान्वये नगरपालिका प्रशासन सुरळीत व सुनियंत्रित चालविण्यासाठी पालिकेचा प्रशासकीय प्रमुख म्हणून मुख्याधिकारी यांची नेमणुक केली. याबरोबर इंजिनियर्स, आरोग्य अधिकारी, लेखा परीक्षक आणि शिक्षण अधिकारी यांची नेमणूक करण्यात आली. मुख्याधिकारी हा नगरपालिकेचा प्रशासकीय प्रमुख व पदसिद्ध सचिव म्हणून महत्त्वाची कामगिरी पार पाडत आहे.

नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेने मलकापूर शहर विकासाच्या दृष्टीने महत्त्वाचे कार्य केले आहे. त्यामध्ये पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करून सांडपाण्याची व्यवस्था केली वाहतुकीसाठी रस्त्याची सुविधा पुरविली. नागरिकांना स्वच्छताविषयक व दिवाबत्तीची सोय केली. सार्वजनिक आरोग्य व कुटुंब नियोजनात महत्त्वाचे कार्य केले. यावरील घटकांचा विचार करता नगरपालिकेने विकास झालेला दिसतो. लोकशाहीकरण प्रक्रियेला आरंभ करून नगरपालिकेच्या विकासाची कामे करून उच्च शिखर गाठले आहे. मलकापूर नगरपालिकेचे प्रशासन प्रभावी असल्यामुळे शहराचा सर्वांगीण विकास झाला. तसेच शहरातील सर्व विकास कार्यास चालना मिळाली.

शाहूवाडी तालुक्यातील एक प्रमुख बाजारपेठ व मध्यवर्ती ठिकाण म्हणून मलकापूर प्रसिद्ध आहे. मलकापूर कोल्हापूर –रत्नागिरी महामार्गावर असल्याने येथील बाजारपेठेत मोठी उलाढाल होते. तालुक्याच्या पश्चिम डोंगराळ भागातील सुमारे ३७ गावांचा दररोजचा संपर्क या बाजारपेठेशी येतो. हे शहर विविध राजकीय पक्षांचे हालचालीचे प्रमुख केंद्र बनले आहे. मलकापूर शहरात कॉंग्रेस, शेतकरी कामगार पक्ष, शिवसेना, भाजप, राष्ट्रवादी आणि जनसुराज्य इत्यादी पक्षाची कार्यालये आहेत. या पक्षांच्या कार्यालयातून या भागातील स्थानिक स्वराज्य संस्था, नागरी स्थानिक स्वराज्य संस्था आणि विधानसभा व लोकसभेच्या विविध हालचाली होत आहेत.

सन १९६० च्या राज्य पुर्नरचना कायदयानुसार द्वैभाषिक मुंबई राज्याचे विभाजन होऊन महाराष्ट्र आणि गुजरात ही दोन नवीन राज्ये अस्तित्वात आली. १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली. महाराष्ट्र शासनाने सत्तेचे विकेंद्रिकरण करून लोकशाहीचा प्रसार करण्याच्या दृष्टिकोनातून १९६२ साली जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम संमत करून १ मे १९६२ रोजी महाराष्ट्रात पंचायतराजची स्थापना केली. महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम १९६५ अन्वये लहान शहरात नगरपालिका आणि मोठया शहरात महानगरपालिका अस्तित्वात आल्या. सन १८८५ ते १९४७ हा कालखंड राष्ट्रीय कॉंग्रेसच्या स्वातंत्र्य चळवळीचा कालखंड होय. १९४८ रोजी शेतकरी कामगार पक्षाची स्थापना केली. या पक्षाची विचारधारा रूजविण्याचे महत्त्वाचे कार्य प्रा.डॉ.एन.डी.पाटील यांनी केले. मलकापूरच्या सामाजिक, आर्थिक, व शैक्षणिक कार्यात यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. बाळासाहेब ठाकरे यांनी १९ जून १९६६ रोजी मुंबई येथे शिवसेनेची स्थापना केली. पहिल्यापासून मलकापूर भागावर शिवसेनेचा प्रभाव होता. सध्या शाहूवाडी पन्हाळा तालुक्यातून शिवसेना–भाजप पुरस्कृत आमदार सत्यजित पाटील सरूडकर हे विधानसभेवर निवडून गेले. जनता पक्षात फूट पडल्यानंतर १९८० साली भारतीय जनसंघाच्या नेत्यांनी भारतीय जनता पक्ष स्थापन केला. या पक्षाचाही येथे एक गट आहे. १० जून १९९९ रोजी शरद पवार व त्यांच्या सहकाऱ्यांनी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाची स्थापना केली. मलकापूर परिसरात या पक्षाचा स्वतंत्र गट आहे. पण त्यांचा प्रभाव जास्त दिसत नाही

मलकापूर शहराच्या सर्वांगीण विकासासाठी पदाधिकाऱ्यांनी महत्त्वाचे योगदान दिले. मलकापूर नगरपरिषदेचे चेअरमन म्हणून डी.एन.हावळ यांनी शहर विकासात महत्त्वाची कामगिरी केली. सरकारची जागा, गुरांच्या बाजाराकरिता मिळवून दिली. नगरपालिकेच्या इमारतींना पावसाळ्यात पावसापासून धोका पोहचू नये म्हणून नगरपालिकेच्या सर्व इमारतींना झडया लावण्यात आल्या. भाजी मंडईच्या पश्चिमेस असलेली खुली जागा ७२ द ४० अशी असलेली जमीन पालिकेला मिळवून दिली. शहरातील सर्व मुरूमाने रस्ते पक्के करून घेतले. पूर्वी नगरपालिका ऑफिसच्या मागील बाजूस मोकळी जागा होती. ती नगरपालिकेला मिळवून दिली. मलकापूर शहरातील मोटार स्टँडवरील लोकांच्या सोयीकरिता आणि स्वच्छतेसाठी शौचालयाचे बांधकाम केले. अणुस्कुरा रस्त्यावरील धक्याचे बांधकाम करून घेतले. नगरपालिकेच्या सार्वजनिक विहिरी सभोवताली दगडी फरश्या बसविल्या व जुन्या दुरूस्त करून घेतल्या. दत्तू रामा सुतार यांच्याकडून नगरपालिकेच्या सार्वजनिक विहिरीवरील नवीन रहाट बसवले आणि जुन्या रहाटाचे नुतनीकरण करून घेतले. ७ जानेवारी १९५० रोजी कोल्हापूर जिल्हयातील सर्व नगरपालिकेची आर्थिक बाबीविषयी सभा कोल्हापूरात भरली. त्या सभेस मलकापूर नगरपालिकेचे चेअरमन हे उपस्थित राहिले. मलकापूर शहरातील लोकांना नगरपालिकेतर्फे दिवाबत्तीची सोय करण्यात आली. ऑगस्ट १९५० मध्ये मलकापूर हायस्कूल मधील विद्यार्थ्यांना आर्थिक मदत केली. स्मशानभूमीतील शेड इमारतीचे बांधकाम केले. चेअरमन यांनी नगरपालिका ऑफिस कामाकरिता कीर्द व खतावणी तयार करून घेतली. गांधी व्यायाम मंदिर या संस्थेस पंचवीस रूपये मदत केली. नगरपालिका हद्दीतील गटारे चुना, सिमेंट आणि वाळूत पक्की बांधून घेतली. नगरपालिकेच्या विहिरी नजीक धुणे धुण्यासाठी फरशी बसवून घेतली. शहरातील मुख्य रस्त्यावर वृक्षारोपण केले. नगरपरिषदेकडील भंगी, झाडूवाले आणि शिपाई इ. कर्मचाऱ्यांना पावसाळ्याकरिता घोंगडी व छत्र्या वाटप केल्या. शहर स्वच्छतेच्या दृष्टीने महत्त्वाचे कार्य केले. तसेच चेअरमन दत्ता केसरकर यांनी बाजार पेठेतील रस्त्यावर आठवडयातून एक वेळ पाणी मारण्याच्या कामास मंजुरी दिली. शहरातील सुभाष रोडचे आणि त्या रस्त्यावरील गटारीची बांधकामे त्यांच्या कार्यकाळात पूर्ण झाली. या बरोबर चेअरमन पा.ल.मोरे यांनी कुभांर खाणीची व त्या लगतची दक्षिणेकडील दरडा पर्यतची सर्व जागा नगरपालिकेला क्रीडागंणासाठी मिळवून दिली. नगरपालिका इमारतीच्या पश्चिम बाजूकडील गटार काढून त्या ठिकाणी

शहाबादी फरशी बसवून घेतली. शहरात सार्वजनिक ठिकाणी भाजी मंडई आणि जनावरांच्या बाजारात झाडे लावली. यांच्या कार्यकाळात नगरपालिकेच्या विहिरीतील पाणी स्वच्छ करण्यासाठी पोटॅशियम पॅरामॅगनेटचा वापर करण्यात आला. नदीपात्रात कपडे धुन्याकरिता धक्के बांधून घेतले. व्ही.पी.पाटक यांनी नगरपालिकेचे प्रमुख म्हणून काम केले. यांनी पालिकेला एक कृतीशील सौजन्यपूर्ण आणि वैचारिक नेतृत्व दिले. लोकांमध्ये त्यांच्याविषयी आदर व जिव्हाळा होता. नगराध्यक्ष गणपती वारंगे यांनी नगरपालिकेची सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य, बांधकाम, पाणी पुरवठा आणि स्वच्छता विषयी गरज लक्षात घेऊन महत्त्वाचे कार्य केले.

२४ जून १९६७ रोजी मा. मामलेदारसाहेब यांच्या अध्यक्षतेखाली नगराध्यक्ष पदाची निवडणूक झाली. या निवडणूकीत नारायण ज्ञानोबा गांधी यांचा पराभव करून शांताराम वासुदेव वारंगे नगराध्यक्षपदी विराजमान झाले. पूर्वी सार्वजनिक वाचनालयाला दोनशे रूपये अनुदान दिले जात होते. यांनी ते दोन हजार रूपये देण्याची तरतूद केली. कंपोस्ट खताच्या स्किम करिता जागा उपलब्ध करून दिली. शहरातील मुलांना मोफत पोलिओ प्रतिबंधक लसीकरणासाठी एक हजार रूपये खर्च केले. यानंतर नारायण ज्ञानोबा गांधी यांनी १९७० – १९७४ या काळात नगराध्यक्ष म्हणून काम केले. यांनी पालिका कर्मचाऱ्यांना मोफत गणवेश वाटपासाठी ७२६ रूपये खर्च केले. कन्या विद्यामंदिर शाळेतील मुलांना पिण्याच्या पाण्याची सोय करण्यासाठी पन्नास हजार रूपये खर्च केले. शहरात व्ही. टाईप प्रकारची गटारे बांधली. बंडू भिकू खटावकर या बेघराला राहण्यासाठी गायरान जागेतील ४०द४० मापाची जागा मिळवून दिली. शहरातील टाकाऊ कचऱ्यापासून कंपोस्ट खत तयार करण्यास सुरूवात केली. तसेच नगराध्यक्ष जगदीश वारंगे यांनी मलकापूर शहराची पाणी समस्या सोडविण्यासाठी प्रथमच इलेक्ट्रीक मोटारीच्या सहाय्याने पाणी पुरवठा करण्यास सुरूवात केली. शहरात स्वच्छताविषयक कामे करून घेतली. नगराध्यक्ष प्रभाकर रामकृष्ण प्रभावळकर यांच्या कार्यकाळात नरहर मंदिराच्या ठिकाणी सांस्कृतिक धाम बांधला. जनावरांचा बाजार, मार्केट कमिटीच्या ताब्यात देण्यात आला. पी.डब्ल्यू.डी.च्या ताब्यातील 'हत्तीमहल ' इमारत व्यायाम शाळेसाठी उपलब्ध करून दिली. शहरातील शौचालयाचे रूपांतर सेप्टीक शौचालयात करून घेतले. शहरातील टाऊन प्लॅनिंग मधील जागा महिला मंडळासाठी राखीव ठेवली. मंगळवार

पेठेतील धक्का (कट्टा)बांधून घेतला. दलित वस्तीमध्ये अनेक विकासाच्या योजना राबविल्या. भाजी मंडईचे बांधकाम केले. हरिजन वाडयात डॉ.बाबासाहेब आंबेडकर बालवाडी बांधली.

नगराध्यक्ष बी.बी.रूगे यांनी मलकापूरातील आर्थिक दृष्टया दुर्बल व मागासलेल्या घटकातील सांसर्गिक रोगाने त्रस्त असलेल्या रूग्नांना ५० टक्के अनुदानातून मोफत औषधोपचार उपलब्ध करून दिला. महादेव टेकडीवर वृक्षारोपन केले. मलकापूर विकास योजनेतून १६ बेघरांना घरे बांधून दिली. छत्रपती शिवाजी बालमंदिर आणि महिला मंडळास ३०० रूपये अनुदान दिले. नगरपालिका कार्यालयातील नवीन लाईट फिटींग करून घेतली. शताब्दी महोत्सवी सार्वजनिक वाचनालयाला ४००० रूपये अनुदान दिले. ३ ऑक्टोबर १९८४ रोजी बी.बी. रूगे यांच्या कार्यकाळात नगरपरिषदेचा शताब्दी महोत्सव कार्यक्रम साजरा केला. तसेच नगराध्यक्ष शांताराम वासुदेव वारंगे यांनी शहरात स्वच्छताविषयक कार्य केले.

केरबा बापू सोनावले यांचा पराभव करून दिनानाथ शाम सक्रे नगराध्यक्षपदी विराजमान झाले. सार्वजनिक वाचनालय इमारतीस कपांऊड बांधण्यास परवानगी दिली. नगरपालिकेतील छ.शिवाजी सभागृह सुसज्ञ करून घेतले. महादेव टेकडीवर दोन ते तीन हजार रोपांचे वृक्षारोपन केले. यांनी शहर विकासाच्या दृष्टीने सामाजिक, आरोग्य, बांधकाम आणि स्वच्छतेविषयक कार्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. यानंतर नगराध्यक्ष नामदेव लक्ष्मण तांदळे यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाज मंदिराचे बांधकाम केले. मलकापूर शहराला स्ट्रीट लाईट दिवाबत्तीची सोय उपलब्ध करून दिली. कुंभार समाजाला व्यवसायाकरिता पाण्याची टाकी बांधून दिली. भाजी मार्केटजवळ शिवसदन पद्धतीचे सार्वजनिक स्वच्छतागृह बांधले. त्यांच्या कार्यकाळात पाणी समस्या निर्माण झाली त्यावेळी यांनी आठ दिवस टँकरने मोफत पाणी पुरवठा केला. शहरात वृक्षारोपनाचा कार्यक्रम राबविला.

नारायण ज्ञानोबा गांधी यांची बिनविरोध नगराध्यक्षपदी निवड झाली. एस.टी.स्टँण्डवर सांस्कृतिक भवन बांधण्यास परवानगी दिली. तालुक्यातील शेती व पिण्याच्या पाण्यासाठी महत्वाच्या पालेश्वर धरण बांधकामास पन्नास हजार रूपये दिले. नगरपरिषदेकडील डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाज मंदिराचे बांधकाम पूर्ण केले. शहरातील दारिद्र्य रेषेखालील कुटुंबातील व्यक्तींना व्यवसयाकरिता राष्ट्रीयीकृत बँकाकडून कर्जे उपलब्ध करून दिली. तसेच नगराध्यक्ष मोहन कृष्णा लगारे यांनी नगररचना खात्यामार्फत बांधण्यात आलेल्या क्रीडांगण,

भाजी मार्केट, दुकान गाळे व प्राथमिक व माध्यमिक शाळा इमारती बांधकामाचे भूमिपूजन केले. बेघर वसाहतीत सार्वजनिक शौचालय बांधले. बालवाडीतील विद्यार्थ्यांना मोफत गणवेश वाटप केले याबरोबर विष्णु पांडुरंग भिंगार्डे यांना नगराध्यक्ष पदावर काही दिवसच राहता आले.

नगराध्यक्ष गीता प्रभाकर वारंगे यांनी शाळी नदीवर सुधारित पाणीपुरवठा योजना राबवून शहराची पाणी समस्या सोडविली. सार्वजनिक वाचनालयासाठी इमारत बांधण्यास परवानगी दिली. शहरातील विहिरीची रस्त्याची कामे केली. शहरातील व्यावसायिकांना शिस्त लावली. तसेच अनिल भगवान येडगे नगराध्यक्ष यांनी कुंभारांना वीटभट्टी व्यवसायासाठी पाण्याची सुविधा उपलब्ध करून दिली. नगरपालिकेच्या क्रीडांगणाची स्वच्छता व सुशोभिकरण केले. नगराध्यक्ष वासुदेव दत्तात्रय गांधी यांच्या कार्यकाळात मलकापूर हायस्कूल ग्राऊंडजवळ दगडी धक्का बांधला. मलकापूरातील तरूण–तरूणींना रोजगाराची संधी मिळवून दिली. तसेच नगराध्यक्ष गणेश पांडूरंग कोलते यांनी शहराच्या विकासात हातभार लावला. पालिकेचे मटण, मच्छी मार्केट आणि वाचनालये यांचे नकाशे व अंदाजेपत्रके तयार करून घेतली. सुभाष चौकातील कट्टा सुशोभीत केला. मलकापूर नगरपालिकेत युतीचा पहिला नगराध्यक्षपदाचा मान रंगराव घेवदे यांना मिळाला. शहर विकासात दिवाबत्ती, पाणीपुरवठा, वृक्षारोपन आणि बेघरांच्या विकासा–करिता महत्वाची कामे केली. त्यांच्यानंतर रविंद्र पाथरे यांनी युतीच्या कार्यकाळात सर्वात जास्त दिवस नगराध्यक्षपद भूषविले. शहरात दिवाबत्तीची सोय केली. पाणी पुरवठयाकरिता विहिरीवरील रहाट आणि टँकर दुरूस्त करून घेतले. शहरात स्वच्छताविषयक कार्य केले. यांच्यानंतर शामराव कारंडे यांनी नगराध्यक्ष म्हणून काम केले.

नगराध्यक्ष राजू गजानन भोपळे यांच्या कार्यकाळात ग्रामीण रूग्णालय मलकापूर परिसरात वृक्षारोपन करण्यात आले. शहरात संत गाडगे बाबा स्वच्छता नागरी अभियान राबविले. वाढीव पाणीपट्टीस स्थगिती दिली. सिटी सर्व्हे कामाकरिता प्रयत्न केला. शहरातील लोकांना स्वच्छ व मुबलक पाणी मिळावे यासाठी साडेसहा लाखाची पाणी योजना राबविली. विठ्ठल मंदिर व मंगलधामचे सुशोभिकरण केले. शहराच्या स्वच्छतेच्या दृष्टीने सर्व व्यावसायिकांना कचरा कुंडया वाटप केल्या. मलकापूर नगरपालिकेच्या वतीने सामाजिक बांधिलकी म्हणून गरीब व गरजू ११ विद्यार्थ्यिनीना शैक्षणिक मदत या कामाखाली दत्तक घेण्यात आले. नगरपालिकेच्या मटण मार्केट आवारात स्वच्छतेच्या व आरोग्याच्यादृष्टीने दगडी

फरशी बसवून घेतली. शहरातील गटारी व रस्त्याची बांधकामे पूर्ण केली. तसेच नगराध्यक्ष ज्योती प्रकाश शिरगांवकर यांनी प्रशासनाचा निष्काळजीपणा लक्षात आल्यावर पालिका प्रशासनावर कडक कारवाई करण्यास सुरूवात केली. न्यू इंग्लिश स्कूल फॉर गर्ल्स मधील नववीच्या विदयार्थिनींमार्फत 'स्वास्थ्य अभियानांतर्गत' शहरात स्वच्छता करण्यात आली. सुधारित नळ पाणी पुरवठा योजनेअंतर्गत महादेव टेकडीवरील जुन्या नळ पाणी जलसाठयाच्या टाक्याशेजारीच जलशुध्दीकरण केंद्र आणि जलकुंभ उभारण्यात आले. नगरपालिकेची १४ ठिकाणी सार्वजनिक शौचालये असून या ठिकाणी शौचालय 'स्वच्छता मोहिम' राबविली. शहरातील नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने ही मोहिम महत्त्वपूर्ण ठरली. नगरपालिका वर्धापनदिनी विविध स्पर्धांचे आयोजन केले. यांनी स्पर्धेतील विजेत्यांना बक्षीस वितरण आणि बालवाडीतील गरिब होतकरू १८ विद्यार्थ्यांना शालेय गणवेश वाटप केले. तसेच नगराध्यक्ष शामराव कारंडे यांच्या कामाच्या अनुभवाचा शहराच्या विकासाकरिता लाभ झाला. वरील सर्व नगराध्यक्षांनी मलकापूर विकासात महत्त्वपूर्ण योगदान दिले.

मलकापूर नगरपालिकेने उभारलेल्या नागरिकांच्या सेवासुविधांकरीता सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य, पाणीपुरवठा, बांधकाम, महिला व बालकल्याण आणि स्वच्छता विभागातून महत्त्वाची भूमिका बजावली. नगरपालिकेच्या सामाजिक कार्याचा विचार करता पालिकेने पूर्वी शहरात दिवाबत्तीची सोयीकरिता रॉकेलवर चालणाऱ्या कंदिलांची सोय उपलब्ध करून दिली. नंतरच्या काळात कोयना विज प्रकल्पांच्या माध्यमातून निर्माण झालेली विद्युत स्ट्रीट लाईट आणि यावर चालणारे ११६ टयुब, ४७ बल्ब, ३ मर्क्यूरी लँप आणि ३ सोडियम व्हेपर बसवून शहरात दिवाबत्तीची सोय केली. २००९ पासून पवनचक्कीपासून तयार झालेल्या लाईटचा वापर केला जात आहे. लहान मुलांच्या आरोग्याची जबाबदारी म्हणून नगरपालिकेने शहरात 'जिजामाता उद्यान' उपलब्ध करून दिले. या उद्यांनाचा शहरातील लोकांना आरोग्य, मनोरंजन आणि विरंगुळा यादृष्टीने फायदा झाला आहे, आणि शहराच्या सौंदर्यात भर पडत आहे. मलकापूर नगरपालिकेने लोकसंख्येची वाढती गरज लक्षात घेवून जीवनावश्यक सर्व वस्तू एका ठिकाणी उपलब्ध व्हाव्यात यासाठी शहरात भाजी मंडई उभारली. यातून शहरातील तरूणांना रोजगार मिळाला आणि शेतकऱ्यांच्या मालाला बाजारपेठ उपलब्ध झाली. नगरपालिकेने शहरातील सार्वजनिक आरोग्य धोक्यात येवू नये ते सुव्यवस्थित राहण्याकरिता आठ गाळ्याचे

एक मटण मार्कट आणि ३७ गाळयाचे एक मच्छीमार्केट इमारतीचे बांधकाम केले. या मार्केटमधुन मलकापूर नगरपालिकेला चांगले उत्पन्न मिळत आहे. मलकापूर नगरपालिकेने सार्वजनिक स्वच्छतेच्यादृष्टीने शहरात चौदा ठिकाणी शौचालयाची बांधकामे केली आहेत. तसेच शहरात जागोजागी २ व ४ सीटच्या मुताऱ्या बांधल्या आहेत. आरोग्याच्यादृष्टीने १९८३ मध्ये ङ्कपीट टाईप योजनाङ्ख अंतर्गत शहरातील सर्व टोपलीच्या शौचलयाचे जलौघात शौचालयात रूपांतर केले. सध्या शहरातील सर्व खाजगी व सार्वजनिक शौचालये ही सेप्टीक टँक शौचालय स्वरूपात केली आहेत.

समाजातील व्यक्तीचा सर्वांगिण विकास म्हणजे शिक्षण होय. मानवी जीवन परिपूर्ण व्हायचे असेल तर शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही. त्यामुळे शिक्षण हा घटक मानवी जीवनाचे प्रमुख अंग बनून राहिले. व्यक्तीची श्रेष्ठता ही त्याच्या मन व मेंदूवरून ठरविली जाते. म्हणून शिक्षण घेतलेल्या व्यक्तीला ङ्कद्वीजङ्ख म्हणत असत. अशाप्रकारे मलकापूर याठिकाणी १८४४ मध्ये शासकीय शाळा स्थापन झाली. शाळेमुळे मुलांच्या शिक्षणाची चांगली सोय झाली. मलकापूर शहराच्या शैक्षणिक विकासाकरिता रयत शिक्षण संस्थेने येथे एक शाखा स्थापन केली. मलकापूर नगरपालिकेच्या शैक्षणिक कार्याचा आढावा घेतल्यास नगरपरिषद प्राथमिक व माध्यमिक शाळा चालवित नाही. नगरपालिका हद्दीत प्राथमिक शाळा कोल्हापूर जिल्हा परिषदेमार्फत चालविल्या जातात. पण मलकापूर नगरपालिकेला शहरातील प्राथमिक शिक्षणापोटी कर योग्य मूल्याच्या एकूण पाच टक्के रक्कम जिल्हा परिषदेला द्यावी लागते. प्राथमिक शिक्षण वर्गणीवर जिल्हापरिषद १/२ टक्का व्याज आकारते. येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळावर नियंत्रण व देखरेख ठेवण्यासाठी नगरपालिकेत तीन सदस्याची समिती स्थापना केली. या परिसरातील शैक्षणिक गरज लक्षात घेवून रयत शिक्षण संस्थेने १९५६ मध्ये मलकापूर येथे मराठी विद्यामंदिर शाळा स्थापन केली. या शाळेला सदाशिव कोळवणकर आणि केशव कुंभार यांनी जमीन दान दिली. मराठी विद्यामंदिर माध्यमिक शाळेच्या इमारतीमध्ये सन १९७६ पासून उच्च माध्यमिक (ज्यु.कॉलेज) शाळेचे वर्ग सुरू करण्यात आले. तसेच ब्रिटिश अमदानीत आबासाहेब पंतपतिनिधी यांनी १८४४ मध्ये मलकापूर याठिकाणी पहिली मुलींची शाळा सुरू केली. यामुळे मलकापूरच्या विद्यार्थिनींच्या आयुष्यात मोठा बदल झाला. सन १९६७ मध्ये रयत शिक्षण संस्थेच्या कृतीतून शहरात मुलींसाठी स्वतंत्र मराठी माध्यमाची शाळा

सुरू केली. या शाळेतील नववीच्या विद्यार्थिनीमार्फत शहरात ड्ढस्वास्थ्य अभियानड्ढ राबविले जाते. १९९२ मध्ये प्रा.डॉ.एन.डी.पाटील यांच्या प्रेरणेतून आणि राव धोंडी पाटील यांच्या सहकार्यामुळे मलकापूर येथे प्रथम आर्टस, कॉमर्स व सायन्स कॉलेज स्थापन झाले.

मलकापूर नगरपालिकेच्या आरोग्याच्या दृष्टिकोनातून विचार करता पालिकेच्या मालकीचा एकही दवाखाना नाही. पालिका हद्दीत जिल्हा परिषदेचे प्राथमिक आरोग्य केंद्र आहे.. या केंद्राच्या माध्यमातून शहरातील वाढत्या लोकसंख्येला मुलभूत सेवा सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात. पूर्वी वैद्य शहरातील रूग्णांना झाडाच्या मुळी व सालीपासून तयार केलेला ड्ढकाढाड्ढ देत असत, त्यास ड्ढमंत्राड्ढ असेही म्हणत. जिल्हा परिषदेने १९७२ ते २०१० या कालावधीत साथीच्या रोग निर्मूलनाचा मलकापूर शहरातील १७४० लोकांना फायदा दिला. मलकापूर नगरपालिकेने जन्म, मृत्यू आणि उपजत मृत्यू या तीनही बाबीकरिता एकच रजिस्टर ठेवले आहे. सन १९८१–८२ मध्ये मलकापूर नगरपालिकेने राष्ट्रीय कुटुंब कल्याण कार्यक्रमात केलेल्या चांगल्या कार्याबद्दल फिरती ढाल व रोख रूपये २० हजारचे बक्षीस मिळविले. जिल्हा परिषदेमार्फत राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रम, सावित्रीबाई फुले कन्या कल्याण योजना, राष्ट्रीय हिवताप निर्मूलन कार्यक्रम आणि राष्ट्रीय हत्तीरोग निर्मूलन कार्यक्रम शहरात राबविले जातात. जिल्हा परिषदेच्या प्राथमिक आरोग्य केंद्राव्यतिरिक्त मलकापूरात १६ खाजगी दवाखाने कार्यरत आहेत. मलकापूर येथे होमिओपॅथिक दवाखाना व मेडीसीन व्यतिरिक्त शहरात आयुर्वेदिक औषधालयाकरिता 'मोटाळा' प्रसिद्ध आहे. जंगल व डोंगर माथ्यावरील वनस्पतीच्या मुळी व झाड पाल्यापासून धनगरी लोक विविध शारीरिक आजारावर आयुर्वेदिक औषधे देतात. त्यास 'मोटाळा' असे म्हणत. पित्ताशयावरील 'कांदा' औषधाकरिता मलकापूर प्रसिद्ध आहे. अशा या आरोग्याच्या सुविधामुळे मलकापूरातील लोकांचे जीवनमान सुधारण्यास मदत झाली आहे.

अशाप्रकारे मलकापूर शहरात आरोग्य व स्वच्छता याबाबतीत नगरपालिकेने आपले लक्ष पुरविले आहे. नगरपालिकेने कॉलरा, अतिसार, गॅस्ट्रो,हगवण, हिवताप, विषमज्वर, डेंग्यू, प्लेग, देवी, गोवर, धनुर्वात, पोलिओ, डांग्या खोकला आणि घटसर्प इ.रोगांचा समावेश होता. या रोगामुळे अनेक लोक मृत्यूमुखी पडत असल्याने आरोग्य विभागामार्फत सनियंत्रण केले जाते. हे साथीचे आजार येऊ नयेत. यासाठी अगोदरच काळजी घेतली. जिल्हा परिषदेने दवाखान्याची सोय केली. या दवाखान्यात प्रशिक्षित डॉक्टर उपलब्ध केले.

मलकापूर शहराला स्वच्छ पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणे ही नगरपालिकेची प्राथमिक जबाबदारी आहे. पूर्वी नगरपालिकेने विहिरीतून शहराला पाणीपुरवठयाची सोय केली. शहरातील विविध भागातील पाण्याची समस्या सोडविण्यासाठी पालिकेने सोमवार पेठ, मंगळवार पेठ, महादेव टेकडी, भट गल्ली आणि जनावरांच्या बाजारातील विहीर अशा एकूण आठ विहिरी खोदून व त्यावर रहाट बसवून लोकांना पाण्याची सोय करून दिली. शहराच्या आरोग्याच्या व स्वच्छतेच्या दृष्टीने पालिकेमार्फत या विहिरीवर विशेष लक्ष ठेवण्यात आले. कालांतराने नगरपालिकेने वाढत्या लोकसंख्येची गरज लक्षात घेवून १० नोव्हेंबर १९७९ रोजी पासून मलकापूर शहरात कडवी नदीवरील बांधण्यात आलेल्या जॅकवेलमधून पाणी पुरवठयाची सोय केली. शहराला शुद्ध व स्वच्छ मुबलक पाणी पुरवठा करण्यासाठी ब्लिचिंग पावडर व तुरटीचा वापर केला जातो. नगरपालिकेने सामाजिक बांधिलकी म्हणून शहरात ३८ ठिकाणी सार्वजनिक नळ उपलब्ध करून दिले. पाणी पुरवठयाच्या सुविधावर नगरपालिकेने मोठया प्रमाणात खर्च केला. नगरपालिकेने शहराला विशेष करून सार्वजनिक विहिरी, हातपंप आणि जॅकवेल नळ पाणीपुरवठा इत्यादीच्या माध्यमातून पाण्याची सोय केली. शहराची पाणी समस्या सोडविण्यात नगरपालिकेचे मोलाचे योगदान आहे.

मलकापूर विकासामध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यही मोलाचे मानले जाते. या विभागाने शहरात बारमाही रस्ते, पूल, मोऱ्या बांधल्यामुळे शहरातील वाहतूक दळणवळण आणि कुटीर उद्योगात वाढ झाली. तसेच रस्त्यांच्या बांधणी दुरूस्ती आणि डांबरीकरणाला नगरपालिकेने प्राधान्य दिले. याशिवाय शहरात समाज मंदिरे, सभागृहे, वाचनालये, व्यायामशाळा, प्राथमिक शाळा बांधून लोकांना मुलभूत सोयी, सुविधा उपलब्ध करून दिल्या. मलकापूर नगरपालिकेचा विचार करता शहरात एकून ७.५० कि.मी. अंतराचे रस्ते आहेत. या रस्त्याचे बांधकाम नगरपालिकेने सिमेंट, कॉंक्रीट, डांबरी, खडीचे आणि मुरमाचे अशा चार प्रकारात केले आहे. नगरपालिका रस्ता बांधकामावर सर्वात जात खर्च करत आहे. रस्त्याची दुरूस्ती आणि परिरक्षण मलकापूर नगरपालिकेने बांधकाम विभागामार्फत केले जाते. तसेच या विभागाने शहराअंतर्गत रस्ते व गटारीचे बांधकाम केल्यामुळे शहराच्या सुशोभिकरनात वाढ झाली आहे. शहरातील बहुतेक सार्वजनिक व खाजगी शौचालये, मोऱ्या, भुयारी गटारे योजनेमुळे स्वच्छता व आरोग्य यामध्ये क्रांतिकारक बदल झाला आहे. शहरातील सांडपाण्याची

व पावसाच्या पाण्याची विल्हेवाट लावण्यासाठी नगरपालिकेने शहरात ११ कि.मी. अंतराची ङ्कव्ही टाईपङ्क आणि ङ्कभुयारी गटारेङ्क बांधून मोलाचे कार्य केले. शहरातील रस्ते व गटारे साफसफाई करण्यासाठी पालिकेने १३ कामगार ठेवून शहर स्वच्छ व सुंदर ठेवण्यात महत्त्वपूर्ण कार्य केले. या बांधकाम विभागाने शहरात बालकांच्या शैक्षणिक विकासाकरिता बालवाडी, दलितासाठी समाजमंदिर, प्रशासकीय कामाकरिता नगरपालिका इमारत, पालिका कर्मचाऱ्यांना राहण्यासाठी निवासस्थाने तरूणांना व्यवसायाकरिता दुकान गाळे व मार्केट इमारती आणि लोकांना स्वच्छतेसाठी शौचालये व मुताऱ्यांच्या इमारती बांधून पालिकेने मोलाचे कार्य केले. यामुळे शहराच्या सुशोभिकरणात व वैभवात भर पडत आहे.

नगरपालिकेचा महिला व बालकल्याण विभाग हा महिलांच्या सबलीकरणासाठी आणि बालकांच्या कल्याणासाठी प्रयत्नशील असलेला एक महत्त्वाचा विभाग आहे. या विभागामार्फत दारिद्र्य रेषेखालील तसेच विधवा परित्यक्त्या आणि निराधार महिलांच्या सर्वांगिण विकासाकरिता प्रयत्न केला. नगरपालिकेने ङ्कलेक वाचवाङ्क अभियानावर पन्नास हजार रूपये खर्च केला. या अभियानांतर्गत पथनाटय, मेळावे आणि व्याख्यानांच्या माध्यमातून स्त्री जागृती, स्त्री जन्माचे महत्व आणि सामाजिक, धार्मिक, आर्थिक आणि राजकीय क्षेत्रातील स्त्रियांचे महत्त्व पटवून देण्यात नगरपालिकेने महत्त्वाचे कार्य केले. तसेच पालिकेने हळदी–कुंकू कार्यक्रमावर ८५ हजार रूपये खर्च केले. या कार्यक्रमातून स्त्रियांमध्ये सामाजिक एकोपा रहावा सांस्कृतिक परंपरा जपली जावी आणि स्त्रियांच्या विविध समस्या सोडविण्याचा नगरपालिकेने प्रयत्न केला आहे. या कार्यक्रमातून स्त्री संघटना स्त्री नेतृत्त्व उदयास येत आहे. स्त्रियांच्या सुप्तगुणाला वाव देण्यासाठी पालिकेकडून क्रीडा स्पर्धांचे आयोजन केले जाते. नगरपालिकेने महिला व बालकांच्या आरोग्य शिबिरावर बराच खर्च केला. महिलामध्ये स्वयंरोजगाराची भावना वाढविण्यासाठी पालिकेने आयोजित केलेल्या अभ्यास सहली उपयुक्त ठरल्या. महिलांच्या उन्नतीसाठी झटणाऱ्या महिलांना व संस्थांना सवित्रीबाई फुले पुरस्कार अशा अनेकविध योजना यशस्वीपणे अंमलात आणल्या.

मलकापूर शहरातील लोकांना नगरपालिकेमार्फत शौचालयाचे महत्त्व पटवून देण्यात आले. शहरातील नागरिकांसाठी शौचालय व मुताऱ्यांची व्यवस्था केली. शहर स्वच्छतेसाठी नगरपरिषदेने सांडपाण्याची व्यवस्था केली. नगरपालिकेने शहरात कोणत्याही प्रकारचे साथीचे

रोग उदबभवू नयेत. यासाठी शहर स्वच्छतेला प्राधान्य दिले. शहर स्वच्छ व सुंदर व निरोगी राहण्याकरिता शहरातील घनकचरा व घाण गोळा करण्यासाठी शहरात विविध ठिकाणी कचरा कोंडाळे ठेवण्यात आले. तसेच पालिकेने कचरा व मैला यापासून कंपोस्ट खत तयार करण्याची व्यवस्था केली. मलकापूर शहर स्वच्छ ठेवण्यात नगरपालिकेने महत्त्वाचे कार्य केले.

नगरपालिकेने अनेक मुलभूत सेवा सुविधा उपलब्ध करून दिल्याने मलकापूर शहराच्या विकासात भर पडली. एकात्मिक शहराचा विकास घडवून आणण्यासाठी मलकापूर नगरपालिकेने वैशिष्टयपूर्ण कार्य केले. शहरात राजकीय नेतृत्वालाही वाव मिळाला. नगरपालिका प्रशासकीय कार्यालयातून शहरातील जनतेला प्रशासकीय ज्ञान आणि नेतृत्वाची संधी मिळाली. या कार्यालयातून नगरसेवक, पदाधिकारी आणि मुख्याधिकारी यांनी शहरातील नागरिकांच्या समस्या सोडविण्यात महत्त्वाचे कार्य केले. शहरी भागात होणाऱ्या विकास कामात मलकापूर नगरपालिकेचा मोठा वाटा आहे. नगरपालिकेच्या आस्थापना विभागातील एकूण ५२ कर्मचारी मलकापूर जनसेवेसाठी सदैव कार्यरत आहेत. नागरी लोकांच्या सामाजिक, सांस्कृतिक, शारीरिक व मानसिक विकासाची गुरूकिल्ली म्हणजेच नागरी स्थानिक स्वराज्य संस्था होय. अशाप्रकारे प्रशासन ङ्कनैतिक कायदाङ्क आहे आणि प्रशासक म्हणजे ङ्कनैतिकतेचा प्रतिनिधीङ्क आहे.

वाचनालय हे खऱ्या अर्थाने गावाचे वैभव ठरते. ग्रंथाच्या सान्निध्यात जीवन फुलून येते जीवनास नवा अर्थ प्राप्त होतो. कारण सार्वजनिक वाचनालय ही ज्ञानगंगाच असते. या शहराच्या विकासात वाचनालयांनी सामाजिक, धार्मिक, आर्थिक, सांस्कृतिक, कला व क्रीडाविषयक शिक्षणाचे धडे मिळण्यास मदत झाली. समाजात असणारे अज्ञान, अंधश्रद्धा, अस्पृश्यता याला छेद देणारी तरूण पिढी वाचन कौशल्यामुळे निर्माण झाली. वेगवेगळया जाती–धर्मात साजऱ्या केल्या जाणाऱ्या सणाविषयी माहिती मिळण्यास आणि अनिष्ठ चालीरिती रूढी परंपरानांही खीळ बसण्यास मदत झाली आहे. एका अर्थाने वाचनालय हे वैचारिक आणि सामाजिक परिवर्तनाचे केंद्र बनले आहे. शहरी तरूण विद्यार्थ्यांना वाचनालय हे एक वरदान लाभले.

सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजने अंतर्गत मलकापूर परिषदेने दारिद्र्य रेषेखालील महिलांचा आर्थिक विकास साधण्यासाठी व त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी विशेष प्रयत्न म्हणून प्रियदर्शनी समाज विकास संस्था स्थापन करून २५ महिला बचत गट स्थापन केले.

स्त्रियांच्या व्यावसायिक व आर्थिक उन्नतीकरीता मलकापूर नगरपालिकेने महत्त्वाची भूमिका बजावली आहे. मलकापूरच्या महिला बचत गटामुळे मलकापूरचे नावलौकिक होण्यास मदत झाली आहे. मलकापूर नगरपालिकेने शहराच्या विविध भागात शॉपिंग सेंटर सुरू केल्याने तरूणांना रोजगाराची संधी आणि व्यवसाय वाढीला प्रोत्साहन मिळाले. शिवाय नगरपालिकेच्या उत्पन्नातही वाढ झाली. शहराच्या सुशोभिकरणात वाढ होण्यास मदत झाली. तसेच मलकापूर नगरपालिकेने राबविलेल्या नेहरू रोजगार योजनेतून शहरी भागातील तळागाळातील लोकांचे जीवनमान उंचावण्यास मदत झाली. शहरातील दारिद्रयाचे उच्चाटन करण्यास ही योजना अत्यंत उपयोगी आहे. मलकापूर नगरपालिकेच्या कल्याणकारी योजनेतून आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विशेषतः दारिद्रय रेषेखालील लोकांची सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक प्रगती झाली. या योजनेमुळे मागासवर्गीय कुटुंबाचा दर्जा व राहणीमान उंचावण्यास मदत झाली.

मलकापूर नगरपालिकेच्या क्रीडांगण किंवा क्रीडासंकुलामुळे शहरी भागातील मुलांच्या क्रीडावृत्तीस प्रोत्साहन मिळाले. आरोग्याच्यादृष्टीने शहरातील लोकांना या मैदानाचा चांगला उपयोग होत आहे. मलकापूर वासियांना क्रीडांगण हे एक वरदान लाभले आहे.

मलकापूर नगरपालिकेने आर्थिक दुर्बल घटक कल्याणकारी योजनेतून समाज मंदिर बांधले. या मंदिरातून मागासवर्गीयांना प्रौढ शिक्षण व लोकशिक्षणाचे धडे मिळण्यास मदत होते. आधुनिक काळातील समाज मंदिर रूपी वास्तू मागासवर्गीय लोकांच्या वैचारिक उन्नतीमध्ये महत्वपूर्ण ठरली आहे. बालवाडी इमारतीमुळे बालकांचा सर्वांगीण विकास होण्यास मदत झाली. अशाप्रकारे हरिजन वस्तीमधील समाज मंदिर सार्वजनिक कार्यक्रमासाठी आणि अंगणवाडी इमारत शहरी बालकांची शैक्षणिक व आरोग्यविषयक प्रगती साधण्यासाठी उपयुक्त ठरली. तसेच मलकापूर नगरपालिकेच्या घरकुल योजनेचा फायदा शहरी भागातील दारिद्रय रेषेखालील कुटुंबाना निवासस्थानाकरिता होत आहे. आर्थिक दुर्बल घटक योजनेमुळे शहरी आणि ग्रामीण भाग ङ्कझोपडपट्टी व हागणदारी मुक्तङ्क होण्यास मदत झाली.

मलकापूर नगरपालिकेने शहरी भागातील लोकांची मुलभूत गरज लक्षात घेवून शहरातील रस्ता बांधणीवर भर दिला आहे. मलकापूर नगरपालिकेच्या रस्ता बांधणीमुळे मलकापूरातील लोकांची वाहतूक व दळणवळणाच्यादृष्टीने सोय झाली. शहरातंर्गत रस्ते व गटारे, दिवाबत्ती

घरकुल योजना आणि वृक्षारोपन इ.मुळे शहराच्या सुशोभिकरणात वाढ झाली. अशाप्रकारे मलकापूर नगरपालिकेने शहराच्या सामाजिक, राजकीय, धार्मिक, आर्थिक, शैक्षणिक व सांस्कृतिक विकास घडवून आणण्यात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे.

# संदर्भ गंथसूची

## अ) प्राथमिक संदर्भ साधने


**१) मलकापूर नगरपरिषद प्रोसेडिंग :-**

१) मलकापूर नगरपरिषद प्रोसिडींग – सन १९४६

२) मलकापूर नगरपरिषद प्रोसिडींग – सन १९४७

३) मलकापूर नगरपरिषद प्रोसिडींग – सन १९४८

४) मलकापूर नगरपरिषद प्रोसिडींग – सन १९४९

५) मलकापूर नगरपरिषद प्रोसिडींग – सन १९५०

६) मलकापूर नगरपरिषद प्रोसिडींग – सन १९५१

७) मलकापूर नगरपरिषद प्रोसिडींग – सन १९५२

८) मलकापूर नगरपरिषद प्रोसिडींग – सन १९५३

९) मलकापूर नगरपरिषद प्रोसिडींग – सन १९५४

१०) मलकापूर नगरपरिषद प्रोसिडींग – सन १९५५

११) मलकापूर नगरपरिषद प्रोसिडींग – सन १९५८

१२) मलकापूर नगरपरिषद प्रोसिडींग – सन १९५९

१३) मलकापूर नगरपरिषद प्रोसिडींग – सन १९६०

१४) मलकापूर नगरपरिषद प्रोसिडींग – सन १९६१

१५) मलकापूर नगरपरिषद प्रोसिडींग – सन १९६२

१६) मलकापूर नगरपरिषद प्रोसिडींग – सन १९६३

१७) मलकापूर नगरपरिषद प्रोसिडींग – सन १९६७

१८) मलकापूर नगरपरिषद प्रोसिडींग – सन १९६९

१९) मलकापूर नगरपरिषद प्रोसिडींग – सन १९७०

२०) मलकापूर नगरपरिषद प्रोसिडींग – सन १९७१

२१) मलकापूर नगरपरिषद प्रोसिडींग – सन १९७२

२२) मलकापूर नगरपरिषद प्रोसिडींग – सन १९७४

२३) मलकापूर नगरपरिषद प्रोसिडींग – सन १९७८

२४) मलकापूर नगरपरिषद प्रोसिडींग – सन १९७९

२५) मलकापूर नगरपरिषद प्रोसिडींग – सन १९८०

२६) मलकापूर नगरपरिषद प्रोसिडींग – सन १९८१

२७) मलकापूर नगरपरिषद प्रोसिडींग – सन १९८२

२८) मलकापूर नगरपरिषद प्रोसिडींग – सन १९८३

२९) मलकापूर नगरपरिषद प्रोसिडींग – सन १९८४

३०) मलकापूर नगरपरिषद प्रोसिडींग – सन १९८५

३१) मलकापूर नगरपरिषद प्रोसिडींग – सन १९८६

३२) मलकापूर नगरपरिषद प्रोसिडींग – सन १९८७

३३) मलकापूर नगरपरिषद प्रोसिडींग – सन १९८८

३४) मलकापूर नगरपरिषद प्रोसिडींग – सन १९८९

३५) मलकापूर नगरपरिषद प्रोसिडींग – सन १९९०

३६) मलकापूर नगरपरिषद प्रोसिडींग – सन १९९१

३७) मलकापूर नगरपरिषद प्रोसिडींग – सन १९९२

३८) मलकापूर नगरपरिषद प्रोसिडींग – सन १९९३

३९) मलकापूर नगरपरिषद प्रोसिडींग – सन १९९४

४०) मलकापूर नगरपरिषद प्रोसिडींग – सन १९९५

४१) मलकापूर नगरपरिषद प्रोसिडींग – सन १९९६

४२) मलकापूर नगरपरिषद प्रोसिडींग – सन १९९७

४३) मलकापूर नगरपरिषद प्रोसिडींग – सन १९९८

**२) मलकापूर नगरपरिषद वार्षिक तपासणी अहवाल (ऑडिट रिपोर्ट):–**

१) मलकापूर नगरपरिषद वार्षिक तपासणी अहवाल – सन १९८३

२) मलकापूर नगरपरिषद वार्षिक तपासणी अहवाल – सन १९८४

३) मलकापूर नगरपरिषद वार्षिक तपासणी अहवाल – सन १९८५

४) मलकापूर नगरपरिषद वार्षिक तपासणी अहवाल – सन १९८६

५) मलकापूर नगरपरिषद वार्षिक तपासणी अहवाल – सन १९८७

६) मलकापूर नगरपरिषद वार्षिक तपासणी अहवाल – सन १९८८

७) मलकापूर नगरपरिषद वार्षिक तपासणी अहवाल – सन १९८९

८) मलकापूर नगरपरिषद वार्षिक तपासणी अहवाल – सन १९९०

९) मलकापूर नगरपरिषद वार्षिक तपासणी अहवाल – सन १९९२

१०) मलकापूर नगरपरिषद वार्षिक तपासणी अहवाल – सन १९९४

११) मलकापूर नगरपरिषद वार्षिक तपासणी अहवाल – सन १९९५

१२) मलकापूर नगरपरिषद वार्षिक तपासणी अहवाल – सन १९९६

१३) मलकापूर नगरपरिषद वार्षिक तपासणी अहवाल – सन २००९

१४) मलकापूर नगरपरिषद वार्षिक तपासणी अहवाल – सन २०१३

१५) मलकापूर नगरपरिषद, स्थायी समिती सभा, २००२, ठराव क्रमांक, ५, १२, १३, २२, २३

**३) अर्थसंकल्प व अंदाजपत्रक :–**

१) मलकापूर नगरपरिषद अर्थसंकल्प व अंदाजपत्रक – सन २०००

२) मलकापूर नगरपरिषद अर्थसंकल्प व अंदाजपत्रक – सन २००१

३) मलकापूर नगरपरिषद अर्थसंकल्प व अंदाजपत्रक – सन २००२

४) मलकापूर नगरपरिषद अर्थसंकल्प व अंदाजपत्रक – सन २००९

५) मलकापूर नगरपरिषद अर्थसंकल्प व अंदाजपत्रक – सन २०१०

६) मलकापूर नगरपरिषद अर्थसंकल्प व अंदाजपत्रक – सन २०११

७) मलकापूर नगरपरिषद अर्थसंकल्प व अंदाजपत्रक – सन २०१२

८) मलकापूर नगरपरिषद अर्थसंकल्प व अंदाजपत्रक – सन २०१३

९) मलकापूर नगरपरिषद अर्थसंकल्प व अंदाजपत्रक – सन २०१४

**४) शासनाचे गॅझेटियर व इतर साधने :–**

1) Maharashtra state Gazetteer, Kolhapur District, 1960

2) The Imperial Gazetter of India, Provincial Series, Bombay Presidency, Vol.2 Usha Publication, New Delhi, 1985

3) चौधरी कि.का.,कोल्हापूर जिल्हा गॅझेटियर,दर्शनिका विभाग, महाराष्ट्र शासन मुंबई, १९८९

4) महादेव मंदिर टेकडी कोनशिला(१९३५)

5) मलकापूर नगरपालिका, आरोग्य विभाग, मोडी लिपी, फेब्रुवारी १९३२

## ब) दुय्यम संदर्भ साधने :–

### १) मराठी संदर्भ ग्रंथ :–

१) पवार आप्पासाहेब(संपा.), जिजाबाईकालीन कागदपत्रे, कोल्हापूर, १९७८

२) गर्गे स.मा., करवीर रियासत कल्पना मुद्रणालय, पुणे, प्रथमावृत्ती, १९६८

३) मोडक बालाजी प्रभाकर, कोल्हापूर प्रांताचा अर्वाचीन इतिहास,कोल्हापूर,१४ एप्रिल १८८६

४) जोशी(तर्कतीर्थ) लक्ष्मणशास्त्री, मराठी विश्वकोश खंड–८, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, १९७९

५) जोशी व.श. व कायमखाने लिला, महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम, १९६५, ज्ञानदीप प्रकाशन, पुणे, १९९५

६) शिंदे (डॉ.)खंडेराव, कोल्हापूर राज्याचा इतिहास, मंजुळा प्रिटंर्स, कोल्हापूर, जानेवारी १९७४

७) रावबहाद्दूर पी.सी.पाटील, माझ्या आठवणी, मौज प्रकाशन, मुंबई, १९६४

८) शर्मा एन.पी., लोकल सेल्फ गव्हर्मेंट इन इंडिया, हिंद किताब लिमिटेड, मुंबई, १९७४

९) दीक्षित (प्रा.)राजा, प्राचीन आणि मध्ययुगीन भारताचा इतिहास, निराली प्रकाशन, पुणे, २००७

१०) पाटील (डॉ.) वा.भा., स्थानिक स्वराज्य संस्था, प्रशांत पब्लिकेशन्स जळगाव, २००९

११) बंग के.आर., भारतातील स्थानिक स्वशासन, विशेष संदर्भ महाराष्ट्र राज्य नागपूर २००५

१२) शिरसाठ (डॉ.)व बैनाडे भगवानसिंह, भारतीय स्थानिक स्वशासन, औरंगाबाद जून २०१०

१३) ग्रोवर बी.एल., आधुनिक भारताचा इतिहास, एस.चंद आणि कंपनी, लिमिटेड, नवी दिल्ली, २००३

१४) एखेळीकर(डॉ.)रमेश, भारतातील स्थानिक स्वराज्य संस्था, औरंगाबाद, जून १९१९

१५) मलकापूर टाऊन म्युनिसिपालिटी ॲडमिनिस्ट्रेशन रिपोर्ट, सन १८४८, फसली

१६) हेरमन किनेर, द ब्रिटिश सिव्हील सर्व्हिस पे.

१७) लाड मनोहर, सार्वजनिक वाचनालय मलकापूर, जि. कोल्हापूर शताब्दी महोत्सव स्मरणिका, १९८१

१८) जमदाडे पी.यु., ग्रंथालय प्रकार परिचय आणि कार्य, सप्टेंबर २००६

१९) मलकापूर नगरपरिषद महिला बचत गट, २००९

२०) भिडे गजानन, मध्ययुगीन भारताचा इतिहास, फडके प्रकाशन कोल्हापूर, प्रथम आवृत्ती, जुलै २०००

२१) ग्रामीण रूग्णालय, मलकापूर, माहिती पुस्तिका, सन २०११–१२

**२) इंग्रजी संदर्भ ग्रंथ**

1) Chabra G.S., Advanced Study in the History of modern India vol.-II, Sterling pub New Delhi 1971.
2) Maheshwari S.R., Local Govt. in India, Delhi orient Langmoaus, 1971
3) Patil P.C., Regional Survey of economic Resources, India Kolhapur, 1950
4) Prof. Dr.N.D.Patil College, Malkapur, Annual Report 2006-2007
5) Shri Sadashiv Kolvankar's will paper Date- 13/08/1971
6) Schatev D.R., Studies in Indian Administration Kitab Mahat, Allahabad, 1981
7) Raychadra S.C., History of Modern India, Surjeet Pub., 1980
8) Trade oard Way, Administration Its proposal And perfects.
9) Bhagvat Anand Narayan, The History of Pratinidhi family, 1924

## ३) मुलाखती :

१) श्री. गांधी उमेश शामराव, गुरूवार, दि.१६ ऑगस्ट २०१२

२) डॉ पाटील भारत, शुक्रवार, दि. १२ ऑक्टोबर २०१२

३) श्री. पलसनदे शंकर रामचंद्र(सणगर गुरूजी), गुरूवार, दि. १० डिसेंबर २०१५

४) श्री.सप्ताळ बाळू शंकर (व्यावसायिक), गुरूवार, दि.१० डिसेंबर २०१५

५) श्री.गायकवाड निलेश(सेवक), शनिवार, दि. १२ मार्च २०१६

६) श्री.घोरपडे सुरेश विकास(शेतकरी), शुक्रवार, दि. १० मे २०१६

७) सौ.पाटील अर्चना राजेंद्र, मंगळवार, दि. १० मे २०१६

८) श्री.पाटील नारायण केरबा(शेतकरी), रविवार, दि.२८ ऑगस्ट २०१६

९) श्री.शिरगांवकर वसंत गोपाळा, सोमवार, दि.५ डिसेंबर २०१६

## ४) वृत्तपत्रे

१) दैनिक पुढारी, कोल्हापूर, दि.६ नोव्हेंबर १९५९

२) दैनिक पुढारी, कोल्हापूर, दि.६ डिसेंबर १९७०

३) दैनिक पुढारी, कोल्हापूर, दि.६ मे १९७५

४) दैनिक केसरी, कोल्हापूर, दि.२७ डिसेंबर १९८१

५) दैनिक पुढारी, कोल्हापूर, दि.८ ऑक्टोबर १९८४

६) दैनिक पुढारी, कोल्हापूर, दि. ५ नोव्हेंबर १९८५

७) दैनिक पुढारी, कोल्हापूर, दि.१० जून १९९२

८) दैनिक पुढारी, कोल्हापूर, दि.८ सप्टेंबर १९९२

९) दैनिक पुढारी, कोल्हापूर, दि.१४ सप्टेबर १९९२

१०) दैनिक पुढारी, कोल्हापूर, दि.३१ मार्च २००१

११) दैनिक सकाळ, कोल्हापूर, दि. ५ नोव्हेंबर २००१

१२) दैनिक तरूण भारत, कोल्हापूर, दि.१४ डिसेंबर २००१

१३) सा.शाहूवाडी टाइम्स, शाहूवाडी, दि.५ डिसेंबर २००१

१४) दैनिक पुढारी कोल्हापूर, दि.३० एप्रिल २००२

१५) दैनिक लोकसत्ता, कोल्हापूर, दि.१४ डिसेंबर २००१

१६) दैनिक सकाळ, कोल्हापूर, दि.३० जानेवारी २००५
१७) दैनिक सकाळ, कोल्हापूर, दि.७ फेब्रुवारी २००५
१८) दैनिक पुढारी, कोल्हापूर, दि.१८ जानेवारी २००७
१९) दैनिक सकाळ, कोल्हापूर, दि.२३ जुलै २००७
२०) दैनिक लोकमत, कोल्हापूर, दि.१९ मार्च २०१५

## परिशिष्टे १



शतक महोत्सवी
मलकापूर नगरपरिषद मलकापूर
माननीय नगराध्यक्ष कालावधी
अ.क्र. नगराध्यक्षांचे नांव कालावधी
१ श्री.व्ही.पी.फाटक १-४-१९५९ ते ४-१-१९६२
२ श्री.गणपत्री रामशेठ वारंगे ५-१-१९६२ ते १४-६-१९६६
३ श्री.शांताराम वासुदेव वारंगे १-४-१९६८ ते २५-११-१९७०
४ श्री.नारायण ज्ञानोबा गांधी ५-१२-१९७० ते १६-१२-१९७४
५ श्री.जगदीश गणपतीशेठ वारंगे १७-१२-१९७४ ते १८-५-१९७६
६ श्री.प्रभाकर रामकृष्ण प्रभावळकर २०-५-१९७८ ते १३-३-१९८०
७ श्री.शांताराम वासुदेव वारंगे ११-५-१९८५ ते ४-८-१९८५
८ श्री.दिनानाथ शाम सक्रे ५-८-१९८५ ते ३०-११-१९८७
९ श्री.नामदेव लक्ष्मण तांदळे ३०-१२-१९८७ ते ६-४-१९८९
१० श्री.नारायण ज्ञानोबा गांधी २०-४-१९८९ ते २४-४-१९९०
११ श्री.मोहन कृष्णा लगारे ८-९-१९९० ते २४-७-१९९१
१२ श्री.विष्णू पांडुरंग भिंगार्डे २५-७-१९९१ ते १६-१२-१९९१
१३ गिता प्रभाकर वारंगे १७-१२-१९९१ ते २५-५-१९९३
१४ अनिल भगवान येडगे १०-६-१९९३ ते ११-१०-१९९४
१५ सौ.सुशिला वसंतराव नागवेकर २८-५-१९९५ ते २७-५-१९९६
१६ श्री.वासुदेव दत्तात्रय गांधी २८-५-१९९६ ते १६-१२-१९९६
१७ श्री.गणेश पांडुरंग कोलते १७-१२-१९९६ ते २७-५-१९९७
१८ श्री.रंगराव तुकाराम घेवदे २८-५-१९९७ ते २६-५-१९९८
१९ श्री.रविंद्र महादेव पाथरे २७-५-१९९८ ते ६-९-२००१
अ.क्र. नगराध्यक्षांचे नांव कालावधी
२० श्री. शामराव दौलू कारंडे ०७/०९/२००१ ते १६/१२/२००१
२१ श्री. राजू गजानन भोपळे १७/१२/२००१ ते १६/१२/२००६
२२ सौ. ज्योती प्रकाश शिरगांवकर १७/१२/२००६ ते २५/१२/२००८
२३ सौ. स्वाती महेश बंके २६/१२/२००८ ते १५/०६/२००९
२४ श्री. शामराव दौलू कारंडे २०/०६/२००९ ते १६/१२/२०११
२५ सौ.शोभा सदानंद मिरजकर १७/१२/२०११ ते २९/४/२०१३
२६ श्री.डी.एस कुंभार तहसिलदार प्रभारी ३०/४/२०१३ ते ६/५/२०१३
२७ सौ.शुभांगी नानासो कोकरे देसाई ७/५/२०१३ ते १९/२/२०१४
२८ सौ.जयश्री सागर ढोणे २०/२/२०१४ ते १४/७२०१४
२९ श्री.वावासो तातोवा पाटील १५/७/२०१४ ते १६/१२/२०१६
३० श्री.अमोल मधुकर केसरकर १७/१२/२०१६

**मलकापूर नगरपरिषद नगराध्यक्ष यादी (सन १९५९ ते २०१६)**

**परिशिष्टे २**





**मलकापूर येथील महादेव टेकडीवरील मंदिराची कोनशिला (१९३५)**

कोनशिलेवरील लेख :श्री सदरहू देवालयाचा जिर्णोद्धार श्रीमंत राजश्री आबाजीराव कृष्ण पंडित पंत प्रतिनिधीसाहेब विशाळगड यांचे आज्ञेवरून कृष्णाजी बाबाजी गंभीर याचे इच्छेप्रमाणे त्यांचे कापशी अन्नछत्र संस्थेतून करणेत आला आहे .

कोनशिलेवरील लेखाचा अर्थ :- टेकडीवरील महादेव टेकडीवरील महादेव मंदिराचा जिर्णोद्धार सन १९३५ मध्ये श्रीमंत राजश्री आबाजीराव कृष्ण पंडित पंत प्रतिनिधीसाहेब विशाळगड यांचे

आज्ञेवरून कृष्णाजी बाबाजी गंभीर याचे इच्छेप्रमाणे त्यांचे कापशी अन्नछत्र संस्थेमार्फत करणेत आला होता त्याची माहिती या कोनशिलेतून मिळते.

## परिशिष्टे ३



## सन १९३२ मध्ये मलकापूर शहरात विषमज्वर रोगाची साथ पसरल्यानंतर ती आटोक्यात आणण्यासाठी नगरपालिकेने प्रोसेंडिगमध्ये केलेली नोंद

## परिशिष्टे ४



# मलकापूर वाचनालय
# इमारत विस्ताराची माग

शाहूवाडी, दि. ७ (वार्ताहर) : १११ वर्षांपूर्वी स्थापन झालेल्या विशाळगड जहागिरीची राजधानी व कोकणची बाजारपेठ म्हणून प्रसिद्ध असलेल्या मलकापूरसारख्या छोट्याशा नगरीत सार्वजनिक वाचनालय भव्य इमारतीच्या प्रतीक्षेत तग धरून उ आहे.

१८८१ पासून या संस्थेला अतिशय विकट वाटेने मार्ग आक्रमावा लागला आहे. सुमार ७० वर्षे अनुदानाखेरीज अल्पशा उत्पन्नामध्ये हे ज्ञान गंगारुपी वाचनालय तग धरून होते. नंतरची २०वर्षे (इ.स. १९५१ ते ७१) पर्यंत वाचनालय अल्प अनुदानावर हळू हळू प्रगतीकडे वाटचाल करीत होते. सन १९७१ नंतर मात्र शासकीय अनुदान व नगरपरिषद यांच्याकडून काहीशा समाधानकारक मिळणाऱ्या अनुदानामुळे या संस्थेला चांगले दिवस दिसू लागले. सन ७१ ते ८१ या कालखंडात संस्थेला 'ब' वर्ग तालुका वाचनालय म्हणून मान्यता मिळाली

आज ही वास्तू जनता जनार्दनाच्या सक्रिय सहाय्यावर व आशीर्वादावर जनतेची ज्ञान मनोरंजनात्मक सेवा करीत आहे. गेल्या १११ वर्षाच्या मानाने संस्थेचा विस्तार वटवृक्षाप्रमाणे विस्तारलेला आहे. शेकडो वर्षांपूर्वीचे साहित्य कथा, कादंबरी, मासिके, ग्रंथ जागे अभावी एका बंद खोलीत

--धूळ खात पडलेले दिसून
वाचकांना जास्त वेळ
अनेक अडचणी संस्थेसमोर
यातच भर म्हणून
वाचनालयाच्या दारात
तर शेजारच्या जागेत
आहे.

वाचनालयाच्या
चालल्या आहेत.
सुरळीत होण्याच्या दृष्टीने
फारच अपुरी पडते.
विभाग, वाचकांची बैठक
विद्यार्थ्यांच्याकरिता
सोयी होणे गरजेचे आहे.
एक मजली इमारत दोन
अशी आम जनतेची मागणी


* पेठवडगाव, दि. ७
तळसंदे (ता. हातकणंगले)
नवजीवन सहकारी दूध
वर्धापनदिनानिमित्त
वासरांच्या मेळाव्यात
सहभाग होता.

## कष्टाळू महिल
## कामगारांची स्थित

वॉशिंग्टन, दि. ७
जगातील बहुतेक
प्रांतीमधील महिला
अधिक कठोर

दैनिक पुढारी दि.८ सप्टेंबर १९९२ रोजी मलकापूर नगरवाचनालयासंबंधी प्रसारित झालेली बातमी

परिशिष्टे ५



# शे. का. पक्ष
## कार्यकर्त्यांचा मेळावा

मलकापूर, ता. ४– शाहूवाडी तालुक्यातील शेतकरी कामगार पक्षाच्या कार्यकर्त्यांचा व्यापक मेळावा मलकापूर येथील नरसिंह मंदिरामध्ये भाई शंकरराव कुंभार यांच्या अध्यक्षतेखाली झाली. या मेळाव्याला सातशे कार्यकर्ते आले होते.

पालेश्वर धरण झाले पाहिजे. अणस्कुरा घाट फोडून रस्ता केला पाहिजे, मागील त्याला काम आणि केलेल्या कामाचे योग्य ते दाम मिळाले पाहिजे. या भागात कॉलेज निघाले पाहिजे, माणसी १२ किलो धान्य मिळाले पाहिजे इत्यादी मागण्या ठरावाने करण्यात आल्या. आणि या मागण्या मिळविण्यासाठी चळवळीचा कार्यक्रमहि या मेळाव्यात आखण्यात आला. या मागण्या मिळविण्यासाठी करावयाच्या लढ्याच्यासंबंधी पक्षाचे जेष्ठ नेते भाई दाजीबा देसाई, भाई डी. एस. नार्वेकर, भाई राम पाटील, भाई कृष्णा पाटील भोगाव यांनी मार्गदर्शन केले.

सायंकाळी ६॥ वा. सुभाष चौकात म्यु. कौन्सीलर श्री. प्रभावळकर मास्तर यांच्या अध्यक्षतेखाली जाहीर सभा झाली. या सभेत मेळाव्यांत घेण्यात आलेल्या निर्णयावर भाई दाजीबा देसाई डी. एस. नार्वेकर माजी आमदार राऊ पाटील आणि शंकरराव कुंभार यांची भाषणे झाली

**दैनिक पुढारी दि. ६ मे १९७५ रोजी मलकापूर येथील शेका पक्षाच्या कार्यकर्त्याच्या मेळाव्याविषयी बातमी प्रसिद्ध करण्यात आली होती.**

**परिशिष्टे ६**

दै. सकाळ ३० जानेवारी 2005





राजू भोपळे, प्रकाश शिरगांवकर, बबन सणगर, बाबासाहेब पाटील, विश्वास लोखंडे, सुचिता महाडिक


# मलकापूर नगरपालिकेच्या विषय समितींच्या निवडी

## विरोधी गटाला प्रतिनिधित्व

सकाळ वृत्तसेवा

मलकापूर, ता. ३० : येथील नगरपालिकेच्या विविध विषय समितींच्या सभापती व सदस्यांची निवड प्रक्रिया काल मतदानाने झाली. मतदान झाल्याने बावीसपैकी केवळ चार सदस्य असणाऱ्या विरोधी शिवसेना-भाजप युतीला सर्वच समित्यांमध्ये प्रतिनिधित्व मिळाले. सत्ताधारी नगर विकास आघाडीचे दोन सदस्य गैरहजर होते. अन्य दोन स्वीकृत सदस्यांना समितींच्या निवडीमध्ये भाग घेता येत नाही. त्यामुळे सोळा सदस्यांचे बहुमत असतानाही बारा सदस्यांनीच मतदान प्रक्रियेत भाग घेतला. शिवाय मतदानात उमेदवारांना पसंती क्रमांक देताना आघाडीच्या काही सदस्यांच्या चुका झाल्या. त्यामुळे विरोधी शिवसेना-भाजप गटाला समित्यांमध्ये प्रतिनिधित्व मिळविणे शक्य झाले.

विविध समित्या सभापती व सदस्य असे : स्थायी समिती सभापती- राजू गजानन भोपळे, सदस्य- बाळासाहेब तातोबा पाटील, विश्वास गणपती लोखंडे, बबन आनंदा सणगर, प्रकाश श्रीकृष्ण शिरगावकर, सौ. सुचिता राजेंद्र महाडिक, सार्वजनिक बांधकाम समिती- बबन आनंदा सणगर (सभापती), उमेश शामराव गांधी, शुभांगी सुदेश गांधी (सदस्य), सार्वजनिक आरोग्य समिती- प्रकाश श्रीकृष्ण शिरगावकर (सभापती), प्रल्हाद राजाराम पळसे, जयश्री नंदकुमार घेवदे (सदस्य), शिक्षण समिती- विश्वास गणपती लोखंडे (सभापती), उमेश शामराव गांधी, शामराव दौलू कारंडे (सदस्य), पाणीपुरवठा समिती- बाळासाहेब तातोबा पाटील (सभापती), प्रल्हाद राजाराम पळसे, शेखर दत्तात्रय नागवेकर (सदस्य), महिला व बालकल्याण समिती- सुचिता राजेंद्र महाडिक (सभापती), आशा प्रकाश भिंगार्डे (उपसभापती), माधवी मुरलीधर मिरजकर, जयश्री नंदकुमार घेवदे (सदस्य).




**शाहूवाडी तालुका नकाशा**





**मलकापूर शहराचा नकाशा**



**श्रीमंत परशुराम त्रिंबक उर्फ आबासाहेब पंतप्रतिनिधी**




**मलकापूर नगरपरिषद कार्यालय (नवीन इमारत)**



पंतप्रतिनिधीचा राजवाडा



शिवाजी स्टेडियम




नगरपरिषदेचे कर्मचारी□सन २००२२००३□



आरोग्य विभागाचे उद्‌घाटन करताना नगराध्यक्षा सौ.गीता वारंगे



जॅकवेल □पाणी भूमीपूजन प्रसंग□



समाजमंदिर उद्घाटन प्रसंगी मार्गदर्शन करताना नगराध्यक्षा सौ. गिता वारंगे




**कन्या विद्यामंदिर मलकापूर**




**मलकापूर हायस्कूल मलकापूर**




श्री • विठ्ठल मंदिर मलकापूर



श्री • महादेव मंदिर मलकापूर



श्री • महादेव मंदिर मलकापूर



श्री • हनुमान मंदिर मलकापूर